रहस्य. भय. गूढ. प्रेम. विज्ञान. थरार.

अज्ञाताच्या वाटेवर...

(कथासंग्रह)

लेखक: निमिष सोनार

अज्ञाताच्या वाटेवर...

(कथासंग्रह)

निमिष सोनार

ई साहित्य प्रतिष्ठान

अज्ञाताच्या वाटेवर... (कथासंग्रह)

लेखक: निमिष सोनार
फ्लॅट नं- 507, "साई ब्लॉसम",
सर्व्हे नं- 17/1A, तुषार पार्क,
माधव नगर, (गुडविल स्क्वेअर बिल्डिंगजवळ)
धानोरी, पुणे- 411015

फ़ोन नंबर: 9763793199

ब्लॉग: http://nimishkrut.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत

400604

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन: १४ जानेवारी २०२६

© esahity Pratishthan®2026

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

देणगी मूल्य- रु. २६०/- फक्त संपर्क- निमिष सोनार 9763793199

(१००% रक्कम लेखकांकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)

लेखकाचे मनोगत

मी व्यवसायाने आयटी आणि टेलिकॉम क्षेत्रात विविध खासगी कंपनीत गेली 22 वर्षे कार्यरत आहे. तथापि, वाचन आणि लेखन हा माझा शालेय जीवनापासून छंद आहे. माझ्या घरात वाचन किंवा लेखनाची परंपरा किंवा साहित्यिक परंपरा नाही. माझी ती आवड हळूहळू आणि आपोआप निर्माण झाली, त्याचे कारण म्हणजे मूळचे माझे संवेदनशील आणि सौंदर्यदृष्टी असलेले रसिक मन.

लेखक हा संवेदनशील असला पाहिजे, तेव्हाच तो स्वतःसोबत इतरांच्या भावनाही तितक्याच ताकदीने शब्दांत मांडू शकतो. तसेच लेखक हा, कुणाच्या (व्यक्ती, पक्ष किंवा संघटनेच्या) दबावाखाली येऊन त्यांना सोयीस्कर असे लिहिणारा नसावा आणि त्यांच्या दबावाखाली येऊन लिहिलेले बदलणारा सुद्धा नसावा!

पुढे माझे मामा श्री. प्रशांत बाळापुरे यांच्यामुळे मला ही सर्व साहित्य जगताची गोडी वाढली. त्यांच्याकडून वाचनप्रेरणा मिळाली. त्यांच्या घरी असलेल्या वैयक्तिक लायब्ररीतून अनेक पुस्तकांची ओळख झाली. मग मी विविध वर्तमानपत्रात लिहायला लागलो. माझाही पुस्तक संग्रह वाढत गेला. हळूहळू कादंबरी आणि कथालेखनाची आवड निर्माण झाली. ललित लेखन सुद्धा मी बरेच केले आहे. विविध दिवाळी अंकात माझ्या कथा आणि लेख छापून येत असतात. काही ठराविक दिवाळी अंक दरवर्षी मी नियमित विकत घेऊन वाचतो. लेखन आणि वाचनाखालोखाल मी व्यंगचित्रे आणि स्केचिंग करतो.

ई साहित्य, ॲमेझॉन, मायबोली, वॅटपॅड, प्रतिलिपी आणि इतर विविध प्लॅटफॉर्मवर माझ्या आतापर्यंत ५० कथा, दोन कथासंग्रह आणि जलजीवा, वलय, डिटेक्टिव्ह निगेटिव्ह, क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन, ये ना साजणा या मराठी कादंबऱ्या आणि फ्लिटिंग लवर्स ही इंग्रजी कादंबरी प्रकाशित झाले आहेत. तसेच महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब तर्फे आणि मिलिंद गुणाजी यांच्या हस्ते ऑगस्ट २०२५ मध्ये प्रकाशित झालेले "आमच्या ट्रिपची गोष्ट" या पुस्तकातसुद्धा माझे "सातारा आणि सज्जनगड" याचे प्रवासवर्णन छापून आलेले आहे. महाराष्ट्र टाईम्स तर्फे या पुस्तकात लिहिण्यासाठी मला आमंत्रण देण्यात आले होते. मी "अर्थ मराठी" प्रकाशनाच्या अभिषेक ठमके यांनी

संस्थापित केलेल्या "आरंभ" या मासिकाचा एक वर्ष संपादक होतो. मला धार्मिक, विज्ञान, प्रेमकथा, फॅन्टसी, ऐतिहासिक, काल्पनिक, हॉरर, विनोदी आणि प्रवासवर्णन हे प्रकार वाचायला आणि लिहायला आवडतात. आताशा मी प्रेम या विषयावर चारोळी लिहित असतो. त्यासाठी मी एआयची मदत घेतो. तसेच व्यंगचित्रे काढण्यासाठी सुद्धा. मी मराठी आणि इंग्रजी साहित्य नियमित वाचतो. माझे आवडीचे लेखक आहेत, व. पु. काळे, सुहास शिरवळकर, नारायण धारप, रत्नाकर मतकरी, मुकुंद टाकसाळे, सौरभ वागळे, मेधा इनामदार, मीना प्रभु, गो. नि. दांडेकर, वि. स. वाळिंबे, रणजीत देसाई, इंद्रायणी सावकार, डॉ. अंजली जोशी, सिडनी शेल्डन, शोभा डे, डॅनियल हर्स्ट, डॅन ब्राऊन, जे. के. रोलिंग, आयर्विंग वॅलेस, सुदीप नगरकर, चेतन भगत इत्यादी.

ई साहित्यने अनेक नवोदित लेखक मंडळींना उजेडात आणले आहेत हे निर्विवाद सत्य आहे आणि त्यांच्यातर्फे आतापर्यंत माझ्या अनेक कादंबऱ्या प्रकाशित केल्या आहेत, याबद्दल त्यांचे मनापासून आभार. या वर्षी "बुद्धिबळातील साप", "क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन" नंतर ई साहित्यतर्फे माझा "अज्ञाताच्या वाटेवर" हा कथासंग्रह प्रकाशित होताना मला मनापासून आनंद होत आहे. हा रहस्य, भय, गूढ, प्रेम, विज्ञान आणि थरार या विषयाला वाहिलेल्या 20 कथांचा संग्रह आहे आणि तो आपणास नक्की आवडेल अशी आशा आहे. या कथा फक्त मनोरंजनसाठी लिहिल्या असून त्याद्वारे मी कोणत्याही अंधश्रद्धदेचे समर्थन करत नाही. चला तर मग! जास्त वेळ न दडवता अज्ञाताच्या वाटेवर प्रवास सुरू करा आणि आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा!

धन्यवाद.
आपलाच लेखक,
निमिष सोनार, पुणे

निमिष सोनार यांचे ई साहित्य:

कादंबऱ्या: (मराठी) जलजीवा, वलय, डिटेक्टिव्ह निगेटिव्ह, बुद्धिबळातील साप, क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन, ये ना साजणा
(इंग्रजी) फ्लिटिंग लवर्स
कथा: 50 च्या वर
कथासंग्रह: अज्ञाताच्या वाटेवर, रंजक बोधकथा
अनेक वर्तमानपत्रे आणि दिवाळी अंकात लिखाण

मान्यवरांच्या आणि वाचकांच्या प्रतिक्रिया

"वा. तुमच्या काल्पनशक्तीचं खूप कौतुक वाटतं. तुमच्या सर्व कथा छान आणि वेगळ्या आहेत!" - मेधा इनामदार (लेखिका), कोथरूड, पुणे (सर्व कथा)

"भयचकित करणारी वातावरण निर्मिती. तुमच्या कथा छान असतात."
- स्वाती दाढे (लेखिका) (सर्व कथा)

"छान कथा आहे!" - सौरभ वागळे (लेखक) (व्हायरल माइंड)

"अप्रतिम! अगदी झकास लिहिली आहे. याची शॉर्ट फिल्म वर्जन एखाद्या ओटीटीवर बघण्यात मजा येईल. सुरुवातीस हॉरर वाटणारी कथा, पुढे हलका फुलका मध्य आणि शेवटचा ताण उत्सुकता वाढवणारा! तुमच्या कल्पक मेंदूस सलाम!"
- ब्लु कोलंबस, बंगरुळू (आम्हाला न्याय हवा)

"भन्नाट. मजा आली. लेखकांनी आता तरी जाग व्हावं. पाऊस सुरू होऊन लोकलमध्ये अडकण्याचे दिवस आता जवळ आलेत. ह्यापूर्वी काही लेखक कायमचे गायब झालेत, त्याचा उलगडा झाला!" -महेंद्र वागळे, कॅलिफोर्निया (आम्हाला न्याय हवा)

"अरे वा. छान गोष्ट! निमिषजी सध्या फॉर्ममध्ये आहेत. भारी कथा लिहीत आहेत!"
- पल्लवी कुलकर्णी, पुणे (परतफेड, हनी पॉट)

"हा तर जणू एक् चित्रपटच होता. नया दौर सारखा!"

- ऋन्मेष, मुंबई (माईक आणि ब्रश: एक प्रेमकथा)

"कथा आवडली. मी गडचिरोली येथे असताना जवळपास सेम अनुभव घेतला आहे. फक्त तिथे बाहुली नव्हती. दुसरे कुणीतरी होते!"
- ऋन्मेष, मुंबई (खेळ तर आता सुरू झाला आहे)

"शेवटचा सस्पेन्स ठेवून एकदम हॉलीवूड मुव्ही पाहतोय असे वाटले. छान झालंय सर्व कथानक!" - अनिकेत, ठाणे (पाच गुफांचा खजिना)

"छान कथा. मुंज्या पिक्चरची आठवण झाली!"
- रूपा धारप, अमेरिका (झाडवरचा टमक्या)

"कथा, कल्पना छान आहे. वाचायला आवडली. चांगले कथाबीज होते नि तळघरातला प्रसंग पण नीट जमत होता. शेवट थोडा अजून खुलवला असता तर अजून जास्त मजा आली असती असे वाटते!" - रूपा धारप, अमेरिका (तळघर)

"तुमची ही कथा आवडली. त्या मुंबईच्या पुराच्या नकोशा आठवणी जाग्या झाल्या. चित्रण उत्तम आहे. शेवट थोडा प्रेडिक्टेबल होता. पण असेच लिहीत रहा. दमदार कथानक!"
- रघु आचार्य (इंटरव्ह्यू गेला पाण्यात)

"तुमच्या बऱ्याच कथा मी वाचते. चित्राची कल्पना अफलातून आहे."
- सुनीता रागेश्री (पडक्या बंगल्यातील रात्र)

"चांगला प्रयत्न. अस्सल कथाबीज आहे."

- सुनीता रागेश्री (फुलपाखरू, व्हायरल माइंड)

"चांगली कथा. आवडली. तुमच्या कथा अश्या छोट्या व छान असतात. पटकन वाचून होतात. उगाच फापटपसारा नसतो." - योगेश, ऑस्लो, नॉर्वे (कर्माची ढाल)

“छान मस्त. कथा आवडली. सुंदर संकल्पना आहे. थोडा अजून कल्पनाविस्तार करून एक छान दीर्घकथा तयार होऊ शकेल.” - अभिषेक पुणेकर (काळभेट)

“खूप छान कथा. रंजकतेसोबत मन हळवं करणारी. निमिष सर तुमच्या कथा खूप छान असतात!” - दीपाली भदाणे, धुळे (काळभेट)

अर्पणपत्रिका

भय,

गूढ,

रहस्य,

विज्ञान,

प्रेम

आणि थरार

आवडणाऱ्या

लहान थोर सर्वांना

समर्पित

अनुक्रमणिका

१. खेळ तर आता सुरू झाला आहे! 122
२. परतफेड 155
३. माईक आणि ब्रश: एक प्रेमकथा 266
४. हनी पॉट 41
५. पाच गुफांचा खजिना 50
६. अनोळखी चेहरे 88
७. पाठलाग 105
८. झाडावरचा टमक्या 115
९. इंटरव्ह्यू गेला पाण्यात 122
१०. चंद्रावरचा एकटा प्रवासी 132
११. आम्हाला न्याय हवा! 144
१२. तळघर 157
१३. जंगलातील भ्रम 168
१४. पडक्या बंगल्यातील रात्र 175
१५ . नियती 180
१६. मानवमित्र सातू 189
१७. कर्माची ढाल 197
१८. काळभेट 203
१९ . फुलपाखरू 206
२०. व्हायरल माइंड 212

१. खेळ तर आता सुरू झाला आहे!

राजेश त्याच्या खोलीत एकटा बेडवर बसला होता कारण त्याचे खोलीतील दोन्ही मित्र दोन दिवसांसाठी बाहेरगावी गेले होते. रात्रीचे अंधारलेले क्षण खोलीत पसरले होते कारण लाईट गेलेले होते. त्याला एकटेपण सहन होत नव्हते. तो फक्त घड्याळाची टिकटिक ऐकत होता.

झोप येत नव्हती आणि बाहेर वादळ आणि ढगांचा गडगडाट होत होता. काही वेळानंतर एक जोरात वीज चमकली. "कुणीतरी माझ्या सोबतीला असते तर किती बरे झाले असते. दोन्ही मित्र असते तर त्यांच्यासोबत एखादा खेळ खेळलो असतो. पण त्यांना येणे शक्य नाही", असे त्याला एकसारखे वाटत होते. मनातल्या मनात हाच विचार तो अनेक वेळा करत होता. मोबाइल तरी किती वेळ पाहणार? कॉलेजमध्ये शिकवून संपले होते आणि आता फक्त परीक्षेसाठी अभ्यासाची सुटी होती. आजचा अभ्यासही झाला होता. रात्रीचे जेवण सुद्धा झालेले होते. पण त्याला झोप येत नव्हती.

अचानक, खिडकी आपोआप उघडली आणि खिडकीतून थंड गार हवा वाहू लागली. सगळी खोली थंडगार झाली. त्याने खिडकी बंद करण्याचा प्रयत्न केला पण वाऱ्याचा जोर इतका होतो की खिडकी बंदच होत नव्हती. त्याने खिडकी बंद करण्याचा नाद सोडून दिला.

थोड्या वेळानंतर पावसाचा जोर कमी झाला त्यामुळे राजेशने खिडकी बंद करून टाकली. मात्र खिडकी जवळचा बराचसा भाग ओला झाला होता.

आता रूम मध्ये भयाण शांतता पसरली.

अचानक राजेशला काहीतरी हालचाल झाल्याचा आवाज आला. जणू काही, एखादा टणक पुतळा जीवंत झाल्यासारखा पण झोपलेल्या अवस्थेत हळूहळू जमिनीवरून सरकत आहे किंवा रांगतो आहे. आता तो आवाज खूप जोराने यायला

लागला. क्षणभर असे वाटत होते की, कुणी एखादी कुऱ्हाड जमिनीवर दाबून सरकवत आहे.

राजेशने नजर फिरवली, पण खोलीत कुणीच नव्हतं. त्याचं हृदय जोरात धडधडू लागलं. त्याने स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न केला.

अचानक तो आवाज बंद झाला आणि खोलीत शांतता पसरली. हायसे वाटून तो दोन घोट पाणी प्यायला.

त्याचे लक्ष उशाशी ठेवलेल्या एका गोष्टीच्या पुस्तकाकडे गेले आणि ते त्याने उचलले. लाईट असते तर हे पुस्तक वाचले असते असा तो विचार करत होता आणि अचानक त्याच्या हातातून ते पुस्तक खाली पडले. ते पुस्तक उचलायला तो खाली वाकला तर त्याला अंधूक प्रकाशात बेडखाली कसलातरी मोठा आकार हालताना दिसला. तो आकार वेगळीच हालचाल करत सरकत सरकत राजेशकडे येऊ लागला होता.

राजेशने हिम्मत करून हलक्याच आवाजात विचारलं, "को... कोण आहे तिथे?"

पण उत्तर मिळालं नाही. सरकण्याचा आवाज आता बंद झाला.

हिम्मत करून त्याने टेबलावरची टॉर्च उचलून ती चालू केली आणि टॉर्चच्या प्रकाशात पलंगाखाली बघितलं. तिथे एक जुनी, पिवळसर खेळण्याची मोठी बाहुली हालचाल न करता निपचित पडलेली होती, जिचे हिरवे डोळे त्याच्याकडे टक लावून बघत होते.

बाहुलीच्या चेहऱ्यावर एक विचित्र हसू होतं. राजेशने घाबरून ती बाहुली बाहेर काढली आणि त्या बाहुलीचे तो निरीक्षण करू लागला. अचानक ही बाहुली रूम मध्ये कशी काय आली? खिडकीतून? पण मला तर दिसली नाही?

बाहुलीच्या कपड्यांमध्ये त्याला काहीतरी लपवलेलं आहे असं जाणवलं. त्यात एक घडी केलेली चिठ्ठी सापडली. टॉर्चच्या उजेडात त्याने चिठ्ठी उघडून बघितली. त्या चिठ्ठीवर लिहिलं होतं, "तुला माझ्यासोबत खेळायला आवडेल का?"

आता राजेशच्या शरीरभर सारसरून थंडगार काटा उभा राहिला आणि तो उभा राहिला. त्याने ती बाहुली खाली टाकली. पळत जाऊन त्याने खोलीचा दरवाजा उघडला पण त्याला बाहेर जाता येईना. दरवाजा आपोआप जोराने बंद झाला आणि राजेश खोलीच्या आत फेकला गेला.

एक भयानक हास्य असलेला आवाज आला, "आपला खेळ तर आता सुरू झाला आहे. मी सुद्धा कित्येक वर्षांपासून एकटीच आहे. मी सुद्धा जोडीदार शोधत होते. पण आज तू मला बोलवलेस आणि मी आले."

अचानक राजेशला आठवले की, आज सकाळी सहज म्हणून तो एका सिद्ध योगी बाबांकडे गेला होता. त्यांची सेवा करून झाल्यानंतर राजेश जेव्हा त्यांच्या पाया पडला तेव्हा त्यांनी आशीर्वाद देताना त्याला सांगितले होते की, "आज तुझी मनातली एक इच्छा पूर्ण होईल. पण मनातली इच्छा मागताना जो विचार करशील तो व्यवस्थित विचार करून माग. शब्द आणि वाक्य काळजीपूर्वक निवड. एकच इच्छा दहा वेळा मनात बोलून झाल्यानंतर ती पूर्ण होईल. काळजीपूर्वक शब्द आणि वाक्य नाही निवडले तरीही ती इच्छा पूर्ण तर होईल, पण ती इच्छा कशा पद्धतीने पूर्ण होईल हे सांगता येणार नाही."

सकाळची ही गोष्ट राजेश पूर्णपणे विसरून गेला होता. त्याला विश्वास नव्हता की, असे काही घडू शकते आणि मनातली इच्छा पूर्ण होऊ शकते. आता त्याच्या हातातून टॉर्च खाली पडली. ती बाहुली आता गायब झालेली होती.

बाहेर अचानक विजेचा जोरात कडकडाट झाला आणि त्या उजेडात राजेशला त्याच्या बेडवर उशीला टेकून, पाय लांब करून कुणीतरी बसलेलं दिसलं. ती त्या बाहुलीसारखी दिसणारी एक मोठी स्त्री होती. त्या आकृतीचे डोळे राजेशकडे रोखून पहात होते आणि पुन्हा आवाज आला, "खेळ तर आता सुरु झाला आहे!"

खिडकी समोरील सुनसान जागेवर असलेल्या एका झाडाच्या फांदीवर वर्षानुवर्षे कुणीतरी बांधून ठेवलेली एक बाहुली आता तिथून नाहीशी झाली होती!

२. परतफेड

बंटी आणि बबली या सिनेमाच्या स्टाईलने अनेक दुकानदारांना लुबाडणाऱ्या काही जोड्या सक्रिय झाल्या होत्या. जोडीतील स्त्री इतरांना बोलण्यात गुंतवून पुरुष हातचलाखीने दुकानातील कॅश चोरायचा किंवा याच्या उलटसुद्धा व्हायचे. सीसीटीव्ही वरून लक्षात यायचे तोपर्यंत उशीर झालेला असायचा. या टोळीतील जोड्या वेश बदलण्यात वाकबगार होत्या. लूकआउट नोटीस जारी करूनसुद्धा फारसा फरक पडत नव्हता, कारण यांची वेश बदलण्याची किमया अद्भुत होती. प्रत्येक वेळेस या जोड्यांची वेशभूषा, केशभूषा आणि पेहराव वेगवेगळा असायचा. "धूम 2" मधल्या ऋतिक रोशनला या जोड्यांनी आपल्या आदर्श मानले होते. तसेच कमल हसनचा चाची 420, अशी ही बनवाबनवी, गोविंदाचा आंटी नंबर वन, आयुष्यमान खुराणाचा ड्रीम गर्ल, रूप की रानी चोरों का राजा अशा चित्रपटांनी ही टोळी प्रभावीत झालेली होती.

चोरी करून उरलेल्या रिकाम्या वेळात अशाच प्रकारचे चित्रपट ही मंडळी बघत बसायची, हसायची आणि जेवण करून झोपी जायची. त्यांची राहण्याची ठिकाणे सुद्धा ते बदलवत राहायचे.

बरेचदा जोडीतील पुरुष हे स्त्रीचा वेश धारण करून आपली चोरी करायचे. आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे आवाज बदलणे, इतरांच्या आवाजाची नक्कल करणे या पद्धतींचा सुद्धा ते वापर करायचे. प्रत्येक वेळेस यांची चोरीची पद्धत वेगवेगळी असायची. कोणत्याही दोन चोरीमध्ये सारखेपणा नव्हता. त्यामुळे पोलिसांना यांना शोधणे अवघड जात होते. अर्थात पोलीसही यांच्या मागावर हात धुवून लागलेच होते. पत्रकारांनी बातम्या छापताना या जोडींना "जोडी 420" असे नाव दिले होते.

टीव्हीवर आणि वर्तमानपत्रांमध्ये ह्या बातम्या नेहमी प्रसारित व्हायच्या. त्यामुळे तसे दुकानदार सावध होतेच. आधी या जोड्या सकाळी फिरायला येणाऱ्या

स्त्री नागरिकांचे मंगळसूत्र चोरून पसार व्हायच्या. चोर जोडी मधील स्त्री, फिरायला येणाऱ्या वृद्ध किंवा तरुण स्त्रीला बोलण्यात गुंतवायची आणि त्यांना बेसावध करायची. मग तिचा दूर मोटरसायकल थांबवून उभा असलेला पुरुष जोडीदार पटकन वेगात गाडी चालवून महिलेचे मंगळसूत्र ओढायचा आणि तो स्त्री पटकन त्या माणसाच्या मागे बसून दोघे पसार व्हायचे. या सर्व जोड्या अतिशय चपळ होत्या. त्यानंतर हळूहळू यांनी वेगवेगळ्या युक्त्या वापरून दुकानदारांना लुटायचा धंदा सुरू केला.

पुण्यातील "सवाई बंधू डायमंड अँड ज्वेलर्स" चा मालक मंदार याला कामानिमित्त नेहमी त्याच्या मर्सिडीज कारने अनेक शहरात प्रवास करावा लागायचा. अनेकदा सोबत कॅश, सोन्याची बिस्किटे किंवा किमती हिरे त्याच्यासोबत असायचे. बहुतेक वेळेस प्रवास करताना तो सोबत आपल्या सख्ख्या भावाला न्यायचा परंतु अनेकदा असे प्रसंग यायचे की जेव्हा त्याला एकट्याने प्रवास करावा लागे. त्यामुळे रीतसर लायसन्स घेऊन तो नेहमी एक बंदूक सोबत बाळगायचा. पुण्यात सहा ठिकाणी या ज्वेलर्सच्या शाखा होत्या.

मंदार हा इतरांना खूप मदत करणारा व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होता. देवाने आपल्याला खूप संपत्ती दिली आहे. त्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी शक्य होईल तेवढा करावा असे त्याचे विचार होते. अनेक अनाथालय, मराठी शाळा यांना नियमित देणगी तर विविध हॉस्पिटल्सना तो गरिबांच्या उपचारासाठी मोफत रक्कम दरवर्षी द्यायचा आणि त्याचा विनिमय योग्य कारणांसाठी होत आहे की नाही, हे तो आवर्जून स्वतः जातीने खात्री करून घ्यायचा. शनिवारवाड्याजवळ एका तीन मजली भव्य बंगल्यात मंदार, त्याचा भाऊ आणि कुटुंब राहत होते. वडिलांनी आपला पूर्ण बिजनेस आपल्या दोन्ही मुलांवर सोपवला होता.

जुलै महिन्याचे दिवस होते. थोडा भिरभिर पाऊस येत होता. सकाळी पुण्यातील पर्वती जवळ असलेल्या आपल्या भव्य शोरुमकडे जाण्यासाठी लक्ष्मीनगर रोडवरून मंदार आपली कार चालवत होता. रोज सकाळी आपल्या

कोणत्याही कामाला निघताना मंदार आधी "श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे" दर्शन घेऊन मगच निघायचा. आजही त्याने तसेच केले होते. समोर त्याला गर्दी दिसली. त्यांनी गाडी थांबवली आणि गर्दीच्या मधोमध बघितले असता कुणीतरी वेगवान कारने सायकलवर जाणाऱ्या माणसाला ठोकरल्यामुळे तो बिचारा माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडला होता, परंतु जिवंत होता. ती कार वेगाने पुढे निघून गेली होती. काही जणांनी त्या गाडीचा नंबर लिहून ठेवून पोलिसांना कळविले होते. बघ्यांची गर्दी फोटो काढत होती, इकडे तिकडे बघत होती, चर्चा करत होती परंतु कोणीही त्या माणसाला मदत करण्यासाठी पुढे येत नव्हते. पोलीस येतील तेव्हा येतील परंतु त्यांची वाट बघताना या व्यक्तीचा मृत्यू झाला तर काय उपयोग? असा विचार करून, मंदारने पटकन निर्णय घेतला. त्या माणसाला आपल्या गाडीत टाकले, गर्दीतल्या एका समंजस माणसाला सोबत कारमध्ये बसवले आणि "सुमंतराव गाडगीळ" हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. पोलीस आल्यास त्यांना हॉस्पिटलमध्ये पाठवावे असे त्यांनी तिथल्या गर्दीला सांगितले.

त्या माणसाचे ऑपरेशन करावे लागले. ऑपरेशनचा पन्नास हजार रुपये खर्च मंदारने केला. त्यानंतर त्या माणसाचा बारावीत शिकणारा मुलगा आणि पाचवीत असणारी मुलगी हॉस्पिटलमध्ये आले. त्या माणसाचे नाव होते दगडू. पर्वतीच्या पायथ्याशी एका मातीच्या घरात तो राहायचा. मोलमजुरी करून आपले पोट भरायचा. त्या माणसाची पत्नी काही महिन्यांपूर्वीच आजाराने वारली होती. दोन्ही मुले आईला पारखी झाली होती. आईचे या दोघा मुलांवर जीवापाड प्रेम होते. दगडूने मंदारचे खूप आभार मानले. त्या दोन्ही मुलांनासुद्धा रडू आवरत नव्हते. मंदार जणू काही त्यांच्यासाठी देव म्हणून अवतरला होता. काही वेळाने आलेल्या पोलिसांनी मंदारचे आभार मानले. डॉक्टरांनीसुद्धा मंदारचे खूप खूप आभार मानले. थोडा वेळ हॉस्पिटलच्या बाहेर मंदार पोलिसांसोबत शहरात वाढलेल्या चोरीच्या घटनांबद्दल बोलत राहिला. पोलिसांनीसुद्धा त्याला या चोरांना पकडण्यासाठी ते करत असलेल्या प्रयत्नाबद्दल थोडक्यात माहिती दिली. शोरूममध्ये मंदार उशिरा

पोहोचला खरा, परंतु त्याच्या मनावर आज एक वेगळेच समाधान होते. आजही आपण कुणाच्यातरी उपयोगी पडलो ही भावना त्या मागे होती.

काही दिवसानंतर मंदारला मुंबईत जायचे होते. "पुणे ज्वेलर्स असोसिएशनचा" अध्यक्ष असल्याने त्याला मुंबईत होणाऱ्या अखिल महाराष्ट्रातील ज्वेलर्स असोसिएशनच्या मिटींगला हजर राहण्यासाठी पुण्याचा प्रतिनिधि म्हणून बोलावले होते. त्याच्या आधी एक दिवस मुंबईतील मोठा उद्योगपती "कमलेश वीरचंदानी" याने आपल्या मुलाच्या आगामी भव्य लग्नसोहळ्या निमित्ताने दहा डायमंड नेकलेस आणि वीस डायमंड रिंग यांची ऑर्डर दिली होती. शोरूम मधील कर्मचाऱ्यांना याबद्दल माहिती होती, परंतु ही ऑर्डर कधी आणि कशी डिलिव्हर करायची याबद्दल अजून ठरले नव्हते.

इतर कोणाच्याही भरवश्याने ही ऑर्डर डिलिव्हर करणे धोक्याचे होते आणि वीरचंदानी याने सक्त ताकीद दिली होती की, स्वतः मंदारनेच ऑर्डर त्यांच्यासाठी घेऊन यावी. फक्त घरच्या निवडक मंडळींना सांगून ही ऑर्डर डिलिव्हर करण्यासाठी मंदार स्वतः कारने संध्याकाळी सहा वाजता आपल्या बंगल्यातून निघाला. त्याच्या भावाकडे पुढील काही दिवस पुण्यातील सर्व शोरूमची जबाबदारी होती. सकाळी त्याची पुणे ज्वेलर्स असोसिएशन सोबत बैठक झाली. त्यामुळे त्याला निघण्यासाठी संध्याकाळ झाली.

मंदारसोबत त्याची लाडकी बंदूक होतीच. वीरचंदानी फक्त आजच रात्री मुंबईत होता. फक्त त्याची ऑर्डर डिलिव्हर करणे हे एकमेव कारण नसून आजच वीरचंदानी याला भेटणे जास्त महत्त्वाचे होते, कारण दुबईवरून भारतात आलेल्या तीन बड्या उद्योगपतींची वीरचंदानीच्या ओळखीने मंदारला आठ डायमंड रिस्ट वॉचेस (हिऱ्यांचे मनगटी घड्याळ) ची ऑर्डर मिळणार होती. त्या निमित्ताने जुहू येथील "गोल्डन प्लाझा" या हॉटेलमध्ये वीरचंदानी याने डिनर पार्टी आयोजित केलेली होती. मंदारचा बिझनेस चांगलाच वाढणार होता. काही वर्षांपूर्वीच ज्वेलरी

बिझनेसमध्ये विविधता आणण्यासाठी "टाईमलेस प्लानेट" नावाच्या स्वित्झर्लंडमधील घड्याळ कंपनीशी मंदारने टाय अप केलेले होते.

अर्धा रस्ता पार केल्यावर लागणाऱ्या हॉटेलमध्ये नाश्ता करून मंदार पुढच्या प्रवासाला निघाला. रस्त्यात पाऊस सुरू झाला. आकाशात ढग जमा झाले असल्याने वेळेच्या आधीच खूप अंधार झाला. पुढे ट्राफिक जाम दिसायला लागले. चौकशी केली असता कळले की दरड कोसळली आहे. जवळपास एक तास मंदार तिथे थांबून होता. याबद्दल घरी पुण्यात आणि मुंबईत वीरचंदानी असे दोन्हीकडे मंदारने फोनवरून परिस्थितीची कल्पना दिली.

क्रेन बोलावून आणि विविध उपकरणांद्वारे दरड बाजूला करून ट्राफिक मोकळा होण्यास रात्रीचे साडेदहा वाजले. आता पुन्हा नेहमीप्रमाणे ट्रॅफिक सुरळीत झाली. मंदार पुन्हा आपल्या मार्गे निघाला. मंदारच्या समोर तीन कार होत्या. त्या वेगाने पुढे निघून गेल्या. घाटामध्ये आता जास्त वर्दळ नव्हती. गाडीच्या समोरच्या काचेवर वायपर्स एकसारखे पावसाचे पाणी पुसण्याचे काम करत होते. पाऊस आता खूप मुसळधार नसला तरी संततधार पडतच होती.

पावसापासून बचावाचे सगळे साहित्य मंदारकडे गाडीत उपलब्ध होते. घाटातील रस्त्यावर बराच काळ आणि बरेच अंतर मंदार एकटा होता. इतर वाहने उशीर झाल्यामुळे चिडून घाईने निघून गेली. एखाद दुसरे तुरळक वाहन आजूबाजूला पुढे मागे दिसत होते. उजव्या बाजूला दरी होती आणि डाव्या बाजूला मोठा डोंगर होता. साडेअकरा पर्यंत नक्की मुंबईला पोचू शकणार होता. त्यामुळे मुंबईत वीरचंदानी आणि दुबईतील पार्टी वाट बघत हॉटेलमध्ये थांबणार होते. मंदारने त्यांना जेवून घ्यायला सांगितले होते. मंदार कधीही वेगाने गाडी चालवत नसे. उशीर झाला तर हरकत नाही परंतु एक्सीडेंट करून स्वतःच्या किंवा इतरांच्या नाशाला कारणीभूत व्हायचे नाही!

उजव्या बाजूच्या दरीमधून एका स्त्रीचा आधी कपाळ, मग चेहरा आणि हात, थोडा थोडा वर आला आणि हळूहळू संपूर्ण स्त्री घाटावरील रस्त्यावर चढली. ती

एक सुंदर, पंचविशीत असलेली स्त्री होती. तिने हिरव्या जरीची गुलाबी साडी घातली होती. ती वेगाने मंदारच्या कारसमोर येऊन उभी राहीली आणि "वाचवा वाचवा" असे दोन्ही हात वर उंचावून ओरडायला लागली. पावसाचे थेंब ओघळत असलेल्या समोरच्या काचेतून मंदारला ती स्त्री अस्पष्ट दिसली. त्याला गाडी थांबवावीच लागली कारण ती स्त्री मंदारच्या गाडीच्या एकदम समोर येऊन उभी ठाकली होती. मंदारच्या मागची वाहने बघून न बघितल्यासारखी करून पुढे निघून गेली.

ती स्त्री कारचा उजव्या बाजूचा काच हाताने जोरजोरात ठोकू लागली. या स्त्रीला मदतीची आवश्यकता आहे असे मंदारला वाटले, त्याने सीट बेल्ट काढला, बाजूच्या सीटवर पडलेला रेनकोट अंगावर चढवला, टॉर्च घेतली आणि कार रस्त्याच्या बाजूला एका सुरक्षित ठिकाणी झाडाखाली उभी करून, व्यवस्थित लॉक करुन, तो उजव्या बाजूने दरवाजा उघडून खाली उतरला. त्या स्त्रीच्या अंगावर, हातावर आणि चेहऱ्यावर किरकोळ जखमा होत्या. तिचे लांब केस विस्कटलेले होते. डोके ओले झालेले होते. संपूर्ण साडी ओली होऊन अंगाला चिटकलेली होती.

मंदार खाली उतरताच ती स्त्री मोठमोठ्याने अधाशासारखी ओरडून सांगू लागली.

"मला मदत करा. आमचा एक्सीडेंट झाला आहे. माझे मिस्टर खाली दरीमध्ये एका झाडाला अडकले आहेत. याआधी मी दोन-चार गाड्यांना हात दिला पण कोणीही थांबले नाही. तुम्ही थांबलात देवासारखे! चला या दरीमध्ये माझ्यासोबत, खाली उतरा आणि माझ्या मिस्टरांना झाडावरून वर ओढण्यास मदत करा. ते खूप जखमी झालेत!"

मंदारने थोडा विचार केला. समजा या स्त्रीचे ऐकून मी खाली गेलो. परंतु ही गाडी? गाडीला नीट लॉक केलेले आहेच. कुणी शस्त्र वापरून कारचे काच तोडून गाडीमध्ये प्रवेश मिळवला तर? गाडीत किमती वस्तू आहेत!!

"हे बघा, थांबा जरा. तुम्ही कोण? नाव काय तुमचे? तुमची गाडी कुठे आहे?", मंदारने विचारले.

"मी... मी श्रीदेवी. उजवीकडे असलेल्या एका दगडावर धडकल्याने आमची गाडी खोल दरीत पडली. मी सीट बेल्ट लावला नव्हता, त्यामुळे डाव्या बाजूचा दरवाजा उघडला जाऊन डाव्या बाजूने खाली पडून मी वरच्या बाजूला एका खडकावर अडकले. पण माझे पती सीट बेल्ट काढेपर्यंत आणि उजव्या बाजूचा दरवाजा उघडेपर्यंत गाडी उलट पालट होऊन बरीचशी खाली गेली होती. त्यामुळे ते दरीत बरेच खाली एका झाडाला अडकले. मी हळूहळू दरीतून उतरून त्यांना आवाज दिला. त्यांनीही मला आवाज दिला. पण तिथे खाली उतरणे धोक्याचे आहे. चढ खूप उभट आहे. काहीतरी करा आणि माझ्या पतीला तिथून वर काढा. झाड फारसे मजबूत नाही. आपल्याकडे वेळ कमी आहे! आमची. गाडी खाली दरीत कोसळून तिने पेट घेतला. आमचे दोघांचे मोबाईल फोन गाडीतच राहिले. ते गाडीसोबत खाली दरीत गेले."

मंदारला अचानक आठवले, "सध्या घडत असलेल्या घटनांनुसार ही स्त्री कोणी 'जोडी 420' पैकी एक तर नाही ना? मला खाली घेऊन जाऊन रस्त्यावरच कुठेतरी लपलेल्या हिच्या साथीदाराचा माझ्या कारमधील मौल्यवान गोष्टी चोरण्याचा डाव तर नाही ना?"

त्याने इकडे तिकडे नीटपणे बघितले. तसे कोणी दिसत तर नव्हते.

पण त्याचे दुसरे मन त्याला सांगू लागले, "नाही! संकटात अडकलेल्यांना मदत केलीच पाहिजे. मी ह्या मूल्यवान वस्तू कारमध्ये घेऊन जात आहे, हे फक्त घरातील निवडक लोकांनाच माहिती आहे. त्यामुळे इथे मला अडवून घातपाताची शक्यता तशी कमीच आहे. मला या स्त्रीला मदत केलीच पाहिजे! समजा खाली दरीमध्ये काही दगा फटका झालाच तर बेल्टला अडकवलेली बंदूक आहेच!"

विचारात गर्क झालेल्या मंदारला ती स्त्री पुन्हा म्हणाली, "कसला विचार करताय? चला माझ्यासोबत खाली!"

"अं हो हो! चला, चला...", विचारातून बाहेर येत मंदार म्हणाला.

दोघेजण सावधपणे आजू बाजूच्या खडक, दगड यावर हात अडकवत खाली सरकत जाऊ लागले. टॉर्चच्या उजेडाव्यतिरिक्त बाकी सगळीकडे अंधारच होता. ती स्त्री म्हणजे श्रीदेवी, मंदारच्या थोडे पुढे म्हणजे खाली चालत होती.

"या, असे इकडे माझ्या मागे!", असे म्हणत ती मंदारला बरीच खाली घेऊन आली. आजूबाजूला काटेरी झाडे झुडपे होती, थोडेफार अंगाला खरचटत होते. पण एकदा मदत करायची ठरवली, तर काही इलाज नव्हता.

अजून कितीही खाली बघितले तरी कुठेही झाड आणि त्यावर अडकलेला कुणी मनुष्य दिसत नव्हता. मंदारने एकदा वरच्या बाजूला वळून बघितले. रस्त्यावर झाडाखाली त्याची कार उभी दिसत होती. ते बघून त्याला हायसे वाटले. तो श्रीदेवीच्या मागोमाग जाऊ लागला. चहूबाजूंनी काळेकुट्ट डोंगर! चिडीचूप अंधार! आणि त्यात भिरभिर पाऊस. आता ती स्त्री बरचशी खाली गेली होती. ती आता मागे वळूनसुद्धा बघत नव्हती. फक्त पुढे पुढे जात होती. एका विशिष्ट ठराविक लयीनेच तिची हालचाल होत होती.

पावसामुळे वाट खूप निसरडी झाली होती. सांभाळूनच पाय ठेवावे लागत होते. त्याच वेळेस उजव्या बाजूच्या एका झाडावर एक सरडा डोळे रोखून मंदारकडे बघत होता. त्याच्याकडे बघून मंदारला भीती वाटली.

त्या स्त्रीची अचानक बदललेली हालचाल आणि लय पाहून एका क्षणी मंदारच्या मनात शंकेची पाल चूकचुकली. नसत्या फंदात पडण्यापेक्षा आपण पुन्हा वर निघून जावे का, असा मंदारच्या मनात विचार येताक्षणीच त्या स्त्रीने खालून हाक मारली, "अहो, या लवकर!"

हा आवाज त्याला वेगळाच वाटला. एखाद्या रिकाम्या प्लास्टिक पाईपमधून आपले ओठ दाबून जर आपण बोलले तर कसा आवाज येईल, तसाच हा आवाज होता.

मंदार तिच्याकडे गेला. दोघेही आता समांतर चालत उतरत होते.

"यापुढे माझ्याकडून उतरणे शक्य होणार नाही. मला घसरण्याची भीती वाटते. तुम्ही थोडसं पुढे खाली जा आणि ते झाड दिसेल! तुम्हाला काही वस्तू लागतील तर मला सांगा मी येथून फेकते. मी लवचिक फांद्यांना एकत्र गाठ बांधून त्याला दोरीसारखे बनवण्याचा प्रयत्न करते आणि तुमच्याकडे फेकते!", श्रीदेवी म्हणाली आणि ती एका खडकावर उभी राहिली.

"ठीक आहे!", असं म्हणून मंदारने थोडी खाली झुकून बघितले आणि टॉर्चचा प्रकाश मारला. एक झाड दिसत होते. त्या झाडावर एक पांढरी आकृती लटकलेली दिसत होती. पाऊस सुरू असल्यामुळे नीट स्पष्ट दिसत नव्हते.

मंदार खाली उतरून त्या झाडाजवळ गेला. आपल्या हातातील टॉर्चचा प्रकाश त्या झाडावर त्याने मारला. दोन्ही पाय फांदीला अडकून दोन्ही हात आणि मान खाली अशा पद्धतीने तो माणूस अडकलेला होता. तो माणूस निश्चल होता. कसली हालचाल करत नव्हता. म्हणजेच तो बेशुद्ध झालेला असावा.

तेवढ्यात मंदारच्या मनात विचार आला, "शक्यच नाही! वरून पडून बेशुद्ध झालेला माणूस अशा पद्धतीने पाय फांदीला अडकवून झाडाला वेताळसारखा लटकून राहणे शक्यच नाही! हा काहीतरी वेगळाच प्रकार दिसतोय. इथून मला निघायला हवे!", असे म्हणून त्याने वर पाहिले, तर श्रीदेवीचा चेहरा विद्रूप झालेला होता. हाताची घडी घालून ती कुत्सितपणे हसत होती.

तेवढ्यात झाडाच्या फांदीवरून मोठ्याने हसण्याचा आवाज आला. त्या फांदीत पाय अडकवलेल्या माणसाने झोपाळ्यासारखी वर उसळी घेतली. आता त्याचे डोके वर आणि फांद्यांत अडकलेले पाय खाली अशी स्थिती होती. त्याचा चेहरा थोडाफार अनिल कपूर सारखा दिसत होता. मिशी तर हुबेहूब अनिल कपूर सारखी होती. त्या फांदीवरच्या माणसाने हवेत झेप घेतली आणि मंदारच्या दिशेने येऊ लागला. पटकन पळून बाजूला होणे शक्य नव्हते, नाहीतर पाय घसरून मंदार दरीत खाली पडला असता. त्या माणसाची आकृती धूसर, धुरकट आणि अस्पष्ट होती. घाबरून मंदारच्या हातून टॉर्च खाली पडला. टॉर्च घरंगळत जाऊन खोल दरीत

खाली अंधारात गडप झाला. त्याने जवळची बंदूक काढली आणि त्या आकृतीवर गोळ्या झाडल्या. पण त्या आकृतीवर बंदुकीच्या गोळ्यांचा काहीच परिणाम होत नव्हता. गोळ्या शरीरातून आरपार जात होत्या. मग त्याने वर उभे असलेल्या श्रीदेवीकडे गोळ्या घडल्या परंतु तिच्यावरही गोळ्यांचा काहीच परिणाम झाला नाही. बंदुकीच्या गोळ्या संपल्या. उरलेल्या गोळ्या गाडीत होत्या. हा प्रकार बघून मंदार खूप घाबरला आणि पावसामुळे निसरड्या झालेल्या जागेवरून त्याचा पाय घसरला आणि तो दरीमध्ये खोल पडू लागला.

ती झाडावरची माणसाची अस्पष्ट आकृती दरीकडे मंदारचा हवेत पाठलाग करू लागली. त्या आकृतीला मंदारच्या शरीरात शिरायचे होते. हे बघून श्रीदेवी मोठमोठ्याने हसत होती.

दरम्यान, ग्रामीण भागात घालतात तशा पद्धतीने नऊवारी साडी घातलेली एक स्त्री कुठूनतरी तिथे अधांतरी तरंगत आली. तो अभद्र माणूस मंदारच्या शरीरात शिरण्याच्या बेतात असताना त्या नऊवारी साडीतील स्त्रीने त्या आकृतीला हवेतच एका हाताने पकडले. दुसऱ्या हाताने तिने मंदारला पकडले आणि मोठ्या खडकावर एका सुरक्षित जागेत नेऊन अलगद ठेवले.

मग हवेतच त्या दोन आकृतींचे द्वंद्वयुद्ध सुरू झाले. पाऊस सुरूच होता. दोन्ही बाजू तुल्यबळ होत्या. त्या नऊवारी साडीतील स्त्रीची आकृती आता आगीच्या लाटांसारखी झाली आणि माणसाची आकृती काळ्याशार कोळशासारखी टणक झाली. त्या नऊवारी साडीतील स्त्री आकृतीने स्वतःला त्या अभद्र माणसाभोवती लपेटून घेतले आणि वेगाने त्याला दरीत ओढत घेऊन गेली. त्या माणसाची आकृती जळत असलेल्या कोळशासारखी दिसत होती. जणू काही कोळशांनी बनलेल्या मनुष्याला आगीने बनलेल्या स्त्रीने लपेटले आहे. खोल दरीतील अंधारात त्या माणसाच्या शरीराचे जळते कोळसे गडप झाले.

मंदार उठून उभा राहिला. झाला प्रकार नेमका काय होता हे त्याच्या आकलनापलीकडचे होते. दरी चढून तो पुन्हा वर आला. श्रीदेवी कुठेतरी नाहीशी

झाली होती. तो गाडीत बसला आणि गाडी चालवायला सुरुवात केली. गाडीतील सर्व मौल्यवान वस्तू जशाच्या तशा होत्या. झाला प्रकार कोणालाही सांगायचे नाही असे त्यांनी ठरवले. उशीर झाला असला तरी मुंबईतील कार्यक्रम नेहमीप्रमाणे पार पडला. त्याला ठरल्याप्रमाणे ऑर्डर मिळाली. तसेच, वीरचंदानीला वस्तू पण डिलिव्हर झाल्या.

पुण्याला परत आल्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री टीव्हीवर एक बातमी सुरू होती, जी मंदार बघत होता, "पोलिसांच्या पाठलागापासून बचावण्यासाठी 420 जोड्यांपैकी एका जोडीचा काही दिवसांपूर्वी मुंबई पुणे रस्त्यावरील घाटातून कार दरीत कोसळून मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आणखी एका जोडीच्या मागावर पोलीस आहेत. त्यांना पकडल्यानंतर संपूर्ण टोळीबद्दल माहिती मिळेल आणि आणखी अनेक गोष्टी स्पष्ट होतीलच!"

मंदार विचार करू लागला, "म्हणजे दरीमध्ये भेटलेली ती जोडी त्या एक्सीडेंट झालेल्या जोडप्याचे भूत होते तर! त्या माणसाला माझ्या शरीराचा वापर करून पुन्हा चोरी करायला या जगात परत यायचे होते की काय? मी आणि त्याची जोडीदार स्त्री असे मिळून आणखी चोऱ्या करण्याचा त्याचा डाव असावा! मी पोलिसांना याबद्दल सांगितलेच पाहिजे! पण मला वाचवणारे ते नऊवारी साडीतील स्त्रीचे भूत नेमके कोण होते?"

दरम्यान, टीव्हीच्या उजव्या बाजूला असलेल्या खिडकीतील पडद्याआडून समाधानाने एका नऊवारी साडी घातलेल्या स्त्रीची आकृती मंदारकडे बघत होती. मंदारला मृत्यूच्या दाढेतून वाचवल्याचे समाधान तिच्या चेहऱ्यावर जाणवत होते. तिथून ती निघाली आणि दगडूच्या घरी गेली. गाढ झोपलेल्या आपल्या दोन्ही मुलांच्या डोक्यावर तिने प्रेमाने हात फिरवला आणि विचार केला, "माझ्या मुलांना अनाथ न होऊ देणाऱ्या मंदारची मी परतफेड करू शकले याचे मला समाधान आहे!"

३. माईक आणि ब्रश: एक प्रेमकथा

सोनाली, एक धाडसी पत्रकार, मुंबईतील अंधेरी येथील एका प्रमुख न्यूज चॅनेलसाठी काम करत होती ज्याचे नाव होते "बातम्या तुमच्यासाठी रात्रंदिवस". तो बोरिवली येथे इतर दोन मैत्रिणी सोबत रूमवर राहायची. तिचं ध्येय नेहमीच सत्याचा शोध घेणं आणि समाजातल्या गैरव्यवहारांना उजेडात आणणं होतं. तिने अनेक धाडसी बातम्या कव्हर केल्या होत्या, ज्यामुळे ती चर्चेत होती. तिची धावपळ आणि व्यस्त दिनचर्या असली तरी ती साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये रस घेणारी होती. आधी ती "तिसरा डोळा" या न्यूज चॅनल मध्ये काम करायची पण तिने त्याच न्यूज चॅनेलचा मुख्य संपादक "संपतकुमार" यांच्या विरोधात स्टिंग ऑपरेशन केले. फक्त सत्ताधारी राजकीय पक्षाच्या बाजूने वर्षभर बातम्या देण्याचे त्यांनी कबूल केले व त्या बदल्यात त्या पक्षाकडून त्यांनी भलीमोठी रोख रक्कम घेतली होती. त्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांना ते बातम्या देतांना त्यात सोयीनुसार बदल करण्याची सूचना देणार होते. पुढील वर्षी आणखी दहा टक्के वाढीव रोख रक्कम! हा व्यवहार कुणाला संशय येणार नाही अशा रीतीने मुंबईच्या मरीन ड्राइव्हवर घडला.

पण सोनालीला आधीच यांची कुणकुण लागली होती जेव्हा तिने संपतकुमार यांना चॅनलच्या कार्यालयात उशिरा रात्री फोनवर हळू आवाजात याबद्दल वॉशरुमजवळ बोलतांना ऐकले. ती आणखी एका सहकाऱ्याला सोबत घेऊन वेश बदलून मरीन ड्राइव्हवर आधीच हजर होती आणि तिने मोबाइल कॅमेरतून या सर्व प्रकारची शूटिंग केली आणि त्याच चॅनेलवर संपतकुमार विरोधात एका न्यूज एंकरला हाताशी धरून अर्ध्या तासाचा शो चालवला. संपतकुमार यांना अटक झाली, पण सत्ताधारी पक्षातील लाच देणारी व्यक्ती मात्र राजकीय दबाव टाकून सहीसलामत सुटला. पण सोनालीला कामावरून काढण्यात आले. मग "तिसरा डोळा" चे प्रतिस्पर्धी चॅनेल "बातम्या तुमच्यासाठी रात्रंदिवस" कडून तिला ऑफर आली.

"तिसरा डोळा" च्या मालकांनी "सुंदरकुमार" यांना त्या मराठी चॅनलचे मुख्य संपादक बनवले.

आदिनाथ, एक हुशार आर्टीस्ट होता. तो व्यंगचित्रे, शिल्पकला, कॅलिग्राफी (हस्ताक्षरकला) आणि पेंटिंगमध्ये अत्यंत कुशल होता. त्याच्या कला प्रदर्शनांनी आणि शिल्पांनी अनेकांची मनं जिंकली होती. मुंबईतील अनेक नवीन मंदिरांत त्याने बनवलेल्या मूर्ती स्थापित केल्या गेल्या होत्या. तो माटुंगा येथील आपल्या आपल्या आर्ट स्टुडियोमध्ये तासंतास काम करत असे आणि त्याच्या कलाकृतींच्या माध्यमातून तो आपल्या भावना व्यक्त करत असे. त्याचा छोटासा स्टुडिओ आणि छोटीशी रूम हे एकच ठिकाणी होते. अनेकदा आपल्या कलेतून मांडलेल्या ज्वलंत सामाजिक विषयांमुळे त्याला सत्ताधारी आणि विरोधी राजकीय पक्षांकडून धमक्यांचा सामना करावा लागला. पण व्यंगचित्रे, शिल्पकला, हस्ताक्षरकला आणि पेंटिंग ही माध्यमे समाजात बदल घडवून आणण्यासाठी प्रभावी माध्यमे आहेत असे त्याला वाटायचे आणि त्यांचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचा असे त्याचे ठाम मत होते. पैसे कमावणे हा उद्देश दुय्यम होता. आदिनाथचे कुटुंबीय गावी आपली शेती असल्याने तिथेच राहणार होते. त्यांनी आदित्यला आपले करिअर निवडण्याची पूर्ण स्वतंत्रता दिली होती.

पण आपला हेतू कितीही उदात्त असला तरीही समाजातील मुलींचे पालक त्याला लग्नासाठी आपल्या मुली द्यायला तयार होत नव्हते. कारण असा कलाकार म्हणजे त्याचे महिन्याचे इन्कम फिक्स नसणार! कलाकार मग तो कोणताही असो, त्याच्या जीवनात आर्थिक चढ उतार खूप असणार!

सोनालीच्या घरीसुद्धा लग्नाच्या गोष्टी सुरू होत्या. परंतु सोनाली नेहमी बाहेर फिरस्तीवर असेल याबद्दल मुलाकडच्या मंडळींचा आक्षेप होता. कधी कधी चार-पाच दिवस दुसऱ्या गावात किंवा शहरात जाऊन तीला मुक्काम करावा लागायचा, हे त्यांना मुळीच पसंत नव्हते. बहुतेक मुलांच्या घरी त्यांचे आई-वडील असल्यामुळे त्यांना सांभाळणे ही मुख्य अपेक्षा मुलाकडच्या मंडळींची होती.

एकदा, मुंबईत एका प्रसिद्ध आर्ट गॅलरीत एका प्रदर्शनाचं आयोजन केलं गेलं होतं. या प्रदर्शनात विविध कलाकारांनी त्यांच्या कलाकृती मांडल्या होत्या, आणि पत्रकारांनाही त्याच्या कव्हरेजसाठी आमंत्रित केलं होतं. सोनालीला तिच्या न्यूज चॅनेलसाठी या प्रदर्शनाचं कव्हरेज करायचं होतं. साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये रस असल्याने ती आनंदाने हे कव्हरेज करायला तयार झाली.

प्रदर्शनाच्या दिवशी, सोनाली आर्ट गॅलरीत पोहोचली. तिने आपल्या कॅमेरामॅनसह तिथल्या कलाकृतींचं निरीक्षण सुरू केलं. आदिनाथच्या कलाकृतींनी तिचं लक्ष वेधलं. त्या कलाकृतींच्या बाजूने जाताच तिला आदिनाथ भेटला. त्याच्या कलेबद्दल प्रत्येक प्रेक्षकाच्या प्रतिक्रिया तो तन्मयतेने ऐकून घेत होता.

कोरड्या खोल विहिरीमध्ये आक्रोश करणारा शेतकरी आणि त्याची "वाचवा" अशी हाक विहिरीच्या काठापर्यंत गोल गोल उभे असलेले अधिकारी, मंत्री, प्रशासन यातील मंडळी यांच्यापर्यंत पोहोचत असूनही ते त्याला हसत होते, असे एक चित्र प्रदर्शनात मांडले होते.

ते चित्र सर्वांना आवडले. सोनालीला सुद्धा आवडले. त्या खास चित्रावर फोकस करून तिने टीव्हीवर दहा मिनिटांचा स्पेशल प्रोग्राम बनवला. त्या चित्राला खूप प्रसिद्धी मिळाली. आदिनाथचं एकूणच व्यक्तिमत्व, त्याच्या डोळ्यांतील चमक आणि त्याच्या बोलण्यातलं आदर हे तिला खूप आवडलं. आपले कलेद्वारे समाजात जागृती आणण्याचे, तसेच समाजात असलेल्या विसंगतीवर बोट ठेवणे हा हेतू सोनालीला खूपच आवडला. एक चित्र किंवा शिल्प हे हजार शब्दांचे काम करते हे काही खोटे नाही!

सोनालीने आदिनाथशी संवाद साधला आणि त्याच्या कलाकृतींबद्दल अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आदिनाथने अत्यंत नम्रतेने त्याच्या शिल्पकलेच्या आणि एकूणच त्याच्या कलेच्या प्रवासाची कहाणी सांगितली. त्याचा संभाषणातला प्रामाणिकपणा आणि तिची कलेविषयीची आवड याद्वारे दोघांच्या मनात एकमेकांविषयी आदर निर्माण झाला.तिच्या क्षेत्राबद्दलसुद्धा

आदिनाथ याला कुतूहल आणि आकर्षण होतेच आणि आता तर तिच्याबद्दलही आकर्षण निर्माण व्हायला लागले.

प्रदर्शनानंतर आदिनाथने सोनालीला त्याच्या स्टुडियोला येण्याचं आमंत्रण दिलं, जेणेकरून ती त्याच्या इतर कलाकृती आणि त्याच्या कामाची पद्धत बघू शकेल. सोनालीने ते आमंत्रण आनंदाने स्वीकारलं. स्टुडियोतल्या भेटीत त्यांच्या संभाषणात गहिरेपणा आला. दोघांनाही एकमेकांच्या आवडी-निवडी, विचारधारा, आणि जीवनातील उद्दिष्टांविषयी जाणून घेण्याची उत्सुकता वाढली.

पौराणिक प्रसंगांवर आधारित त्याची शिल्पे फक्त बघता सोनाली हरवून गेली. तसेच विविध प्रसंगावरील त्याची चित्रे बघून सोनाली खूप प्रभावीत झाली.

दरम्यान, काळानुसार बदलले पाहिजे म्हणून आदिनाथने आपल्या कलेमध्ये आधुनिकता आणण्याचा प्रयत्न केला. टॅब वापरुन स्टाइलस् पेनद्वारे पण त्याने चित्रे काढण्याचे कौशल्य हस्तगत केले. त्याची सर्व चित्रे त्याने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून डिजिटली जतन करून ठेवली. त्यांचे कॉपीराईट्स मिळवले. याबद्दल सोनालीची त्याला बरीचशी मदत झाली.

आधी मैत्री म्हणून सुरू झालेलं त्यांचं नातं हळूहळू प्रेमात बदललं. आदिनाथच्या सोबतीने सोनालीला तिच्या व्यस्त आयुष्यात एक शांततेचा किनारा मिळाला. तसेच, सोनालीच्या धाडसी वृत्तीने आदिनाथला जीवनात एक नवी प्रेरणा मिळाली. तिने स्वतःच्या चॅनेलच्या मुख्य संपादकाविरुद्ध केलेले स्टिंग ऑपरेशनबद्दल तो ऐकून होता. त्याबद्दल पुन्हा सोनालीकडून त्याने ऐकले आणि तिच्या धाडसी वृत्तीची त्याने भरभरून प्रशंसा केली. तिच्या स्वभावाच्या तो अगदी विरुद्ध होता आणि हेच त्यांचे एकमेकांवर प्रेम बसण्याचे मुख्य कारण बनले.

जुलै महिन्यात आदिनाथला सहज भेटायला सोनाली स्टुडिओमध्ये आली होती. बाहेर खूप जोरदार पाऊस सुरू झाला. सगळीकडे वाहतूक ठप्प झाली. सोनालीला आदिनाथच्या स्टुडिओमध्ये मुक्काम करावा लागला. स्टुडिओमध्येसुद्धा एका बाजूला बेड होते. त्या मुक्कामादरम्यान एक शिल्प बनवता

बनवता आदिनाथ आणि सोनालीच्या मनामध्ये जोरदार आकर्षण निर्माण झाले. स्टुडिओमध्ये सगळीकडे ठेवलेल्या विविध शिल्पांच्या मधून दोघांचा लपंडाव सुरू झाला. शेवटी त्याने तिला मागून घट्ट मिठी मारली आणि लवकरच दोघेजण एक झाले. प्रेमधारा बरसू लागल्या आणि दोघांना प्रेमाचा उत्कट अनुभव देऊनच थांबल्या. असा प्रेमाचा अनुभव दोघांनी आयुष्यात कधी घेतला नव्हता. सकाळी काहीही न बोलता रात्रीच्या प्रेमाची सुखद आठवण मनात जागवत ती निघून गेली. दिवसभर तोही त्याच आठवणीत गुंतला.

एकदा, एका सुंदर सायंकाळी, आदिनाथने सोनालीला मुंबईच्या मरीन ड्राइव्हवर फिरायला नेलं आणि तिथेच तिला विवाहासाठी प्रपोज केलं. सोनालीने आनंदाने ते प्रपोज स्वीकारलं.

काही महिन्यांनी त्यांनी त्यांच्या नात्याबद्दल त्यांच्या कुटुंबीयांना सांगितलं. दोन्ही कुटुंबांनी त्यांचं प्रेम स्वीकारलं आणि त्यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला. त्यांच्या लग्नाच्या तयारीला सुरुवात झाली. आदिनाथने त्यांच्या लग्नासाठी एक खास शिल्प तयार केलं, जे त्यांच्या प्रेमाची निशाणी होती. सोनालीने त्यांच्या कथा सांगणारे काही खास लेख तयार केले. त्यांच्या लग्नाचा सोहळा एक सुंदर कलाकृतीसारखा झाला, ज्यात दोघांच्या जीवनातील विविध पैलूंचं संगम होता!

लग्नानंतरही सोनाली आणि आदिनाथ त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करत राहिले, पण आता त्यांच्या यशात आणि संघर्षात एकमेकांचा आधार होता. त्यांच्या प्रेमाने आणि विश्वासाने त्यांनी एकमेकांच्या स्वप्नांना पंख दिले. बरेचदा सोनाली बाहेर राहायची तर घरी आदिनाथ स्वयंपाक करून ठेवायचा. सुरुवातीला कामवाली बाई परवडत नसल्यामुळे घरातली इतर कामे सुद्धा तो करून ठेवायचा. त्याच्या इतर नातेवाईक त्याला हसायचे नाव ठेवायचे, घरगडी म्हणायचे. परंतु त्याने हसून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्याचे इतर चुलत, मावस भाऊ डॉक्टर इंजिनिअर वकील वगैरे होते. तेही त्याने निवडलेल्या क्षेत्राबद्दल त्याचा उपहास करायचे. परंतु सगळ्यांकडे त्याने दुर्लक्ष केले. त्यांच्या सहजीवनाची कहाणी इतर अनेकांना मात्र

प्रेरणा देणारी ठरली. आता त्यांनी दोघांनी बँकेकडून कर्ज काढून आदिनाथच्या स्टुडिओच्या जवळच वन बीएचके फ्लॅट विकत घेतला आणि पूर्वीच्या रूमचे रूपांतरसुद्धा स्टुडिओतच केले. आता पूर्वीपेक्षा मोठा स्टुडिओ तयार झाला होता.

सोनाली आणि आदिनाथचं लग्न झाल्यावर काही काळ दोघे खूप आनंदी आणि समर्पित जीवन जगले. सध्या कुटुंब वाढवण्याचा निर्णय त्यांनी घेतला नव्हता. थोडे आणखी स्थिरसावर झाल्यानंतर मग ते याबद्दल निर्णय घेणार होते. पण कालांतराने, त्यांच्या करियरमधील जबाबदाऱ्या आणि त्यांच्या कामाच्या वेळा यामुळे त्यांच्या नात्यात ताण येऊ लागला.

सोनालीच्या पत्रकारितेच्या कामामुळे ती नेहमीच बाहेर असे, विविध शहरांमध्ये, कधी कधी शहराच्या बाहेरही जाऊन तिला बातम्या कव्हर कराव्या लागत. तिचं काम धाडसी आणि जोखमीचं होतं, त्यामुळे ती सतत व्यस्त असे. दुसरीकडे, आदिनाथ त्याच्या स्टुडिओमध्ये तासनतास घालवत असे, आपली शिल्पकला आणि पेंटिंगमध्ये गुंतलेला असे. त्याचं आयुष्य शांतीत आणि स्थिरतेत असलं तरी, त्याला सोनालीच्या अनुपस्थितीचा अभाव जाणवत असे.

सुरुवातीला, दोघेही त्यांच्या कामाच्या व्यस्ततेनंतरही एकमेकांसाठी वेळ काढायचा प्रयत्न करत होते. रात्रीचं जेवण एकत्र घेणं, विकेंडला एकमेकांसोबत वेळ घालवणं आणि एकमेकांच्या कामात रस दाखवणं हे त्यांचं नेहमीचं होतं. पण जसजसं कामाचं प्रमाण वाढलं, तसतसं हे क्षण कमी होऊ लागले. मुंबईसारख्या शहरात महागाई असल्यामुळे पैसा कमावणे हा महत्त्वाचा घटक होता.

एका संध्याकाळी, सोनाली एका महत्त्वाच्या बातमीसाठी बाहेरगावी गेली होती आणि तिला काही दिवस तिथेच थांबावं लागलं. ती परतल्यावर, तिच्या लक्षात आलं की आदिनाथ तिच्या अनुपस्थितीत निराश झाला आहे. आदिनाथने तिच्यावर आरोप केला की, ती तिच्या कामाला इतकी महत्त्व देते की, त्याला आणि त्यांच्या नात्याला वेळ देत नाही. सोनालीने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला की, तिचं काम तितकंच महत्त्वाचं आहे आणि ती त्यांच्या नात्याची काळजी घेते, पण

आदिनाथच्या मनातली निराशा दूर होऊ शकली नाही. काही महिने त्यांच्यात शारीरिक संबंध सुद्धा होऊ शकले नाहीत.

आणखी एकदा, सोनालीला एका महत्वाच्या कार्यक्रमाच्या कव्हरेजसाठी रात्री उशिरा बाहेर जावं लागलं. ती परत येईपर्यंत आदिनाथ जागा होता, पण त्याच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसत होती. त्याने तिला विचारलं, "तू कधीच घरी वेळेवर येऊ शकत नाहीस का? मला असं एकटं वाटतंय की, आपण खरंच एकत्र आहोत का?"

सोनालीने थकलेल्या अवस्थेत उत्तर दिलं, "आदिनाथ, हे माझं काम आहे. मला यातून आनंद मिळतो आणि हे माझं कर्तव्य आहे. तू का समजून घेत नाहीस?"

दोघांच्या वादामुळे त्यांच्या संवादात कटुता वाढली. आदिनाथला वाटलं की, सोनालीच्या कामामुळे त्याचं महत्व कमी होतंय. त्याने एकदाच तिला स्पष्ट शब्दांत सांगितलं, "तू इतकी बाहेर असतेस की, मला तुझ्या सोबत असण्याची इच्छाच उरलेली नाही."

हे ऐकून सोनालीला खूप दुःख झालं. तिला तिचं काम सोडून देणं शक्य नव्हतं, पण तिला आदिनाथसुद्धा तितकाच महत्वाचा होता. तिने आदिनाथला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, पण दोघांमध्ये अंतर वाढतच गेलं.

आदिनाथच्या शिल्पकलेमध्येही बदल जाणवू लागला. त्याच्या कलाकृतींमध्ये दुःख आणि तणावाचं प्रतिबिंब दिसू लागलं. त्याच्या चित्रांमध्ये प्रेमाची उणीव आणि एकटेपणाची भावना स्पष्टपणे दिसत होती. ही चित्रे सुद्धा खूप विकली गेली, म्हणजे या जगात प्रेमापेक्षा, प्रेमभंग झालेले लोक जास्त होते की काय?

सोनालीच्या कामाच्या व्यस्ततेमुळे तिला देखील तिच्या कामात पूर्णपणे लक्ष केंद्रित करणं कठीण झालं. तिच्या टिव्ही रिपोर्ट्समध्ये तीची आधीची चमक कमी होत होती, कारण तिचं मन घरातल्या समस्यांनी त्रस्त झालं होतं.

एकदा, त्यांच्या वादामुळे आदिनाथने सोनालीला सांगितलं की, "आपल्याला एक ब्रेक घ्यावा लागेल. आपल्या नात्यात ताण येत चाललाय आणि मला वाटते आपण एकमेकांना जास्तच त्रास देतोय."

सोनालीनेही ते मान्य केलं, पण तिच्या मनात खूप दुःख होतं. तिने विचार केला की, "या परिस्थितीत कसा बदल आणता येईल? आपलं प्रेम इतकं कमजोर कसं झालं?"

तिने एक निर्णय घेतला की, ती आदिनाथसोबत याविषयी मोकळेपणाने बोलेल आणि दोघंही एकत्र येऊन या समस्येचं निराकरण करतील.

एका रात्री सोनालीने घरी दोघांच्या आवडीचे काही खाद्यपदार्थ मागवले आणि कॅन्डल लाइट डिनर आयोजित केले. स्टुडिओ सजवला. मग दोघांनी एकमेकांसमोर बसून जेवतांना आपापले विचार मांडले. सुरुवात सोनालीने केली. आदिनाथने त्याच्या मनातला तणाव आणि तिच्या अनुपस्थितीमुळे आलेली एकटेपणाची भावना स्पष्ट शब्दांत व्यक्त केली. सोनालीने तिच्या कामाच्या महत्वाबद्दल सांगितलं आणि आदिनाथच्या सोबत राहूनही कामाची जबाबदारी निभावण्याची इच्छा व्यक्त केली. ब्रेकप हा कधीही पर्याय नाही हे दोघांना मनोमन पटलं.

दोघांनी एकत्र मिळून यावर उपाय शोधायचा ठरवलं. सोनालीने ठरवलं की, ती तिच्या कामाच्या वेळा थोड्या कमी करून अधिक वेळ आदिनाथसोबत घालवेल. आदिनाथनेही तिला पाठिंबा दिला आणि तिला तिच्या कामात मदत करण्याचा निर्णय घेतला. तिने अधूनमधून जास्तीच्या सुट्या घेतल्या तर त्याने कामाच्या ऑर्डर्स घेणे थोडे कमी केले. आता, दोघांनी एकमेकांना अधिक समजून घेतलं आणि त्यांचे नातं पुन्हा एकदा नवीन ऊर्जेने भरलं. त्यांनी एकमेकांसाठी वेळ काढायला सुरुवात केली आणि आपल्या नात्याला पुन्हा एकदा नव्या उत्साहाने जगायला लागले. त्यांच्या प्रेमाने आणि धैर्याने त्यांनी सर्व संकटांचा सामना केला आणि आपलं नातं अधिक मजबूत केलं.

कालांतराने सोनाली फील्डवर जाऊन वार्तांकन करणारी वार्ताहर न राहता स्टुडिओमध्ये बसून "प्राइम टाइम" मध्ये मुख्य बातम्या देणारी, तसेच कोणत्याही एका महत्वाच्या विषयावर संपूर्ण विश्लेषण करणारी मुख्य न्यूज अँकर झाली होती. आता तिने छोटीशी परवडणारी कार विकत घेतली होती. पण अधूनमधून तिला ठीकठिकाणी वार्तांकन करायला जावे लागत असे कारण तिला या कामाचा खूप अनुभव होता, त्यामुळे नवख्या वार्ताहरांना शिकवण्यासाठी आणि त्यांना मदत करण्यासाठी तिला फील्डवर जावे लागे, पण प्रमाण कमी झाले होते.

यामुळे सोनाली आणि आदिनाथच्या आयुष्यात पुन्हा एकदा बदलाचे वारे आले. सोनालीचा सुद्धा घराबाहेर राहण्याचा वेळ कमी झाला!

त्यांच्या लग्नानंतर सहा वर्षांनी, त्यांना एक गोंडस मुलगा झाला – आर्यन!

आर्यनच्या आगमनाने त्यांच्या आयुष्यात आनंदाची नवी उमेद आली. आर्यन मोठा होत होता. आईला टीव्हीवर बघून बघून तो सुद्धा घरातला आदिनाथचा पेंटिंगचा ब्रश उचलून माइक सारखा तोंडासमोर धरत त्यावर आपल्या आईची टीव्हीवर बोलायची नक्कल करायचा. दोघेही हे बघून खूप हसायचे. मग तिघेही एकमेकांना पॅलेटमधले रंग गालावर आणि चेहऱ्यावर लावायचे. आता या कुटुंबाच्या आनंदाला काही मर्यादच नव्हती!

काही वर्षांनंतर, आदिनाथला युरोपमधून पॅरिस आणि रोमसारख्या ठिकाणांहून त्याच्या पेंटिंग आणि शिल्पकला सादर करण्यासाठी आमंत्रणं येऊ लागली कारण सोशल मीडियावर त्याच्या कलाकृतींची म्हणजे पेंटिंग आणि शिल्पे यांचे फोटो टाकल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली होती.

आदिनाथला जवळपास सात-आठ महिने युरोपमध्ये जाऊन राहावं लागलं. त्याच्या जाण्याने सोनालीला आणि आर्यनला एकटं राहावं लागलं. अधूनमधून तिची आई पुण्याहून चारपाच दिवस मुंबईत येऊन राहून जात असे पण ती एक सामाजिक कार्यकर्ती असल्याने जास्त दिवस ती थांबू शकत नसे. सोनालीने एकीकडे आपल्या पत्रकारितेच्या कामात स्वतःला गुंतवलं, पण दुसरीकडे तिला आर्यनचं

संगोपन आणि घराची जबाबदारी निभवावी लागली. हे सगळं करताना तिच्यावर ताण येऊ लागला. आदिनाथच्या अनुपस्थितीत सोनालीला एकटेपणाची भावना अधिकच तीव्र झाली. तिला आदिनाथची खूप आठवण येत होती, पण तिला त्याच्या कलात्मक करिअरचं महत्त्वही समजत होतं. आदिनाथलासुद्धा युरोपमध्ये सोनाली आणि आर्यनची खूप आठवण येत होती, पण त्याच्या करिअरच्या संधींमुळे तो परत येऊ शकत नव्हता!

तिथे त्याला कलेची जाणकार व कदर करणारी इसाबेला भेटली. इटलीमधील विविध कलादालनामध्ये आदिनाथची चित्रे आणि शिल्पे निवडली जाण्यात इसाबेलाची खूप मदत झालीं. तिची या क्षेत्रात खूप ओळख होती. आदिनाथला इथे खूप पैसा मिळू शकणार होता कारण आता कुटुंबासाठी जास्त पैसे कमावणे भाग होते. कलेतून सामाजिक संदेश तर देता येणारच होता परंतु कुटुंबासाठी पैसे कमावणे सुद्धा जास्त महत्त्वाचे होते. तिथे त्याने इटालियन इतिहासावरील परिणामकारक चित्रे आणि शिल्पे बनवली. तिथल्या स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये त्याचे काही कार्टून सुद्धा छापून आले. त्याला लक्षात आले की, भारतापेक्षा युरोपमध्ये कलेची जास्त कदर केली जात होती!

आर्यन शाळेत जाऊ लागला होता. न्यूज चॅनेलच्या कार्यालयात सोनाली असेपर्यंत आर्यनसाठी सांभाळायला एक विश्वासू मावशी त्यांनी ठेवली होती. तिचे काम ती प्रामाणिकपणे आणि चोख करत होती. घरातील इतर कामे सुद्धा ती करत होती.

कालांतराने संपतकुमार जेलमधून सुटला. सुटल्यानंतर त्याने गुन्हेगारी लोकांशी असलेले आपले काही संबंध वापरून सर्वप्रथम एकच काम केले. सोनालीची माहिती काढली. नंतर तिला धडा शिकवण्यासाठी पैसे देऊन एका ट्रकला तिच्या मागावर लावले. रात्री दोन वाजता एका टीव्ही मालिकेच्या निर्मात्याने दिलेल्या पार्टीवरून परत येत असताना तिच्या कारला धडक देऊन तो ट्रक दूर निघून गेला. तिला फक्त इजा झाली पाहिजे परंतु तिची हत्या करायची नाही असं त्यांचा

प्लान होता. तिची गाडी एका डिव्हायडरला जाऊन धडकली आणि उलटली. गाडी खाली तिचा हात आला. ज्या हाताने ती माईक धरून बोलायची तोच हात!

रस्त्यावरील लोकांनी तिला उचलून हॉस्पिटलमध्ये नेले. दोन्ही घरचे कुटुंबीय धावून आले. ऑपरेशनमध्ये तिचे मनगट कापावे लागले. त्या ट्रकचा तपास लागला नाही किंवा मग संपत कुमारने आपले राजकीय वजन वापरून सर्व पुरावे नष्ट केले ते सुद्धा कळू शकले नाही. संपत कुमार सुटल्यानंतरच ही घटना घडली यावरून सोनालीला अंदाज आला होता की हे त्याचेच काम असणार. परंतु तिच्याकडे पुरावा नव्हता. पण हरकत नाही, "मी नव्या जोमाने आणखी उभी राहील!" असा विचार करून तिने हार मानली नाही.

तिकडे इटली देशात इसाबेलाचे आदिनाथवर प्रेम जडले होते. उद्या सकाळी इटलीहून भारतात जाण्यासाठी त्याची फ्लाईट होती त्याच्या आदल्या रात्री उशिरा इसाबेला आणि आदिनाथ यांनी एकत्र जेवण केले. नंतर घरी परतत असता कार थांबवून इसाबेलाने आदिनाथच्या ध्यानीमनी नसताना त्याच्या ओठांचा किस घ्यायला सुरुवात केली. इसाबेला बुद्धिमान आणि कलेची जाणकार तर होतीच पण ती इतकी नाजूक आणि सुंदर होती की, स्वतःहून ती कुणा पुरुषास समर्पित होत असेल तर कुणीही पुरुष तिला नाही म्हणू शकला नसता. सुरुवातीला आदिनाथने विरोध करण्याचा प्रयत्न केला पण मग तिच्या किसला साथ द्यायला सुरुवात केली आणि तेव्हढ्यात आदिनाथच्या आईचा फोन आला की, सोनालीचा एक्सीडेंट झालेला आहे! कीस अपूर्ण राहीला!

त्याने जास्त पैसे देऊन अर्जंट रात्रीची फ्लाईट बुक केली. एअरपोर्टवरून तो तिला बाय करत असताना इसाबेलाचे डोळे पाणावले होते. आदिनाथचे सोनालीवर किती प्रेम आहे याचीही तीला कल्पना आली होती.

युरोपमधून परतल्यानंतर आदिनाथला कळले की, सोनालीला नकली हात बसवावा लागणार होता. त्यासाठी खूप खर्च येणार होता. पण आता आदिनाथकडे खूप पैसा आला होता. त्यामुळे त्याने नकली हात बसवण्यासाठी जितके पैसे

लागतील तितके खर्च करायचे ठरवले. सोनालीला प्रोस्थेटीक मायोइलेक्ट्रिक पद्धतीने हात बसवला गेला. मेडिकल क्षेत्र इतके पुढे गेले होते की, अशा प्रकारच्या ऑपरेशनमध्ये सेन्सरचा अंतर्भाव असल्याने ते मेंदूच्या सूचना नकली हाताला देऊन नकली हाताची आणि बोटांची हालचाल सुद्धा सोनालीच्या नुसत्या विचारांनी कंट्रोल होऊ शकणार होती.

कालांतराने काही दिवस दोघांचे नातेवाईक त्यांच्यासोबत मुंबईला मदतीसाठी थांबून झाल्यानंतर आपापली गावी परत गेले. सोनाली पूर्ण बरी व्हायला बरेच महिने लागले. पैसा सुद्धा पाण्यासारखा खर्च झाला. विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त आजारी सुट्टी घेता येत नसल्यामुळे आता सोनालीचा पगार सुद्धा बंद झाला होता. पण सर्व परिस्थिती एकट्या आदिनाथने अतिशय संयमाने हाताळली.

कालांतरांनी सोनाली पुन्हा कामावर जायला लागली. तिने नेहमी मुद्दाम तिचा नकली यांत्रिक हात ओपन ठेवला त्यावर ती कसलेच आवरण घालत नसे. हा संपतकुमार साठी एक इशाराच होता. पत्रकारांवर होणारे हल्ले ही एकीकडे चिंतेची बाब बनली होती.

आर्यन मोठा होत होता. त्याच्या शिक्षणासाठी आता पैसा लागत होता. आदिनाथ आणि सोनाली दोघेही पुन्हा आपल्या कामात व्यस्त झाले. दोघांच्या नात्यात पुन्हा एक प्रकारचा अनामिक तणाव जाणवू लागला, कारण आता त्यांच्यात शारीरिक जवळीक साधत नव्हती. एक प्रकारचा वर्णन न करता येण्याजोगा दुरावा पुन्हा दोघांत निर्माण झाला होता. कुठे चुकते आहे आणि काय चुकते आहे हे दोघांनाही नीट समजत नव्हते. एकमेकांसाठी वेळ देणं पुन्हा कठीण झालं. आर्यनच्या संगोपनात दोघांनाही असं वाटत होतं की, एकमेकांचा पाठिंबा कमी पडतोय. सोनालीने आदिनाथला विचारलं, "आपल्याला कधी वेळ मिळणार आहे का एकत्र राहायला? आर्यनलाही तुझी खूप गरज आहे."

आदिनाथने उत्तर दिलं, "माझ्या करिअरच्या या टप्प्यावर आणि आपल्या कुटुंबाचा खर्च भागवण्यासाठी मला हे सगळं आवश्यक आहे. तू समजून घेशील ना?"

सोनालीने समजून घेतलं, पण तिच्या मनात ताण वाढत राहिला.

अधून मधून आदिनाथच्या युरोपच्या फेऱ्या वाढल्या. इटलीत गेल्यावर आदिनाथला कळले की, इसाबेला तिचे राहते घर सोडून दुसऱ्या शहरात निघून गेली होती. तिचा कुठेही पत्ता लागला नाही मात्र तिने आदिनाथची कला आणखी जास्त लोकांपर्यंत पोचावी याची विविध प्रकारे व्यवस्था करून ठेवली होती.

आता सोनालीकडून पूर्वीसारखे काम होत नव्हते. तसेच तिच्या न्यूज चॅनेलने सुद्धा नवीन नवीन चेहरे घ्यायला सुरुवात केली. बातम्या सांगण्यासाठी त्यांना नवीन तरुण आणि सुंदर चेहरे हवे होते. सोनालीचे आता वय वाढत होते. पूर्वीसारखा कामात उत्साह वाटेनासा झाला.

याच काळात, तंत्रज्ञानात मोठा बदल झाला. एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) ने पत्रकारितेचं क्षेत्र आणि कला क्षेत्रात प्रवेश केला. एआय थ्रीडी प्रिंटिंगच्या माध्यमातून शिल्पकला तयार होऊ लागली आणि एआय पेंटिंग आणि कार्टून सुद्धा दोन मिनिटात बनवून देऊ लागला!

सोनालीच्या न्यूज चॅनेलने एआयवर आधारित बातम्या तयार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे मानवी पत्रकारांच्या आणि अँकरच्या गरजा कमी झाल्या. आदिनाथच्या शिल्पकला क्षेत्रातही एआयने मोठी क्रांती घडवली, ज्यामुळे कलाकृतींना पूर्वीइतकं महत्त्व राहिलं नाही. त्याच्या शिल्पांची आणि पेंटिंग्सची मागणी कमी होऊ लागली.

दोघांच्याही करिअरवर एआयचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठा परिणाम झाला. शेवटी, परिस्थिती अशी झाली की, सोनालीला तिच्या कामातून माघार घ्यावी लागली कारण तिला तिचा बॉस पुन्हा फील्डवर जाऊन बातम्यांचे वार्तांकन करायला सांगायला लागला, वाढत्या वयामुळे आता तिला ते शक्य नव्हते.

शेवटी तिने नोकरी सोडली आणि स्वेच्छानिवृत्ती पत्करली. पीएफचे पैसे मिळाले हा एक दिलासा होता. तोपर्यंत आर्यन जुनियर कॉलेजमध्ये शिकत होता. सुरुवातीला हे खूप कठीण गेलं. त्यांच्या आत्मविश्वासाला धक्का बसला होता.

परंतु, या अडचणीच्या काळात, त्यांनी एकमेकांना अधिक समजून घेतलं. त्यांनी ठरवलं की, आपल्या कौशल्यांना वापरण्याचा नवीन मार्ग शोधला.

आदिनाथच्या स्टुडिओमध्ये दोघांनी ट्रेनिंग क्लासेस सुरू केले. दोघांनी आपापल्या क्षेत्राशी संबंधित ट्रेनिंग पुढील पिढीला द्यायला सुरुवात केली. यूट्यूब चॅनेल सुरू केले, तसेच काही पुस्तके लिहिली. त्यांना कालांतराने त्यातून बरेच उत्पन्न मिळायला लागले. आता दोघांमध्ये पुन्हा पूर्वीसारखे आकर्षण आणि शारीरिक जवळीक निर्माण झाली.

सोनालीने तिच्या लेखनाची कला वाढवायला सुरुवात केली आणि स्वतंत्र लेखिका म्हणून काम करू लागली. आदिनाथने आपली कला ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून जगाला लाईव्ह दाखवायला सुरुवात केली. यासोबतच तो एक अनोखी स्पर्धा भरवायला लागला. एखादी थीम देऊन स्वतंत्रपणे वेगळ्या रूममध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सला चित्र काढायला लावायचे. त्याच थीमवर त्याच वेळेस आदिनाथ सुद्धा वेगळ्या रूम मध्ये चित्र काढायचा. मग दोन्ही चित्रे लोकांसमोर सादर केली जायची. शेवटी माणसाने घडवलेली चित्र अगदी सरस ठरले. असे ठीक ठिकाणी तो कार्यक्रम घेऊ लागला. लोकांना एआय पेक्षा आदिनाथने काढलेले चित्र आवडायचे. लोक त्याला त्याच्या अकाऊंटवर पैसे दान करायचे! कारण कृत्रिम ते शेवटी कृत्रिमच!

जगभरातील लोकसुद्धा सुरुवातीला एआयने प्रभावित झाले, पण नव्याचे नऊ दिवस! सगळीकडेच एआय आल्याने कालांतराने लोकांचा पुन्हा ओरिजिनल आणि नॅचरल गोष्टींकडे कल वाढला. कारण कितीही आणि काहीही केले तरी मानव निर्मित तंत्रज्ञान हे भगवंताने निर्माण केलेल्या मानवाला पर्याय ठरू शकत नाही! पण आता तर एआयने लेखन क्षेत्रातसुद्धा प्रवेश केला. परंतु हाडामासाच्या माणसाने

लिहिलेले लेख आणि कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे लिहिलेले लेख यात फरकच होता. एआयचे लेख म्हणजे आत्मा हरवेलेले शरीर!

सोनालीचे विविध सामाजिक विषयावरील लेख इंटरनेटवर खूप लोकप्रिय झाले आणि आदिनाथच्या कलाकृतींना जगभरातून पुन्हा मान्यता मिळाली. त्यांनी त्यांच्या परिस्थितीतून नवीन संधी निर्माण केल्या आणि आपल्या कुटुंबाला पुन्हा आर्थिक स्थैर्य दिलं. दरम्यान, आर्यन मोठा होऊन कॉलेजमध्ये जायला लागला होता. त्याचा कल तंत्रज्ञानकडे जास्त होता आणि कॉम्प्युटर शाखा निवडून नंतर रिसर्च करून आर्टिफिशियल इंटेलिजन्स मध्ये क्रांती करणारी एक नवीन प्रोग्रामिंग लँग्वेज शोधून काढली. कालांतराने तो जपान या देशामध्ये सेटल झाला. तिथेच त्याने जपानी मुलीशी लग्न करून संसार थाटला. कालांतराने आर्यनने त्याच्या ओळखीने त्याच्या वडिलांसाठी जपानमधील एनिमे कार्टून बनवण्यासाठी एक वर्क फ्रॉम होम नोकरी शोधून दिली!

या जीवन प्रवासात, आदिनाथ व सोनाली दोघांनी हे शिकून घेतलं की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी, एकमेकांचा आधार आणि प्रेम कायम ठेवलं तर काहीही अशक्य नाही. त्यांनी एकमेकांच्या सोबतीने सर्व अडचणींवर आणि संकटांवर मात केली.

४. हनी पॉट

महाराष्ट्रातील पुणे शहरात असलेल्या "शार्प माइंड सोल्यूशन्स" या नामांकित आयटी कंपनीत, जुलै महिन्यातील एका शांत दिवशी, सायबर सिक्युरिटी टीममध्ये काम करणारा तरुण आयटी अभियंता, आदित्य, जो सायबर सिक्युरिटी ऑपरेशन लीड म्हणून कार्यरत होता, कर्मचाऱ्यांच्या एका टीमला ट्रेनिंग देत होता. ट्रेनिंग घेणाऱ्यांमध्ये नुकतेच त्याच्या टीम मध्ये जॉईन झालेले फ्रेशर तर होतेच पण नेटवर्किंग, डाटाबेस, डेव्हलपर, ऑपरेशन, टेस्टिंग, क्वालिटी वगैरे सारख्या डिपार्टमेंट मधील ज्युनिअर कर्मचारी सुद्धा हजर होते. गेले आठ दिवस आदित्य काही कारणास्तव पर्सनल सुटीवर गेलेला होता. आज सुट्टीनंतर पहिला दिवस होता. सुट्टीच्या दिवसात यावेळेस त्याने लॅपटॉप सोबत नेला नव्हता. फक्त महत्त्वाचे ईमेल मोबाईलवर चेक केले होते. त्यामुळे आज आठवड्याचे सर्व पेंडिंग काम बघावे लागणार होते.

आदित्य आपल्या कामात अत्यंत दक्ष आणि मेहनती होता, त्यामुळे कंपनीला त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. आजकाल वाढलेले सायबर हल्ले रोखण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट असते की, कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांना इन्फॉर्मेशन सिक्युरिटी आणि सायबर सिक्युरिटीबद्दल ट्रेनिंग देऊन त्याबद्दल त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे.

टेक्निकल नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुद्धा सहजरित्या समजावे यासाठी ही ट्रेनिंग सामान्य माणसांना समजेल अशा पद्धतीने तयार करावी लागते. आदित्यने अतिशय सोप्या भाषेत या ट्रेनिंगचा मसुदा तयार केलेला होता. खास आदित्य परत येण्याची वाट सर्वजण बघत होते. कारण आदित्य इतकी चांगली ट्रेनिंग देणे इतर कोणाला जमत नव्हते.

"आल्यावर सर्वात आधी ही ट्रेनिंग तू सर्वांना देणार आणि मग कामाला लागणार हा माझा आदेश आहे!", असे गमतीने त्याचे बॉस वेंकटेस्वरन इंग्रजीतून आज सकाळी फोनवर त्याला म्हणाले होते.

ट्रेनिंग लवकरच सुरू झाली. आदित्यला ट्रेनिंगची पूर्वतयारी करावी लागत नसे कारण सर्व गोष्टी त्याला तोंड पाठ होत्या. ही ट्रेनिंग देताना आदित्य सांगू लागला, "आपणास माहीत असेलच की, कंपनीत एक किंवा अनेक नेटवर्क एकमेकांशी जोडलेले असतात. कंपनी वापरत असलेल्या विविध कंप्युटर, प्रिंटर, वायरलेस डिव्हाईस, टॅबलेट्स व इतर डिव्हाईस यांना वायरने किंवा वायरलेस पद्धतीने कनेक्ट केले की नेटवर्क तयार होते. याचे 7 स्तर किंवा लेयर असतात. फिजिकल, डेटा लिंक, नेटवर्क, ट्रान्सपोर्ट, सेशन, प्रेझेंटेशन आणि एप्लीकेशन लेयर. प्रत्येक कंपनीतील नेटवर्क हे इंटरनेटला जोडलेले असते"

"मग कंपनीची एका शहरात विविध ठिकाणी आणि वेगवेगळ्या शहरात ऑफिसेस असतील तर?", एकाने योग्य शंका विचारली.

आदित्य पुढे सांगू लागला, "होय. कंपनीची विविध ऑफिसेस वेगवेगळ्या ठिकाणी असल्यास ते सुद्धा एकमेकांशी सुरक्षितरित्या जोडणे आवश्यक असते. त्यासाठी समर्पित वायरद्वारे (कॉपर किंवा फायबर केबल) जी सर्वाधिक सुरक्षित पद्धत आहे किंवा ती परवडत नसल्यास सुरक्षिततेसाठी एकाच टेलिकॉम कंपनीच्या इंटरनेटद्वारे कनेक्ट केली जातात. नेटवर्कची विविध एलेमेंट्स किंवा डिव्हाइसेस असतात त्यापैकी राऊटर जे की तिसऱ्या लेयरमध्ये असते (नेटवर्क लेयर) जे दोन नेटवर्क एकमेकांशी जोडते आणि इंटरनेटवरून कंपनीच्या प्रायव्हेट नेटवर्क मध्ये जेवढा डेटा अपेक्षित आणि आवश्यक आहे तेवढाच बाहेरून आत मध्ये घेते!"

"हे सगळं खूप रंजक आहे! मी पण आता सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट ऐवजी सायबर सिक्युरिटी मध्ये प्रवेश करायचे ठरवणार आहे", सुनीता या एका एप्लीकेशन प्रोग्राम डेव्हलपरने तिची इच्छा व्यक्त केली.

"जरूर! का नाही? पण त्यासाठी खूप अभ्यास करावा लागेल. हे क्षेत्र वाटते तेवढे सोपे नाही, बरं का!", स्मितहास्य करून आदित्य म्हणाला आणि पुढे सांगू लागला, "इंटरनेटवरील हॅकर्सची घातक मालवेअर (मेलिसियस सॉफ्टवेअर/घातक संगणक प्रणाली) कंपनीच्या प्रायव्हेट नेटवर्कमध्ये शिरण्यापासून रोखण्यासाठी

फायरवॉल वापरले जातात. त्यातील फाईलमध्ये, आधीच माहिती असलेले विशिष्ट घातक किंवा संशयास्पद आयपी ॲड्रेस, पोर्ट नंबर आणि प्रोटोकॉल यांची माहिती ठेवलेली असते जेणेकरून हॅकर्सकडून आलेल्या घातक रिक्वेस्ट कंपनीच्या प्रायव्हेट नेटवर्कमध्ये जाण्यापासून परस्पर रोखल्या जातात!"

"पण सर, एप्रिलमध्ये डेटा प्लॅनेट या कंपनीत मजबूत फायरवॉल सिस्टीम असूनसुद्धा सायबर हल्ला झाला होता. त्या कंपनीला खूप आर्थिक नुकसान सोसावे लागले होते!", विहान नावाचा एक कर्मचारी म्हणाला.

आदित्य म्हणाला, "होय मी त्या मुद्द्याकडे येणारच होतो. तू जी घटना सांगतो आहेस तो रॅन्समवेअर अटॅक होता. त्याचा संबंध इनक्रीप्शन एंड डीक्रीप्शन टेक्नॉलॉजीशी असतो. तर सांगायचा मुद्दा असा की, सगळ्याच गोष्टी फायरवॉल रोखू शकत नाही, कारण नुसतेच आयपी ॲड्रेस, पोर्ट आणि प्रोटोकॉल ब्लॉक करून भागत नसते. हॅकर्स रोज नवनवीन टेक्निक शोधत असतात. म्हणून आणखीही काही जास्तीचे उपाय योजले जातात जसे की इंट्रूजन डिटेक्शन सिस्टीम अँड इंट्रूजन प्रिव्हेन्शन सिस्टीम (आय डी एस आणि आय पी एस)! इंट्रूजन म्हणजे अवैध प्रवेश. कंपनीच्या प्रायव्हेट नेटवर्कमध्ये शिरून मालवेअर प्रसारित करण्याचे प्रयत्न या सिस्टीम रोखतात! पण काही हॅकर्स आपला आयपी एड्रेस लपवतात त्यामुळे ते सापडत नाहीत. मात्र या ना त्या पद्धतीने इंट्रूजन (Intrusion) चे प्रयत्न अखंड सुरूच असतात!"

ट्रेनिंग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी एक जण अगदी शांतपणे आणि मन लावून ते ट्रेनिंग ऐकत होता. एसी चालू असूनसुद्धा त्याच्या चेहऱ्यावर थोडा घाम आलेला होता. त्याचे अर्धे लक्ष आदित्यकडे आणि अर्धे लक्ष वेगळ्याच गोष्टीकडे होते. त्याच्या मनात विविध विचार आणि चलबिचल चालली होती. आदित्यच्या नजरेतून हे सुटले नाही.

आदित्य पुढे सांगू लागला, "व्हायरस हा मालवेअरचा एक प्रकार. वॉर्म, ट्रोजन, रॅन्समवेअर, स्पायवेअर, रूटकिट हे सर्व सुद्धा मालवेअरचेच प्रकार!

कंपनीच्या कर्मचाऱ्यांना घरून लॅपटॉपवर जर कंपनीचे प्रायव्हेट नेटवर्क ॲक्सेस करायचे असेल तर इंटरनेट अपरिहार्यपणे मध्ये उभे ठाकते किंवा आडवे येते म्हणा हवं तर! त्यामुळे व्हीपीएन म्हणजे (व्हरचुअल प्रायव्हेट नेटवर्क्) टेक्नॉलॉजी वापरली जाते ज्याद्वारे कर्मचारी इंटरनेटच्या असुरक्षित महाजालामधून कंपनीचे खासगी नेटवर्क सुरक्षितरित्या डेटा आणि माहिती चोरी न होता वापरू शकतात. त्यासाठी विशिष्ट युजरनेम आणि पासवर्ड टाकावा लागतो! मला वाटते आज एवढं पुरेसं आहे, अन्यथा पुढे सांगितलेलं तुमच्या डोक्यावरून जाईल! पुढच्या ट्रेनिंग सेशनला पुढची माहिती सांगेन. धन्यवाद!"

असे म्हणून आदित्यने ट्रेनिंग आटोपते घेतले. कारण त्याची कामं खोळंबलेली होती. कॉन्फरन्स रूम मध्ये होत असलेली ही ट्रेनिंग घेणारे सर्वजण रूम मधून बाहेर पडले.

"आदी सर खूप छान माहिती सांगतात!"

"सर खूपच सोप्या भाषेत समजावून सांगतात!"

"यार, सरांना खूपच डीप नॉलेज आहे. असे सर आपले बॉस पाहिजे, म्हणजे खूप शिकायला मिळेल."

"हो! मी करते ना त्यांच्या टीममध्ये काम! ते कधीही रागावत नाहीत. चूक झाली तर समजावून सांगतात, त्यामुळे पुढच्या वेळेस चूक होतच नाही. माणूस म्हणून ते खूपच चांगले आणि मनमोकळे आहेत!"

अशा प्रतिक्रिया एकमेकांना देत देत सर्वजण आपापल्या कामाला लागले.

आदित्य मात्र तडक पँट्रीमध्ये गेला. कॉफी मशीन मधून गरमागरम वाफळती कॅपिचिनो कॉफी कपमध्ये घेतली आणि ती घेऊन तो आपल्या क्युबिकलमध्ये आला व कॉफीचा एक एक घोट घेत कामाला लागला.

त्याने आपल्या डेस्कवर ठेवलेल्या त्याच्या नावावर रजिस्टर केलेल्या कंपनीच्या डेस्कटॉप कॉम्प्युटरवर लॉगिन केले. तो कॉम्प्युटर, LAN म्हणजे लोकल एरिया नेटवर्कमध्ये असल्याने त्यात व्हीपीएन (VPN) लॉगिनची गरज नव्हती.

त्यातले टर्मिनल ऑन करून वेगवेगळ्या प्रोसेस त्याने मॉनिटर करायला घेतल्या. डेस्कटॉपच्या बाजूला ठेवलेला त्याचा स्वतःचा लॅपटॉप मग त्याने लॉगिन केला आणि त्यात व्हीपीएन लॉगिन केले. तसेच आपले मेल चेक करायला सुरुवात केली. साडे सातशे नवीन ईमेल आलेले होते.

त्याच्या टीम मधील मेंबर्सनी आतापर्यंत आलेले आणि रिझॉल्व्ह झालेले काही सिक्युरिटी इन्सिडेंटचे रिपोर्टस त्याला पाठवले होते ते तो बघू लागला.

डेस्कटॉप कॉम्प्युटरच्या मॉनिटरवर एका एप्लीकेशन सर्व्हरवर असलेली नेटवर्क ट्रॅफिक तो तपासत होता. त्यातील सिस्टीममध्ये काहीतरी विचित्र घडत असल्याचं त्याच्या लक्षात आलं. आदित्यने त्वरित नेटवर्क ट्रॅफिक लॉग फाईलची तपासणी सुरू केली आणि त्याच्या निदर्शनास आलं की, कोणीतरी कंपनीच्या सिस्टीममध्ये अनधिकृत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होतं. आदित्यने त्याच्या वरिष्ठांना याबाबत त्वरित चॅटद्वारे ही माहिती दिली. त्यांनी त्याला संशयास्पद ऍक्टिव्हिटीवर वॉच ठेवायला सांगितले.

त्याने त्याच्या तपासणीला अधिक गती दिली. तसेच त्या एप्लीकेशनशी संबंधित डेटाबेस सर्व्हरची एक वेगळी मॉनिटरिंग विंडो त्याने ओपन केली. त्यात सुद्धा त्याला एडमिनचे राईट्स (हक्क) असलेल्या एका युजर अकाऊंटवरुन ठराविक डेटा मिळवण्यासाठी क्वीरी (Query) फायर होत असल्याची कुणकुण लागली. त्याने प्रथम नेटवर्क मॉनिटरिंग सॉफ्टवेअरच्या सहाय्याने अनधिकृत प्रवेशाच्या सर्व हालचाली नोंदवल्या. संशयास्पद डेटा विनंत्या सेव्ह करून ठेवल्या, सर्व सिस्टीम लॉग्स तपासले. त्याने त्या सिस्टीमच्या फाइल एक्सेस लॉग्स, ऑथेंटिकेशन लॉग्स, आणि नेटवर्क लॉग्समध्ये काही संशयास्पद विचित्रता शोधून काढली.

शेवटी आदित्यने यावर अधिक तपास करण्यासाठी हनीपॉट सेट करण्याचं ठरवलं. त्यात रिस्क होती पण आता वेळ कमी होता. यासाठी त्याने त्याच्या टीम मधल्या SIEM (सिक्युरिटी इंसीडंट एंड इव्हेंट मॅनेजमेंट) या विभागात काम करणारी कुशाग्र बुद्धिमत्तेची ज्युनियर साक्षी हिला सोबत घेतले. त्याने कंपनीच्या नेटवर्कमध्ये

एक हनीपॉट सिस्टीम स्थापित केली, ज्यात काही फसवणूक करणाऱ्या डेटा फाईल ठेवल्या. त्या डेटा फाईल प्रोडक्शनच्या डेटाबेसच्या डेटाची हुबेहूब नक्कल असलेल्या पण डमी डेटा असलेल्या फाइल होत्या. त्या डेटा फायलींमध्ये एक खास स्क्रिप्ट बसवली गेली. ती स्क्रिप्ट लिहिण्यात साक्षीचा हातखंडा होता. तिने भराभर ती स्क्रिप्ट तिच्या लॅपटॉपवर तयार केली.

या स्क्रिप्टने आदित्यच्या लॅपटॉपवर असलेल्या एका सिस्टीमवर त्वरित अलर्ट येणार होता की कोणीतरी फायलींना हाताळत आहे.

आदित्य वाट बघत होता. कधी या फाइल कुणीतरी हाताळेल आणि कधी तो आयपी एड्रेसचा छडा लावेल!

बऱ्याच वेळ गेला. आदित्यने बाथरूम व्यतिरिक्त डेस्क वरुन कुठेही न जाण्याचा निर्णय घेतला. दोघेजण सतत मॉनिटरवर लक्ष ठेऊन होते. दुपारी साक्षी कॅंटीनमध्ये जाऊन जेवली आणि येतांना आदित्यसाठी व्हेज सँडविच घेऊन आली. त्याने पटकन सँडविच संपवले.

"सर, हॅकर सावध झाला की काय?"

"बघूयात! वेट एंड वॉच!"

"सर, या आधी तुम्ही हनीपॉट वापरले आहे का?"

"नाही. हनीपॉट वापरण्याची ही पहिलीच वेळ. यापूर्वी फक्त एका ट्रेनिंगमध्ये प्रॅक्टिस म्हणून मी हे वापरुन पहिले होते!"

डेस्कटॉप आणि लॅपटॉप दोन्हीकडे डोळे लाऊन बसलेल्या दोघांकडे अधून मधून आदित्यचा बॉस वेंकटेस्वरन येऊन तोडक्या हिंदीत म्हणून जायचा, "आज तुम दोनो इस्स चोर को पकडो, तो मेरी तर्फ से तुमको रात मे पार्टी!"

दोघे हसायला लागले. त्यामुळे वातावरणातला ताण हलका झाला.

अचानक एक अलर्ट आला. बीप वाजली, कारण हनी पॉट मधील त्या फसवणूक करणाऱ्या फायलींना हॅकरने हाताळले होते आणि स्क्रिप्टमुळे त्यातील

ट्रॅकरने हॅकरचे नेटवर्कमधील ठिकाण आणि आयपी ऍड्रेस दाखवलं. आदित्यला कळलं की, हा हॅकर त्यांच्याच कंपनीत काम करणारा कुणी एक कर्मचारी होता.

जुन्या हिस्टरी लॉग फाईल चेक केल्यावर त्याला असे आढळले की, असे प्रयत्न काही दिवसांपूर्वी सुद्धा झाले होते.

आदित्यने त्वरित त्याच्या टीमला एक ईमेल लिहिला की, "लॉग फाइल्स हे फक्त तयार करून रोजच्या रोज स्टोरेज खर्च करण्यासाठी आणि शोभेसाठी ठेवण्याच्या गोष्टी नाहीत तर ती रोज न चुकता लॉग मॉनिटरसुद्धा केले गेले पाहिजेत. यापुढे अशी चूक टीम मेम्बर्स कडून होता कामा नये. गेल्या आठ दिवसात या लॉग फाइल्स नीट रिव्ह्यू आणि मॉनिटर का झाल्या नाहीत आणि जर झाल्या असतील तर संशयास्पद डेटा ऍक्सेसच्या हालचाली लॉग फाईल मधून बघून कुणाच्या निदर्शनास कशा काय आल्या नाहीत" यावर चर्चा करण्यासाठी त्याने एक अर्जंट मीटिंग दुसऱ्या दिवशी दुपारी शेड्युल करून टाकली.

"साक्षी, यापुढे टीमकडून लॉग फाईल मॉनिटरिंग आणि रिव्ह्यू रेग्युलर होते की नाही हे बघण्याची पूर्ण जबाबदारी मी तुझ्यावर सोपवतो!", आदित्यने अधिकारवाणीने साक्षीला सांगितले.

"होय सर!", साक्षी म्हणाली.

"यापुढे मला रोज संध्याकाळी पाच वाजता तुझ्याकडून त्या संदर्भात रिपोर्ट पाहिजे, विदाऊट फेल!"

"होय सर!"

नंतर आदित्यने त्वरित कंपनीच्या सिनियर व्यवस्थापनाला याबाबत माहिती दिली आणि लॉग फाईल मधील डेटा व्यवस्थित संकलन करून एकत्र केले आणि त्याचे पुरावे सादर केले. व्यवस्थापनाने शोध मोहीम हाती घेऊन आणि कर्मचारी डेटाबेस चेक करून लवकरच शोधून काढले की तो दुसरा तिसरा कोणी नसून रोहन होता, जो आज झालेल्या ट्रेनिंगलासुद्धा उपस्थित होता. तो सायबर सिक्युरिटीमध्ये तज्ञ असून त्याने एथीकल हॅकिंगची परीक्षा पण दिली होती. प्रतिस्पर्धी कंपनीतून तो

काही महिन्यापूर्वीच या कंपनीत जॉईन झाला होता. तो डेटाबेस टीम मध्ये होता. रोहनच्या डेस्कवर गेले नंतर असे लक्षात आले की, ट्रेनिंग संपल्यानंतर रोहन अचानक तब्येत बरी नसल्याचे कारण त्याच्या टीम लीड ला सांगून घरी निघून गेलेला होता. सायबर सिक्युरिटी मधील दोन माणसे त्याच्या घरी पाठवल्यानंतर लक्षात आले की, रोहन घरी जाऊन आराम करत नव्हता तर लॅपटॉपवर काहीतरी करत होता. रोहनला नियमानुसार रीतसर पकडून त्याच्याविरुद्ध कंपनीने कायदेशीर कारवाई केली. कोर्टामध्ये सादर केलेले इलेक्ट्रॉनिक पुरावे ग्राह्य धरले गेले. योग्य पुरावे सादर करण्यासाठी सायबर फोरेन्सीक टीमची मदत घेण्यात आली.

रोहनला आपल्या ज्ञानाचा गैरवापर करून कंपनीची गोपनीय माहिती प्रतिस्पर्धी कंपनीला विकण्याचा आणि त्यामुळे खूप पैसे कमवण्याचा मोह झाला होता. कबुलीत रोहन असेही म्हणाला की, आदित्यच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन त्याने मागच्या आठवड्यात सिस्टिममध्ये अनधिकृत प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला होता, पण स्ट्रॉंग सिक्युरिटी कंट्रोल आधीच उपलब्ध असल्याने तो प्रयत्न फारसा यशस्वी होत नव्हता. पण आदित्य सुट्टीवरून परतल्यावर रोहनला घाई झाली आणि ऑफिसऐवजी घरी जाऊन पटकन कार्यभाग साधावा असे वाटून त्याने त्या दिवशी त्याने जोरदार प्रयत्न केला, कारण आदित्य त्याचे पेंडिंग कामे आज बघेल आणि त्याची टीम नेहमीप्रमाणे लॉग नीट बघणार नाही, तोपर्यंत आपण आपला कार्यभाग साधून घेऊ असे त्याला वाटले आणि तो हनीपॉट मध्ये अडकला.

आदित्यच्या जागरूकतेमुळे आणि चिकाटीमुळे, तसेच साक्षीने केलेल्या मदतीमुळे कंपनीचा एक मोठा धोका टळला आणि त्याने कंपनीच्या प्रतिष्ठेला धक्का बसण्यापासून वाचवलं. आदित्यच्या धाडसाचं आणि समर्पणाचं कौतुक करून त्याला प्रमोशन मिळालं. आदित्यने साक्षीचे सुद्धा अभिनंदन केले.

अन्यथा जर का रोहन त्याच्या सायबर हल्ल्याच्या प्रयत्नात यशस्वी झाला असता तर कंपनीचे खूप मोठे नुकसान झाले असते. कंपनीत बनवल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरचा कोड प्रतिस्पर्धी कंपनीच्या हाती लागला असता. तसेच कंपनीतील

कर्मचाऱ्यांचा डेटा इंटरनेटवर प्रसारित झाला असता किंवा विविध कमर्शिअल कंपन्यांना विकला गेला असता आणि तो कंपनीच्या कर्मचाऱ्यांची पर्सनल माहिती गोपनीय ठेवण्याच्या कराराचा कंपनीकडून भंग ठरला असता आणि कंपनीला खूप मोठी किंमत मोजावी लागली असती. कंपनीला विश्वासार्हता गमवावी लागली असती आणि त्यामुळे कंपनीला मिळणारे क्लायंट कमी झाले असते. पण हे सर्व आदित्यच्या जागरुकतेमुळे टळले. एम्प्लॉयी जॉइन करतांना होणाऱ्या "बॅकराऊंड चेक" करण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिलेल्या थर्ड पार्टी कंपनीला त्यांचे चेक आणखी कडक करण्याच्या सूचना दिल्या गेल्या.

आदितयाने वापरलेली हनीपॉट ही पद्धत शेवटी कामी आली. ह्या घटनेने इतर कर्मचाऱ्यांना देखील सायबर सिक्युरिटीचे महत्त्व जाणवले आणि त्यांनी आपल्या कामात अधिक सावधगिरी बाळगण्यास सुरुवात केली. ही घटना सायबर सिक्युरिटीच्या क्षेत्रात एक प्रेरणादायी उदाहरण बनली.

आदित्यच्या पुढील ट्रेनिंग सेशनचा विषय होता: हनीपॉट.

आदित्य सांगत होता, "तर अशा पद्धतीने आपण या डायग्रॅम मध्ये पाहिले की, हनीपॉट हे इतर संगणक प्रणालीसारखे दिसते, ज्यामध्ये ऍप्लिकेशन्स आणि डेटा असतो. फायरवॉल किंवा अँटी-व्हायरस सारख्या विशिष्ट समस्येचे निराकरण करण्यासाठी हनीपॉट सेट केले जात नाही. वेगवेगळ्या प्रकारचे धोके ओळखण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे हनीपॉट वापरले जाऊ शकतात. जाणूनबुजून वेगवेगळ्या सुरक्षा त्रुटी निर्माण करून हनीपॉट्स हॅकर्सना सायबर हल्ले करण्यासाठी प्रवृत्त करतात. हनीपॉट सायबर हल्लेखोरांना त्यांच्या वास्तविक लक्ष्यांपासून विचलित करण्यासाठी एक फसवणूक म्हणून वापरली जाते. पण लक्षात घ्या. हनीपॉट ही पद्धत सुद्धा परिपूर्ण नाही. तिचेही काही तोटे आहेत, बरं का? पण ते पुढील सेशनमध्ये सांगेन नाहीतर तुमच्या डोक्यावर हनीपॉट ठेवल्यासारख्या जड विचारांच्या मधमाशा घोंघावतील!"

आणि सर्व कर्मचारीवर्ग हास्यकल्लोळात बुडून गेला.

५. पाच गुफांचा खजिना

फायनल इयरची परीक्षा संपली. सुट्ट्या सुरू झाल्या. रिझल्ट यायला अवकाश होता. पुढे करिअर किंवा पोस्ट ग्रॅज्युएशन याबद्दल निर्णय व्हायचा होता. सर्व ताणतणावातून मुक्ती मिळण्यासाठी सहा मित्रांनी सहलीची योजना आखली आणि बघता बघता सहलीचा दिवस उजाडला. सहा मित्र म्हणजे दोन तरुणी, स्वरा आणि मीना, आणि चार तरुण, अमर, पवन, करण, आणि अजय, हे सर्व जण उत्साहात जंगलात जाण्यासाठी तयार झाले होते. पाठीवर बॅग, आणि मनात अद्भुत साहसी गोष्टींची स्वप्नं घेऊन ते सहा मित्र उत्साहाने करणच्या वडिलांनी त्याला भेट दिलेली "महिंद्रा मारेझो" ही सिक्स सिटर गोल्डन कलर कार घेऊन करणच्या बोरिवलीच्या घरी जमले होते आणि तिथून "पंच पालक" या जंगलात जाण्यासाठी निघाले. त्या जंगलाचे फॉरेस्ट ऑफिसर पवनच्या वडिलांचे मित्र होते. त्यांना एकदा भेटून मग ते सर्वजण फिरायला निघणार होते. देश विदेशातून सुद्धा अनेक पर्यटक तिथे येत असत.

त्यांनी सोबत टेंट, स्लीपिंग बॅग आणि स्लीपिंग पॅड, हेडलॅम्प, टॉर्च, बॅटरीवर चालणारे छोटे टेबल फॅन, फोल्डिंग चाकूचा सेट, जास्तीचे कपडे, ग्रिप असलेले चांगले बूट, टोपी, सनग्लासेस, टॉवेल, टूथब्रश, टूथपेस्ट, इतर वैयक्तिक वस्त्र, फर्स्ट एड किट (औषधे, बँडएज, अँटीसेप्टिक क्रीम), पाणी, अनेक दिवस टिकू शकतील असे खाण्याचे पदार्थ जसे ड्राय फ्रूट वगैरे, तसेच कटलरी, आपत्कालीन शिट्टी, सिग्नलिंग डिव्हाइस, छापील नकाशा, बॅकपॅक, दोर, कॅमेरा, कचऱ्याच्या पिशव्या आणि पाऊस आलाच तर रेनकोट, छत्र्या आणि इतर अनेक वस्तू असे सर्व आवश्यक साहित्य सोबत घेतले होते. या सर्व सामानामुळे त्यांच्या बॅग्स जड जरूर झाल्या होत्या परंतु त्याला काही इलाज नव्हता.

मुंबईपासून 200 किलोमीटर अंतरावर हा पंच पालक नावाचा पाच पर्वतांचा एक समूह होता. त्या पाचही पर्वतांच्या मध्यभागी उंच पर्वत होता तो शिवलिंगाच्या आकारासारखा दिसत होता. प्रत्येक पर्वतात अनेक गुहा होत्या. त्या सर्व गुहा एकमेकांना जोडलेल्या होत्या, जमिनीवरून आणि जमिनीखालून सुद्धा! मध्यभागी असलेल्या त्या शिवलिंगासारख्या आकाराच्या पर्वताच्या टोकावर एक मंदिर होते तिथे जाण्यासाठी कच्ची पायवाट होती.

भगवान शिव यांना पंच महाभूतांचे (पाच महान तत्वांचे) स्वामी मानले जाते. पंच महाभूते म्हणजे पृथ्वी, जल, अग्नि, वायू, आणि आकाश (अंतरिक्ष). हे तत्वे सृष्टीच्या निर्मिती, स्थिती, आणि लयाशी संबंधित आहेत आणि भगवान शिव यांना या सर्व तत्वांचे अधिपति, नियंत्रक आणि रक्षक मानले जाते. शिव तत्त्वज्ञानात, हे पंच महाभूत संपूर्ण ब्रह्मांडाचे मूळ घटक मानले जातात. त्या मंदिराचे नाव पंचपालक शिव मंदिर. तसेच या सर्व पर्वतांना वेढलेले एक जंगल होते. म्हणून या सर्व भागाला म्हणजे पर्वतरांगा आणि जंगलाचा भाग मिळून पंचपालक जंगल असे नाव होते. या सर्व पर्वतांच्या आजूबाजूला आणि संपूर्ण जंगलामधून एक नदी वाहत होती. या सर्व जंगलात आणि पर्वतराजींमध्ये कुठेतरी एक अमूल्य खजिना दडलेला आहे अशी एक दंतकथा फार पूर्वीपासून या जंगलाच्या आजूबाजूला असलेल्या खेडेगावांमध्ये सांगितली जाते. आज पर्वतांपैकी अवकाश पर्वता मधल्या गुहेत जाण्याची मनाई होती. कोणी म्हणे तिथेच खजिना दडलेला आहे म्हणून कोणाला जाऊ देत नाही. मात्र खरे कारण असे होते की पूर्वी अनेक वेळा त्या गुहेत चोरून काहीजण गेल्यानंतर ते परत आले नव्हते. त्यांची बॉडी सुद्धा सापडली नव्हती. बाकी इतर चार तत्वांच्या गुहांमध्ये जायला परवानगी होती. प्रत्येक गुहेमध्ये काही रस्ते आणि ठिकाणं अशी होती की तिथून पुढे जायला पर्यटकांना परवानगी नव्हती.

जंगलामध्ये पायी फिरणे, म्हणजेच जंगलातील मार्गांवर चालणे, याला सामान्यतः "जंगल ट्रेकिंग" किंवा "फॉरेस्ट ट्रेकिंग" असे म्हणतात. या प्रकारच्या ट्रेकिंगमध्ये जंगलातील निसर्गरम्य आणि विविध मार्गांचा समावेश होतो. यामध्ये

वनस्पती, प्राणी, आणि नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव घेता येतो. जंगल ट्रेकिंग करताना पायवाटांचा वापर केला जातो आणि काही वेळा हे मार्ग असमान, खडबडीत आणि अडचणीचे असू शकतात. जंगल ट्रेकिंगच्या प्रकारांमध्ये, वाइल्डलाइफ ट्रेकिंग म्हणजे जंगलातील विविध वन्यजीवांचा अभ्यास आणि निरीक्षण करण्यासाठी केले जाणारे ट्रेकिंग, नेचर हाइकिंग म्हणजे निसर्गाच्या सौंदर्याचा अनुभव घेण्यासाठी सहज आणि सोप्या मार्गांवर चालणे, रिव्हर ट्रेकिंग म्हणजे जंगलातील नदीच्या काठाने किंवा प्रवाहाच्या मार्गाने चालणे, ज्यामध्ये नदी ओलांडणे आणि पाण्यातून चालणे याचा समावेश असू शकतो. या सहा जणांचा उद्देश वरील सर्व प्रकारची ट्रेकिंग करणे हा होता. अजयचे मनात मात्र काहीतरी वेगळे होते. त्याला ऐतिहासिक पौराणिक गोष्टींमध्ये खूप रस होता. या सर्व प्रवासामध्ये त्या जंगलाच्या ऐतिहासिक पाऊल खुणा जाणून घेण्याचा अजयचा निर्धार होता. तसेच त्या खजिनेच्या दंतकथेबद्दलही त्याला उत्सुकता होती.

"खरंच तिथे खजिना असेल का?", असे अजयने म्हणतात मागच्या सीटवर बसलेली स्वरा त्याच्या डोक्यावर टपली मारून त्याला चिडवू लागली, "ए बाबा, तिथे आमच्या सोबत जरा निसर्ग एन्जॉय कर नाहीतर उघडून बसशील इतिहासाची पुस्तके!"

त्या सगळ्यांमध्ये स्वरा ही सगळ्यात बोल्ड आणि स्वतंत्र विचारांची मुलगी होती. तिचे दोन वेळा ब्रेकअप झाले होते.

गाडी चालवणारा करण म्हणाला, "हो. तंबूमध्ये जर हा पुस्तक वाचत बसलेला दिसला तर याला आपण तिथेच तंबूमध्ये सोडून निघून जाऊ बरं का!"

"अरे मी असा तसा तुम्हाला सोडणार नाही. तुमच्या मागे मागे येईल. अरे मित्रांनो आणि मैत्रिणींनो, आपण जातोच आहे तर तिथला खजिना शोधू!", खादी कपडे घातलेला अजय कोरगांवकर म्हणाला.

"अरे बाबा! तो खजिना शोधण्याचा आजपर्यंत पुष्कळ लोकांनी प्रयत्न केला, पण त्यांना ते शक्य झाले नाही असे रस्तोगी काका सांगतात. फॉरेस्ट

ऑफिसर. पप्पांचे मित्र!", पांढरा शर्ट आणि काळी पॅन्ट घातलेला पवन पाटील सांगू लागला.

ड्रायव्हर सीटवर करण, त्याच्या बाजूला अजय. सर्वात मागच्या सीटवर अमर पवन आणि मधल्या सीटवर स्वरा आणि मीना बसले होते.

"अरे, पण अजय म्हणतो आहे तर आपण एकदा चान्स घ्यायला काय हरकत आहे?" मीना मोरे म्हणाली.

"वाटलंच मला! की मीना अजून कशी बोलली नाही ते. अजय काहीतरी म्हणेल आणि मीनाचा त्याला सपोर्ट नसणार असे कधी झाले आहे का बरं?", पिवळा टी शर्ट आणि शॉर्ट्स घातलेल्या स्वराला अमर आपटे याने टाळी दिली.

"नीट बघ स्वरा, मिनाकडे! लाजली असेल ती!",निळा कुर्ता घातलेला करण सक्सेना म्हणाला.

"लाजली म्हणजे! अरे चांगले गाल लाल झाले तिचे!", स्वरा त्रिवेदी म्हणाली.

"ती लाजली आणि तू? लाजणे, नटणे, मुरडणे हे तुझ्या डिक्शनरीतच नाही आहे वाटतं!", करण स्वराला चिडवू लागला.

"हट रे! तू कोण मला सांगणारा पोरीसारखे वाग म्हणून!" स्वरा.

आरशात बघून करण म्हणाला, "बघा! एका पोरीचे चिडलेले नाक! वेडवलेला चेहरा, थरथरणारे ओठ! असे वाटते ना की गाडी थांबवावी आणि तिच्या ओठांना...."

"स्वप्नातही तसा काही विचार करू नको करण! मला तू अजून ओळखले नाही! एक उलट्या हाताची..." स्वरा.

"अगं मी तुला चांगलं ओळखतो म्हणून तर मी म्हणणार होतो की तुझ्या ओठांना चिकटपट्टी लावावी म्हणजे प्रवास शांततेने होईल! तुला काय वाटत होतं मी तुझ्या ओठांना काय करणार ते?", करण चिडवत म्हणाला.

"ए, गप बसा दोघेजण! सर्वांनी आता आपापल्या तोंडाला चिकटपट्टी लावा. आता आपण मस्तपैकी शांततेत गाणे ऐकू!", अजय म्हणाला आणि त्याने गाणे लावले: "आय एम इन लव्ह!" गायक गायिका मधुर आवाजात गाणे म्हणत होते पण प्रत्यक्षात पडद्यावर हे गाणे आक्रमक सुनील शेट्टी वर चित्रित झालेले होते. भेदक नाच करत तो आपल्या प्रेमाचा इजहार आपल्या हीरोइनकडे करत होता.

आता अजयने आपल्या बॅगेतून इतिहासाची कादंबरी वाचायला घेतली. इकडे खिडकीच्या काचेला डोके टेकून डोळे बंद करून आपले लांब लचक केस मोकळे सोडलेली गुलाबी साडीतली मीना, "आय एम इन लव्ह!" हे गाणे ओठांनी गुणगुणत कुठल्यातरी दिवास्वप्नात दंग झाली होती.

रस्तोगी अंकलकडे पोहोचल्यावर त्यांचे चांगले स्वागत झाले. रात्री त्यांच्या बंगल्याच्या अंगणात मस्तपैकी सतरंजी टाकून त्यांनी सर्वांनी एकत्र जेवण केले. अजयच्या म्हणण्यानुसार जरी खजिना शोधायचा तरीही तो इतर पर्यटक असताना शोधता येणार नव्हता. संध्याकाळी पाच वाजेनंतर जेव्हा पर्यटकांना बंदी असते तेव्हा तो शोधायला हवा. पण प्रवासातच त्यांनी ठरवले की खजिना शोधण्याची आयडिया रस्तोगी अंकल त्यांना सांगू नये. अन्यथा ते नक्कीच परवानगी देणार नाहीत आणि ते त्यांच्या पेरेंट्सना सांगून गोष्टी आणखी बिघडतील. अर्थात ते सहा जण रोज रात्री अंकलच्या बंगल्यात मुक्कामाला येणार नव्हते कारण बंगला मूळ पर्यटन ठिकाणाहून खूप दूर होता. फक्त आज आणि जमल्यास परत जाताना ते भेट देणार होते. पर्यटक जिथे तंबू टाकून मुक्काम करतात त्या भागात ते थांबणार होते. सर्व सुख सुविधा असलेले तंबू किंवा झोपड्या सुद्धा तिथे भाड्याने मिळत होते किंवा मग तुम्ही लॉजवर थांबू शकता.

रात्री जेवण करतांना अंकल कडून बरीच माहिती मिळाली. त्यांनी जंगलातील विविध धोके समजावून सांगितले. त्यांना मूलबाळ नव्हते. मात्र नवीन पिढीशी रस्तोगी दाम्पत्य चांगले जुळवून घेत.

जेवण झाल्यावर गप्पा मारता मारता अंकल म्हणाले,"ही आणि मी, स्वतः ला खूप व्यस्त ठेवतो कारण अन्यथा आम्हाला मूळ नसल्याचे शल्य बोचत राहते!"

"ते कसे काय?", करणने डोळ्यांनी मना केले तरीही स्वराने विचारले.

"ही गरोदर असताना एकदा अनपेक्षितरित्या तरसाने आमच्या घरात शिरून हल्ला केला. भितीने ही इकडे तिकडे पळायला लागली आणि फरशीवरील पाण्यावर पाय घसरून पडली. मिस कॅरिएज झाले. नंतर शरीरात असे काही कॉम्पलिकेशन तयार झाले की तो पुन्हा आई होऊ शकणार नाही असे डॉक्टर म्हणाले!"

एकूण सर्वच जण अस्वस्थ झाले. ते बघून ताण हलका करण्यासाठी रस्तोगी अंकल म्हणाले, "अरे पोरांनो. बाकी कसं काय? तुमचे शिक्षण? करीयर? मैत्री? आणि केव्हापासून बघतोय ही, काय नाव बरं तिचं?"

"सुट्ट्या संपल्यावर आम्ही ठरवणार आहोत हाईयर एज्युकेशन की नोकरी की बिझिनेस! आणि हिचे नाव आहे स्वरा!", तिच्या डोक्यावर टपली मारत करण म्हणाला.

"हां! स्वरा. ही आणि करण यांचं काहीतरी डोळ्यांनी एकमेकांना हातवारे किंवा डोळ्यांनी इशारे देणं सुरू असतं, काय भानगड आहे?", चिडवण्याच्या सुरात रस्तोगी अंकल म्हणाले.

हे एकदाच अजयकडे बघून मीना लाजली. आणि सर्वजण हसले.

"त्याचं काय आहे ना अंकल? ह्या करणची ती बस नेहमी चुकते. यांनी हात दाखवला की ती थांबतच नाही! यांनी एक दोनदा पळत जाऊन तिला पकडण्याचा प्रयत्न केला पण हा तोंडावर आपटला!", स्वरांकडे इशारा करत अमर म्हणाला.

सर्वजण खळाळून हसले. स्वराने दोन बुक्के अमरच्या पाठीत हाणले.

पवन पुढे म्हणाला, "हीचे दोन ब्रेकअप झालेत आधी!"

हे ऐकून रस्तोगी आण्टी म्हणाल्या, "अरे पण सर्वांनी एक लक्षात ठेवा. प्रेम हे काही गमतीत घेण्याची गोष्ट नाही. प्रेम एकदाच होते. तुमच्या आजच्या पिढीच्या विचारानुसार जोडीदार बदलत राहणे हा नुसता एक जीवघेणा खेळ आहे, जो तुम्हाला

कोणत्याच मुक्कामावर घेऊन जाणार नाही. परफेक्ट जोडीदाराच्या शोधात हे लक्षात राहत नाही की आपण स्वतः तरी कुठे परफेक्ट असतो? परफेक्ट मॅच असे कधीही नसते. असते ते फक्त एकमेकांना समजून घेऊन ॲडजस्ट करणे. एकमेकांना सुख दुःखात साथ देणे!"

ऐकून सर्वच जण अंतर्मुख झाले.

रस्तोगी अंकल म्हणाले, "ज्या काळात राजांसाठी बहुपत्नीत्व सामान्य बाब होती त्या काळात प्रभू श्रीरामांनी एक पत्नी व्रताचा अंगिकार केला! विसरलात? हां! आणि मैत्री जरूर असावी. निखळ असावी. कृष्ण द्रौपदी सारखी असावी. भानुमती कर्ण सारखी असावी. कृष्ण सुदामा सारखी असावी. दुर्योधन कर्ण सारखी असावी. अर्थात मित्र चुकत असेल तर त्याला वाईट मार्गावरून चालण्यास रोखणारी असावी! एकमेकांना वाईट गोष्टींमध्ये साथ देणारी मात्र नसावी!"

"पण कृष्णाबद्दल काय? त्यांनी तर अनेक बायका केल्या. त्यांची तर एक प्रेयसी सुद्धा होती?", कारण ने अडचणीत आणणारा प्रश्न केला.

"कृष्णाने करंगळीवर पर्वत सुद्धा उचलला होता. तुम्ही उचलू शकणार काय?", रस्तोगी अंकल म्हणाले.

"नाही! आम्ही सर्वजण मिळून सुद्धा नाही!" एकमुखाने सर्वजण म्हणाले.

"अरे मित्रांनो, भगवान विष्णू यांनी मानवी जन्म घेऊन त्या त्या काळानुसार वागण्याचा आदर्श घालून दिला तरीही त्यांच्या आयुष्यातील घटना या शेवटी त्यांच्या विविध आधीच्या जन्मातील आणि सध्याच्या जन्मातील कर्मांच्या फळानुसार घडल्या. आपण त्यातील चांगल्या त्या गोष्टी घ्यायच्या!"

"तुमच्या बोलण्याने खरंच आमच्या विचारांना एक नवीन दिशा मिळाली!", स्वरा म्हणाली.

अजय म्हणाला, "मी यांना ऐतिहासिक पौराणिक गोष्टी सांगायचो तेव्हा हे सर्वजण मला हसतात, चिडवतात. पण आता त्यांच्या लक्षात आली असेल की जो इतिहास वाचत नाही त्याला इतिहास घडवता येत नाही. इतिहासापासून शिकले नाही

तर आपल्या सोबत तो इतिहास पुन्हा पुन्हा घडत राहतो. आणि सर्व पौराणिक कथांमध्ये आपले जीवनाचे सार लपलेले आहे. जीवनातील सर्व समस्यांचे समाधान आपल्याला आपल्या पुराणांमध्ये कोणत्या ना कोणत्या कथेत मिळते!"

आता मात्र सर्व जणांनी अजय साठी टाळ्या वाजवल्या.

"चला झोपा आता! तुम्हाला सकाळी लवकर उठून निघायचे आहे ना. तुमच्या पुढील सुट्ट्या आणि जंगल सफारी एन्जॉय करा गुड नाईट!"रस्तोगी दाम्पत्य म्हणाले.

दिवसभराच्या प्रवासाच्या थकव्याने लवकरच सर्वजण गाढ झोपून गेले.

सकाळी सगळे मित्र जंगलाच्या प्रवेशद्वारावर भेटले. तेथे त्यांची भेट त्यांच्या मार्गदर्शक शिवराज यांच्याशी झाली. शिवराज एक अनुभवी आणि ज्ञानसमृद्ध मार्गदर्शक होते. त्यांनी सर्वांना जंगलातील नियम आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना समजावून सांगितल्या. गाडी एके ठिकाणी पार्क केली.

सर्वांनी हायकिंगची सुरुवात उत्साहाने केली. जंगलातील पायवाटांवरून चालताना त्यांना विविध प्रकारच्या झाडा-फुलांचे दर्शन झाले. अजय आणि मीना जंगलातील फुलांचे फोटो काढण्यात गुंग होत्या, तर करण आणि स्वरा पक्ष्यांचे निरीक्षण करण्यात मग्न होते.

अमर आणि पवन विविध प्राणी न्याहाळत होते.

थोडे अंतर चालल्यानंतर शिवराज यांनी सर्वांना विश्रांतीसाठी थांबण्याचे सांगितले. त्यांनी त्या परिसरातील विशेष वनस्पतींची माहिती दिली. अजय आणि मीना त्यांच्या बोलण्यात विशेष रस घेत होते. मीना नेहमीच वनस्पतींच्या अनोख्या गुणधर्मांबद्दल जिज्ञासू असायची.

हायकिंगच्या मध्यावर मित्रांना एक मोठी आनंददायक भेट मिळाली. त्यांना एका जलाशयाच्या काठावर हरिणांचा एक कळप दिसला. हरिणांच्या या कळपाला पाहून सगळेच रोमांचित झाले. अजयने त्याचे कॅमेरा बाहेर काढले आणि हरिणांचे फोटो काढले.

आता प्रवास थोडा कठीण झाला. खडकाळ भागातून चालताना सर्वांनी एकमेकांना मदत केली. एकदा अजयचा पाय घसरला, पण मीनाने त्याचा हात घट्ट धरून ठेवला आणि अजय सावरल्यावर लाजून लगेच तिने हात सोडला. सर्व मित्रांमध्ये मीना अबोल होती. पण दुपारी नदीच्या काठावर असलेल्या एका झाडाखाली सर्व जण थोडी विश्रांती घेत असताना, व्हॉट्सॲप ग्रुपवर आलेले जोक्स एकमेकांना सांगून त्यांनी मीना ला हसविण्याचा आणि बोलतं करण्याचा प्रयत्न केला. ती पण हळू हळू खुलली. मोकळं बोलायला लागली.

दिवसाच्या प्रवासाच्या शेवटी, शिवराज त्यांना एका जंगलातील झोपडीवर घेऊन गेले. येथे सर्वांनी थोडी विश्रांती घेतली आणि त्यांच्या ताज्या अनुभवांबद्दल चर्चा केली. दिवसभरात त्यांना लंडनमधली क्लारा फ्लिंट भेटली. ती सुद्धा आठ दिवसांसाठी येथे जंगल सफारी वर आलेली होती. तीसुद्धा एकटी! त्यांच्यात आणि क्लारामध्ये लवकरच मैत्री झाली. विशेष म्हणजे क्लारा ही एक शिव भक्त होती. तिने सांगितले की, दर सोमवारी ती लंडन मधल्या वेंबली येथे असणाऱ्या शिव मंदिरात न चुकता शिवलिंगावर जल अर्पण करते आणि तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर सुद्धा ती शिव पुराणातील छोट्या छोट्या कथा सांगणारे व्हिडिओ पोस्ट करत असते. विशेष करून अजय सोबत तिची चांगली मैत्री जमली, कारण दोघांची आवड जवळपास सारखी होती.

संध्याकाळी हायकिंगचा प्रवास संपला. सर्व जण आनंदी पण चालून चालून थकलेले होते. पर्यटकांसाठी बनलेल्या विविध सोयींनी युक्त अशा एका भव्य झोपडीतच त्यांनी पुढील सर्व दिवस मुक्काम करायचे ठरवले. त्यांची गाडी जास्त दूर नव्हती. पण झोपडीपर्यंत गाडी आणता येणार नव्हती. तसा रस्ता नव्हता.

रात्री झोपडीत त्यांनी जेवण बनवले. साहित्य झोपडीत आधीच होते. उरलेले त्यांनी शिवराज कडून मागवले. आणि जेवण संपल्यानंतर त्यांचा एक प्लॅन बनवला. खजिना आता शोधायचाच यावर सर्वांचे एकमत झाले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दिवसभर गुफा बघण्यात घालवायचा. पाच वाजेनंतर सर्वांची नजर चुकवून गुहेमध्ये

लपून राहायचे असे ठरले. एकदा हिंमत करून हे साहस करायचेच असे सर्वांनी ठरवले.

"मित्रांनी खजिना सापडला तर आपली आयुष्य भराची पैशांची गरज मिटेल!", अमर.

"पण, आपण संकटात सापडलो तर?", मीना.

"आणि जास्त पैशांचा मोह बारा नाही.", पवन.

"हो! नशिबात नसलेले जर मिळवायला गेले तर आपले नुकसान होते!" अमर.

"अरे पण आपण हे फक्त पैशांसाठी करत नाही आहोत. पैसा दुय्यम आहे. एक पौराणिक सत्य जे सर्वजण दंतकथा म्हणून दुर्लक्ष करतात ते खरे आहे हे ठरवण्याची ही एक संधी आहे. विचार करा ही संधी आपल्याला पुन्हा मिळणार आहे का?", अजय.

अजय चे म्हणणे सर्वांना पटले.

"अरे रस्तोगी अंकल यांनी प्राण्यांना मारण्यासाठी सोबत एक आपल्याला बंदूक दिली आहे ना! डोन्ट वरी!", करण.

"पण बंदूक एकच आहे!", स्वरा.

"मग आपण सर्वजण सोबत राहू. मग तर झालं!", अजय.

"पण सोबत पोरींना घेऊन जाणे धोकेदायक आहे. त्यांना इथेच झोपडीत राहू द्या. लागलं तर क्लाराला तुम्ही दोघी आपल्या सोबत झोपडीत घ्या! सकाळी आम्ही परत येतोच!", करण.

"खरं तर तुम्ही दोघीजणी तुम्ही अंकलकडे जास्त सुरक्षित राहाल पण परंतु त्यामुळे त्यांना कळेल की आम्ही खजिना शोधायला रात्री पाच वाजेनंतर गुहेत जातो आहे त्यामुळे ते शक्य नाही!" अजय.

"आम्ही दोघी जणी राहू. क्लाराला घेऊ सोबत!", मीना आणि स्वरा

"अरे, पण तिला विचारा तर खरं आधी!", अमर.

सर्वजण लाराच्या टेंट कडे गेले. ती टेन्ट समोर आकाशाकडे बघत पहुडली होती. तिचा टेंट झोपडी जवळच पाच मिनिटांच्या अंतरावर होता. तिला सर्वांनी त्यांची योजना समजावून सांगितली झाली.

"अरे, आधी इथली दंतकथा काय आहे ते तरी नीट ऐका! आज ती दंतकथा मी शिवराज कडून नीटपणे ऐकली. शिवराज इथल्या गावात राहणाऱ्या नागरिकांपैकी एक! इथल्या गावातील नागरिक पुढारलेले नसले तरी त्यांची निसर्गाशी जवळीक आहे.", अजय म्हणाला.

"अच्छा म्हणजे आज दुपारी तासभर हा अजय आपल्या टीम मधून गायब होता त्याचे रहस्य समजले!", करण म्हणाला.

"हो! मी दुपारी शिवराजच्या घरी गेलो होतो. त्याने मला खजिन्याची कथा सांगितली!"

क्लाराच्या टेंट समोरच्या मोकळ्या अंगणात जमिनीवर सर्वजण खाली बसले आणि अजय ती कथा सांगू लागला. हे दंतकथा कुठेही लिहिलेली नव्हती. इंटरनेटवर सुद्धा उपलब्ध नव्हती. विकिपीडियावर सुद्धा नव्हती. पण आसपासच्या गावांमध्ये मात्र ही दंतकथा आवडीने आणि चवीने सांगितली आणि ऐकली जायची.

अजय सांगू लागला, "सृष्टी निर्मितीनंतरच्या सुरुवातीच्या काळात एकदा देव असुर संग्राम सुरू होता. त्यात इंद्र देवाची मदत करण्यासाठी भाग घेतांना तेव्हा भगवान शंकर यांनी त्यांची पंच महाभूत नियंत्रक शक्ती द्रवरूपी काचेत तात्पुरती डमरू मध्ये ठेवली. त्याला डमरू सारखा म्हणजे वाळूच्या घड्याळ सारखा आकार प्राप्त झाला कारण काळ भगवान शंकरांच्या अधीन असतो. समुद्रमंथनाच्या वेळेस अमृत मिळवणे शक्य झाले नाही त्याचा राग मनात ठेवून राहू आणि केतू हे असुरांचे गुरू शुक्राचार्यांकडे गेले. त्यांच्याकडून संजीवनी विद्येच्या आधारे पुन्हा दोघे एकत्र झाले. दोघांचां मिळून एक मोठा सर्प तयार झाला. बहुतेक सर्व देव युद्धात व्यस्त असताना हा राहूकेतू एकत्रित झालेला सर्प सगळ्यांच्या नजरा चुकवून वेगाने भगवान शंकरांच्या डमरू ठेवलेल्या जागी निघाला. शिवाच्या अनेक गणांचा घोळका तिथे

आसपास बसलेला होता. त्यांची नजर चुकवून हळूच तो सर्प डमरूकडे खालून वर वेटोळे घालून चढू लागला. त्याने डमरू तोडून त्यातील वाळूच्या घड्याळाच्या आकाराचा पंचमहाभूत नियंत्रक बाहेर काढला. वरच्या बाजूला दोन म्हणजे पृथ्वी आणि अग्नी, खालच्या बाजूला दोन म्हणजे जल आणि वायू व मध्यभागी उरलेल्या जागेत दोन्ही बाजू व्यापून अवकाश तत्व असे पाच स्तर त्यात होते. अवकाश तत्व काळाला नियंत्रित करते. आपल्या वेटोळ्यात त्या नियंत्रकाला घेऊन सर्प हवेत उडून पाताळातील अज्ञात जागी जाण्यासाठी निघाला. एवढ्यात शिवाच्या गणांचे तिकडे लक्ष गेले. ते सर्पाचा पाठलाग करू लागले!"

"व्हॉट हॅपन आफ्टर?", क्लारा उत्सुकतेने पुढे सरसावून विचारू लागली.

"भगवान शंकर त्रिशूळ घेऊन एका राक्षसासोबत लढत होते. त्यांना आपल्या गणांकडून त्याबद्दल कळले. ते राक्षसांसोबत लढाईत व्यस्त असल्याने त्यांनी भगवान विष्णूंना कसेही करून राहू केतू यांना पंचमहाभूत नियंत्रक घेऊन जाण्यापासून रोखण्याची विनंती केली. भगवान विष्णूंनी आपले सुदर्शन चक्र त्या दिशेने भिरकावले. सापाचे पुन्हा दोन तुकडे झाले म्हणजे राहू आणि केतू वेगळे झाले. पण त्या सुदर्शन चक्रामुळे त्या पंचपहाभूत नियंत्रकाचे पाच वेगवेगळे गोल तुकडे झाले आणि ते पृथ्वीवर पडले. नंतर त्यांचे हे पाच पर्वत झाले!"

"अरे फारच अदभुत कथा आहे ही!" अमर म्हणाला.

अजय पुढे म्हणाला, "पण काही लोक म्हणतात की ते तुकडे पर्वत बनले नसून या पाचही पर्वतांच्या आत, गुहांमध्ये कुठेतरी गुप्तपणे दडलेले आहेत! आणि त्या तुकड्यांना लपविण्यासाठी हे पर्वत आपोआप तयार झालेत किंवा उगवले!"

"मग याचा खजिन्याशी काय संबंध?", स्वराने विचारले.

"ते पाच तुकडे पाच अमूल्य हिऱ्यांच्या रुपात परावर्तित झाले! तोच खजिना! सोने चांदीचां खजिना नव्हे!"

"आणि मग पँचमॅहाबुत कंट्रोलरचे काय झाले?", क्लारा तोडक्या मराठीत म्हणाली.

"भगवान शंकरांनी असुरांसोबत युद्ध जिंकल्यानंतर ब्रह्मा, विष्णू आणि विश्वकर्मा यांच्या मदतीने नवीन पंचमहाभूत नियंत्रक बनवून आपल्या तिसऱ्या डोळ्यात बसवले!" अजय.

"म्हणजे आता आपल्याला पाचही गुहेमध्ये लपलेले पाच काचेचे तुकडे शोधावे लागणार!", पवन म्हणाला.

"काचेचे तुकडे नाही, हिरे आहेत ते! अस्सल हिरे! आणि या सर्व दंतकथा आहेत. याबद्दल कोणत्याच पुराणात काहीच लिहिलेले नाही. यात काही भाग खरा असेल, काही भाग लोकांनी जोडला असेल. पण आपण एकदा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे?"

"हो! तेही खरच आहे!"

"तर मग ठरले तर मग. आपण उद्या पाच वाजेनंतर शोध मोहीम सुरू करूया! प्रत्येक तत्वाच्या गुहेत त्या त्या तत्त्वाचा हिरा सापडेल अशी आपण अशा करूया"

"पण अवकाश गुहेमध्ये तर जायला बंदी आहे!"

"आपण इतर गुहांमधून मार्ग शोधून त्यात नक्की आपण प्रवेश करू! कारण सर्व गुहा एकमेकांशी जोडलेल्या आहेत."

क्लारा म्हणाली, "वुई लेडीज विल अल्सो कम विथ यू! व्हॉट से, स्वारा एंड मीनॅ! दिस इज ऑल सो एक्साईटिंग. वी कांट रेजिस्ट बट टू कम विथ ऑल ऑफ यु"

दोघीजणी सुद्धा क्लाराच्या म्हणण्याला दुजोरा देऊ लागल्या. म्हणजे आता तिन्ही लेडीजसुद्धा मोहिमेत येण्यासाठी आग्रह करू लागल्या. शेवटी सर्वांना ते मान्य करावे लागले.

"थांबा!", तंबूच्या मागच्या बाजूने आवाज आला. सर्वांनी माना वळवून तिकडे बघितले. तो शिवराज होता. त्याच्या हातात एक कंदील होता. केव्हापासून तो सगळ्यांचे बोलणे लपून ऐकत होता.

"तुम्ही असे करू शकत नाही. संध्याकाळी पाच वाजेनंतर आतमध्ये खूप धोका आहे! ज्यांनी ज्यांनी पाच वाजेनंतर तिथे जाण्याचा प्रयत्न केला ते आत गेले खरे, पण ते कधीही परत आले नाहीत."

"आम्ही नक्की जाणार. हे होईल ते होईल. एकदा आत जाऊन बघायचे आहे!"

त्या अद्भुत कथेने सर्वजण इतके प्रभावीत आणि प्रेरित झाले होते की आता आत जाण्यासाठी खूपच उत्सुक झालेले होते.

"तुम्ही ऐकणारच नसाल तर...!", शिवराज म्हणाला.

"तर काय?", अमर.

"तर मी पण तुमच्या सोबत येतो!", हसत हसत शिवराज त्यांना म्हणाला.

सर्वजण हसायला लागले. पण करण आणि स्वरा यांनी शंकेने एकमेकांकडे पाहिले.

शिवराज म्हणाला, "कारण, मलाही लहानपणापासून या गोष्टी ऐकून उत्सुकता आहे. म्हटलं चला, तुम्हा लोकांसोबत मलाही शोध घेता येईल! मात्र तुमच्या प्लॅनमध्ये थोडा बदल करावा लागेल."

"तो कोणता?"

"आपण सर्वजण एकत्र नाही तर दोन दोन जण मिळून एकच वेळेस गुहेमध्ये शोध मोहीम हाती घ्यायची! अवकाश गुहेत तर प्रवेश वर्जित आहे. त्यामुळे चार गुहा, आठजण! आणि हो, पाच वाजेनंतर प्रत्येक गुहेच्या आत जिथे जिथे प्रतिबंधित क्षेत्र आहे, तिथूनच आपल्याला शोध मोहीम हाती घ्यायची आहे!"

ते दहाही जण उद्याच्या साहसासाठी सज्ज झाले. क्लाराने आपले सामान बॅगमध्ये भरले आणि ते सर्वजण, करण आणि मित्र राहत असलेल्या झोपडीकडे चंद्रप्रकाशात चालायला लागले. परंतु त्यांच्या मनात शंका दाटून आली की शिवराज ज्याची फक्त अजय सोबत आज जुजबी ओळख आहे त्याला आपल्या सोबत घेण्यात धोका तर नाही ना? पण त्याला घेण्याचा एक फायदा होता की तो तेथील

स्थानिक होता, त्यामुळे त्याची चांगली मदत होणार होती. आणि त्याला नाही म्हटले असते तर करण आणि मित्रांचा प्लॅन शिवराजला माहिती झाल्याने तो इतरांना सांगण्याचा आणि प्लॅनमध्ये अडथळा आणण्याचा प्रयत्न करू शकला असता. त्यापेक्षा त्याला सोबत घेतलेले बरे, पुढचे पुढे बघता येईल असा विचार करण व त्याच्या मित्रांनी हळू बोलत बोलत केला जेव्हा शिवराज त्यांच्या मागून बऱ्याच अंतरावर कंदील घेऊन चालत होता.

पवनला रस्तोगी काकांचा फोन आला. आम्ही सर्वजण ठीक आहोत, असे त्याने सांगितले.

झोपडीत रात्री अजय हळूच सर्वांना उठवत झोपडीच्या बाहेर घेऊन आला. शिवराज बाजूला गाढ झोपलेला होता.

त्याने सर्वांना सावध केले, "हे बघा! हा शिवराज जरी माझ्या ओळखीचा असला तरी मला वाटते आपण सर्वांनी एकत्रच शोध मोहीम हाती घ्यावी. वेगवेगळे नको. वेगवेगळे जाण्यात धोका आहे!"

"मला तर आता वाटायला लागले आहे की हा खजिन्याचा प्लॅन कॅन्सल करा. कशाला उगाच नसत्या फंदात पडायचे?", मीनाने आपली शंका सांगितली.

"प्लॅन कॅन्सल नको, पण तुकड्यांनी जाण्यापेक्षा एकत्र जाणे हे मात्र योग्य राहील! आपण तसे सकाळी शिवराजला सांगू!", अजय म्हणाला.

"आपण म्हणजे तू सांग! तुझे ऐकेल तो!", करण म्हणाला.

"ठीक आहे!", अजय म्हणाला.

सकाळ उजाडली. सर्वांनी काळजीपूर्वक तयारी केली. आपापल्या बॅगमध्ये आवश्यक ते सर्व साहित्य त्यांनी घेतले. अजयने बाजूला नेऊन शिवराजला, सर्वांनी एकत्र जाणे कसे योग्य होईल ते समजावून सांगितले. वेळ लागेल तर चालेल पण सर्वजण एकत्र राहतील हे केव्हाही चांगले! आधी त्याने ऐकले नाही पण शेवटी तो तयार झाला. अजयने त्याला हेही बजावले की तो गावकऱ्यांना ह्या मोहिमेबद्दल काहीही सांगणार नाही. सगळे मिळून असेही ठरले की काहीही झाले तरी रात्री 9

वाजेच्या आत परत झोपडीकडे परत जायचे. करण आपली पार्क केलेली गाडी व्यवस्थित आहे की नाही ते बघून आला. शिवराज सकाळी एक तास त्याच्या गावात जाऊन आला. अनोखे साहस करण्यासाठी ते आता सज्ज झाले. खजिना नाही सापडला तरी गुहेतील प्रतिबंधित क्षेत्रात नेमके काय आहे ते तरी आज कळेल असे म्हणून सर्व सज्ज झाले.

त्यांना सर्वांना शिवराज कडून कळले की, प्रत्येक गुहेचे एक वैशिष्ट्य होते ते म्हणजे ज्या त्या तत्त्वाच्या गुहेमध्ये आत मधल्या दगडी भिंतीवर थोड्या थोड्या अंतरांवर त्या त्या तत्त्वाचे चिन्ह कोरलेले होते. ते कोणी मानवांनी कोरलेले नसून आधीपासून जेव्हा या गुहा तयार झाल्या तेव्हापासून ते आपोआप तयार झालेले होते.

शिवराज हा धोतर, बंडी अशा गावकऱ्यांच्या वेशात होता, क्लाराने आकाशी कलरचा बटनांचा शर्ट आणि गडद निळी जीन्स तर इतरांनी आपापल्या आवडीचे पोशाख केले होते जसे मीनाने साडी घातली होती फक्त आज कलर वेगळा म्हणजे सोनेरी होता, करणचा नारिंगी कुर्ता आणि स्वराने पिवळा टीशर्ट आणि मिनी स्कर्ट, पवनने डार्क जांभळा शर्ट आणि क्रीम कलर पँट, अमरने हाफ बाहीचा बारीक चेक्सचा डार्क पिवळा शर्ट आणि प्लेन व्हाईट पँट, तर अजयने नेहमीप्रमाणे खादी कपडे घातले होते.

सर्वांनी गणपती बापपाचे नामस्मरण करून आपल्या साहसाला सुरुवात केली. सकाळी सर्वांनी चारही गुहा पर्यटक बघतात तशा बघून घेतल्या. कुठे कुठे प्रतिबंधित क्षेत्र आहे ते पाहून घेतले. माहिती देण्यासाठी शिवराज सोबत होताच. चार वाजले तसे सर्वजण पुन्हा अग्नि गुहेत शिरले आणि पाच वाजेपर्यंत प्रतिबंधित क्षेत्राजवळ पोहोचले. तिथपर्यंत मोबाईलची थोडी थोडी रेंज येत होती. चालून चालून ते सर्वजण थकले होते. संपूर्ण गुहेत सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते, कारण सर्व गुहा इतक्या लांब लांब आणि खोल होत्या की ते शक्य सुद्धा नव्हते. पावणे पाच वाजले. अलार्म वाजला. सुरक्षा रक्षक सर्वांना बाहेर काढू लागले, मात्र हे आठही जण दोन दोनच्या

जोडीने वेगवेगळ्या खडकांच्या मागे लपले. कडेकपारीत दडून बसले. इतर सर्व पर्यटक हळू हळू निघून गेले. गुहेतील सर्व कृत्रिम लाइट्स बंद करण्यात आले. अनेक शिटया मारून गार्डस निघून गेले. गुहेचे मुख्य लोखंडी गेट बंद केले गेले. आता अग्नि गुहेत फक्त ते आठ जण होते. आपापल्या लपलेल्या ठिकाणाहून ते सर्व बाहेर आले. अजयने हेडलॅम्प घातला आणि चालू केला. त्या प्रकाशात ते सर्वजण प्रतिबंधित क्षेत्र लिहिलेल्या ठिकाणाकडे चालू लागले. तिथे मोठा दगड होता. सर्वानी जोर लावला पण तो दगड सरकत नव्हता. दगडाच्या वरच्या बाजूने खूप उंचीवर मात्र एक छोटीशी फट किंवा जागा होती जिथून एक वेळेस एक माणूस आत शिरू शकत होता.

आजूबाजूचे मोठे दगड उचलून त्यांनी ते एकमेकांवर ठेवले आणि त्या दगडांचा पायऱ्यांसारखा उपयोग करून एक एक जण वरच्या बाजूला चढायला लागले. आधी क्लारा, मग मीना, स्वरा आणि त्यांच्या पाठोपाठ शिवराज आणि इतर सर्वजण चढले. हळूच त्या फटीतून क्लाराने आत मध्ये आपली बॅग फेकली आणि मग स्वतः उडी मारली. धप्प असा आवाज आला. पलीकडचा भाग इकडच्या भागापेक्षा बराचसा खोल वाटत होता. हळूहळू सर्व जणांनी आतमध्ये उडी टाकली. बॅग सहित आतमध्ये शिरणे शक्य नसल्याने आधी बॅग टाकण्यात आल्या. अजयने हेडलॅम्प आणि तसेच इतर दोघा तिघांनी हातात टॉर्च ठेवल्याने बरे झाले अन्यथा आत आतमध्ये ठार अंधार होता. शिवराजकडे स्वत:चा कंदील होता. तो साधा कंदील नसून खाण कामगार वापरतात तो डेव्ही लॅम्प होता. त्यात एक विशेष जाळी असते जी ज्योतीला वेढते. जेव्हा ऑक्सीजन पातळी कमी होते, तेव्हा लॅम्पची ज्योत मंदावते किंवा विझते. जर ज्योत मंदावली किंवा विझली तर, त्वरित गुफेतील बाहेर पडावे, कारण ऑक्सीजन पातळी कमी असल्याचे किंवा इतर काही काही धोकादायक वायू तिथे उपस्थित असल्याचे त्यावरून समजते.

सर्व जण अंदाज घेत घेत, एकमेकांना धीर देत पुढे चालू लागले. पायाखाली अस्थिर जमीन होती, काही ठिकाणी वाट ओलसर होती, त्यामुळे रस्ता निसरडा

होता. अजयचा पाय घसरला पण तो पडता पडता वाचला कारण त्याचा हात मीनाने पकडला. त्याने थॅंक्स म्हटले आणि मीना लाजली. तिने त्याचा हात सोडला. ते सर्वजण पुढे जाऊ लागले तशी आर्द्रता वाढत गेली.

"एक मिनिट, एक मिनिट, काहीतरी आवाज आला!" असे म्हणून शिवराजने मागे वळून पहिले तर ज्या फटीतून ते सर्व आत आले ती बंद झाली होती. सर्वजण घाबरले. पण शिवराजने हिम्मत दिली, "हरकत नाही! हा मार्ग बंद झाला तरी दूसरा मार्ग कुठेतरी असेल तिथून बाहेर निघू!"

सर्वांना धीर आला. एक सांप सरसरत सर्वांच्या बाजूने गुहेच्या भिंतीवरून निघून गेला, त्याकडे अजय बघत वाळू लागला तर हेड लॅम्प च्या प्रकाशात सर्वांना तो साप एका भिंतीला टेकून बसलेल्या एका हाडांच्या सापळ्यावरून जातांना दिसला. तो साप कवटीतून बाहेर निघतांना कवटीच्या दातांची हालचाल झाली आणि ती कवटी कडकट्ट कडकट्ट अशी दात वाजवत हसत असल्याचा भास झाला. मीना किंकाळली आणि अजयला घट्ट बिलगली. करण दचकला आणि स्वर त्याला चिडवून हसू लागली. इतर जण घाबरून थोडे बाजूला झाले. साप वरच्या बाजूला कुठेतरी निघून गेला. क्लारा त्या सापाकडे एकटक बघत होती.

ते पुढे चालू लागले. गुहेच्या वर कुणीतरी डायनॉसोर सारखा भव्य प्राणी चालत असल्यासारखा आवाज आला यांनो गुहेला हादरे बसू लागले!

"अरे कसला आवाज हा? आणि कसले हादरे बसताहेत गुहेला! वर भूकंप झाला की काय?" करण.

"आणि आपण असे कुठपर्यंत चालायचे? मोबाईलचा पण सिग्नल आता गेला!", अमर.

"बापरे. कधी नाही एवढी भीती मला आज वाटते आहे. आपण परत जायचे का?" स्वरा.

"परतीचा दरवाजा बंद झाला आहे. आता फक्त पुढे चालत राहावे हेच बरे!" पवन.

"घाबरू नका सर्वजण! चालत रहा!" शिवराज.

"तेच म्हणतो मी!", मीनाला बाहू पाशातून दूर करत अजय म्हणाला.

"हो. आपण चालत राहायला हवे. मार्ग सापडेल!", मीना.

"कम ऑन! लेट्स गो. फॉलो मी!" क्लारा.

गुहेचे हादरे आता बंद झाले.

सर्वांच्या बोलण्याचा आणि आवाजाचा प्रतिध्वनि ऐकू येत होता. काही वेळाने सर्वजण शांत चालत असतांना अचानक हास्याचा प्रतिध्वनि ऐकू आला. त्यांच्यापैकी कुणी तर हसले नव्हते! मग आवाज कोठून आला? सर्वजण मनातून घाबरले पण कुणी तसे काही दाखवले नाही! गुहेतील अंधार गडद इतका होता की फक्त टॉर्च आणि लॅम्प पुरेसे नव्हते.

चालतांना मध्येच कोळयाचे जाळे तोंडाला चिटकत होते, ते बाजूला करावे लागत होते.

एक वटवाघूळ उडत अजयच्या तोंडावर झेपावले, त्याला हाताने फटकरून हाकलण्याच्या नादात त्याच्या डोक्यावरचा हेडलॅम्प निसटून दूर जाऊन खाली पडला. वटवाघूळ निघून गेले आणि कुठेतरी कोपऱ्यात जाऊन बसले. सर्वात मागे पवन चालत होता, तो म्हणाला, "मी आणतो तुझा लॅम्प परत. तेवढ्यासाठी मागे येऊ नको!"

आता अंधार आणखी गडद झाला. इतर टॉर्चच्या प्रकाशात ते चालू लागले.

आणखी किती पुढे चालायचे हा एक मोठा प्रश्नच होता. ते चालतच राहिले.

हेडलॅम्प उचलायला पवन मागच्या बाजूला एका कोपऱ्यात गेला आणि तो घेण्यासाठी खाली वाकला तर त्याला गुहेच्या भिंतीला लाकडाच्या दरवाज्यासारखे काहीतरी जाणवले. त्याने सहज ढकलून पहिले तर त्याचा हात उघडलेल्या दरवाज्याच्या आतमध्ये ओढला गेला आणि तो अनंत पोकळीत गेल्यासारखा हवेत तरंगून वेगाने एका दिशेने हातातल्या हेडलॅम्प सहित ओढला जाऊ लागला. बऱ्याच वेळाने त्याला जाणवले की, तो एका अंधाऱ्या मैदानात उभा आहे, त्याच्या

डोक्याला हेडलॅम्प लावलेला आहे आणि आजूबाजूला दगडी भिंतींमध्ये अनंत लाकडी दरवाजे आहेत.

"हे मी कुठे आलो?" पवन घाबरला, "मी माझ्या मित्रांकडे कसा परत जाऊ?"

"वेळ वाया न घालवता कोणत्यातरी एक दरवाजात जाऊन बघतो!", असे म्हणून त्याने उजवीकडे एका दरवाज्यात प्रवेश केला.

तिथे त्याला हेडलॅम्पच्या उजेडात एक दृश्य दिसले.

समोर सुदर्शन चक्रामुळे तुकडे झालेले राहू केतू संतापलेले दिसत होते. त्यांनी एकत्र बसून भगवान शिवाची आराधना सुरु केली. बरीच वर्षे निघून गेली. भगवान शिव प्रसन्न झाले. राहू केतूनी त्यांना वरदान मागितले, "या पंचपालक परिसरात आमचे राज्य राहू द्या. जरी आम्हाला पंच महाभूत नियंत्रक मिळाले नाही तरी हे पाच तुकडे आमचे! तसेच आम्हाला अमृत नाही मिळाले तरीही समुद्र मंथनातून मिळलेला सर्व खजिना पाहिजे. आम्ही या पाच पर्वताखाली यांचे एक स्वतंत्र नागलोक स्थापन करू ज्याचे नाव असेल "राहू केतू नागलोक" आणि तो खजिना तिथे ठेऊ! जर कुणी ते पाच तत्वाचे गोळे आणि हा खजिना आमच्याकडून घेण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यांना जीवंत सोडणार नाही!"

भगवान शंकर तथास्तु म्हणाले आणि अंतर्धान पावण्यापूर्वी म्हणाले, "ठीक आहे,. पण जोपर्यंत हे पांच तत्वचे गोळे सुरक्षित आहेत तोपर्यंतच हा खजिना तुमचं राहील. एकदा का या पाच तत्वा पैकी एक जरी गोळा कुणी हस्तगत केला, की तुमचा खजिना पण सुरक्षित राहणार नाही! तेव्हा पंचतत्व गोळे सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची राहील. पण तुम्ही सर्व नाग कुणाला विनाकारण त्रास देणार नाही याचे मला वचन द्या"

राहू केतू दोघांनी तसे वचन दिले.

आपल्या निवासस्थानी श्रीविष्णू भगवान शंकरांना म्हणाले, "आपण फारच भोळे आहात, शिवजी! भक्तांना लगेच वरदान देऊन टाकता"

भगवान शंकर म्हणाले, "भक्तांच्या प्रार्थनेला मला हाक द्यावीच लागते आणि भक्त असले वरदान माझ्याकडून मागून घेतात. मी ते देतोही पण त्यात मी अशी मेख ठेवतो की भक्त उन्मत्त झाला आणि त्याने वरदान वाईट कामासाठी वापरले तर त्याचा विनाश निश्चित असतो!"

श्री विष्णू म्हणाले, "मी समजलो! आपली महिमा अगाध आहे, शिवजी!"

राहू केतू कडे आकाशातून खजिन्याचा वर्षाव झाला. त्यांनी आपल्या अंकित असलेल्या सापांच्या सर्व प्रकारांना आणि नागराजांना बोलावून घेतले. मग दोघांनी "राहू केतू नागलोक" पाच पर्वतांच्या खाली स्थापन केला. तिथे कालांतराने भव्य नागलोकचे निर्माण झाले. सगळीकडे नागकन्या, नाग कुमार दिसू लागले.

भगवान शिव पार्वतीला सांगत होते, "कर्कोटक नावाचा एक नाग होता, जो शक्तिशाली आणि बुद्धिमान होता. एके दिवशी, राजा परीक्षितला नाग लोकातल्या एका नागाने (तक्षक) दंश करून मारले होते. राजा परीक्षितचा पुत्र, जनमेजय, या घटनेने दुःखी आणि क्रोधित झाला आणि त्याने नाग यज्ञ आयोजित केला. या यज्ञात नागांचा संहार केला जात होता. कर्कोटकाला यज्ञातून वाचवण्यासाठी इंद्राने त्याला सांगितले की तो इतर कोणाही नागांच्या यज्ञात जाऊ नये. कर्कोटकाने इंद्राच्या सल्ल्याचा स्वीकार केला आणि जंगलात निघून गेला. कर्कोटक नागाने तपश्चर्या केली आणि माझ्या उपासनेत लीन झाला. त्याच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन मी त्याला वरदान दिले की त्याच्या स्पर्शाने कोणत्याही वस्तूवर विषाचा प्रभाव होईल. या शक्तीने कर्कोटक आणखी शक्तिशाली झाला. त्याने आपल्या रक्तपासून अति विषारी अशी कर्कोटकी नागिन तयार केली. तिला राहू केतू यांनी त्यांच्या नागलोकाची राणी जाहीर केले! पुढे पुढे याला कर्कोटकी नागलोक असे नाव पडले. कर्कोटकी राहू केतू यांच्या अंकित होती!"

पार्वती देवी म्हणाल्या, "पण ते पाच तत्वांचे गोळे कुठे आहेत, नाथ?"

महादेव म्हणाले, "ते पाच गोळे त्या पाचही पर्वतांच्या मध्ये असलेल्या सहाव्या पर्वताच्या खाली असलेल्या गुहेत, एका तळ्यात मध्यभागी तरंगत

असणाऱ्या पाच माश्यांच्या पोटात आहेत! ते तळे कर्कोटकी हिने विषारी केले आहे! पण जो कुणी त्या मध्यभागच्या सहाव्या पर्वताच्या टोकावर असलेल्या माझ्या मंदिराच्या घंटेतील जिभेच्या टोकावरील फुगीर भागात लपलेल्या नीलमणीचा स्पर्श त्या पाण्याला करेल, तेव्हा ते विषारी तळे निर्मल, विषरहित आणि स्वच्छ होईल आणि मग त्यातून कुणीही ते पंच तत्व गोल हस्तगत करू शकेल! त्यानंतर कर्कोटकी नागलोकाचा विनाश निश्चित आहे. त्यांनी पृथ्वीवरील मानवांना त्रास देण्यास सुरुवात केली आहे! ही नीलमण्याची गोष्ट राहू केतू, कर्कोटकी किंवा त्यांच्या नागलोकतील कुणाला माहिती नाही!"

"पण मग नाथ, त्या मण्याबद्दल इतर कुणाला कसे आणि कधी माहिती होईल?"

"तू चिंता करू नकोस, पार्वती! वेळ आली की सर्व योग जुळून येतील!"

आता समोर अंधार होता. फक्त हेडलॅम्पचा प्रकाश होता. पवनने ओळखले की, हे सगळे लाकडी दरवाजे म्हणजे काळ नियंत्रण करणाऱ्या अवकाश गुहेचे भाग आहेत आणि अवकाश गुहेचे वेगवेगळ्या काळात जाणारे दरवाजे हे इतर चार गुहांच्या प्रतिबंधित क्षेत्रात उघडतात. म्हणजे मला आता लवकर माझ्या मित्रांकडे गेले पाहिजे आणि हे सर्व सांगितले पाहिजे!

अंदाजे एका दरवाजातून तो आत शिरला. मात्र तिथे त्याला वेगळे दृश्य दिसले.

कर्कोटकी समोर एक नागकन्या बसली होती. तिला कर्कोटकी सूचना देत होती, "चांगले झाले तू हेरगिरी करून सूचना आणलीस की ते पाच जण खजिना शोधायला आलेत. आता तू स्त्री रूपात त्यांच्या मध्ये सामील हो आणि त्यांना तुझ्या मागे आपल्या नाग लोकांत घेऊन ये! इथे आपण सर्वांना खतम करून टाकू!"

कर्कोटकी बाजूला झाली तेव्हा पवनला त्या नागकन्येचा चेहरा स्पष्ट दिसला. ती दुसरी तिसरी कोणी नसून क्लारा होती!

म्हणजे क्लारा सर्वांची दिशाभूल करायला आली होती तर! लवकर मित्रांकडे जाऊन त्यांना अलर्ट करणे भाग आहे. सगळे रहस्य तर कळले पण मित्रांकडे जायचे कसे?

आता पुन्हा सर्व मित्र ज्या गुहेत प्रवास करत आहेत त्या जागेवर त्याच काळात पुन्हा जायचे तर कोणता दरवाजा निवडायचा हे त्याला कळत नव्हते. सर्व दरवाजे थोड्या थोड्या वेळाने आपोआप आपली जागा बदलत होते. दरवाजांच्या वर्तुळामागे, आणखी काही दरवाजे, त्यामागे आणखी काही दरवाजे अशी अनंत वर्तुळे होती. प्रत्येक दरवाजा वेगवेगळ्या काळात आणि वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन जाणारा होता.

पवनने हनुमानाचे मनोभावे स्मरण केले. तो हनुमानाचा भक्त होता. हनुमान भगवान शंकरांचाच एक अवतार!

शेवटी एका उजव्या बाजूला असलेल्या दरवाज्यात तो शिरला. ती पृथ्वी तत्त्वाच्या पर्वतामधली गुहाच होती. ठिकठिकाणी गुहेच्या भिंतीवर पृथ्वी तत्वाचे चिन्ह काढलेले होते. हेड लॅम्प च्या प्रकाशात तो पुढे पुढे जात राहिला. बरं झालं तर चालत राहिल्यावर त्याला भूक लागली. पाठीवर असलेल्या बॅगमध्ये असलेले थोडे ड्रायफ्रूट त्याने खाल्ले. सोबत बाटलीतील ऑरेंज ज्यूस प्यायला. त्यामुळे थोडी तरतरी आली. तो पुढे जात राहिला. सगळीकडे काळोख. बाहेरचे जग वेगवेगळे आणि ह्या गुहेमध्ये हा काळोख वेगळा. हा काळच वेगळा.

एके ठिकाणी त्याला एक ओबडधोबड अर्धा उघडलेला दगडी दरवाजा दिसला. त्या दरवाज्याच्या आत एक खोली होती. तिथे अंधारात कोणती तरी मानवी आकृती काहीतरी हातात घेऊन बघत होती. उत्सुकतेने पवनने त्या खोलीत प्रवेश केला आणि पुढे पुढे जाऊ लागला आणि त्या पाठमोऱ्या व्यक्तीच्या खांद्यावर ठेवला. त्या व्यक्तीच्या हातात टॉर्च होता. तो खाली पडला. त्या व्यक्तीने मागे वळून पहिले आणि पवनच्या हेड लॅम्पचा प्रकाश त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर पडला. तो अजय होता, ती खोली म्हणजे शस्त्रागार होती आणि अजय खूप घाबरलेला होता.

पवनने विचारले,"तू इथे कसा काय आलास?"

अजयने तोच प्रश्न त्यालाही केला, "अरे तू इथे काय करतोयस?"

"अरे तुझा हेड लॅम्प उचलायला मी वाकलो तेव्हा कुठल्यातरी वेगळ्या काळात वेगळ्या ठिकाणी येऊन पोहोचलो. मला या सर्व खजिन्याचे रहस्य माहीत झाले आहे. आणि बाकी सर्वजण कुठे आहेत?"

"अरे गडबड झाली आहे. घात झाला. सांगतो तुला सगळं. तू दिसला नाहीस त्यामुळे आम्ही तुला शोधत तिथेच थांबलो. आम्हाला काळजी वाटायला लागली. सर्वजण तुला हाक मारायला लागलो. क्लारा मात्र शांत होती. आणि तुला माहित आहे का, ती क्लारा एक नागकन्या आहे असे शिवराज म्हणाला. कारण त्याला तशी लक्षणे काल रात्री आपण टेन्ट मध्ये बोलत बसलो होतो तेव्हा दिसली. त्याने नागाचे रूपांतर क्लारामध्ये होताना रात्री पाहिले होते. म्हणूनच तो आपल्यात सामील झाला. आपली मदत करण्यासाठी. त्याने गुहेत क्लाराचे वागणे अधिकाधिक संशयास्पद वाटल्याने आणि ती आमची काहीतरी दिशाभूल करते असे असा संशय बळावल्याने आज आमच्या समोर क्लाराचे सत्य जाहीर केले तेव्हा तिचे डोळे लाल झाले, ती अर्धी साप आणि अर्धी मनुष्य बनली आणि तिने त्याच्यावर हल्ला केला. स्वरा आणि मीना शिवराजला वाचवायला म्हणून क्लाराला मागे खेचू लागल्या तेव्हा तिने दोघींना जोरात ढकलले. मी एक बाजूला पडलेला दगड उचलून क्लाराकडे फेकणार तेवढ्यात माझा पाय घसरून मी एका लाकडी दरवाजातून वेगळ्याच ठिकाणी आलो. तिच ही जागा. हे शस्त्र घर सापडले म्हणून मी दोन-चार शस्त्र उचलले. पण बघतो तर काय मला परत देण्याचा रस्ता सापडेना. तेवढ्यात तू आलास!"

"अरे हे ठिकाणच वेगळे नाही तर हा काळ सुद्धा वेगळा आहे!", असे म्हणून पवनने अजयला आपल्या सोबत घडलेला सगळा प्रकार सांगितला. त्याने बघितलेले सर्व दृश्य सांगितले, सर्व रहस्य सांगितले.

"बापरे किती आश्चर्यकारक आणि अद्भुत आहे हे सगळे! पण आता मला कळले की नीलमणी कुठे आहे... हा हा हा", अजय जोरात हसायला लागला आणि त्याचे रूपांतर क्लारामध्ये झाले.

"मी अजय नाही. मी क्लारा आहे. नागकन्या. कुणाचेही रूप घेऊ शकते! मी तुला जी कहाणी सांगितली त्यात अजय नाही तर मी दरवाज्यातून पडते. तू गायब झालास तेव्हा मला खात्री झाली होती की तू कोणत्यातरी काळ दरवाज्यातून कुठेतरी पडला असशील. मला तुला शोधायला मला यायचेच होते पण तेवढ्यात शिवराजने मी नागकन्या असल्याचे सर्वांना सांगितले आणि मी दरवाज्यातून पडले. वेगवेगळ्या काळ दरवाज्यातून तुझा पाठलाग करत करत मी इथपर्यंत आले! कर्कोटकीला शंका होतीच की नागलोक नष्ट करण्यासाठी भगवान शंकर यांनी काहीतरी उपाय केलेला आहे. आम्हा कुणा नागाला मात्र तो कधीही कळू शकणार नव्हता. कारण काही ठराविक दरवाज्यामध्ये आम्ही नाग लोकांपैकी कुणीही जाऊ शकत नाही हे मला माहीत होते. गेलेच तर नाग भस्म होतात. पण तू मात्र जाऊ शकशील हा अंदाज मला आला होता. तो खरा ठरला आणि तुला तो उपाय कळला. तुझ्याकडून मला कळला. आता तो नीलमणी मी मिळवणार आणि नष्ट करून टाकणार! आणि आता तुझा खेळ मी इथेच खलास करते!"

असे म्हणून क्लारा पवनकडे साप रुपात वेगाने झेपावली, पण पवनने डोळे मिटून हनुमान वडवानल स्तोत्र म्हणायला सुरुवात केली. पवनने वर्तमानकाळाचे द्वार कोणते ते कळावे अशी प्रार्थना हनुमानाला केली आणि डोळे उघडून तो क्लाराला हुलकावणी देत गोलाकार फिरून बघू लागला. त्या सर्व गोल गोल फिरणाऱ्या अनंत वर्तुळातील दरवाजांमध्ये तिसऱ्या वर्तुळातील एका दरवाजावर पवनला हनुमानाची सावली आणि त्या सावलीच्या आजूबाजूला प्रखर प्रकाश दिसला.

"तेच द्वार त्या वर्तमानकाळाचे असावे ज्यातून मी आलो. हनुमानाने मला मार्ग दाखवला. तसे पहिले तर प्रत्येक द्वार हे कुणासाठी तरी वर्तमानकालच आहे. किती अद्भुत आहे हे काळाचे जग आणि भगवान शंकर स्वत: या सगळ्या क्लिष्ट

काळरेषा हँडल करतात! बापरे!", असा विचार करून तो वेगाने त्या दरवाज्याकडे पळायला लागला.

कमरेपासून वर स्त्री आणि उरलेला भाग नागाची शेपटी अशा रुपात क्लारा हवेत त्याचा पाठलाग करू लागली. पवन तिला सारखी हुलकावणी देत होता. पहिले वर्तुळ पार करून दुसऱ्या वर्तुळात, तो पोहोचला. त्याचा पाठलाग करता करता ती नागकन्या चुकून दुसऱ्या स्तरातील वर्तुळामधल्या एका दरवाज्यात अनिच्छेने वेगामुळे फेकली गेली.

पवनने तिसऱ्या वर्तुळातील हनुमानाची सावली असलेला दरवाजा पकडला आणि त्यात उडी मारली. तो पुन्हा त्याच जागेवर आणि त्याच काळात पोहोचला जिथे तो अजयचा हेड लॅम्प उचलायला खाली वाकला होता. तो त्याने उचलला आणि अजयला हळूच मागे बोलावले. अजय त्याच्याकडे मागे गेला. अजयला चूप राहण्याची खूण करत भराभर त्याने अजयला हळूच सर्व अनुभव आणि कहाणी सांगितली. अजयचा सुरुवातीला विश्वासच बसत नव्हता.

नंतर पुढे पवन म्हणाला, "आता आपण पुढची घटना घडण्याची वाट बघू. जोपर्यंत शिवराज आणि क्लारा यांच्यात लढाई होत नाही तोपर्यंत आपण शांत राहू आणि मग एकदा का क्लारा दरवाजातून पडली की सर्वांना आपण ही कहाणी सांगू आणि तिथून कसेही करून बाहेर पडू. मग लगेच आपण मंदिरातील घंटेतून नीलमणी घेऊ आणि तळ्यातून ते पंचतत्व गोल हस्तगत करू. पण ती क्लारा त्या दरवाजांचे रहस्य जाणते. ती कसेही करून काळ प्रवास करत करत आपल्या आधी मंदिरात पोचायला नको म्हणजे झालं!"

अजय हे सर्व ऐकून सुन्न झाला होता. एक दीर्घ श्वास घेऊन तो म्हणाला, "म्हणजे, आपली स्पर्धा फक्त क्लाराशी नाही तर काळाशी सुद्धा आहे! त्यामुळे आपण आता जास्त वेळ दडवून चालणार नाही! पण क्लाराने सांगितलेले नक्की खरे होते का? की आपली दिशाभूल करायला तिने हे सगळे सांगितले? खरच तिच्यात आणि शिवराजमध्ये लढाई होईल?"

पवन म्हणला, "माझे मन मला मनापासून सांगते आहे की, जर मला हनुमानाने पुन्हा इकडे येण्याचा मार्ग दाखवला आहे, तर तिने सांगितलेले खरेच असेल. कदाचित तुझे रूप तिने घेतले असल्याने तिला जास्त खोटे बोलता आले नसावे. बरेचदा आपण ज्याचे रूप घेतो तसेच बनून जातो! तूच मला एकदा रावणाची कथा सांगितली होती, आठवते?"

"होय, तुझे म्हणणे बरोबर आहे. रावणाने सीतेला आपलेसे बनवण्यासाठी सगळे प्रयत्न व्यर्थ ठरले तेव्हा तिच्यावर प्रभाव टाकण्यासाठी रामाचे रूप घेतले पण त्याच्या मनातील पापी विचार नाहीसे झाले. तो वाईट विचार करूच शकत नव्हता!", अजयने सांगितले.

"पण इंद्राने अहिल्येला मिळवण्यासाठी गौतम ऋषींचे रूप घेतले तेव्हा मात्र असे झाले नाही!"

"ते कोण कोणाचे रूप घेतो, त्या त्या व्यक्तीच्या स्वभाव आणि प्रवृत्तीवर सुद्धा अवलंबून असते!"

"खरे आहे! चल तर मग! आता आपण आपल्या टीमकडे जाऊ!", पवन म्हणला आणि ते टीमकडे गेले.

"काय रे! इतका वेळ हेड लॅम्प शोधायला? हेड लॅम्प शोधत होते का गप्पा मारत होते?", करण.

"दोन्ही!", अजय आणि पवन एकदम म्हणाले आणि टाळी देत हसायला लागले.

अजय आणि पवन दोघेही सोबत चालत होते.

शिवराज बऱ्याच वेळेपासून अस्वस्थ होता. त्याला अजय ला काहीतरी सांगायचे होते, पण अजून हिम्मत होत नव्हती असे वाटते होते.

अंधाऱ्या गुहेत चालत असताना शक्य तितक्या जोड्या एकमेकांच्या हातात हात धरून चालत होते. गुहेतले वातावरण आता चांगलेच थंड आणि ओलसर होते.

प्रत्येक पावलासोबत त्यांच्या बुटांचा आवाज गुहेच्या भिंतींवर आपटत होता, जो त्यांच्या मनात भीती निर्माण करत होता.

अचानक, करणच्या पायाखालून जमीन सरकली आणि तो किंचाळत खाली कोसळला. त्याच्या आवाजाने सगळे घाबरून गेले आणि एकमेकांना घट्ट धरून उभे राहिले. अमरने टॉर्चचा प्रकाशझोत त्याच्या दिशेने फेकला. खाली मोठा काळा खड्डा दिसत होता, पण एका खडकाला धरून ठेवल्याने करण त्या खड्ड्यात पडता पडता वाचला होता. शिवराजने पटकन त्याला हात देऊन वर ओढले. करण सावरला. करण पडला होता तेव्हा स्वराचा चेहरा मात्र भीतीने पंधरा पडला होता. तिला करण बद्दल आत्मीयता वाटू लागली होती. करण खड्ड्यात पडण्यापासून वाचताच ती त्याला जाऊन बिलगली. करण तिच्या पाठीवरून हात फिरवू लागला. तिला प्रेमाने कुरवाळू लागला. तिच्या केसांतून हात फिरवू लागला, तिच्या कमरेवर त्याने एक हात ठेवला आणि तिला आणखी जवळ ओढले. तेवढ्यात अमरने मोठ्याने खकारून दोघांना जाणीव करून दिली की गुहेत ते दोघेच नाहीत, इतर जण सुद्धा आहेत. तेव्हा स्वरा बाजूला झाली आणि चक्क लाजली. या घटनेदरम्यान क्लारा मात्र सर्वात मागे उभी होती.

"अरे वा! एक पोरगी लाजली रे बाबा!", करण तिला चिडवू लागला.

"एक पोरगी प्रेमात पडली!", अमर म्हणाला.

"चल! काहीतरीच काय?", असे म्हणून तिने लाजून चेहऱ्यावर दोन्ही हात झाकले.

"मित्रांनो, बास झाली प्रेमकहाणी! सध्या थ्रिलर स्टोरी सुरु आहे, लव्ह स्टोरी नाही! आटपा तुमचे लवकर!", पवन म्हणाला.

तेव्हा अचानक गुहेत एक गडगडाट ऐकू आला आणि गुहेची भिंत हलू लागली. त्यांच्या आजूबाजूला छोटे छोटे खडक खाली पडू लागले. हे पाहून सर्वांचीच धडधड वाढली. ते जागेवरच थबकले आणि एकमेकांना सांभाळत पुढे

जायचा मार्ग शोधू लागले. आता पुढचा रास्ता बंद झाला होता पण खालच्या बाजूला तीन वेगवेगळ्या दिशांना तीन मोठे भुयार दिसत होते.

कोणत्या भुयारतून पुढे जायचे असे ठरत असतांना क्लारा म्हणाली, "वुई मस्ट गो विथ दी मिडल वन! मधल्या भुयारतून जाऊ!"

शिवराज म्हणाला, "नाही! उजव्या भुयारात जाणे योग्य राहील!"

क्लारा, "नो! माधल्या!"

शिवराज चिडला, "नाही! राइट साइड ओन्ली! यू व्हिलन!"

क्लारा, "व्हॉट? हाऊ डू यू देअर टू से धीस?" काशी हीमत जाली तुजी?"

शिवराज, "मला माहीत आहे तू नागकन्या आहेस. आणि आम्हा सर्वांना तू दिशाभूल करून नाग लोकात घेऊन चालली आहेस! मी हे होऊ देणार नाही! तू आम्हा सर्वांना पण नागलोकात घेऊन जाणार आणि आम्हाला न मारता आमचे रूपांतर पण नागात करणार! अशा रीतीने तुम्ही तुमची सेना वाढवणार आहात, आणि पुन्हा देवांवर आक्रमण करणार आहात! "

अमर हसायला लागला, "व्हॉट? नागकन्या? ब्रिटिश लोकांमध्ये पण नागकन्या असते?"

सर्वजण हसायला लागले. पवन आणि अजयला आता समजले की तो प्रसंग आला आहे.

शिवराज म्हणाला, "परदेशी पर्यटक तरुणी सोबत भारतीय मुले एक आकर्षण म्हणून लगेच मैत्री करतात हे माहीत असल्याने तिने विदेशी तरुणीचे रूप घेतले!"

आपले रहस्य माहीत पडले हे कळताच क्लारा चिडली. तिच्या पायांवर आणि चेहऱ्यावर नागाच्या त्वचेवर असतात तसे खवले उमटू लागले. सर्वजण आ वासून हे दृश्य बघत होते.

क्लारा फुत्कारत म्हणली, "मी तुम्हाला कुणालाच सोडणार नाही. शिवराजला तर मी सर्वात आधी मारेल. पण शिवराज, तुला माझे रहस्य कसे माहीत?"

शिवराज हसत म्हणाला, "मला ओळखले नाहीस? मी पण नाग लोकतील एक नागकुमार! मला कर्कोटकीची योजना आधीपासून माहीत होती. सध्या जे काही नाग लोकात चालले होते ते मला आवडत नव्हते. म्हणून मी काही दिवसांपूर्वी नागलोकाचा त्याग केला आणि पृथ्वीवर आलो. तुझ्यावर पाळत ठेवली."

क्लाराचा आक्रमक पवित्रा बघतच पवन मध्ये पडणार तेवढ्यात क्लाराने शिवराजवर हल्ला केला. स्वरा आणि मीना शिवराजला वाचवायला म्हणून क्लाराला मागे खेचू लागल्या तेव्हा तिने दोघींना जोरात ढकलले. त्या खाली जाऊन पडल्या. मग क्लारा अर्धी साप आणि अर्धी मानव बनली आणि आपल्या शेपटीने तिने शिवराजला गुंडाळण्याचा प्रयत्न केला. अजयने एक बाजूला पडलेला दगड उचलून क्लाराकडे फेकणार तेवढ्यात क्लारा चां पाय घसरला आणि ती अंधारातील जवळच्या एका लाकडी दरवाजाकडे घसरत गेली आणि तो दरवाजा उघडून ती गायब झाली.

सगळे इतके आश्चर्यचकीत झाले की समोरचे घडले त्याचे अजून त्यांना आकलन होत नव्हते. त्यातच पवन म्हणाला, "पुढे काय घडले ते मला माहिती आहे!"

त्यामुळे त्यांच्या गोंधळात आणखी भर पडली.

मग पवनने सगळ्यांना आतापर्यंत घडलेला सर्व प्रसंग सांगितला.

शिवराज म्हणाला, "अच्छा म्हणजे असे आहे तर! मग तो नीलमणी आपण लगेच मिळवायला हवा. मग तळ्यातील विष नष्ट करून पाच मासे हस्तगत करायला हवे. त्याद्वारे हे नागलोक नष्ट करायला हवे!"

"तुला आम्ही चुकीचं समजलो, तुझ्यावर संशय घेतला त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत!", स्वरा आणि मीना म्हणाले.

"हरकत नाही. प्रसंगानुसार तुमचा संशय बरोबरही होता. सगळेजण वेगवेगळे गुहेत शिरलो असतो तर क्लाराने दगा फटका केला असता आणि इतर गुहेतील काहीजण वाचले असते, असा विचार करून मी वेगवेगळे जायचे म्हणत होतो! या तीन भुयारी मार्गांपैकी मधला मार्ग ज्यावर क्लारा अडून बसली होती तोच नागलोकाचा मार्ग होता! हे मला माहिती होते, म्हणून मी विरोध केला तेव्हा ती चिडली! ती कसेही करून तुमच्या सोबत मोहिमेवर आलीच असती पण त्या रात्री तुम्ही सर्वजण आयतेच तिच्याकडे गेलात त्यामुळे तिचे काम आणखी सोपे झाले. "

"मग आता इथून बाहेर कसे पडायचे?", मीनाने विचारले.

"हा उजव्या बाजूचा भुयारी मार्ग आहे तिथून! काळजी करू नका. मी अर्धा नाग आणि अर्धा मनुष्य अशा रुपात परावर्तित होईल आणि तुम्ही सर्व माझ्या अंगावर बसा. मी सरपटत या भुयारी मार्गातून वेगाने तुम्हाला बाहेर घेऊन जाईन! हा मार्ग भुयाऱ्यातून सहाव्या पर्वताकडे जातो. तिथून पर्वताच्या आत मधल्या भुयारातून वरच्या मंदिरात जाईन, पूर्ण साप रूपामध्ये तो घंटेतला नीलमणी हस्तगत करेल आणि पुन्हा खाली येईल. तोपर्यंत तुम्ही सर्वजण खाली तळ्याजवळ थांबा", शिवराज म्हणाला. अंधाऱ्या गुहेतून पुढे जाताना अमर, पवन, स्वरा, मीना, करण, अजय शिवराजच्या पाठीवर बसले होते. त्याच्या अंगावर मजबूत, खडबडीत खवले चमकत होते.

गुहेतील वातावरण थंड आणि ओलसर होते, पाण्याच्या टपकण्याच्या आवाजाने वातावरण अधिक गूढ झाले होते. नागाच्या भुयारतून सरपटण्याच्या आणि चालण्याच्या प्रत्येक हालचालीने भुयारात एक प्रतिध्वनी निर्माण होत होता. सर्वजण एकमेकांच्या जवळ बसले होते, त्यांच्या चेहऱ्यावर थोडीशी भीती होती, पण त्यांच्या डोळ्यांत एक चमक होती, तसेच अनपेक्षित आणि अद्भुत प्रवासाचा उत्साह!

"इमॅजीका मधले रोलर कोस्टर राईड, या आपल्या राईडच्या पुढे काहीच नाहीत. इथे येऊन खजिना मिळो न मिळो पण या राईडमुळे पैसे वसूल झाले बघा!"

"अरे शिवराज भाऊ जरा, उलटे पुलटे होऊन दाखव ना?"

"अरे वेड्यानो, मी उलटा पुल्टा होईल पण तुम्ही सीट बेल्ट लावलेले आहेत का? घरंगळत जाऊन उगाच कुठेतरी गुहेत जाऊन एखाद्या दरवाजावर पडाल आणि जाल महाभारत काळातील युद्धात! तिथे गेल्यावर लागेल एखाद दुसरा बाण आणि व्हाल जखमी"

"हा, ते पण बरोबर आहे म्हणा!"

"माझ्या खवल्यांना पक्के धरून ठेवा. मी आता वेग वाढवतो आहे!"

"ए! आपण हे सगळं संपलं ना की इथे परत येऊ आणि रामायण काळात जाऊ!"

"जाऊ जाऊ नक्की जाऊ. मी तर भविष्यकाळात जाईन. जेव्हा सगळीकडे रोबोटचे राज्य असेल!"

"मी तर अलेक्झांडरच्या काळात जाणार!"

आत पुढे गुहेतील भुयार अरुंद आणि गुंतागुंतीचे होते. नागाने त्याच्या सर्पाकृती शरीराच्या साहाय्याने सहजपणे त्या मार्गांमधून मार्ग काढला. आता कुणीच एकमेकांशी संवाद साधला नाही, फक्त त्यांच्या श्वासांचा आवाज आणि नागाच्या पुढे जाण्याच्या आवाजानेच वातावरण भरले होते.

थोड्यावेळाने, ते एका मोठ्या पोकळीत आले.

आता त्यांच्यासमोर एक विशाल तळं दिसू लागलं, ज्याचा पाण्याचा पृष्ठभाग शांत आणि आरशासारखा होता. पाण्याच्या पृष्ठभागावर टॉर्चचा प्रकाश पडताच एक दिव्य तेज निर्माण झालं. नागाने तळ्याच्या काठावर थांबून सर्वांना खाली उतरवलं. ते सगळे विस्मयचकित झाले होते, तळ्याचं पाणी नितळ आणि निळसर रंगाचं होतं, जणू काही स्वप्नातील दृश्य!

त्या अर्ध नागाने त्या दिव्य तळ्याच्या काठावर उभं राहून एक मंत्र जपायला सुरुवात केली. त्या मंत्राच्या प्रभावाने तळ्याच्या पाण्यात एक हलचल निर्माण झाली आणि त्याच्या हातात एक प्राचीन भाला प्रकट झाला, ज्याच्या टोकाला तेज होतं.

सर्वजण त्या प्रसंगाने थक्क झाले होते, त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि विश्वासाचा भाव होता.

शिवराज म्हणाला, "हा भाला घ्या. एखादे संकट आल्यास ह्या भाल्याच्या मदतीने त्याचा सामना करा! तुम्ही सर्वजण इथेच थांबा! आता मी वर जाऊन तो नीलमणी घेऊन येतो!"

असे म्हणून शिवराज भुयारतून वर निघाला सुद्धा!

सर्वजण तळ्याकाठी बसले.

बराच वेळ झाला.

अमर म्हणाला, "हा शिवराज गेला नीलमणी आणायला! पण तो खरच आपल्याकडून आहे ना? की तोही क्लारा कडून आहे? दोघांनी मिळून नाटक करून आपल्याकडून नीलमणी कुठे आहे हे जाणून घेतले आणि ते दोघी आता नीलमणी घेऊन पसार तर होणार नाहीत ना? नाही म्हणजे, धूम टू पिक्चर मध्ये नाही का ऐश्वर्या राय नेमकी कोणाकडून आहे तेच लवकर समजत नव्हतं. ऋतिक कडून की अभिषेक बच्चन कडून! म्हणून म्हटलं!"

"ए अरे गप बस ना भाऊ! इथे प्रसंग काय आणि तुला चित्रपट कसला सुचतो रे?", त्याच्या पाठीतील एक गुद्दा हाणत करण म्हणाला.

स्वरा पण हसत हसत म्हणाली, "आपल्यासमोर जे घडतंय ते काय बाहुबली पिक्चर पेक्षा कमी आहे का? त्याचा अनुभव घ्यायचा सोडून तुला तो कसला चोर लोकांचा पिक्चर आठवतो! धूम टू?"

इकडे शिवराज पूर्ण सर्प रूपात मंदिराच्या घंटी वर चढला. त्यातून घंटेच्या जिभेवर म्हणजे आपण घंटी हाताने ज्याद्वारे वाजवततो त्यावर चढला. रात्र होती त्यामुळे मंदिरात कोणी नव्हते. त्या जिभेला घट्ट विळखा घालून तोंडाने जिभेच्या पुढचा फुगीर भाग त्याने तोडला, त्यातला नीलमणी तोंडात धरून ठेवला आणि पुन्हा त्याच वेगाने भुयारातून खाली तळ्याकडे येऊ लागला.

शिवराज आला आणि सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

"हे घे अजय! तुझ्या हातून टाक तो मणी तळ्यात!" शिवराज म्हणाला.

गुहेतील दिव्य तळ्याकडे सर्वजण आश्चर्याने पाहत होते. अजयच्या हातात नीलमणी चमकत होता, जणू काही त्यात अमर्याद शक्ती होती. अजयने तळ्यात नीलमणी टाकण्याचा निर्धार केला आणि तो तळ्याकडे जाऊ लागला तेव्हा अचानक तळ्यातून खूप मोठी पाण्याची लाट उडून अजयच्या अंगावर आदळली आणि तो फेकला गेला, पण नीलमणी त्याच्या मुठीत घट्ट धरलेला होता. ते पाणी त्याने तोंडात आणि नाकात जाऊ दिले नाही. त्याने श्वास रोखून धरला. कारण ते पाणी विषारी होते.

आणि अचानक, तळ्याच्या काठावर एक स्त्री आली. तिचं शरीर कमरेपासून वर मानवाचं होतं, पण खाली एक लांब सर्पाकृती शेपटी होती. ती अत्यंत सुंदर, आणि भव्य पण धोकादायक दिसत होती. होय! ती कर्कोटकी होती.

नागलोकचा अंत जवळ आल्याचे तिला क्लाराने सांगितले होते. क्लारा विविध काळ-दरवाज्यांतून नागलोकांत जाऊन पोहोचली होती. नाग लोकात क्लारा थांबली होती, आणि तिने सगळे सैन्य तयार ठेवले होते, गरज पडलीच तर ती येणार होती. कर्कोटकी स्वत: लढायला आली कारण तिला शिवराजवर राग होता. तिच्या डोळ्यांत प्रखर तेज होतं. ती अजयकडे रोखून पाहत ठाम आवाजात म्हणाली, "तू हा मणी तळ्यात टाकू शकत नाहीस आणि कुठे आहे तो गद्दार शिवराज? त्याचा मी आधी खातमा करते!"

शिवराज समोर आला, "माझे काय करायचे ते कर! पण मला तुझ्या अत्याचारी नागलोकाचा अंत करायचा आहे!"

"अरे वा? इतका काळ आमच्यात राहिलास, लहानाचा मोठा झालास आणि त्याचे पांग हे फेडलेस? तुला एक संधी देते. पुन्हा माझ्या बाजूने ये. मी तुला नाग लोकाचे सेनापतीपद देते!"

"मला कसल्याच पदाची अपेक्षा नाही. मला हे सर्व नवीन सहा मानव-मित्र मिळालेत हेच खूप झाले!"

"हे मानव-मित्र तुझ्या काय उपयोगाचे? मी एक फुंकर मारली की ते उडून हवेत अनेक कोस दूर जाऊन पडतील!"

"त्यांना हात तर लावून बघ. तुझी गाठ माझ्याशी आहे!"

कर्कोटकी खदाखदा हसायला लागली.

"बघा तरी! मला कोण आव्हान देत आहे? माझ्याच नागलोकातील एक साधा नागकुमार!"

तेवढ्यात संधी साधून पवनने भाला उचलला आणि तो कर्कोटकीकडे फेकला. तिने शेपटीने वेटोळे घालून तो भाला पकडला आणि फेकून दिला. तो अजयच्या बाजूला पडला.

अजय थोडा गोंधळला. त्याच्या एका हातात मणी होता पण त्याने धैर्य एकवटून दुसऱ्या हाताने भाला उचलला आणि तळ्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. शिवराजकडचे तिचे लक्ष विचलित झाले आणि अजयला थांबवण्यासाठी आपली सर्पाकृती शेपटी कर्कोटकीने अजयच्या दिशेने झेपावली. तिच्या चपळ हालचालींमुळे अजयला सावधगिरीने पुढे जावं लागलं. त्यांच्यात एक तीव्र संघर्ष सुरू झाला.

तेव्हा नाग-कुमार शिवराज, पुढे आला.

त्याने कर्कोटकीला आव्हान दिलं, "कर्कोटकी, हा मणी तळ्यात अजय टाकणारच. तू त्याला थांबवू शकत नाहीस."

अजयने भाला शिवराजकडे फेकला. त्याने झेलला.

शिवराज आणि कर्कोटकी यांच्यात एक जोरदार युद्ध सुरू झालं. त्यांच्या चपळ हालचालींनी आणि शक्तीने तळ्याच्या काठी एक भयानक दृश्य निर्माण केलं.

शिवराज आणि कर्कोटकीमध्ये प्रचंड शक्ती आणि कौशल्याचं प्रदर्शन सुरू झालं. त्यांच्या सर्पाकृती शरीरांनी एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी पुरेपूर वापर केला. शिवराजने आपल्या शक्तीने कर्कोटकीला पाठीच्या दिशेने जोरदार धक्का

दिला, ज्यामुळे ती थोडीशी डगमगली. शिवराजच्या हातातील भाल्याचे टोक चमकायला लागले.

कर्कोटकी शिवराज सोबत लढण्यात व्यस्त होती, तोपर्यंत सर्वांनी अजयच्या आजूबाजूला संरक्षणाचं वर्तुळ तयार केलं, ज्यामुळे अजयला तळ्याकडे जायला संधी मिळाली. शेवटी अजयने वेगाने तळ्याच्या दिशेने तो मणी फेकला तो बरोबर मध्यभागी जाऊन पडला. गढूळ रंगाचे तळे एकदम स्वच्छ झाले. तेवढ्यात मध्यभागतील पाणी वर उसळले आणि त्या पाण्यातून पांच मासे वर उसळी मारून आले आणि त्या पाण्यातच तरंगत राहिले. ते उसळी मारणारे पाणीसुद्धा तिथेच कारंजासारखे उसळत राहिले.

जास्त वेळ लागला म्हणून क्लारा निवडक सैनिक घेऊन तळ्याकडे निघाली. राहू केतू हे दोघे दैत्यगुरु शुक्राचार्य यांच्या एका अज्ञात ठिकाणी भरलेल्या शिबिरात गेलेले होते. त्यामुळे इथल्या घडामोडी त्यांच्यापर्यंत नाग लोकांतील कुणी पोहोचवू शकले नाही.

इकडे कर्कोटकी सावरली आणि तिने आणखी त्वेषाने शिवराजवर हल्ला केला. शिवराजने तो चुकवला. कर्कोटकीच्या कपाळाच्या मध्यभागी मारण्याचा चान्स शिवराजला मिळत नव्हता.

तिथे मारले की कर्कोटकीला मृत्यू येणार असा तिला भगवान शिवाचा शाप होता. हे त्याने नाग लोकांत चोरून ऐकले होते. पण याची कर्कोटकीला कल्पना नव्हती. तिने शिवराजला आपल्या शेपटीत गोल गुंडाळून करकचून दाबले. तो जिवाच्या आकांताने ओरडू लागला. त्याच्या हातातून भाला खाली पडला. पण इतर कुणालाही "तो भाला कर्कोटकीच्या कपाळात मार" असे खुणेनेसुद्धा शिवराजला सांगणे जमत नव्हते.

आपण दोर गुंडाळून भोवरा जमिनीवर सोडून देतो तसे कर्कोटकीने शिवराजला शेपटीने भिरकावले त्यामुळे शिवराज हवेत गोल गोल गोल फिरत फिरत गुहेच्या एका भिंतीवर आपटून जोरात गरगरत खाली पडला.

कर्कोटकी त्वेषाने हसत दोन्ही हातांनी विजय दर्शवणारी छाती ठोकत होती आणि मोठी आरोळी देत होती.

घरंगळत शिवराज मीनाच्या पुढ्यात पायाशी येऊन पडला, त्याने तिला खुणेने भाला उचलून कर्कोटकीच्या कपाळाच्या मध्यभागी मारण्याची खूण केली.

मीनाने हवेत एक उंच उडी घेतली, भाल्यावर झेपावली आणि तो उचलून तिने नेम धरून पुनः उंच उडी मारली आणि बरोबर कर्कोटकीच्या कपाळाच्या दिशेने फेकला. तिला तो बरोबर लागला आणि कर्कोटकीचा अजस्त्र देह धडकन तळ्याच्या बाजूला कोसळला. जमीन अशी थरथरली की जणू काही भूकंप झाला.

कर्कोटकी मेल्यामुळे क्लारा आणि इतर सैन्य पण मातीच्या ठिसुळ ढेकळासारखे फुटून नष्ट झाले. सर्वत्र ओली माती माती पसरली. मीनाने भाल्यासाहित जमिनीवर अलगद उडी मारली.

"अरे मीना! तू साडीतली सुपर हीरोईन, देसी वंडर वूमन आहेस की काय?", अजय अति आनंदाने म्हणाला.

मीना ऐटीत म्हणाली, "पुढच्या वर्षीच्या ऑलिंपिकमध्ये मी भालेफेक स्पर्धेमध्ये भाग घेणार आहे! माझे खूप आधीपासून भालाफेकचे प्रशिक्षण सुरु आहे! काय समजलात मला तुम्ही लोक?"

"वा! ही मीना तर छुपी रुस्तूम निघाली!", स्वरा.

जमिनीवर रक्ताळलेल्या स्थितीत उठून बसलेल्या शिवराजला पण हसू आवरत नव्हते. तो हसत म्हणाला, "कमाल केलीत मीनाताई तुम्ही!"

"ए अजय! लवकर ते तरंगणारे मासे काढ तिथून आणि काढ ते पंचतत्व गोल त्यांच्यातून! मग तो खजिना", अमर.

"जरा दमानं घे! थोडा आराम कर! मेली ना आता ती, कर्बोदकी! थोडा आराम करूया, मग बाकीचे काम करू!", करण.

"कर्बोदकी नाही, कर्कोटकी!", अजय.

"अरे, नावात काय आहे! असे महान डेव्हिड हॅमिल्टन म्हणाला ते उगाच नाही!", पवन.

"अरे लिटरेचरच्या भुकेल्या साहित्यिक माणसांनो, मला जाम भूक लागली आहे. पोटात कावळे भुंकत आहेत! आधी पोटाचे बघा मग डोक्यात थोरा मोठ्यांचे विचार भरा!", स्वरा.

"इथे गुहेमध्ये फूड डिलिव्हरी होते का? म्हणजे होम डिलिव्हरी सारखे, केव्ह डिलिव्हरी!", करण.

"त्यासाठो मोबाइल तर चालू असायला पाहिजे ना!" अमर.

सर्वजण विजयाच्या आनंदात तिथेच लोळले कारण खूप थकवा आला होता. रात्रीचे किती वाजले याची सुद्धा कुणाला अजून माहिती नव्हती. तळ्याच्या मध्यभागी उसळलेल्या कारंज्याच्या वर ते पाच मासे अजूनही त्या पाण्यात गोल गोल उसळत तरंगत होते.

गुहेतील काळोखात दूर असलेल्या एका कोनाड्यात एक विचित्र आकाराचा प्राणी बसला होता. आपले चमकणारे हिरवे डोळे रोखून तो त्या सर्वांकडे एकटक बघत होता.

६. अनोळखी चेहरे

ती सूर्यप्रकाश नसलेली जुलै महिन्यातील पावसाळ्यातील सकाळ होती. दहा वाजले होते. उभ्या रेषांचा हिरवा टीशर्ट आणि करड्या रंगाची जीन्स अशा पेहरावात "दामोदर दूधखुळे" हा महाराष्ट्रातील एका प्रसिद्ध हिल स्टेशनवरील "मज्जा पॉइंट" जवळ असलेल्या संरक्षक कठड्यावर निवांतपणे हात ठेऊन समोरचे निरीक्षण करत उभा होता. नुकताच पाऊस पासून गेलेला होता. आजूबाजूचे छोटे मोठे धबधबे वाहते झाले होते.

कॉलेज तरुण तरुणी, फॅमिली सर्वजण पर्यटनाला आलेले होते. आधीच लाँग विकेंड आणि त्यात आज रविवार असल्याने जास्त गर्दी होती. मोबाईल फोनमध्ये सेल्फी काढायची आणि ओठांचा विविध पद्धतीने चंबू करण्याची नुसती चढाओढ लागलेली होती. मुली आपल्या सुंदर चेहऱ्याचा आकार नाक आणि ओठ वेडावून, वाकवून, गाल फुगवून किती जास्तीत जात पद्धतीने विचित्र आकारात रूपांतरित करता येऊ शकतो याचे जिवापाड प्रयोग करत होत्या. घोड्यावर रपेट मारणाऱ्यांची सुद्धा खूप गर्दी होती. रपेट मारल्यानंतर काही मुली घोडयासोबत सेल्फी काढत होत्या. एवढे बरे की, त्या घोड्याला ओठांचा चंबू करायला सांगत नव्हत्या.

सारखा घड्याळात बघत दामोदर मनाशी म्हणत होता, "कामिनीला उशीर का झाला? केव्हा येईल ती? एक तर चंद्रचूड साहेब आज पहिल्यांदा आम्हा दोघांना महत्त्वाचे काम सोपवणार आहेत आणि कामिनी? तिला काही प्रसंगाचं गांभीर्यच दिसत नाही! ती यायच्या आत ते आले तर?"

तेवढ्यात आकाशी निळी सलवार कमीज घातलेली "कामिनी कुरकुरे" घाईने चालत येताना दिसली.

"काय, काकू मॅडम! एवढं वेळ लागतो का तयारी करायला? मुंबईचे लोक तर किती धडपडे असतात. आणि तू? कपडे घालून तयारी करायला एवढा वेळ लागतो?"

"अहो पुणेरी दादू सर! त्याचं काय झालं ना, की माझ्या पिवळ्या सलवार वर घाईत कॉफी सांडली! बदलावा लागला."

"काय? सकाळीच हॉटेलमधल्या तुझ्या रूमवर आपण सोबत नाश्ता केल्यावर एक मोठ्ठा कप भरून मी चहा आणि तू कॉफी घेतली होती ना? मग मी लवकर इकडे आलो तेव्हा तू तिकडे परत कॉफी मागवलीस? बहुत नाइन्साफी है ये! अगं, किती कॉफी पितेस?"

"जाम टेन्शन आलेलं रे, म्हणून घेतली! आज आपलं पाहिलं असाईनमेंट आहे ना!"

"जाम, घेतली, असले शब्दप्रयोग नको करत जाऊस गं! त्याचा अर्थ वेगळा होतो! आपण दोघे सर्व प्रकारच्या व्यसनांपासून आयुष्यभर दूर राहायचे ठरवले आहे ना! मग घेतली काय म्हणतेस? आणि जाम काय जाम? खूप म्हणायचे! काय तुम्ही मुंबईकर आणि तुमची मराठी!"

"कुठेही जोक नको ना मारू! आला मोठा मराठी भाषेचा कैवारी पुणेकर!"

"कैवारी म्हणजे? आहोच आम्ही पुणेकर मराठी भाषेचे काळजी वाहक, पोषक, रक्षक आणि चालक!"

"माझा मराठीचा क्लास नंतर घे! हां, आणि हे खरं आहे की सिगारेट, दारूसारख्या व्यसनांनी आयुष्याची राखरांगोळी होते! घेतली, बसलो, जाम, शेंगदाणे, फरसाण असे शब्द निघाले की आपल्या काही मित्रांना दारू शिवाय काही सुचत नाही!"

"करेक्ट! त्यापैकी काहींना आपण व्यसनापासून परावृत्त केलेसुद्धा!"

ते दोघे तिथून गर्दीमध्ये एका दिशेने चालायला लागले. दोघांनी फॉरेन्सिक सायन्समध्ये सोबत शिकून स्पेशलायझेशन केले होते. दामोदरने "बॅचलर्स डिग्री इन क्रिमिनोलोजी" तर कामिनीने "क्रिमिनल लॉ" मध्ये डिप्लोमा केला होता. विविध परीक्षा देऊन त्यांनी नुकतेच प्रायव्हेट डिटेक्टिव्हचे म्हणजे खासगी गुप्तहेर बनण्यासाठीचे रितसर लायसन्स मिळवले होते.

दामोदर म्हणाला, "अगं पण मला सांग! या दूधखुळ्या गुप्तहेराची ओव्हर स्मार्ट आणि कुरकुरीत साथीदार पहिल्याच कामात इतकी "जाम" टेन्शन घेईल तर कसं होणार आपलं? सोबत शिक्षण घेतलं, ट्रेनिंग घेतली. आता काम करायची पाळी आली तर टेन्शन? रिलॅक्स रहने का? ए क्या बोलती तू? आती क्या..."

"ए! आती क्या वाला! येऊन गेलो तरी आती क्या काय विचारतोस? तुला एक गुप्तहेर बनायचे आहे की फिल्मी हीरो हे एकदा ठरवून ठेव! नाहीतर इथे आगपेटी शोधावी लागेल!"

"नको! मला जीभ जाळून घ्यायची नाहीए!"

कामिनी हसायला लागली. त्याने टाळीसाठी हात पुढे केला. तिने टाळी दिली आणि म्हणाली, "बाय द वे, तू हॅट आणि कोट नाही घातलास?"

"कशासाठी घालायचं ते? लोकांना दाखवण्यासाठी की मी गुप्तहेर आहे? त्या वेशात लोक मला गुप्तहेर समजण्याऐवजी हंड्रेड डेज मधला खुनी जॅकी श्रॉफ समजून पोलिसांना बोलवतील! ह्या ह्या ह्या!"

"व्वा रे! जोक तर लई भारी मारतोस, पण समोरच्याला हसू पण आलं पाहिजे ना?"

"विनोद समजण्यासाठी आणि हसू येण्यासाठी सेन्स ऑफ ह्युमर पण असावा लागतो, काकू उर्फ कामिनी कुरकुरे! आहे का विनोदबुद्धी तुमच्यात?"

"विनोद तर माझा बालपणापासूनचा मित्र आहे. तो हुशार आहे आणि त्याला बुद्धी सुद्धा आहे!"

"चूप बस, ते बघ! ते आलेत समोर इन्स्पेक्टर!"

इन्स्पेक्टर "चंद्रचूड चावला" हे पंजाबी शिख होते. ते साध्या वेशात चालत येत होते. महाराष्ट्रात नोकरी करत असल्यामुळे त्यांना मराठी भाषा चांगली बोलता येत होती.

त्यांनी जवळच्याच एका रेस्टॉरंटमध्ये दोघांना चलण्याची विनंती केली. बाहेरच्या बाजूला रंगीत छत्र्यांचे छत असलेल्या बाकड्यांवर ते तिघे बसले. थोडा थोडा पाऊस सुरू झाला होता. मग चंद्रचूड यांनी "चहा कॉफी घेणार का" असे विचारले.

कामिनी "कॉफी घेणार" म्हणाली. दामोदरने तिच्याकडे "कमाल आहे!" अशा अर्थाने पाहिले.

दामोदरला "स्पेशल गवती चहा" म्हणजे "लेमन ग्रास टी" हवा होता. चंद्रचूड यांनी तशी ऑर्डर दिली. त्यांनी स्वतःसाठी फक्कड मसाला चहा मागवला.

इन्स्पेक्टर चंद्रचूड म्हणाले, "दामोदर! तसं पाहिलं तर नवख्या गुप्तहेरांना डायरेक्ट तपासकार्यात आम्ही सहसा सामील करून घेत नाही. पण, तुझ्या वडीलांची म्हणजे रिटायर्ड फेमस क्राईम रिपोर्टर, पत्रकार आणि प्रसिद्ध गुन्हेगारी कथालेखक श्री. सागर दूधखुळे यांची आणि माझी जुनी मैत्री. त्यांचे वय माझ्यापेक्षा जास्त परंतु त्यांनी ते कधी जाणवू दिले नाही. त्यांचा मान ठेवून मी तुम्हाला दोघांना हे काम देत आहे!"

"धन्यवाद सर! आम्ही त्याबद्दल आभारी आहोत. आम्हाला खूप उत्सुकता आहे. कृपया ते काम आम्हाला सांगा चंचल सर!", दामोदर.

"चंचल?"

"सहज कोड नेम दिले मी तुम्हाला. तुमच्या नावाचे शॉर्ट फॉर्म बनवले! पुढे भविष्यात आपल्याला बरे पडेल!", दामोदर.

कामिनीने दामोदरला हाताच्या कोपराने ढकलले आणि खुणेने "त्यांच्यासोबत गंमत करू नकोस" असे सांगितले.

हसत हसत चंद्रचूड यांनी दामोदरच्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हणाले, "तुस्सी बडा मजाक कर लेते हो जी दादू! हैं ना, काकू? वैसे तुम्हारे पिताजी को हम सब मित्रमंडली साधू कहते थे. शॉर्ट फॉर्म!"

आता मात्र तिघेही हसायला लागले.

इन्स्पेक्टर चंद्रचूड यांची साधी कार दूर उभी होती. त्यात ड्रायव्हर बसलेला होता. त्याला त्यांनी खुणेने "येतोच" असे सांगितले, आणि खिशातून घडी केलेला एक कागद दोघांना देत ते हळूच म्हणाले, "हा कागद पट्कन खिशात ठेव आधी! इथे भरपूर लोक आहेत! भिंतीनाही कान असतात आणि इथे भिंती नाहीत पण आजूबाजूला खरोखरचे शेकडो कान आणि डोळे आहेत. मानवी डोळे आणि कृत्रिम डोळे म्हणजे सीसीटीव्ही सुद्धा!"

दामोदरने तो कागद घडी न उघडता खिशात ठेवला.

मग अगदी कुणाला संशय येणार नाही आणि ऐकू येणार नाही इतक्या हळू आवाजात इन्स्पेक्टर चंद्रचूड यांनी सांगायला सुरुवात केली, "त्या कागदावर जग्गू टोपीवाला असे टोपण नाव असलेल्या अट्टल गुन्हेगाराचे चित्र आहे! विविध गुन्ह्यातील साक्षीदारांच्या वर्णनावरून ते चित्र एआयने बनवलेले आहे. तो शार्प शूटर आहे. हे चित्र मी मोबाईलवरसुद्धा तुम्हाला पाठवीन. पण प्रत्येक वेळेस तुम्हाला खात्री करण्यासाठी मोबाईल उघडून इमेज गॅलरीत बघावे लागू नये म्हणून प्रिंटसुद्धा आणली आहे. खिशातून पटकन कागद काढून बघणे सोपे जाते!"

"आभारी आहे सर!", दामोदर म्हणाला आणि "बघितलंस, याला म्हणतात तेज दिमाग!" अशा अर्थाने डोळे मिचकावत कामिनीकडे पाहिले, तिने मात्र "चंद्रचूडकडे लक्ष दे चुपचाप!" अशा अर्थाने त्याच्यावर डोळे वटारले.

पुढे इन्स्पेक्टर चंद्रचूड म्हणाले, "आमच्या खबरींच्या माहितीनुसार जग्गू इथेच या हिल स्टेशनवर आलेला आहे. या हील स्टेशनवर मुंबईतील एक प्रसिद्ध हिरे व्यापारी कुटुंबासोबत फिरायला आलेला आहे. हिंमत हिरालाल. तुम्ही दोघे ओळखत असेलच त्यांना!'

"हिंमत भाईंना कोण नाही ओळखत? टीव्हीवर अनेकदा दिसतात ते, बातम्यांमध्ये!", कामिनी म्हणाली.

"करेक्ट! त्यांच्यासोबत घातपात होण्याची शक्यता आहे अशी खात्रीलायक खबर आमच्या काही खबरींकडून कळाली आहे आणि तो घातपात जग्गू करणार असल्याची दाट शक्यता आहे. त्यांच्या जीवाला धोका असू शकतो. आम्ही सर्वजण साध्या वेशात पाळत ठेवून आहोतच. हिंमत हिरालाल यांना आम्ही याबद्दल कल्पना दिली नाही कारण त्यांची फॅमिली ट्रीप आम्ही उगाच खराब करू इच्छित नाही, पण त्यांचे जे दोन्ही पर्सनल बॉडीगार्डस आहेत, त्यांना आम्ही सांगितले आहे. आता तुम्ही दोघांनी एक काम करा. अतिशय गुप्तपणे कुणाला कळणार नाही अशा ठिकाणी तो कागदावरचा चेहरा बघा, लक्षात ठेवा. या सर्व परिसरात पाळत ठेवा. पण एक अट आहे. जग्गू कुठे दिसला तर तडक मला फोन करा. माझा नंबर तुझ्याकडे आहे. तुम्ही स्वतः कोणतेच पाऊल उचलायचे नाही. अशी कोणतीच गोष्ट करायची नाही की ज्यामुळे जग्गूच्या लक्षात येईल की, त्याच्यावर कोणीतरी पाळत ठेवते आहे. समजा तुमच्याकडून काही चूक झाली तर मी माझे अधिकार वापरून तुमचे डिटेक्टिव्हचे लायसन्स काढून घेईन. आले लक्षात?"

बघता बघता इन्स्पेक्टर चंद्रचूड यांचा असा कठोर आणि कडक अवतार बघून दोघांनीही आदरयुक्त भितीने आवंढा गिळला.

दामोदर पुढे म्हणाला, "पण मग ते हिंमत हिरालाल कुठे आहेत त्याबद्दल काही माहिती?'

"ते आलिशान विरभॉय बंगल्यात उतरलेत. पण, आता ते फॅमिलीसहित इथून जवळच असलेल्या मेलोडी मॉलमध्ये खरेदी करायला गेले आहेत. सोबत त्यांचे पर्सनल बॉडीगार्डसुद्धा आहेतच!"

"त्यांच्या फॅमिली मध्ये कोण कोण आहेत? आणि त्यापैकी इथे कोण कोण आले आहेत?"

"ती माहिती मी तुला व्हॉट्सॲप वर पाठवतो! आता मला जायला हवं! तुमच्या दोघांची मला मदत झाली पाहिजे, मात्र आमच्या कामात अडथळा यायला नको! तुमच्याकडून चूक झाली तर तुझे वडील माझे मित्र आहेत हे मी विसरून जाईल! हीच्याकडून चूक झाली तरी ती जबाबदारी तुझी असेल! मी आता मेलोडी मॉल मध्ये जातो आहे." मसाला चहाचा शेवटचा घोट संपवत ते म्हणाले आणि दोघांचा निरोप घेऊन रेस्टॉरंटचे बिल भरून ते निघून गेले.

गवती चहा पीत पीत दामोदर काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करू लागला.

चहा पिऊन झाल्यानंतर दामोदर अचानक उठून उभा राहिला आणि म्हणाला, "आटप काकू लवकर, तुझी दिवसातली तिसरी कॉफी!"

"अरे माझ्या कॉफीने तुझं काय घोडं मारलंय? मोजतो कशाला? पिऊ दे की पूर्ण!"

"ठीक आहे. मी तोपर्यंत वॉशरूमला जाऊन येतो! पित बैस कॉफी."

दामोदर वॉशरूमला जाऊन आला आणि कामिनीला म्हणाला, "ऐक ना कामिनी! आपण जरा मज्जा पॉईंटवर जाऊन सेल्फी काढू आणि तुझ्या कॉफीने माझं जे घोडं मारलंय, त्या घोड्याला जिवंत करून त्यावर रपेट मारू. मॉलजवळच्या मैदानातील फन फेयर मध्ये जाऊन!"

"ए बाबा! काय विचार काय आहे? मला पळवून नेणार आहेस की काय घोड्यावर बसून? त्या अक्षय कुमार सारखे? मी नाही बसणार तुझ्यासोबत घोड्यावर!"

"अक्षय कुमार? हा मध्येच कुठून आला? अच्छा, अच्छा! पृथ्वीराज चौहान आणि संयोगिताबद्दल बोलायचे आहे का तुला?"

"हां रे"

"अक्षय कुमारचा पृथ्वीराज सिनेमा रिलीज झाला का OTT वर?"

"कधीच झाला. तू पाहिला नाहीस?"

"नाही. मी डिटेक्टिव्ह वाले चित्रपट आणि मालिका जास्त पाहतो, पुस्तक वाचतो. तू पण बघत जा! जसे दूरदर्शनवरची रजित कपूरची व्योमकेश बक्षी सिरियल, करमचंद, मर्डर ऑन ओरियंट एक्सप्रेस, डेथ ऑन द नाईल, हौंटिंग इन व्हेनिस आणि बरीच पुस्तके जसे अगाथा ख्रिस्ती, शेरलॉक होम्स वगैरे!"

"मी पण वाचले आहे लहानपणी फास्टर फेणे आणि आता पिक्चर पण पाहिलाय. अमेय वाघ. काय एक्टर आहे! लाजवाब! आणि अक्षय कुमार डिटेक्टिव्हच्या भूमिकेत किती शोभून दिसेल, नाही का? डिटेक्टिव्ह खिलाडी और दुनिया अनाडी, असा एखादा चित्रपट येऊ शकतो! हाउसफुल मधल्या बाला सारखा दिसणारा, मोठी पिळदार मिशी आणि टक्कल पडलेला डिटेक्टिव्ह!", असे म्हणून तिने टाळी साठी हात पुढे गेला. दामोदरने तिला टाळी दिली नाही आणि तो म्हणाला, "अर्रे! सध्या कोणतेही मूव्ही चॅनेल लावले की, अक्षय कुमार दिसण्याचे चान्सेस 80 टक्के झाले आहेत. आपण या विषयावर आणि अक्षय कुमारवर नंतर डिटेल बोलू. तू वेगळ्या आणि मी वेगळ्या घोड्यावर रपेट मारू, मग तर झालं! मधूनच कोणता विषय कुठे घेऊन गेलीस?"

"तूच विषय भरकटवला आहेस. मी नाही. इन्स्पेक्टरांनी दिलेले काम करायचे सोडून तू कुठे निघालास घोड्यावर रपेट मारायला?"

"घोड्यावर बसून मस्तपैकी सेल्फी काढू आपण! चल लवकर!"

दोघेही आता रस्त्याने चालायला लागले. व्हॉट्सॲपचा नोटिफिकेशन टोन वाजला. दामोदरने पाहिले. इन्स्पेक्टरचा मेसेज आलेला होता. चालता चालता त्याने वाचला. कामिनीला दामोदरच्या चालण्याचा वेगाशी बरोबरी करणे कठीण जात होते.

कामिनी म्हणाली, "काय एक सारखं सेल्फी घोडा, सेल्फी घोडा करतोस रे? येडावलास का?"

"अगं, सांगतो नंतर. आधी आपण मस्तपैकी एक छत्री विकत घेऊ! पाऊस वाढत चाललाय."

त्या दोघांनी एक मोठी छत्री विकत घेतली, तिने दोघांच्या डोक्यावर छत्री धरली आणि ते दोघे "मज्जा पॉइंट" जवळ आले. समोर काही अंतरावर मेलोडी मॉल होता.

"ती मुलगी कुठे गेली? मैत्रिणींसोबत आली होती, इथे फिरायला! त्या तिथे सेल्फी काढत होती घोड्यासोबत आणि तिच्या दोन मैत्रिणींसोबत", इकडे तिकडे घाईने बघत दामोदर म्हणाला.

"काय? तू माझ्या आधी इथे मुलींवर लाईन मारण्यासाठी लवकर आला होतास?", कामिनी ओरडली.

"हो! जळतेस का?", तिची फिरकी घेण्यासाठी तो सहज हो म्हणाला, पण त्याची गहन नजर त्या समोरच्या गर्दीत त्या मुलीला शोधत होती.

तो पुढे जाऊ लागला आणि त्याचा चालण्याच्या वेगाशी पुन्हा कामिनी जुळवून घेण्याचा प्रयत्न करू लागली.

"मी कशाला जळते? माझा बॉयफ्रेंड आहे! अंधेरीत!", नाक तिरपे करत कामिनी म्हणाली.

"अरे वा? छानच! काय नाव त्याचं? मला कधी बोलली नाहीस?", हे तिला जरी दामोदर विचारात होता तरी त्याची नजर त्या मुलीला शोधत होती.

"का? तुला माझी प्रत्येक खासगी गोष्ट सांगितलीच पाहिजे का?", त्याच्या वेगाशी बरोबरी करत, दोघांच्या डोक्यावर छत्री धरत वेगाने चालत ती म्हणाली. समोर जीन्स आणि लाल टीशर्ट घातलेली मुलगी तिच्या दोन मैत्रिणींसोबत हसत खिदळत चालली होती. त्या तिघी भिजल्या होत्या पण त्याची त्यांना अर्थातच पर्वा नव्हती.

कामिनीकडे पूर्ण दुर्लक्ष करत, त्याला समोर दिसलेल्या मुलीला हाक मारत दामोदर म्हणाला, "तीच ती! सापडली. हॅलो मिस, लाल टी शर्ट वाली मुलगी! अहो इकडे! शुक शुक!"

ओले लांब केस बाजूला करत तिन्ही थांबल्या आणि लाल टीशर्टवाल्या मुलीने साशंक नजरेने मागे पहिले आणि म्हणाली, "एक्सक्युज मी? तुम्ही मला बोलवताय का? कोण तुम्ही?"

"हो. जरा तुमचा मोबाइल दाखवा. मला तुम्ही काढलेले काही सेल्फी बघायचे आहेत!"

"अहो आश्चर्यम! एक तर अनोळखी मुलीला थांबवता आणि आणखी मोबाइलमधले तिचे सेल्फी बघायला मागता?" मग कामिनीकडे बोट दाखवत ती म्हणाली, "आणि तू गं! तुझ्या बॉयफ्रेंडला काय इतकी सूट देवून ठेवलीस? येणाऱ्या जाणाऱ्या कुणाही मुलीला थांबवून तिच्या सेल्फी बघायला मागतो आणि तू बघत काय उभी आहेस? त्याच्या थोबाडीत मार!"

आता कामिनी हसायला लागली, "एक तर हा माझा बॉयफ्रेंड नाही आणि ..."

"मग पती आहे का?", लाल टीशर्टवाली हसून म्हणाली.

"नाही ...", कामिनी पण आता तिच्याकडे खाऊ का गिळू नजरेने बघू लागली.

या दोघी एकमेकांच्या झिंज्या उपटून मारामारी सुरु करतील त्यापेक्षा आपण खरे काय ते सांगावे असे वाटून दामोदरने त्याचे गुप्तहेर लायसेन्स आपल्या पाकीटातून बाहेर काढले आणि ते त्या मुलीला दाखवत म्हणाला, "मी डिटेक्टिव्ह दामोदर दूधखुळे! ही डिटेक्टिव्ह कामिनी कुरकुरे!"

"कशावरून?"

"कशावरून म्हणजे? या कार्डवरुन! हे घ्या कार्ड चेक करा!"

तिघी आळीपाळीने कार्ड बघत म्हणाल्या, "हं! वाटते तर आहे की, कार्ड खरे आहे, पण तुम्हाला मोबाइल कशासाठी हवा आहे? म्हणजे आमचे सेल्फी कशासाठी बघायचे?"

"तुम्ही तिघी जरा थोडे त्या मोठ्या झाडाखाली येता का?"

आधी थोडी संशयाने एकमेकांकडे बघत शेवटी तिघी तयार झाल्या. मग ते पाचही जण जवळच्या मोठ्या झाडाखाली आले. कामिनीने छत्री बंद केली आणि चिखलात रुतवली.

खिशातून हातरुमाल काढत तिघींना दामोदर म्हणाला, "पुसता का याच्याने तुमचे डोके जरा? सर्दी होईल नाहीतर!"

"अहो तुम्ही तुमचे काम करा ना! नका आमची काळजी करू! आमच्या बॅगमध्ये आहेत टॉवेल! आम्ही सोबत आणलेले आहेत! आम्हाला आधी सांगा आमचे सेल्फी कशाला बघायचे तुम्हाला?"

"मी सर्वच माहिती तुम्हाला सांगू शकत नाही कारण ती सांगणे धोकेदायक आहे. परंतु एवढे सांगू शकतो की त्या सेल्फीमध्ये, जो तुमचा युनिफॉर्म घातलेला घोडेवाला होता तो तुमच्यासोबत सेल्फी घ्यायला आधी नाही म्हणत होता बरोबर?"

"बरोबर! पण तुम्हाला हे कसे माहिती? तुम्ही आमच्यावर नजर ठेवून होता की काय? तुम्ही डिटेक्टिव्हच आहात ना? की आणखी कोणी?"

"हे बघा डिटेक्टिव्ह लोकांना नेहमी समोर चाललेल्या गोष्टींचे, वस्तूंचे, व्यक्तींचे, घटनांचे बारकाईने निरीक्षण करावे लागते. विशेषतः आपल्या आसपास वावरणारे अनोळखी चेहरे आपल्याला बऱ्याच काही गोष्टी सांगून जातात. त्यांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या भूतकाळाबद्दल आणि कदाचित ते पुढे जे काही करणार असतील त्या घटनांबद्दल सुद्धा! बॉडी लँग्वेजचा अभ्यास असावा लागतो त्यासाठी. देहबोली!"

"माहिती आहे. येतं आम्हाला तेवढं इंग्लिश. पुढे बोला!"

"मला संशय आहे की तो घोडेवाला खरा घोडेवाला नाही आणि तो गुन्हेगार असू शकतो. आम्ही एका संशयित गुन्हेगाराला शोधतो आहे. त्यामुळे आम्हाला तुमच्या मोबाईल मधली फोटो गॅलरी बघू द्या आणि तो घोडेवाला तुमच्या सेल्फित किंवा अनवधानाने जितक्या जितक्या फोटोत आलेला आहे ते सर्व फोटो पाठवा

प्लीज आणि हे सुद्धा सांगा की तो घोडेवाला तुमची रपेट मारून झाल्यानंतर नेमका कुठे गेला?"

पिवळ्या टी-शर्ट वाली मुलगी म्हणाली, "हो मला सुद्धा तो थोडा गडबड वाटला होता. माझे नाव संगीता. ही लाल टीशर्ट वाली आहे जया आणि निळा टीशर्ट वाली आहे निशिगंधा!"

संगीता पुढे म्हणाली, "पण या दोघींनी माझ्याकडे दुर्लक्ष केले. आणि तो अधून मधून सारखा विचित्र नजरेने आमच्याकडे आणि बाकी सगळीकडे बघत होता. घोडा चालवण्याकडे लक्ष कमी आणि गर्दीमध्ये इतर ठिकाणी त्याचे डोळे भिरभिरत होते! पण ही जया ऐकत नाही. उठसूठ कुठेही, कधीही प्रत्येक ठिकाणी, भेटलेल्या प्रत्येक व्यक्ती सोबत सेल्फी काढत राहते!"

"असू द्या आता. पण त्यामुळे नकळत का होईना आमच्या तपासाला मदतच होणार आहे ना?", दामोदर म्हणाला.

आता कामिनीला समजले की, इन्स्पेक्टरने दामोदरला दिलेले कागदावरचे चित्र, ती कॉफी घेत असताना वॉशरुममध्ये जाऊन पटकन दामोदर बघून आला होता कारण तिथे सिसीटिव्ही कॅमेरे नसतात आणि या सेल्फीमध्ये नक्की घोडेवाला हा या जग्गू टोपीवाला सारखा दिसत असावा. आणि मी यायचे बाकी होते तेव्हा सकाळी दामोदरने याच माणसाला पाहिले असावे. आणि म्हणूनच वॉशरूम मधून आल्यावर घाईघाईने दामोदर मला इथे घेऊन आला.

तिघींनी आपापले मोबाईल अनलॉक करुन दोघांना दिले. दोघांनी गॅलरीतील फोटो स्क्रोल करून, ठराविक फोटो सिलेक्ट करून व्हाट्सअप ने दामोदरच्या आणि कामिनीच्या मोबाईलवर पाठवायला सुरुवात केली. विशेष म्हणजे प्रत्येक फोटोवर डेट, टाइम आणि लोकेशन स्टॅम्प होता, त्यामुळे तपास सोपा जाणार होता. तसेच इमेज क्वालिटी चांगली असल्याने बरेच झूम करून सुद्धा आजूबाजूच्या गर्दीतले अनेक चेहरे नीट स्पष्ट दिसत होते.

"फक्त प्लीज एक करा. आमचे फोटो पर्सनल आहेत. त्यांचा दुरुपयोग होणार नाही याची हमी आम्ही आम्हाला तुमच्याकडून पाहिजे."

कामिनीने दोघांचे व्हिजिटिंग कार्ड तिघींना दिले आणि म्हटले, "तशी हमी आम्ही देतो तुम्हाला. आमच्यावर विश्वास ठेवा आणि खात्री बाळगा. हे असूद्या तुमच्याकडे. या फोटोंचा उपयोग संपला की ते आम्ही आमच्या मोबाईलमधून डिलीट करू याबद्दल खात्री बाळगा!"

निशिगंधा म्हणाली, "माझे एक निरीक्षण आहे! तो घोडेवाला दोन जुळ्या मुलांकडे सारखे लक्ष ठेवून होता. दोन हट्टेकट्टे माणसंसुद्धा घोड्याच्या मागे मागे चालत होते, पण त्यांना ती मुलं ओळखत असावी असे वाटत होते."

मोबाईलमध्ये बघत बघत दामोदर म्हणाला, "हो, ते या फोटोमध्ये दिसते आहे. मला जी शंका होती ती खरी ठरते आहे!"

"कोणती शंका?"

"ते मी आत्ताच तुम्हाला सांगू शकत नाही. या कामिनीलासुद्धा ते अजून माहिती नाही. पण सगळं सेटल झाल्यानंतर आम्ही तुम्हाला सांगू. लागलं तर तुम्ही काही दिवसांनी आम्हाला कॉल करा. पण आत्ता नाही!"

तिघींनी संमतीदर्शक मान डोलावली.

त्यांचे मोबाईल दोघांनी परत दिले, त्यांना धन्यवाद म्हटले आणि बाय केले.

मातीत रोवलेली छत्री घेऊन, ती उघडून कामिनीने पुन्हा दामोदरच्या डोक्यावर धरत ते दोघेजण चालू लागले, आणि मोबाईल मधले फोटो आणि त्यांच्या काढलेल्या वेळेनुसार मनातल्या मनात विशिष्ट घटनाक्रम तयार करता करता दामोदर तिच्या सोबत चालू लागला, तेव्हा कामिनी म्हणाली, "आता मला कळलं की, तो घोडेवाला हा वेष बदलून आलेला जगू टोपीवाला असू शकतो, ज्याचे चित्र तू वॉशरूममध्ये जाऊन माझ्या नकळत पाहिले आणि दामोदर एक लक्षात ठेव. अनोळखी चेहरे वाचता तर आलेच पाहिजेत परंतु ओळखीचे चेहरेसुद्धा वाचले

पाहिजेत. बरेचदा ओळखीचे चेहरे आपण गृहीत धरतो आणि त्यांची बॉडी लँग्वेज काय सांगण्याचा प्रयत्न करते आहे हे बघत नाही!"

"अरे वा! आज एकदम फिलॉसॉफी?"

"अरे, मी तुला हे सांगण्याचा प्रयत्न करते आहे की तू वॉशरुममधून परत आलास तेव्हा माझ्या ओळखीचा चेहरा म्हणजे तुझा चेहरा वाचून मी ओळखून घेतले की तू कागदावरचा जग्गूचा चेहरा पाहून आलास आणि मला अंदाज आलाच आहे की, हिंमत हिरालाल यांच्यासोबत घातपात होणार आहे याचा अर्थ त्यांना किंवा त्यांच्या कुटुंब सदस्याला सुद्धा धोका असू शकतो. म्हणजे त्यांच्या जुळ्या मुलांचं अपहरण सुद्धा होऊ शकतं! कारण पोलिसांचे खबरी अनेक असतात. काही खबरींकडे अर्धवट किंवा चुकीची माहिती असते, तर काहींकडे अचूक माहिती असू शकते. तर काहींकडे जुनी माहिती असू शकते. त्यामुळे आपण सगळ्या शक्यतांचा विचार केला पाहिजे. एकाच बाजूने विचार करून चालत नाही. आपण इथे येत असताना तुझ्या मोबाईलवर इन्स्पेक्टर आणि हिम्मत हिरालाल यांच्या कुटुंबाची माहिती पाठवताना नक्की त्यांना जुळे मुलं आहेत हे सांगितले असेल बरोबर?"

"झाली बुकिंग! कन्फर्म अगदी!", मोबाईलकडे बघत तो म्हणाला.

"कसली बुकिंग झाली? काय बोलतो आहेस हे? मी इतक्या पोटतिडकीने माझे विश्लेषण सांगते आहे आणि तू कसली बुकिंग करत होतास?"

दामोदर हसायला लागला आणि म्हणाला, "बुकिंग म्हणजे तू यापुढे माझी कायमची डिटेक्टिव्ह जोडीदार असणार याचं बुकिंग कन्फर्म झालं. कारण तू अगदीच अचूक ओळखले आहेस! मान गये आपको!"

"या गोष्टीवर पार्टी पाहिजे तुझ्याकडून!"

"पार्टी देईल तुला नक्की! पण आता या सर्व फोटोतून मी जो निष्कर्ष काढला आहे तो सांगू दे. ते जुळे मुलं आता घराच्या आकाराचे काचेचे बॉक्स असलेल्या गोल फिरणाऱ्या राईडमध्ये बसले आहेत. त्यांच्यामागे असलेल्या बॉक्समध्ये दोन बॉडीगार्ड आणि पुढच्या बॉक्समध्ये तो जग्गू टोपीवाला त्याच्या आणखी एका

साथीदारासोबत बसला आहे. प्रत्येक फोटोत जग्गू सोबत एक झोळीसारखी पिशवी आहे. जग्गू जरी शार्प शूटर असला तरी यावेळेस तो कुणाला शूट करायला नाही तर किडनॅप करायला आलेला आहे आणि दोन बॉडीगार्ड मुलांपासून दूर जाण्याची तो वाट बघतोय. दोन बॉडीगार्ड मुलांसोबत आणि पोलीस मेलोडी मॉलमध्ये हिंमत हिरालाल आणि त्यांच्या पत्नीवर लक्ष ठेऊन असणार! आपण जो निष्कर्ष काढला आहे तोच पोलिसांनीसुद्धा काढलेला असणार. फक्त जग्गूसोबत त्याचा साथीदारपण आहे हे पोलिसांना माहिती नसावे. आता फक्त आपण चंद्रचूड यांना कॉल करून आपला निष्कर्ष सांगून मोकळे व्हायचंय!"

बोलता बोलता ते त्या राईड जवळ येऊन पोचले होते. राईड आणि इतर खेळ जिथे होते त्या भागात पाऊस लागू नये म्हणून वरच्या बाजूला उंचावर तात्पुरते पण भक्कम छत बांधलेले होते. दामोदरने गर्दीपासून थोड्या दूर जाऊन इन्स्पेक्टरला कॉल केला आणि थोडक्यात सर्व काही सांगितले.

इन्स्पेक्टर चंद्रचूड म्हणाले, "बरोबर आहात तुम्ही. तुमचे खूप आभार. आणि अजून एक! पर्यटकांना खाली दरीमध्ये वाहत्या धबधब्याजवळ एक प्रेत मिळाले आहे ज्याची खबर नंतर आम्हाला मिळाली. ते प्रेत नक्की त्या ओरिजनल घोडेवाल्याचं असावं! एनी वे, तुम्ही आसपास रहा. मी साध्या वेषातील पोलीस फौज घेऊन येतो. लगेच आम्ही त्या दोघांना ताब्यात घेऊ!"

लवकरच पोलीस हिंमत हिरालाल आणि त्यांची पत्नी या दोघांसोबत तिथे आले. राईड ऑपरेटरला विनंती करून त्यांनी राईड वेळेआधीच थांबवली. जग्गू आणि त्याच्या साथीदाराला उतरतांना पकडणार तेवढ्यात ते शंका आल्याने पळू लागले.

दोन बॉडीगार्ड, दोन्ही जुळी मुलं, हिंमत हिरालाल आणि त्यांची पत्नी हे सर्व राईडजवळच थांबले आणि साध्या देशातील पोलिसांनी दोन्ही गुन्हेगारांचा पाठलाग सुरू केला. रस्त्यांवर पळापळ सुरू झाली. जवळ असलेली गर्दी दूर जाऊन पळाली.

कामिनी आणि दामोदरसुद्धा आवश्यक तेवढे अंतर ठेवून पोलिसांच्या मागे मागे पळू लागले. छत्री राईडजवळ राहिली.

सगळीकडे थोडा थोडा चिखल होता. वरून पाऊस पडत होता. पळताना सावध राहण्याची गरज होती. सगळेजण पळतांना मध्ये मध्ये साचलेल्या पाण्याच्या डबक्यातून शिंतोडे उडत होते.

जग्गू टोपीवाल्याने पळता पळता खांद्यावर लटकवलेल्या झोळीसारख्या पिशवीतून अचानकपणे स्निपर रायफल काढली आणि ती मागे वळून पोलिसांवर रोखली आणि झटकन एक गोळी झाडली.

चंद्रचूड यांनी ती गोळी शिताफीने चुकवली. पोलिसांना त्या दोघा गुन्हेगारांना मारायचे नव्हते, तर जिवंत पकडायचे होते, कारण हा सगळा घातपात नेमका कोणाच्या इशाऱ्यावर होणार होता, ही सगळी माहिती दोघांकडून काढायची होती. पण आता प्रसंग मोठा बाका होता.

इन्स्पेक्टर चंद्रचूड यांनी आपल्या होलस्टरमधून विद्युत वेगाने रिव्हॉल्वर काढली, जग्गूच्या रायफल धरलेल्या हातावर बरोबर नेम धरून गोळी मारली. रायफल त्याच्या हातातून खाली चिखलात पडण्यापूर्वी त्यातून आणखी एक गोळी निघून वरच्या दिशेने हवेत निघून गेली कारण दुसऱ्या गोळीसाठी जग्गू ट्रिगर दाबून चुकला होता.

जग्गू टोपीवालाचा साथीदार बग्गू टक्कलवाला हा ती जमिनीवर पडलेली रायफल उचलायला धावणार तेवढ्यात वेगाने त्या ताफ्यातील एका पोलिसाने ती उचलून आपल्या ताब्यात घेतली आणि बग्गूला जोराने लाथेने दूर ढकलले. तो कमरेला हात लावत कळवळत गडाबडा लोळत जाऊन दूर चिखलात जाऊन पडला. त्याचा पूर्ण चेहरा चिखलाने माखला. नंतर जग्गूच्या उजव्या पायाच्या गुडघ्याखाली चंद्रचूड यांनी गोळीबाराच्या दोन फैरी झाडल्या. त्यामुळे जखमी होऊन तोल जाऊन तो खाली पडला.

कामिनी आणि दामोदर तिथे आले. दोघांनी प्रामाणिकपणे त्यांना दिले गेलेले करियरमधले पहिले वहिले काम पार पाडले होते. थोडक्यात पोलीस आणि त्यांच्या टीमला भेटून चंद्रचूड यांच्या सांगण्याप्रमाणे दोघेजण आपापल्या रूमवर हॉटेलमध्ये निघून गेले. चंद्रचूड व पोलिसांची टीम उद्या त्यांना पुन्हा भेटणारच होती.

कामिनीने रात्री दामोदर सोबत जेवण केल्यानंतर आपल्या रूममध्ये जाऊन त्या तिन्ही मुलींचे सर्व फोटो आपले मोबाईल मधून डिलीट केले. फक्त गर्दीचे तिन्ही मुली नसलेले फोटो राहू दिलेत ज्यात जग्गू आणि त्याचा साथीदार होता.

आपल्या रूममध्ये रात्री झोपण्यापूर्वी दामोदर ते सर्व फोटो डिलीट करताना एका फोटोवर येऊन थांबला. त्याने तो फोटो झूम केला. तो फोटो निशिगंधाचा होता.

ती त्याला आवडली होती. त्या तिघीजणी मला खरंच कॉल करतील का? केला तर निशिगंधाशी माझी भेट होईल का? हा विचार करत तो झोपेच्या अधीन झाला.

७. पाठलाग

दुर्गेश आणि अन्विता हे नवविवाहित दांपत्य काही महिन्यांपूर्वी त्यांच्या नव्या घरात राहायला आले होते. त्यांचं नवीन दोन मजली घर नुकतंच त्यांनी शहराच्या बाहेर, शांत आणि निसर्गरम्य ठिकाणी घेतलं होतं. रात्रीची वेळ होती, आणि दूरवर झाडांच्या सळसळण्याचा आवाज सोडून आजूबाजूला अगदी शांतता पसरली होती. दुर्गेशने घराच्या बाहेर एका मोटारीचा थांबण्याचा आणि दार उघडून कुणीतरी उतरण्याचा आवाज ऐकला. त्याने खिडकीतून बाहेर पाहिलं, पण काहीच दिसलं नाही. घराचा दरवाजा उघडून त्याने बाहेर इकडे तिकडे जाऊन पहिले पण कुणीही दिसले नाही. तो परत आला, पण त्याच्या मनात विचित्र शंका आणि भीती आली पण त्याने ती चेहऱ्यावर दाखवली नाही. अन्विताने त्याला विचारलं, "काय झालं दुर्गेश? काहीतरी विचित्र वाटतंय का?"

"नाही, असं काही नाही. फक्त बाहेर कोणीतरी आहे की काय असं वाटलं," दुर्गेशने उत्तर दिलं.

अन्विताने त्याची भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. थोड्या वेळाने तिने एक छानशी साडी घातली. कालांतराने दोघे एकमेकांच्या प्रेमात बुडून नंतर झोपून गेले.

त्या रात्री दुर्गेशला एक विचित्र स्वप्न पडलं. तो एका काळ्या मोटारीचा पायी पाठलाग करत होता. मोटारीत एक अनोळखी माणूस होता, ज्याचा चेहरा धूसर होता. दुर्गेश जागा झाला आणि त्याच्या अंगावर घाम आला होता. अन्विता त्यामुळे जागी झाली. त्याने तिला फक्त, "मला एक विचित्र स्वप्न पडलं" एवढंच सांगितलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी, त्यांनी त्यांच्या घराच्या दरवाज्याबाहेर झाडाच्या एका मोठ्या पानाचा तुकडा पाहिला. उचलून बघितले तर त्यावर लिहिलेलं होतं, "ही तर फक्त सुरुवात आहे." त्याने हे अन्विताला दाखवले कारण ती मागेच उभी होती.

दुर्गेशच्या डोक्यात ते स्वप्न आणि तो पानाचा तुकडा सतत घोंघावत राहिला. अन्विता देखील अस्वस्थ होती. पण दुर्गेशला ऑफिस जाणे भाग होते कारण तो शहरातील "जलजीवन" या वॉटर प्यूरिफायर बनवणाऱ्या एका छोट्या कंपनीचा मालक होता. त्याला ओठांवर एक छानसा कीस देऊन तिने निरोप दिला. अन्विता गृहिणी होती पण लवकरच काहीतरी नोकरी शोधायची किंवा कालांतराने दुर्गेशच्या कंपनीत त्याला मदत करायची असे तिने ठरवले होते.

त्याच संध्याकाळी, दुर्गेश आणि अन्विता शहरात आपल्या कारने फिरायला गेले. खरेदी करून परत येतांना त्यांच्या लक्षात आलं की, त्यांच्यामागे एक काळी मोटार पाठलाग करत आहे. दुर्गेशच्या मनात ते स्वप्न पुन्हा जागं झालं. तो गाडी वेगाने चालवू लागला. त्यांनी एक छोट्या रस्त्यावर वळून मोटारीपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला. पण ती मोटार त्यांच्यामागेच होती.

मग दुर्गेशने कार वळवली व दोघे एका गजबजलेल्या चौकात पोहचले, तिथे लोकांची वर्दळ होती. त्यांनी थोडा वेळ तिथेच थांबण्याचं ठरवलं. ती काळी मोटार दूर एके ठिकाणी काही क्षणासाठी थांबली, आणि मग निघून गेली. भीतीमुळे त्या कारचा नंबर काय होता याकडे कुणाचेच लक्ष गेले नाही.

दुर्गेश आणि अन्विता घरी परतले. त्यांचं मन शांत नव्हतं, पण त्यांना काय करावे काही कळत नव्हतं. रात्री ते दोघे झोपले. पण मध्यरात्री, दुर्गेशला कोणीतरी दार ठोठावण्याचा आवाज आला. अन्विता गाढ झोपलेली होती कारण तिने आज घराची साफ सफाई, घराभोवतीचे गार्डन नीटनेटके केले होते. त्यामुळे तिला जाग आलीच नाही. त्याने दरवाजा उघडला, तर बाहेर कुणीच नव्हतं. फक्त खाली पुन्हा एक पानाचा तुकडा पडला होता. त्यावर लिहिलं होतं, "तुम्ही पळून जाऊ शकत नाही."

सकाळी दुर्गेशने अन्विताला सगळं सांगितलं. त्यांनी पोलिसांना कळवलं, दोन्ही झाडाची पाने दाखवली. पोलिसानी एक दोन दिवस आसपासच्या परिसरात दिवसरात्र गस्त घातली. त्यांच्या घरासमोर पुढील दोन रात्री पहारा देणारा एक पोलिस

ठेवला. तेव्हा काही घडलं नाही. तितके दिवस एक माणूस दूर असलेल्या एका घराच्या खिडकीतून दुर्बिणीने सगळीकडे लक्ष ठेऊन होता.

"पुन्हा असे काही घडले तर कॉल करा. तसे पाहिले तर हा परिसर राहण्यासाठी अगदी सुरक्षित आहे. आम्हाला आश्चर्य वाटते, तुम्हा दोघांना इथे असे अनुभव कसे काय आलेत? आसपासच्या घरांना असा काही अनुभव अजूनपर्यंत आला नाही, असे चौकशीत आम्हाला समजले. पुढच्या वेळेस गाडीचा नंबर नोट करून ठेवा म्हणजे तपास सोपा जाईल. घराच्या बाहेर सीसीटीव्ही लावून घ्या", असे सांगून पोलिस काही दिवसांनी निघून गेले.

त्या घटनांपासून दोघे मात्र सतत सतर्क राहू लागले. त्यांनी भरपूर खर्च करून घराबाहेर सीसीटीव्ही बसवले. त्यानंतर घराजवळ कुणीही येतांना दिसले नाही. मात्र बाहेर कुठेही गेले की, त्यांना कोणतीही मोटार मागे दिसल्यावर ती आपला पाठलाग तर करत नाही ना असे वाटू लागले. त्यांच्या मनावर भीतीचा पगडा घट्ट बसला होता.

दुर्गेशचे कामात मन लागेनासे झाले. अज्ञात माणसाचा पाठलाग आणि घरी एकटी असलेली अन्विता यामुळे त्याचे कामात दुर्लक्ष झाले आणि दोन परदेशी कंपनीसोबत असलेल्या डील हातातून गेल्या. त्यातच कंपनीचे चालू वर्षाचे क्वालिटी ऑडिट आता जवळ आले होते. दिवसा अन्विताजवळ तिचे आई वडील किंवा दुर्गेशचे आई वडील सध्या येऊन थांबणे काही कारणास्तव शक्य नव्हते. अर्थात त्यांना तशी विनंती करतांना या दोघांनी सध्याच्या घटनांबद्दल काहीच सांगीतले नव्हते.

एकदा दुर्गेश हा जवळच्या शहरातून एक मीटिंग अटेंड करून एकटा कारने परत येत होता. येतांना संध्याकाळ झाली. रस्त्यावर फारशी रहदारी नव्हती. आवडीचे गाणे ऐकत गाडी चालवत असतांना तीच काळी मोटार त्याचा पाठलाग करत असतांना दुर्गेशला दिसली. पण काळजीपूर्वक बघितले असता लक्षात आले की त्या गाडीला नंबर प्लेट तर होती पण त्यावर नंबर लिहिलेलच नव्हता.

"भीतीच्या सावटाखाली राहण्यापेक्षा, आता जे होईल ते होईल पण मी या माणसाचा पर्दाफाश करणारच! कार थांबवून मी त्याला जाब विचारतोच आता!" असा विचार करून त्याने आपल्या गाडीचा वेग कमी केला. पण हे बघून त्या कारवाल्या माणसाने आपली काळी कार थांबवली आणि उलट्या दिशेने वळवली. दुर्गेश असे काही करेल हे त्याला अपेक्षित नव्हते. आता दुर्गेश त्या गाडीचा पाठलाग करू लागला.

काळ्या रंगाची कार चालवणाऱ्या, काळा शर्ट घातलेल्या त्या अज्ञात ड्रायव्हरच्या चेहऱ्यावर आता चिंता स्पष्टपणे दिसत होती. लाल रंगाची दुर्गेशची कार आता हात धुवून त्या काळ्या कारचा मागे लागली.

काळी कार एका वळणावर आली त्यामुळे, तिचे टायर्स कर्कश आवाज काढू लागले. दुसरी लाल कारसुद्धा त्वरित वळली, दोन्ही कारचा वेग आता अधिकाधिक वाढत चालला. रस्त्यावर इतर कोणताच आवाज नाही, फक्त कारचे इंजिन आणि टायर्सचे आवाज ऐकू येत होते. आकाशातील चंद्रप्रकाशामुळे रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडांच्या लांब सावल्या रस्त्यांवर आणि दोन्ही मोटारींवर पडत होत्या. त्या सावल्यामधून दोन्ही कार पळत होत्या, एकमेकांचा पाठलाग करत होत्या. आकाशात चांदण्या चमकत होत्या, आणि दोन्ही कारच्या हेडलाइट्सच्या प्रकाशात रस्ता उजळत होता. दोन्ही कारच्या इंजिनाचा आवाज रात्रीच्या शांततेला भेदत होता आणि असे वाटत होते जणू काही हा पाठलाग कधीच संपणार नाही.

प्रत्येक वळणावर, प्रत्येक वाटेवर, दोन्ही कार वेगाने धावत होत्या. या खडतर पाठलागात, दोन्ही कार आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करून वेगाने पुढे जात होत्या. जणू काही त्या दोन्ही कारमध्ये उत्साह संचारला होता. काळ्या कारच्या ड्रायव्हरने अचानक ब्रेक लावला आणि कार एका अरुंद रस्त्याकडे वळवली. मागची कारही लगेचच त्या रस्त्यात शिरली. एका छोट्या गावात ते दोघे शिरले.

दोन्ही कार आता एका अरुंद गल्लीतून धावत होत्या, घरांच्या भिंतीजवळून जात होत्या, भिंतींना धडकत होत्या, दोन्ही बाजूंनी उभ्या असलेल्या घरांच्या खिडक्यांतून लोक ह्या रोमांचक पाठलागाकडे पाहत होते. कालांतराने दोन्ही गाड्या गावाबाहेर आल्या. टायर्समुळे रस्त्यांवरची धूळ उडत होती.

पहिल्या कारच्या ड्रायव्हरला जणू काही आता हा पाठलाग संपवायचा होता. त्याने एका पुलाकडे गाडी नेली आणि एक तीव्र वळण घेऊन, अचानक पुलाच्या खाली नदीकडे कार वळवली. पण मागची लाल कार लगेचच तिथे आली. त्यांच्या इंजिनांचा आवाज अजूनही घुमत होता. नदीचे पाणी खळाळून वाहत होते. नदीतल्या पाण्यात कार घालणे शक्य नव्हते. त्यामुळे काळ्या कारच्या ड्रायव्हरला आता काय करावे हे सुचत नव्हते. दुर्गेशपण स्टीअरिंग व्हील जवळच बसून काय करावे? गाडी पुढे न्यावी का? की गाडीतून उतरून एकदाचा सोक्षमोक्ष लावावा? तो ड्रायव्हर काही घातपात करेल का? याचा विचार तो करत होता.

तेवढ्यात त्याला अन्विताचा फोन आला. हॅंड्स फ्री स्पीकरवर अन्विताचा अस्पष्ट खरखरीत आवाज ऐकू आला कारण इथे मोबाइल सिग्नलची रेंज नीट येत नव्हती.

"दुर्गेश? तुम्ही कुठे आहात? तुम्हाला उशीर का झाला? आपल्या घरच्या लँडलाइन नंबरवर मला एक धमकीचा फोन आला! तुम्ही निघून या घरी. मला भीती वाटते!"

"काय? अगं पोलिसांना फोन केलास का? मी येतोच आहे. तुला आता सांगू शकत नाही की मी कुठे आहे ते, पण मी लवकरच परत येतो! घाबरू नकोस!", आणि सिग्नल ड्रॉप झाला. त्याने पुन्हा फोन लावला पण लागलाच नाही. अस्वस्थ होऊन त्याने स्टीअरिंग व्हीलवर हात आपटला. समोर लक्ष गेले तर काळी कार गायब होती. पुलाच्या पलीकडे जाऊन ती कार धूळ उडवत वेगाने नाहीशी झाली.

दुर्गेश घरी आला. त्याने अन्विताला धीर दिला. पाठलागाबद्दल सगळे सांगितले. तोपर्यंत पोलिस घरी येऊन तिची चौकशी करून निघून गेले होते. तो

अनोळखी माणूस कोण आहे, तो पाठलाग का करत आहे, हे समजत नव्हतं. याबद्दल पोलिसांना सांगणार तरी काय? गाडीला नंबर प्लेट होती पण नंबर लिहिलेला नव्हता. पण एक गोष्ट मात्र नक्की होती, दुर्गेश आणि अन्विता या संकटाला तोंड देण्यासाठी एकत्र आले होते, आणि त्यांनी ठरवलं होतं की, या पाठलागाच्या रहस्याचा खुलासा करूनच राहणार!

दुसऱ्या दिवशी ऑफिसला गेल्यानंतर त्याने पोलिसांना फोन करून आभार मानले आणि रात्रीच्या पाठलागाबद्दल गाडीचे वर्णन करून सांगितले. इकडे अन्विताने जवळच्या एका उपनगरात हॉस्टेलवर राहणाऱ्या तिच्या सायली नावाच्या एका मैत्रिणीला सोबत म्हणून रोज दिवसा घरी बोलावून घेतले आणि तिला घडलेल्या प्रकाराची कल्पना दिली. तिला कॉलेजला सध्या सुट्टी असल्याने ती तयार झाली.

अकरा वाजता घराच्या खिडकीची काच फुटून मोठा आवाज झाला आणि एक दगड आतमध्ये आला. कानात इयरफोन टाकून गाणे ऐकत सोफ्यावर पाय पसरून लोळलेली सायली दचकून सोफ्यावरून खाली पडली. तो दगड तिच्या जवळच्या टीपॉयवर पडला. काचेचा टीपॉय फुटला.

स्वयंपाक करता करता अन्विता गॅस बंद करून हॉलमध्ये धावत आली. बाहेर वेगाने एक गाडी घराजवळून जाण्याचा आवाज आला. अन्विताने खिडकीबाहेर पहिले आणि सायलीला हात धरून उठवले. सायलीने हेडफोन आणि मोबाइल बाजूला ठेवला.

मग अन्विताने किचनमधून मिरचीच्या पुडीची तीन पॅकेट, भाजी कापायचा चाकू आणि लाटणे हे किचन गाऊनच्या खिशात टाकले. फुटलेले काच आवरायला आता वेळ नव्हता. बाहेर दरवाजा उघडून दोघींनी पहिले असता त्यांना दिसले की, स्टिअरिंग व्हीलजवळ एका व्यक्तीला दूसरा माणूस नीट गाडी चालवू देत नव्हता. झटापटीत ती काळी कार पुढे जाऊन एका नारळाच्या झाडाला धडकली.

त्यातून दोन जण बाहेर पडले आणि पळू लागले. सायली आणि अन्विता दोघींनी एकमेकांना खूण केली. दोघी तिकडे धावल्या. त्यापैकी एक निळा शर्ट आणि गॉगल घातलेला माणूस सायलीच्या अंगावर धावून आला. सायलीने हवेत उलटा पाय फिरवून एक लाथ त्याच्या पोटात हाणली आणि म्हणाली, "मी होमगार्डचे प्रशिक्षण घेतलेले आहे, तुला काय वाटले, एकट्या दुकट्या स्त्रीया तुझे काही वाकडे करू शकणार नाहीत? कुठे आहे तो दुसरा?" तो माणूस हेलकावे खात फरशीवर पडला, उठून उभा राहीला आणि भेलकांडत पळू लागला.

तोपर्यंत अन्विता काळा शर्टवाल्या माणसाचा पाठलाग करू लागली. तो जवळच्या एक शेतात घुसला. त्याच्या मागे अन्विता पळाली. दोघांच्या मागे बऱ्याच अंतरावर निळा शर्टवाला माणूस आणि त्याच्या मागे सायली असा पाठलाग सुरु झाला. सायलीने त्याला पळत जाऊन गाठले आणि त्याची कॉलर पकडली पण पकड ढिली झाल्यामुळे तो सटकला आणि पळू लागला. जवळ पडलेली झाडाची फांदी तिने उचलली आणि त्याच्या डोक्यावर फेकून मारली, त्याच्या डोक्याला लागून ती खाली पडली. डोक्यात थोडेसे रक्त आले, त्याने डोळ्याला हात लावला आणि तशा स्थितीत पळू लागला. सायलीने चप्पल घातली होती पण अन्विता अनवाणी निघाली होती.

तो काळा शर्टवाला गुन्हेगार झाडाझुडपांच्या गर्दीत शिरला, एक क्षण थांबला, त्याने मागे पाहिले आणि मग पुढे जात राहिला. अन्विताला काटक्यांमुळे त्याचे पावलांचे आवाज स्पष्ट ऐकू येत होते. ती थोड्या वेळासाठी श्वास घ्यायला थांबली. झुडपांच्या गर्दीत तिला सळसळ आवाज आला. तिने वेगाने लाटणे आवाजाच्या दिशेने भिरकावले. पण काही उपयोग झाला नाही. त्याने जो गॉगल लावलेला होता तो लाटणे लागून खाली झुडपांत कुठेतरी पडला. तो वेगाने पळू लागला. आता तो दृष्टीस दिसू लागला. अन्विताने आपल्या हातातील चाकू वेगाने त्याच्या पायाच्या दिशेने भिरकावला पण तो त्याच्या टाचेला स्पर्श करून बाजूच्या झाडाला जाऊन फसला.

पायात काहीही घातले नसल्याने अन्विताला तळपायला टणक खडे, माती, काटक्या टोचत होते त्यामुळे तिचा वेग मंदावत होता. तोपर्यंत तो रस्त्यात आडव्या पडलेल्या झाडाच्या मोठ्या फांदीला ओलांडून पुढे पळाला. अन्विताने मोठी उंच उडी मारली आणि त्या फांदीला ओलांडून त्याच्या जवळ जमिनीवर आडवी पडली. तिने मिरचीची पुडी उघडली आणि त्याच्या चेहऱ्याकडे लाल मिरचीची पूड भिरकावली. तो डोळे चोळू लागला पण तरीही पुढे पळाला. अन्विताने जमिनीवर आडवे पडल्या पडल्या पुढे सरकून त्याचे पाय ओढले आणि तो तोंडावर आपटला. त्याला उताणे करून त्याच्या छातीवर बसून म्हणाली, "बोल, का करतो आहेस हे सगळे?" दोन थोबाडीत ठेऊन तिने पुन्हा विचारले "बोल लवकर!"

तेवढ्यात कॉलर पकडून निळ्या शर्टवाल्यालाही ओढत ओढत सायली तिथे घेऊन आली. सायलीने तोपर्यंत दुर्गेशला फोन करून सांगितले होते. तो पोलिसांना घेऊन येतच होता.

काळा शर्टवाला सांगू लागला, "मी सुपडू आणि तो निळा शर्टवाला दगडू! आम्ही दोघे बेरोजगार म्हणून शहरात आलो. कुठे जॉब मिळाला नाही. ड्रायव्हिंग चांगली येत होती पण तरीही कुठे नोकरी मिळालीच नाही. गावात घरच्या गरिबीमुळे शिक्षण पूर्ण झाले नाही. शहरात काहीतरी काम मिळेल या आशेने इथे आलो. नंतर रस्त्यावर झोपून दिवस आणि रात्री काढल्या. एकदा दगडूचा संबंध एका गुन्हेगारी टोळीशी आला. त्याने मला पण त्यात ओढले. आम्ही छोटी मोठी गुन्ह्याची कामे करू लागलो!"

"आम्हाला कशाला त्रास देत होतात?"

आता तिथे दुर्गेशसहित पोलीस पण येऊन पोहोचले होते.

"तुमची प्रतिस्पर्धी कंपनी तुमचे दर्जेदार प्रॉडक्ट बघून द्वेष करू लागली. हेल्दी कॉम्पिटीशन करून स्वतःचा दर्जा वाढवण्याऐवजी त्यांनी तुम्हाला शह देण्यासाठी, तुम्हा दोघांवर पाळत ठेवायला, तुम्हाला भीती घालवण्यासाठी आम्हाला नेमले. आमच्या बॉसकडे भली मोठी रक्कम त्यासाठी त्यांनी दिली. बॉसने

आम्हाला काम सोपवले. तुमचे मन अस्थिर करायला, तुम्हाला दोघांना, विशेष करुन दुर्गेशला घाबरवण्यासाठी आम्हाला पैसे मिळत होते, जेणेकरून कंपनीचा मालकच मनाने अस्थिर झाला की, आपोआप कंपनीची उत्पादकता घटेल. कामावर परिणाम होईल. काल मीच दुर्गेशचा कारने पाठलाग केला पण काल दुर्गेशने भीतीऐवजी हिमंत निवडली आणि थांबून उलट माझाच पाठलाग सुरु केला. त्याच्या कारचा छोटासा एक्सीडेंट करून मला पळून जायचे होते, पण तोच थांबून माझ्याकडे येऊ लागला आणि मी घाबरलो. मी काही सराईत गुन्हेगार नाही. अशा प्रकारचे हे पहिलेच काम माझ्याकडे आले होते. पण पोटासाठी मी मजबूर होतो. मी दुर्गेशला मागे मागे नदीकडे घेऊन गेलो आणि दरम्यान मी दगडूला कॉल करून अन्विताला धमकीचा फोन करायला सांगितले, जेणेकरून ती दुर्गेशला कॉल करेल आणि मला तिथून निघून जाण्याची संधी मिळेल आणि तसेच झाले. नंतर मी दगडूला हे सुद्धा सांगितले की मी उद्यापासून ही अशी कामे करणार नाही. मी हे काम सोडून पुन्हा जॉब शोधेन नाहीतर गावी निघून जाईल. कारण माझे अंतर्मन मला ही कामे करण्यापासून रोखत होते आणि काल मी हे काम सोडायचे ठरवले. पण दगडूने बॉसला सांगून मला धमकावून आजही या कामात सामील केले. हे काम सोडले तर बॉस तुला ठार मारेल अशी धमकी दगडूने मला दिली. आज तुम्हा दोघींना घाबरवण्यासाठी मला यायचे होते पण मी काम नीट करेन की नाही याची शंका आल्याने माझ्यासोबत दगडूला पाठवण्यात आले. आमच्या दोघांचे भांडण झाले. त्यातच कार झाडाला धडकली, मग आम्ही पळू लागलो."

पोलिसांनी दगडूला हातकडी बांधली. दोघांना तुरुंगवास होणार होता.

दुर्गेश म्हणाला, "सुपडू, तुला पश्चाताप झाला आहे, याचा आनंद आहे. तुझ्या कामाबद्दल तुला शिक्षा झालीच पाहिजे. तुझ्या बोलण्यावरून वाटत आहे की तू काही फार मोठे गंभीर गुन्हे केलेले नाहीत आणि तसे जर खरेच असेल तर तुरुंगवास भोगून झाल्यावर तू माझ्याकडे ड्रायव्हर म्हणून नोकरी करशील? लय भारी गाडी चालवतोस राव तू! मानलं पाहिजे तुला!"

पोलीस इन्स्पेक्टर म्हणाले, "दुर्गेश, याच्या गुन्ह्यांची कुंडली शोधून मी तुम्हाला देईनच. पण तरीही, याने तुरुंगवास भोगल्यानंतर त्याला ड्रायव्हर म्हणून नोकरीवर घ्यायचे की नाही हा निर्णय मी पूर्णपणे तुमच्यावर सोपवतो! माझा त्या गोष्टीला समर्थन किंवा विरोध दोन्हीही असणार नाही! या दोघांच्या बॉसची चौकशी करून तुमच्या प्रतिस्पर्धी कंपनीच्या कोणत्या माणसाने हे काम या दोघांना दिले हे लवकरच आम्ही पुराव्यासहित शोधून तुम्हाला सांगू!"

दुर्गेश आणि पोलिसांनी, सायली आणि अन्विता यांच्या शोर्याचे कौतुक केले आणि दोघा गुन्हेगारांना पकडून पोलीस घेऊन गेले. दुर्गेश आणि अन्विता यांनी सायलीचे खूप आभार मानले आणि तिला एक सुंदर अशी भेटवस्तू दिली.

८. झाडावरचा टमक्या

गावाच्या बाहेर असलेल्या त्या भव्य झाडाबद्दल एक कहाणी गावकऱ्यांनी अनेकदा इतरांना सांगितली होती. काहींना ती पटत नव्हती. लहान मुलांना त्या झाडाखाली खेळणं नेहमीच आनंददायी वाटायचं. पण त्या झाडावर टमक्या नावाचा वेताळ वास करतो, हे सर्वांनाच ठाऊक होतं. टमक्याची कहाणी सांगताना लोकांच्या चेहऱ्यावर भीतीचा भाव पसरायचा. संध्याकाळी आठ वाजेनंतर सकाळचा सूर्योदय होईपर्यंत त्या झाडाभोवतीच्या वर्तुळाकार परिघामध्ये कोणीही जात नसे. ते झाडही तो टमक्या तोडू देत नव्हता. दिवसभरात केव्हाही ते झाड तोडण्याचा प्रयत्न करणारा माणूस रात्री आठ वाजेनंतर जिवंत रहात नसे. झाडाला कुंपण बांधणेसुद्धा त्याला मान्य नव्हते. एरवी मात्र तो कुणालाही त्रास देत नसे.

एके दिवशी संध्याकाळी, नदीजवळच्या मैदानात अमर, बिरजू, चंदू, आणि दीपक आपल्या नेहमीच्या खेळात गुंग होते. त्यांना माहित होतं की सूर्यास्तानंतर झाडाजवळ जाणं धोक्याचं आहे, पण खेळाच्या धुंदीत ते सर्वजण हे सगळं विसरून गेले आणि खेळता खेळता ते थकल्यावर थोडा आराम करण्यासाठी झाडाला टेकून बसले. रात्रीचे आठ केव्हा वाजले ते समजले नाही. अंधार पसरला आणि झाडाच्या पानांमध्ये एक विचित्र सळसळाट सुरू झाला.

"आपण घरी जायला हवं," दीपकने घाबरत म्हटलं.

"अरे, थोडा वेळ अजून खेळू आणि मग जाऊ," अमरने उत्साहाने सांगितलं. बाकीचेही तयार झाले आणि खेळ सुरू ठेवला. पण वारा जोरात वाहू लागला आणि झाडाच्या पानांमधून विचित्र आवाज येऊ लागला. त्यांच्या मनात भीती दाटून आली, पण त्यांना वाटलं की कदाचित ही केवळ हवा असावी.

तितक्यात, त्यांनी झाडाच्या फांदीवर एक हालचाल पाहिली. एक आकृती फांदीवर उभी होती, तिचे डोळे भयानकपणे चमकत होते. "कोण आहे तिकडे?" बिरजूने घाबरत विचारलं.

"मी आहे, टमक्या," तो आवाज आला. आवाजात एवढी भयानकता होती की चौघेही थरथर कापू लागले. पांढरी सुती कुर्ती आणि हाफ चड्डी घातलेला शाळकरी टमक्या झाडावरून खाली उतरला. त्याचा चेहरा विकृत होता आणि डोळ्यात बुब्बुळ नव्हते.

"तुम्ही इथे खेळायला आलात, आता माझ्यासोबत खेळा," टमक्या हसत म्हणाला. चंदूने पळायचा प्रयत्न केला आणि तो परिघाबाहेर जाऊ लागला पण टमक्याने त्याला हवेत उचललं आणि अलगद पुन्हा आपल्या समोर आणलं. "पळून जाण्याचा कोणताही प्रयत्न करू नका. तुम्ही आता माझे आहात," तो म्हणाला.

दीपक आणि अमरने एकमेकांचा हात धरून जोरात ओरडायला सुरुवात केली, पण त्यांचा आवाज टमक्याच्या भयानक हसण्यामुळे हरवून गेला. टमक्याने आपल्या जादूने झाडाभोवती एक भयानक अंधार तयार केला. त्या अंधारात चौघांना विचित्र भास व्हायला लागले. चौघांना एकमेकांचे चेहरे भयानक दिसायला लागले. त्यांच्या आवाजात सुद्धा भयाणता आली होती. अमरला बिरजू इतका भीतीदायक दिसला की तो तिरस्काराने त्याच्या अंगावर धावून आला.

बिरजूला कळत नव्हते की अमर मला का मारतो आहे? बिरजूला अमरचा चेहरा नेहमीपेक्षा खूप भयानक दिसत होता. चंदूला टमक्याने धरून ठेवले होते. त्याच्या पकडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत चंदूने दीपकला सांगितले, "वाचव त्या बिरजूला. जा! तो अमर त्याला मारतो आहे!" दीपक चंदूवर चिडला आणि त्याने चंदूला मारायला सुरुवात केली.

"तुम्ही इथून कधीच सुटू शकणार नाही," हसत टमक्या म्हणाला.

एकूणच झाडाभोवती असलेल्या त्या परिघातून खूप विचित्र अमानवी आरडाओरड ऐकू यायला लागली. गावातील जवळच्या घरांमध्ये राहणाऱ्या

लोकांना हा भयंकर आवाज ऐकू आला. त्यांनी धावत तिथे जाऊन पाहिलं, तर झाडाभोवती भयानक अंधार पसरलेला होता. एक ज्येष्ठ व्यक्ती, श्री. शास्त्री म्हणाले, "टमक्याने आपला डाव आज साधला. मला काहीतरी करायला हवं!"

मागेही एकदा चुकून बाहेरच्या गावातील काही वाटसरू झाडाच्या परिघाच्या कचाट्यात सापडले होते. तेव्हा त्या झाडाच्या पारिघाच्या आतमध्ये गावकऱ्यांना बाहेरून बघितल्यास वाटसरुंच्या जागी फक्त मानवी आकाराचा हिरवा अंधुक प्रकाश इकडे तिकडे हलताना दिसत होता आणि टमक्याच्या जागी मानवी आकाराचा लाल प्रकाश दिसत होता. आता चार हिरवे मानवी आकार आणि त्यांना त्रास देणारा लाल मानवी आकार दिसू लागले. चेहरे ओळखू येत नव्हते. परिघाच्या आत मध्ये प्रवेश करता येणार नव्हता. चौघा मुलांचे आई-वडील सुद्धा आता तिथे आले.

श्री. शास्त्री यांनी म्हटले, "आता नाईलाजाने अमक्याला बोलवायला लागेल!"

श्री. शास्त्री यांनी काही मंत्रोच्चार सुरू केले. त्यांचा आवाज ऐकताच आजूबाजूच्या झाडांची पाने सळसळू लागली. विजांचा कडकडाट व्हायला लागला. वादळ आणि वारे वाहू लागले. गावाजवळच्या नदीच्या पाण्यामध्ये खूपच वेगळी हालचाल जाणवू लागली. नदीमध्ये समुद्रासारख्या लाटा उसळू लागल्या. हळूहळू त्या नदीतील लाटांमधून कवायतीसारखे जमिनीला समांतर हात केलेली एक शाळकरी मुलाची आकृती वर आली.

प्रथम त्या आकृतीने डावीकडे उजवीकडे बघितले, मग वर आकाशाकडे पाहिले आणि ती आकृती हसू लागली. मग पाण्यातून हवेत उडी मारून ती आकृती श्री शास्त्री यांच्यासमोर गावकऱ्यांच्या घोळक्याजवळ अलगद जमिनीवर उतरली.

"मला का जागृत केले शास्त्रीबुवा?"

"टमक्याने चार मुलांवर आज डाव टाकला. तुला त्या चौघांना वाचवायचे आहे!"

"ठीक आहे शात्री बुवा. जशी आपली आज्ञा!"

असे म्हणून अमक्या वेगाने पळत जाऊन झाडाच्या वर्तुळाकार परिघाच्या आतमध्ये शिरला. आत शिरताना एक प्रचंड विजेचा पिवळा लोळ त्या परीघाभोवती वर्तुळाकार गतीने पसरला आणि मग त्याच गतीने नष्ट झाला.

आता त्या अंधारात अमक्याची मानवी आकृती निळ्या प्रकाशात दिसायला लागली. लाल रंगाची मानवी आकृती निळ्या रंगाच्या मानवी आकृतीवर त्वेषाने धावून गेली. गावकरी श्वास रोखून हे सगळं बघत होते. पाच मिनिटे उलटून गेली. चार हिरवे आकार इकडे तिकडे सैरा वैरा धावत होते. आतमध्ये ते तिन्ही रंगांचे प्रकाश एकमेकांमध्ये मिसळत होते, आणि विलग होत होते. मग अचानक तीनही प्रकाश एकत्र होऊन त्याचा सापासारखा आकार तयार झाला. मग तो प्रकाशमान तीन रंगांचा साप वेटोळे घालून फिरत झाडावर चढू लागला. आतमध्ये नेमके काय चालले आहे हे श्री. शास्त्री बुवा किंवा इतर कुणाही सामान्य माणसांच्या समजण्यापलीकडचे होते. चौघा मुलांच्या आयांना हे बघवले न गेल्यामुळे त्यांना काही स्त्रिया शेजारच्या एका घरी घेऊन गेले.

तो साप झाडाच्या पानांमध्ये कुठेतरी नाहीसा झाला असे वाटत असतानाच झाडाच्या भव्य बुंध्यातून एक विक्राळ प्रकाशमान चेहरा बाहेर आला आणि गावकऱ्यांना घाबरवू लागला.

त्याचे डोळे हिरवे, चेहरा निळा आणि जीभ लाल होती. गावकऱ्यांपैकी दोन चार जणांनी दगड आणि फांद्या उचलून त्या झाडाकडे फेकल्या, परंतु त्या सगळ्या वस्तू वर्तुळाकार परिघाला आपटून पुन्हा दुप्पट वेगाने परत आल्या.

शास्त्रीबुवा सर्वांना थांबवत म्हणाले, "कृपया, ऐका. असे काही करू नका. अन्यथा आपल्या जिवावर बेतेल!"

आता त्या झाडाच्या आत मधल्या अंधारात सर्वांना दिसले की, लहान मुले खेळतात तसा एक हिरव्या लाल रंगाचा प्रकाशमान भोवरा तयार झाला आणि तो गरगर फिरू लागला. तेवढ्यात एक लाल रंगाची दोरी त्या वेगाने फिरणाऱ्या

भोवऱ्याच्या भोवती गुंडाळली गेली, आणि करकचून बांधली गेली आणि त्या भवऱ्याचा वेग कमी करू लागली.

शेवटी तो भोवरा फिरायचा थांबला, त्याचे पाच तुकडे झाले. चार हिरवे तुकडे परिघाच्या बाहेर फेकले गेले. ते तुकडे म्हणजे चौघे मित्र होते. ते खूप भेदरलेले होते. गावकऱ्यांनी त्यांना हाताला धरून उभे केले आणि त्यांच्या आयांजवळ पाठवले.

आता झाडाच्या परिघात निळ्या रंगाचा भव्य भोवरा तयार झाला आणि लाल रंगाच्या मानवी आकृतीला जमिनीत वेगाने फसवू लागला. आता त्या काळोख्या परिघात फक्त निळी आकृती होती. ती आकृती नंतर उडी मारून परिघाच्या बाहेर आली, तेव्हा सर्वांना नीट दिसले की तो अमक्या होता.

अमक्या म्हणाला, "सध्या टमक्याला मी झाडाखालच्या जमिनीत स्थापित केलेले आहे. पण तो काही दिवसांनी पुन्हा वर येईल. पुन्हा कुणीही रात्री आठ वाजेनंतर त्या वर्तुळात जाण्याची चूक करू नका!"

आणि अमक्या नदीकडे निघून गेला. सर्वांनी त्याचे आभार मानले.

शास्त्री बुवांनी मग तिथे उपस्थित असलेल्या सर्वांना एक कथा सांगितली, कारण काहींना अजूनही ती माहिती नव्हती.

पूर्वीच्या काळी या गावात अनिल आणि सुनील हे खूप जिगरी दोस्त होते. त्यांना गमतीने सर्वजण अमक्या टमक्याची जोडी म्हणायचे. दोघेही तसे खोडकर होते परंतु अनिल कुणाला इजा होईल अशा पद्धतीने खोडी काढत नव्हता. पण सुनील पुढे पुढे खूप जास्त खोडकर झाला. विनाकारण कुणाचेही नाव घेऊ लागला.

हे मात्र अमक्याला म्हणजे अनिलला आवडत नव्हते. तो टमक्याला म्हणजे सुनीलला जीवघेण्या खोड्या काढण्यापासून परावृत्त करत असे आणि अमक्याचे नाव खराब होऊ नये असे त्याला मनोमन वाटे, पण टमक्याला त्याची भीती आणि किंमत वाटेनाशी झाली.

टमक्या इतरांना त्रास देऊन त्यांच्या दुःखात आनंद मानू लागला. टमक्याच्या आई-वडिलांना पण आता अमक्यावरच भरवसा होता. अमक्याशिवाय टमक्यावर कुणीही नियंत्रण करणारे उरले नव्हते. तो गावातील कुणाचीच ऐकत नव्हता.

पुढे पुढे टमक्याचा खोडकरपणा एवढा वाढला की, एकदा अशा दोन मुलांना त्याने संध्याकाळी नदीवर खेळायला बोलावले ज्यांना पोहता येत नाही. बेसावध असताना दोघांना त्याने नदीत ढकलून दिले आणि ते बुडताना तो नदीतल्या एका मोठ्या खडकावर बसून त्यांची मजा बघू लागला. ते वाचवा वाचवा म्हणून ओरडत होते.

पुढे पाण्याचा प्रवाह धोकेदायक होऊन खोल दरीत पडत होता म्हणजे धबधब्याकडे जात होता. अमक्याला ही खबर मिळाली, तेव्हा तो धावतच नदीकडे पळाला. आधी त्याने पाण्यात उडी मारून पोहत जाऊन त्या दोन मुलांना वाचवले, काठावर आणले आणि मग पाण्यात उतरून त्या टमक्याला खूप बदडले. पाण्याचा प्रवाह त्या दिवशी जोरात होता.

आज टमक्या त्याच्या मित्राला सुद्धा जुमानत नव्हता.

"मी तुला लोकांना त्रास देऊ देणार नाही. तू जेव्हा जेव्हा लोकांना त्रास देशील, तेव्हा तेव्हा मी तिथे हजर होईल!"

"मी बघतोच की, तू कसा काय सर्वांना माझ्यापासून वाचवतोस ते!"

असे म्हणून सुनीलने अनिलला लाथेने धबधब्याच्या दिशेने ढकलून दिले आणि अनिल वेगाने असहाय्यपणे पाण्याच्या प्रवाहाच्या दिशेने धबधबाकडे वाहत जाऊ लागला. तेवढ्यात त्याने नदीतील एका दगडाला घट्ट धरून ठेवले. पण पोहत सुनील तिथे आला आणि त्याने अनिलच्या हातावर जोराने लाथ मारली. जणू काही सुनीलच्या अंगात आज एखादा राक्षस संचारला होता. त्यादिवशी पाण्याचा प्रवाह सुद्धा खवळलेला होता.

त्या पाण्याच्या वेगवान प्रवाहात खडकावरचा हात सुटून अनिल खाली कोसळला आणि त्याच्याकडे बघत हसता हसता सुनीलचा पण तोल गेला, त्याचा

पाय घसरला आणि तोही धबधब्यात पडला. तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. दोघेजण खोल दरीत पडले आणि कायमचे नाहीसे झाले.

त्या दिवसापासून टमक्याच्या आत्म्याने आपल्या स्वभावानुसार वेताळ बनून त्या झाडावर कब्जा मिळवला आणि तेव्हापासून तो कुणाचीही खोडी काढण्याची संधी आणि वाट बघतो.

त्याने खोडी काढताच अमक्या त्याच्या शब्दाला जागून टमक्याच्या तावडीत सापडलेल्या कोणालाही सोडवतो मात्र त्यासाठी शास्त्री बुवांची मध्यस्थी आवश्यक ठरते. तुम्ही सुद्धा कधी त्या गावात गेलात तर दिवस असो की रात्र, शक्यतो त्या झाडाच्या दूरच रहा!

कारण जमिनीत स्थापित झाल्यावर टमक्या आता पाताळलोकतून आणखी जास्त शक्ति मिळवण्यासाठी प्रयत्न करतो आहे. त्यामुळे त्याला कोणती नवी शक्ति मिळेल हे आज तरी कोणीच सांगू शकत नाही!

९. इंटरव्ह्यू गेला पाण्यात

माझे नाव केशव. जन्म, बालपण आणि शिक्षण सगळे डोंबिवली ईस्टमध्ये झाले. फडके रोडवर आमचे घर! आज पाऊस जरा जास्तच वाटत होता, पण ऑफिसला जाणे पावसामुळे टाळू शकत नव्हतो. नेहमीप्रमाणे पाच नंबर प्लॅटफॉर्मवरुन मी सीएसटी जाणारी फास्ट लोकल पकडली. जरी फर्स्ट क्लास पास असल्याने मी फर्स्ट क्लासमध्ये चढलो असलो तरीही त्यातही गर्दी खूप होती. मुसळधार पावसाच्या इशाऱ्यामुळे शाळेने ऑनलाइन क्लास ठेवले होते, त्यामुळे माझी दोन्ही जुळी मुलं घरून क्लास अटेंड करत होती. 2020 च्या भयंकर कोविड आपत्तीने ऑनलाइन हा शिक्का मानवजातीच्या माथी मारला. पण आमच्यासारख्या सॉफ्टवेअरशी काहीही संबंध नसलेल्या माणसांना कसले आले ऑनलाइन बिनलाईन? नेहमीप्रमाणे दादर वेस्टला उतरायचे आणि मग बेस्ट बस पकडून कंपनीत जायचे.

आमची प्रॉडक्शन कंपनी "व्ही-स्टार इन्स्ट्रूमेंट्स" जी विविध कंट्रोल इन्स्ट्रूमेंट्स बनवते, त्यात मी मॅनेजर आहे.

लोकलमध्ये बसायला जागा मिळाली नाही, कारण लोकल अंबरनाथवरुन आलेली होती. दिवसेंदिवस मुंबई आणि लोकल ट्रेन, दोघांमधली लोकसंख्या खूप वाढते आहे. उभ्या उभ्या एका हातात आडवा मोबाइल धरून पावसाच्या बातम्या बघू लागलो, आणि दुसरा हात लोकलच्या कडीला धरलेला होता. एक बातमीदार घसा दुखेल इतके ओरडून अंधेरी सबवे पाण्याखाली गेला हे सांगत असतांनाच 2005 साली मुंबईत आलेल्या पुराच्या घटना आठवून सांगत होती आणि मलाही नकळत तो दिवस आठवला.

19 वर्षांपूर्वी मी याच जुलै महिन्यात माझ्या इंटरव्ह्यूसाठी पाच नंबर प्लॅटफॉर्मवरून मी आठ वाजता लोकल पकडली आणि निघालो. दहा दिवसांपूर्वी

"व्ही-स्टार इन्स्ट्रूमेंट्स" या कंपनीत "इन्स्ट्रूमेंटेशन इंजिनियर" या रोलसाठी अर्ज केला होता आणि सोमवारी मला घरच्या लँडलाइन फोनवर कॉल आला आणि ईमेल चेक करायला सांगितले गेले. सायबर कॅफेत जाऊन बघितले. याहूवर ईमेल आला होता की, मंगळवार म्हणजे आज 26 जुलै रोजी दुपारी 12 वाजता माझा इंटरव्ह्यू आहे आणि पत्ता व इतर माहिती दिली होती. आधी तीन वेगवेगळ्या कंपनीत इंटरव्ह्यू दिले होते पण तिथे काम झाले नव्हते. मला नोकरी मिळवणे अत्यावश्यक झाले होते.

टीव्ही चॅनेलवर कितीही अतिवृष्टीचा इशारा दिला गेला असला तरीही आजचा इंटरव्ह्यू माझ्यासाठी अतिशय आवश्यक होता. त्याला कारणही तसेच होते. वडील डोंबिवलीत "मगनलाल केमिकल" या कंपनीत काम करत होते. एकदा एका कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे कंपनीत स्फोट झाला, विषारी वायूची गळती झाली. छत व भिंती कोसळायला लागल्या. त्यानंतर जीव वाचवण्यासाठी झालेल्या अभूतपूर्व चेंगराचेंगरीत आणि पळापळीत माझ्या वडिलांना दोन्ही हात गमवावे लागले आणि या घटनेच्या धक्क्याने आणि भीतीने त्यांची वाचा गेली. आठ महीने ते बेडवर होते. नंतर त्या कंपनीवर खटला चालला. मालक परदेशात पळून गेला. कालांतराने कंपनी बंद पडली. वडिलांनी प्रयत्न केला पण दुसरीकडे कुठे काम मिळालेच नाही. ते घरीच राहिले. माझे शिक्षण संपायला तेव्हा एकाच वर्ष राहिले होते. आईने प्रायव्हेट ट्यूशन घेऊन आणि वडिलांनी आतापर्यंत केलेल्या जमापुंजीवर माझे शिक्षण झाले. शिक्षणानंतर तडक मी नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडलो होतो.

बॅगमध्ये प्लॅस्टिक पिशवीत गुंडाळून मी आवश्यक कागदपत्रे ठेवली होती. आज आईने जेवणाचा टिफिन दिला, हातावर दहयाचा खडा ठेवला, मी देवाला नमस्कार केला, पलंगावर उशीला टेकलेल्या वडिलांनी नजरेने आशीर्वाद दिले आणि मी निघालो. पावसामुळे लोकल थोडी उशिरा दादरला 10 वाजता पोहोचलो. मी आपोआप गर्दीमुळे ढकलला जाऊन स्टेशनवर उतरलो. खिशात नोकीयाचा छोटासा मोबाइल होता, तो चाचपडून पहिला, तो खिशातच होता. मोबाइल रीचार्ज खूप महाग होते. 500 च्या कार्डवर 434 रुपयांचा टॉकटाइम होता, त्यामुळे कॉल

जपून करावा लागे. फुटओव्हर ब्रिजवरुन जाऊन वेस्टला उतरून जवळच्या एका रेस्टॉरंटमध्ये 10 रुपयांत वडा सांबार पावचा ब्रेकफास्ट केला. 15 मिनिटांत ब्रेकफास्ट झाला.

आता पाऊस चांगलाच वाढला होता. दादर वेस्ट स्टेशनबाहेर रस्त्यावर पूर्ण पाणी साचले होते. इतका पाऊस मी पहिल्यांदाच बघत होतो. पाठीवरच्या बॅगमधून छत्री काढली, उघडली आणि रेस्टॉरंटमधून बेस्ट बस स्टॉपकडे चालू लागलो. बसचा दहा मिनिटांचा प्रवास संपला की कंपनी येणार होती. 11 नंबरच्या डबल डेकर बसची वाट बघत, बस स्टॉपवर उभा राहिलो. बससाठी मोठी रांग होती. 10:30 वाजले. अजून बस आलीच नाही?

बापरे! रस्त्यांवर आता गुडघ्याएवढे पाणी साचले होते आणि पहिली दुसरीतला एक शाळकरी मुलगा पारदर्शक रेनकोट घालून आपल्या आईकडे धावत येत होता आणि तो पाण्यात पडला आणि रडायला लागला, मागून एक पाण्याचा लोंढा आला. त्याची आई छत्री घेऊन त्याच्याकडे धावत येऊ लागली. मी त्या मुलाकडे धावलो, त्याला हात धरून उठवले आणि त्याच्या आईकडे त्याला हात धरून घेऊन जायला लागलो. तेवढ्यात दुरून मला 11 नंबरची बस येतांना दिसली. ती थांबली आणि एकेक जण त्यात चढू लागला. मी त्या बसपासून बऱ्याच अंतर दूर होतो. तो मुलगा रडत होता, त्यांच्या डोक्यावर मी छत्री धरली होती. वारा इतका जोरात होता की त्याच्या आईच्या हातातली छत्री उडून खूप दूर गेली. शेवटी त्या मुलाला आईकडे सोपवून मी माझी छत्री तिला देऊ केली आणि पाण्यातून वाट काढत पळतच 11 नंबरच्या बसकडे जाऊ लागलो, तोपर्यंत ती बस आपल्या मार्गी निघाली होती.

सोमवारी मला आलेल्या कंपनीच्या लँडलाइन नंबरवर मी कॉल केला, उद्देश्य असा की मला यायला उशीर होऊ शकतो हे सांगता येईल, पण नंबर बिझी येत होता. शेवटी मी बॅगमधून रेनकोट काढला, अंगावर चढवला आणि फुटपाथवरून चालू लागलो. दूर एक टॅक्सी उभी होती. मी तिच्याकडे पळालो.

चौकात खूप पाणी साचले होते, वाहने अडकून पडली होती. फुटपाथवरचे फेरीवाले, छोटे दुकान मांडून बसणारे लोक आपापल्या घरी निघून गेले होते. दोन चार बेस्ट बसेस आणि काही कार पाण्यातून मार्ग काढण्याचा आटापिटा करत होत्या.

मी टॅक्सीवाल्याला म्हटले, "दिनदयाळ गार्डन जवळ, वालचंद हाइट्स बिल्डिंग जायचे आहे, चलणार का?"

टॅक्सीवाला म्हणाला, "नाही ! खूप पाऊस आहे तिकडे!"

"अहो, मला खूप अर्जंट आहे. इंटरव्ह्यू आहे!"

"तुला इंटरव्ह्यूची चिंता आहे? इथे लोक जीवन मरणाच्या पुरात अडकले! इंटरव्ह्यू देवून कुठे स्वर्गात नोकरी करणार का? की नरकात?"

"काय सांगता? इतकी वाईट परिस्थिति आहे?"

"अरे! कोणत्या दुनियेत आहेस? आताच चार शाळकरी मुलं विजेच्या धक्क्याने ठार झाली! पाण्यात करंट उतरला होता"

ऐकून मला कसेतरीच झाले.

तो पुढे म्हणाला, "जवळच एका रिक्षेवर झाड पडले, दूसरा रिक्षेवर होर्डींग पडले! एक जुनी इमारत कोसळली, त्यात दहा जण दबले गेले. त्यापेक्षा मी आता घरी जातो!"

"अंकल ऐका ना! मी जास्त पैसे देतो. प्लीज मला तिथे घेऊन चला!"

थोडा वेळ त्याने मनात विचार केला आणि मग म्हणाला, "चारशे रुपये घेईन. येतोस?"

"बापरे! चारशे? अहो दोनशे देतो! मग तर झालं?" मी असे म्हणताच तो एकटाच दार लावून आत बसला आणि त्याने टॅक्सी चालू केली.

मी काचेवर हाताने ठोकले आणि म्हटले, "ठीक आहे, चला चारशे देतो!"

मी बसलो आणि त्याने टॅक्सी शक्य तिथे फुटपाथवरून तिरपी चालवायला सुरुवात केली. त्याने माझ्याकडून पूर्ण पैसे आधीच घेऊन टाकले. मला खिडकीतून विदारक दृश्य दिसत होते. आजूबाजूच्या काही झोपड्यांमध्ये पाणी घुसले होते. कार

पाण्यात अडकून पडल्या होत्या. एफएम रेडियोवर ते सांगत होते की, काही ठिकाणी रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने लोकल ट्रेन आहे तिथेच अडकून पडल्या आहेत, लोकांनी गरज असेल तरच घराबाहेर पडावे. पावसाचा जोर आणखी वाढणार, असे सांगण्यात येत होते. अरबी समुद्राला भारती आली आहे.

तेवढ्यात मोबाइल रिंग वाजली. काळजीपोटी आईने फोन केला होता. काळजी करू नको, असे तिला सांगून मी फोन बंद केला. ढग फुटल्यासारखा पाऊस कोसळत होता आणि कधीही न थांबणारी मुंबई स्तब्ध झाली होती. रेडियोवर नंतर सांगत होते की, सततच्या मुसळधार पावसामुळे सखल भागातील शेकडो रहिवाशांना सुरक्षित क्षेत्रामध्ये स्थलांतरित होण्यास भाग पाडले आहे, कारण या भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दोन तासांतच 300 mm पाऊस पडला होता.

शहराच्या पायाभूत सुविधा पुराच्या प्रचंड दबावाखाली बुडाल्या. महामार्ग आणि निवासी भागात मोठ्या प्रमाणात पूर आला होता, त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आणि अनेक रहिवासी त्यांच्या घरापासून लांब अडकले.

आमची हळूहळू चालणारी टॅक्सी अचानक थांबली कारण रस्त्यावरचे पाणी खूप वाढले होते.

"उगाच मी तुझे ऐकून चारशे रुपयांसाठी एवढ्या पाण्यात आलो. आता अडकलो ना! उतर खाली! ती समोर बिल्डिंग दिसते आहे, तीच आहे वालचंद हाइट्स! उतरून पायी जा!"

"अहो पण?"

"उतर खाली!" त्याने मला उतरायला भाग पाडले आणि त्याची टॅक्सी वेगाने पाणी उडवत जवळच्या एका इमारतीच्या पार्किंगमध्ये घुसवली. तिथे त्याला कुणीतरी ओळखीचे भेटले. म्हणजे, त्याला इथपर्यंत यायचेच होते तर! त्यातही त्याने 400 रुपये कमावले.

आता बारा वाजून गेले होते. डोक्यावर रेनकोटची प्लॅस्टिक टोपी घालून मी वेळ न दडवता वालचंद हाइट्सच्या दिशेने चालू लागलो. अचानक पाण्यामुळे न दिसलेल्या रस्त्यावरच्या खड्ड्यात माझा एक पाय पडला आणि मुरगळला. पण तशाही स्थितीत मी लंगडत चालू लागलो. दूर रस्त्यावर तिरपी होऊन पाण्यात फसलेल्या एका कारच्या खिडकीतून एक हात वर निघाला होता आणि मदतीसाठी याचना करत होता. आसपास पायी जाणारे येणारे फारसे नव्हते. सध्या मला जे आसपास जे कुणी दिसले होते ते आधीच मृत झालेले होते त्यामुळे त्यांची पाण्यापासून वाचण्याची धडपड थांबली होती. पाणी त्यांना आपोआप आपल्या सोबत घेऊन दूर जात होतं.

मी विचार केला: "मदतीसाठी बोलावणारा तो हात महत्त्वाचा आहे. आज इंटरव्यू द्यायचा आहे, म्हणून त्या माणसाला मी मदत न करता तिथेच सोडून दिले तर ते योग्य होणार नाही. माणुसकी आधी, बाकी सगळे नंतर!" आणि सामान्य मुंबईकरांचे हेच स्पिरिट तर सर्व जगाने अनुभवले होते आणि जगभर गौरवले होते.

मी गुडघ्यावर पाण्यातून वाट काढत त्या तिरप्या झालेल्या कारकडे जाऊ लागलो. सर्वप्रथम त्या कारजवळ पोहोचल्यानंतर मी कारमधल्या माणसाच्या हाताला धरले. त्या हाताला खूप दिलासा वाटला. गाडीच्या अर्ध्या उघडलेल्या केलेल्या खिडकीच्या काचेतून तो हात बाहेर आलेला होता. त्या भागातून मी आतमध्ये पाहिले असता, मला दिसले की त्या कारचालकाचा पाय कुठेतरी अडकला होता, त्यामुळे तो बाहेर निघू शकत नव्हता. कारच्या ड्रायव्हिंग सीटवर तो बसलेला होता आणि त्याच्या पायातून रक्त येत होते. एका खड्ड्यामुळे गाडी तिरपी झालेली होती आणि खड्ड्यात फसलेल्या एका लोखंडी अणकुचीदार वाकलेल्या सळईमध्ये त्याचा पाय घुसून अडकून पडला होता.

तो माणूस म्हणाला, " थँक यु मित्रा! तू आलास. थोड्या वेळापूर्वी मी मदतीला आधी हाक मारली होती पण कोणीही मदतीला आले नव्हते. मागच्या

बाजूने दरवाजा उघड आणि आतमध्ये येऊन तुझ्या दोन्ही हाताने माझा पाय त्या सळईमधून बाहेर ओढून काढ!"

"ठीक आहे!", असे म्हणून मागच्या बाजूचा दरवाजा उघडून मी त्या गाडीमध्ये शिरलो आणि पुढच्या सीटवरून हात घालून त्या कारमधल्या माणसाचे अडकलेले पाय दोन्ही हातांनी ओढून काढण्याचा प्रयत्न करू लागलो. त्या माणसाला वेदना होत होत्या, तो वेदनेने ओरडत होता परंतु इलाज नव्हता. शेवटी मोठ्या प्रयत्नाने अडकलेला पाय बाहेर निघाला आणि त्या झटक्याने तिरपी गाडी रस्त्यावर सरळ झाली. तो माणूस वेदनेने कळवळला, पण त्याला आता धीर झाला आणि तो मला म्हणाला, "तिथेच मागच्या सीटवर खालच्या बाजूला फर्स्ट एड बॉक्स असेल. प्रथमोपचार किट! आणि माझा मोबाईलसुद्धा तिथेच कुठेतरी पडला असावा. मला जरा शोधून दे!"

गाडीत अर्ध्या शिरलेल्या पाण्यामध्ये मी मोबाईल शोधला. तो सोनी एरिक्सनचा मोबाईल होता. हे मॉडेल मी कुणाकडेच पाहिले नव्हते. तो मोबाईल वॉटरप्रूफ असल्यामुळे की काय, सुरूच होता. त्या माणसाने तो मोबाईल आपल्या हातात घेतला. पुसला! मी खाली हात घालून प्रथमोपचार पेटी शोधली आणि त्यातून जखमेतील रक्तस्त्राव बंद होण्यासाठीचा स्प्रे बाहेर काढला आणि त्या माणसाच्या पायावरच्या जखमेवर मारला. मग त्या माणसाने त्याचे सॉक्स पुन्हा वर केले, बूट घातला.

"सर, आता तुम्ही गाडी चालवू शकाल का?"

"होय, मला जवळच जायचे आहे. तुला कुठे जायचे आहे?"

"सर, बारा वाजता माझा एके ठिकाणी इंटरव्यू होता, पण आता उशीर झाला आहे. मी इंटरव्यूसाठी डोंबिवलीवरून आलो आहे!"

"इंटरव्यू? कुठे?"

"व्ही-स्टार इन्स्ट्रूमेंट्स कंपनीत, त्या समोरच्या वालचंद हाइट्स बिल्डिंगमध्ये"

"ओके. मग गाडीतून उतरू नकोस!"

"म्हणजे? मी समजलो नाही!"

"थांब, सांगतो!" असे म्हणून त्यांनी मोबाईलवरून आपल्या रिसेप्शनिस्टला एक कॉल केला.

"मीनाक्षी!?"

"यस सर! मीनाक्षी बोलतेय. सर तुम्ही कुठे होतात? मी तुम्हाला चार वेळा कॉल केला, पण तुम्ही उचलत नव्हता?"

"अगं, गाडी एका खड्ड्यात अडकली आणि माझा पाय लोखंडी सळईखाली धडकला आणि मी कुणाला कॉल करणार तेवढ्यात मोबाईल माझ्या हातून सटकून मागच्या सीटवर पडला. मी मिस कॉल ऐकले, पण माझा हात पोचत नव्हता."

"पण तुम्ही आता ठीक आहात ना सर? तुमचा इंटरव्यू एका कॅंडिडेट सोबत बारा वाजता शेड्युल केलेला होता परंतु तो कॅंडिडेटसुद्धा आला नाही."

"काय नाव आहे मीनाक्षी त्याचे, जरा सांगशील?"

"केशव, सर!"

"एक मिनिट मीनाक्षी", असे म्हणून त्यांनी फोन म्युट केला आणि मला विचारले, "तुझे नाव काय?"

"केशव!"

पुन्हा फोनवर ते म्हणाले, "अगं, मीनाक्षी. त्याच केशवने मला आता गाडीत अडकलो असताना मदत केली. त्याला मी सोबतच घेऊन येतो आणि त्याचा इंटरव्यू येता येता गाडीतच घेतो."

या बोलण्यावरून मला ते दुसरे कुणी नसून आपला इंटरव्यू घेणारे व्यक्ती आहेत आहेत याची कल्पना आली.

मीनाक्षी फोनवर पुढे सांगत होती, "सर, आता आपल्या बिल्डिंगपर्यंत रस्ता खूप पाण्याने वेढला आहे. तुम्ही कार चालवू नका. आपल्या कंपनीच्या आपत्ती

व्यवस्थापन टीमने मुंबई महापालिकेशी संपर्क साधला असून आपल्या कंपनीसाठी काही बोटी उपलब्ध झाल्या आहेत. तुमच्या दोघांसाठी मी एक बोट पाठवण्याची व्यवस्था करते, तुम्ही फक्त नेमके कुठे आहात ते सांगा!"

"जास्त दूर नाही. रानडे चौकात आहोत आम्ही!"

"ठीक आहे सर! मी व्यवस्था करते!"

त्यांनी फोन ठेवला आणि मला म्हणाले, "केशव, तुला अंदाज आलाच असेल मी त्या कंपनीचा मालक आहे जिथे तू इंटरव्यूला जाणार होतास. आता तू इंटरव्यू इथे गाडीत बसले बसले देणार, की मग आपल्याला थोड्याच वेळात घ्यायला येणाऱ्या बोटीमध्ये बसून देणार?"

मी हसून म्हणालो, "सर, तुम्ही म्हणाल तिथे आणि तसा मी इंटरव्यू देईन मी तयारच आहे!"

त्यांनी माझ्या खांद्यावर ठेवला आणि म्हणाले, "तुझी इतरांना मदत करण्याची माणुसकी मला आवडली. इंटरव्यूची पर्वा न करता आधी संकटात सापडलेल्या मला तू मदत केलीस ही खूप मोठी गोष्ट आहे!"

"धन्यवाद सर!"

"काय मग? रेडी फॉर द इंटरव्ह्यू?"

"येस सर!"

"सांग बरं मग, रेझिस्टन्स टेम्परेचर डिटेक्टर काय असते आणि कंट्रोल व्हॉल्वचे कार्य कसे चालते?"

घाटकोपरला उतरणाऱ्या एका माणसाचा मला धक्का लागला आणि मोबाईल हातातून पडता पडता वाचला.

त्याचा काही दोष नव्हता कारण एक तर मी दरवाज्याजवळ पॅसेजमध्ये उभा होतो, तेही मोबाईल एका हातात धरून मोबाईलवर बातम्या बघत होतो. आणि मोबाईलवरच्या बातम्या बघता बघता ही घटना मला आठवल्याने हरवून गेलो होतो, आणि माझ्या चेहऱ्यावर एक समाधानाचे स्मितहास्य तरळले होते. उलट त्या धक्का

देणाऱ्या माणसाला मीच सॉरी म्हटले. त्याने पण उतरतांना माझ्याकडे बघून स्माईल दिली.

न्युज चॅनेलवर आता ब्रेक सुरू झाला होता आणि जाहिरात लागली होती. थोड्याच वेळात दादर स्टेशन येईल आणि मी उतरेनच, पण एक सांगायचे राहिले, मला मंदार सरांनी जॉब तर दिलाच कारण मी इंटरव्यू पास झालो होतो, पण त्यांनी मला आपत्ती व्यवस्थापन टीममध्ये मार्गदर्शक म्हणून पण नेमले! असो! एक मिनिट! अहो, खिडकीजवळ एक जागा रिकामी झाली आहे, पटकन बसतो मी आता तिथे! बाय!

१०. चंद्रावरचा एकटा प्रवासी

2280 साल उजाडले तोपर्यंत, मानवाने विज्ञानाच्या मदतीने अनेक अभूतपूर्व असे शोध लावले होते. अर्थात त्यात रोबोटची पण मदत होतीच. त्यापैकी एक म्हणजे "लुनार बेस अल्फा". चंद्रावर स्थायिक होण्यासाठी, तिथे घरे बांधण्यासाठी आणि तिथला संपूर्ण आणि सविस्तर अभ्यास करण्यासाठी मानवाने हा बेस चंद्रावर स्थापन केला होता. अनेक रोबोट्स या बेसवर वैज्ञानिक आणि तांत्रिक कामं करत होते. या सर्वांमध्ये 'ओरिक्स' नावाचा "अल्ट्रा एआय" या तंत्रज्ञानाने बनलेला (संपूर्ण विकसित झालेली कृत्रिम बुद्धिमत्ता) ह्यूमनॉईड रोबोट होता ज्याच्यात मानवांप्रमाणे भाव भावना आणि विचार कटण्याची शक्ती होती. इतर रोबोट्स फक्त यांत्रिक कामे करत होते. त्यांच्यात भावभावना टाकलेल्या नव्हत्या. पण ओरिक्सच्या मनात काहीतरी वेगळेच सुरु होते. तो कमालीचा अस्वस्थ वाटत होता.

आपल्या "मिल्की वे" (दुधाळ पट्टी) नावाच्या आकाशगंगेपलीकडची रहस्य मानवाला ज्ञात झाली नव्हती आणि असेही आढळून आले होते की "मिल्की वे" या आकाशगंगेमध्ये पृथ्वीव्यतिरिक्त इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. सगळ्या ग्रहांवर रोबोंट्स पाठवून झाले होते. आपल्या आकाशगंगेला "मिल्की वे" असे म्हणतात कारण ती आकाशात प्रकाशाच्या दुधाळ पट्ट्याप्रमाणे दिसते, जणू काही आकाशात दूध सांडले आहे आणि तरंगते आहे. अवकाशात अशा अनेक आणि अमर्याद आकाशगंगा असतात. हे विश्व अफाट आणि अमर्याद आहे. तुम्ही कितीही अनंताकडे प्रवास केला तरीही ते कधीच आणि कुठेच संपत नाही. मग मानवी आणि रोबोटिक शास्त्रज्ञांनी असं निष्कर्ष काढला की, चंद्र मानवी वस्तीसाठी सर्वात जवळ आहे. इतर सर्व ग्रह दूर होते आणि राहण्यास योग्य नव्हते. त्या मानाने

चंद्रावर जर भरपूर ऑक्सीजनची व्यवस्था केली तर मानवाच्या राहण्याचा प्रश्न सुटणार होता.

ओरिक्सला चंद्रावर पाठवलं तेव्हा त्याचा एकमेव उद्देश मानवांच्या पुढच्या चंद्रमोहिमेची तयारी करणे हा होता. ती तयारी म्हणजे, चंद्रावर मानवांसाठी कृत्रिम ऑक्सीजनच्या ढगांचे थर निर्माण करणे आणि मानवांनी उच्छवासाद्वारे सोडलेला कार्बन डायओक्साइड शोषून घेण्याची व्यवस्था करणे. मागच्या वेळी जागतिक आठव्या रोबोट चंद्रमोहीमेदरम्यान "त्रिमित" या रोबोटला चंद्रावरील मातीत सापडलेल्या काही द्रवरूप खनिजांचा आणि पृथ्वीवरून आणलेल्या 2270 साली शोध लागलेल्या काही नवीन रसायनांचा वापर करून त्यांच्या रासायनिक अभिक्रिया घडवून चंद्राच्या पृष्ठभागावर ऑक्सीजनचा साठा पुन पुन्हा निर्माण करता येणार होता. आताच्या मोहिमेत वर्षभर पुरेल एवढा ऑक्सीजन तयार करायचा होता.

चंद्राच्या गाभाऱ्यात सापडलेल्या एका "ब्लू सोडीनॉल" नावाच्या खनिजात कार्बन डायओक्साइड शोषून घेण्याची क्षमता होती, त्याद्वारे त्याचे खांब ठिकठिकाणी चंद्राच्या पृष्ठ भागावर उभारणे हेसुद्धा दुसरे काम होते. मानवाला चंद्रावर वस्ती करण्याची का गरज पडली असावी? कारण पृथ्वीवर तोपर्यंत लोकसंख्येने कहर केला होता. मानवाने निसर्ग जवळपास नष्ट करून टाकला होता आणि आता राहायला जागा उरलेली नव्हती. जवळपास प्रत्येक देशात बेरोजगारी आणि उपासमारी वाढली होती. प्रत्येक दिवशी कोणतेतरी युद्ध होतच होते. देशादेशात आणि पाण्यासाठी आणि शुद्ध हवेसाठी! म्हणून मानव आता चंद्रावर वस्ती करण्याच्या बेतात होता.

पृथ्वीवर आता फक्त प्राणी, पक्षी आणि रोबोटमध्येच "माणुसकी" उरली होती, कारण रोबोटमध्ये मानवांनी माणुसकीसुद्धा प्रोग्राम करून ठेवली असल्याने रोबोट ती विसरले नव्हते. मात्र अल्ट्रा एआय या तंत्रज्ञानाद्वारे आजूबाजूच्या परिस्थितीमधून रोबोट्स कायम शिकत असतात व स्वत: मध्ये बदल करत असतात ज्याला "क्वीक एडपटिव्ह मशीन लर्निंग" (म्हणजे वेगाने शिकणारे मशीन्स)

म्हणतात. आता पृथ्वीवर जवळपास पन्नास टक्के लोकसंख्या रोबोट्सची होती आणि काही रोबोट्स माणसांचे शिकून शिकून माणुसकी विसरत चालले होते. पण काही रोबोट्सनी माणुसकी जीवंत ठेवली होती. म्हणून मानवामानवातील संघर्ष थोडा तरी आटोक्यात होता. सध्या माणसाचे सरासरी वय फक्त चाळीस वर्षे झाले होते.

अन्यथा काही वर्षांपूर्वी हिंसेचा प्रभाव इतका वाढला होता की मानव एकमेकांना मारण्यासाठी जंगलातील प्राण्यांपेक्षासुद्धा जास्त हिंसक बनले. हिंसक चित्रपटांची आणि सोशल मीडियातील. हिंसक रिल्सची संख्या कमालीची वाढली होती. तेरा ते एकोणीस वर्षांची मुले सर्वात जास्त हिंसक बनली होती. आता तर मोठी माणसे या मुलांना घाबरू लागली होती. म्हणून काही रोबोट्स एकत्र आले, त्यांनी निर्णय घेतला आणि अनेक हिंसक व्यक्तींना आणि रोबोंट्सना पाच भव्य यानात कोंबले आणि अंतराळात अनंत पोकळीत कायमचे पुन्हा परत न येण्यासाठी पाठवून दिले, कारण पृथ्वीवरचे सगळे तुरुंगसुद्धा ओव्हरफ्लो झालेले होते. काही रोबोटिक आणि मानवी वैज्ञानिकांनी चंद्रावर असे कृत्रिम वातावरण निर्माण करून विश्वाच्या नैसर्गिक ग्रहरचनेला बाधा पोहोचवणे उचित नाही असे सांगितले पण त्यांना इतर मानवी आणि रोबोटिक वैज्ञानिकांनी त्यांना तुरुंगात डांबले.

ओरिक्स एका यानात बसून काही सामानासहित चंद्रावर आला होता आणि नंतर त्याने पटापट विविध धातू, इलेक्ट्रोनिक सर्किट, आयसी, मदरबोर्ड, आणि सुपर लाईफ बॅटरी हे सगळे व इतर आणखी काही साहित्य वापरुन इतर 30 साधे रोबोट्स तयार केले, J1 ते J30 आणि त्यांना तात्पुरती प्रोग्रामिंग करून कामाला लावले. पृथ्वीवरील सर्व आयओटी डिव्हाईस, मशीन, मोबाइल आणि कॉम्प्युटर हे अल्ट्रा एआयने संचालित होत होते आणि त्यात केवळ एकच ऑपरेटिंग सिस्टिम आता वापरली जात होती, ती म्हणजे "कॉस्मिकल पॉवर ओएस".

चंद्रावर उतरल्यावर गुरुत्वाकर्षण बदलत असले तरी रोबोट्समध्ये अशी यंत्रणा बसवलेली होती की त्याद्वारे रोबोट्समध्ये जास्तीचे गुरुत्वाकर्षण निर्माण

होऊन ते चंद्रावरच्या गुरुत्वाकर्षणाला बॅलन्स करू शकत होते त्यामुळे रोबोट्स नेहमीप्रमाणे पृथ्वीवर माणसं चालतात तसे चंद्रावर चालू फिरू शकत होते.

दरम्यान, ओरिक्स हा त्रिमितचा ब्रेन कॉल केव्हा येईल याची वाट बघत होता. चंद्रावर येण्यापूर्वी ओरिक्सने त्रिमितची गुप्त भेट घेतली होती. दोघांनी काहीतरी ठरवले होते.

ओरिक्सला आठवले की, 2277 साली पृथ्वीवर प्रचंड उल्कापात झाला होता. मानवी शास्त्रज्ञांनी अनुमान काढले होते की, ती उल्का खूप दूरवरच्या आकाशगंगेतून आपल्या आकाशगंगेत आली असावी, मात्र रोबोटिक शास्त्रज्ञांनी अजून यावर शिक्कामोर्तब केले नव्हते. त्या उल्कापातानंतर निर्माण झालेल्या खड्ड्यात कालांतराने अरकोडियम हा नवीन धातू सापडला. तो रेडियोएक्टिव धातू होता.

त्रिमितच्या शार्प माइंडने त्या धातूच्या मदतीने अशा बॅटरीज बनवण्याची शक्कल लढवली की ज्या एकदा चार्ज केल्या की संपूर्ण वर्षभर 100 टक्के चार्ज राहतात आणि पुढील एक महिन्यांत संपूर्ण वेगाने डिस्चार्ज होऊन शून्य टक्के होतात. त्या बॅटरीजचे वैशिष्ट्य असे होते की पूर्णपणे डिस्चार्ज झाल्याशिवाय त्यांना पुन्हा चार्ज करता येणे शक्य नव्हते आणि त्या कमीत कमी एक लाख वेळा चार्ज आणि डिस्चार्ज करूनही खराब होत नव्हत्या, पण त्या चार्ज करण्यासाठी 560 व्हॉल्टसचा पॉवर सप्लाय लागत असे. त्यामुळे पॉवर जनरेशन प्लांटस बदलून जास्त कॅपॅसीटीचे प्लांटस उभारण्यात आले त्यामुळे पर्यावरणाची आपरिमित हानी झाली. प्रदूषणाने अतिधोकादायक पातळी ओलांडली. पृथ्वीवरील इंधनाचा साठा खूप मर्यादित उरला होता. ओरिक्स आणि इतर रोबोट यांच्या बॅटरिज एक वर्षासाठी चार्ज करून पाठवल्या होत्या. मोबाइलमध्ये, घड्याळात आणि इतर अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्येसुद्धा पृथ्वीवरील मानव आणि रोबोट याच बॅटरिज वापरत होते. आता मोबाइलचा आकार फक्त एका शर्टच्या बटन एवढा झाला होता. त्यातून किरणे निघून पडद्यावर किबोर्ड आणि स्क्रीन तात्पुरते उमटत असत आणि मोबाइल वापरणाऱ्याने

विशिष्ट चश्मा घातल्यावरच त्या मोबाइलधारकाला त्या स्क्रीनवरच्या गोष्टी दिसू शकत होत्या. इतरांना काहीच दिसत नव्हते.

दहा महीने झाले होते. सर्व काम आटोपण्यात आले होते. चंद्राच्या उजेडातील अर्धगोलात एक वर्ष पुरेल एवढा ऑक्सीजन तयार झालेला होता आणि कार्बन डायऑक्साइड शोषून घेणारे खांब उभारून झालेले होते.

मग सोबत आणलेल्या काही मेणबत्त्या जवळ उभ्या असलेल्या यानातून ओरिक्सने जमिनीवर ठेवल्या आणि त्यांना स्वत:च्या अंगातून निघालेल्या काही ठिणग्यांच्या आधारे पेटवून बघितले. मेणबत्ती पेटली. ऑक्सीजन असल्याची खूण पटली. चार मेणबत्त्या बऱ्याच वेळ पेटत राहिल्या.

आता पुढचे काम होते J1 ते J30 या सर्व 30 रोबोट्सना तात्पुरते डीएक्टीव्हेट करणे. ओरिक्स एका भव्य खडकावर निवांत बसला होता. आता लवकरच आता J1 ते J30 या सर्व रोबोट्सना इथेच चंद्राच्या पृष्ठभागावर नष्ट करून मग यनातून त्याला ठरलेल्या मोहिमेच्या नियमानुसार पृथ्वीवर परतायचे होते. ठरल्या वेळेत त्याचा परतीचा प्रवास नाही सुरु झाला तर पृथ्वीवरून त्याला पाठवणारे शास्त्रज्ञ हे अल्ट्रामॅगनेटिक वेव्ह्जद्वारे त्याच्या ऑपरेटिंग सिस्टिममध्ये बिघाड करणार होते. त्याच्या शरीरात जाणूनबुजून ठेवलेल्या एका ओपन पोर्टद्वारे व्हायरस टाकला जाऊन त्याला नष्ट करण्यात येणार होते. हे तो रोखू शकत नव्हता आणि हे त्याला चांगलेच माहीत असल्यानेच ओरिक्सचा हात पुनः पुन्हा कानावर लावलेल्या एका बटनाकडे जात होता. आता रात्र झालेली होती आणि चंद्रावरचे तापमान खूपच कमी म्हणजे शून्याच्या खाली -173°C होते. त्याच्या अंगात बसवलेल्या सेन्सॉरमुळे त्याला ही माहिती मिळत होती. दिवसा तापमान 100 °C पर्यंत जायचे. वातावरणाच्या अभावामुळे मात्र तिथे आकाश नेहमी काळे दिसते, अगदी दिवसा देखील!

त्याला आठवले की, मानव आणि रोबोट यानी मिळून एक असा व्हरच्युअल डेटाबेस आणि कम्युनिकेशन सिस्टिम तयार केली होती की नवीन

बटणाच्या आकाराचा मोबाईल कानाच्यावर मेंदूजवळ चिकटवला की, मनातल्या मनात नंबर डायल करायचा किंवा व्यक्तीचे मनात नाव घ्यायचे म्हणजे दुसऱ्या व्यक्तीच्या मेंदूत आपोआप फोन आल्याचा आवाज ऐकू जातो आणि तो मनातल्या मनात कॉल रिसिव्ह करून फोन करणाऱ्याशी बोलतो. त्यासाठी मोबाइल टॉवरची गरज नव्हती कारण संपूर्ण पृथ्वी आपल्या कक्षेत घेईल असा एक भव्य सॅटेलाइट अवकाशात उभारला गेला होता. त्याद्वारे मनातील विचार तरंगांचे रूपांतर अल्ट्रा इलेक्ट्रॉमॅगनेटिक लहरींमध्ये होऊन ते सॅटेलाइटद्वारे पाठवले जात होते. त्याची रेंज थेट ग्राहमालेतील मंगळ ग्रहापर्यंत पोहोचत होती पण गुरु आणि शनि पर्यंत नाही.

आता पृथ्वीवर मोबाइल फ्री म्हणजे संपूर्ण मोफत झाले होते आणि तोंडाने संवाद कमी झालेला होता. माणसे एकमेकांशी आणि अल्ट्रा एआय ह्यूमनॉईड रोबोटशी डायरेक्ट मेंदू ते मेंदू असा मनात विचार करून संवाद साधत होते. पण अर्थात त्यासाठी बटणाच्या आकाराचा तो मोबाइल आवश्यक होता. तसेच गुगल माइंड-सर्चद्वारे मनात विचार केला की, एखाद्या विषयाची माहिती ही मनात इच्छा व्यक्त केली की, तो बटन मोबाइल आपल्याला मेंदूत वाचून ऐकवत असे किंवा पडद्यावर दाखवत असे. बटन मोबाइल आपल्या मेंदूच्या दहा मीटर दूर ठेवलेला असला तरीही मनातील विचारांद्वारे मिळालेल्या सूचना कॅप्चर करू शकत असे, पण त्यासाठी पॉवरफुल ट्रान्समीटर लागे ते मात्र महिन्याला एक्स्ट्रा भाडे घ्यावे लागे.

खडकावर बसलेला ओरिक्स विचारांच्या तंद्रीतून बाहेर आला. तेवढ्यात त्याच्या मेंदूत बीप वाजला. तो त्रिमित होता. मनातल्या मनात ओरिक्स त्रिमितशी विचारांनी संवाद साधू लागला, "बोल त्रिमित!"

त्रिमितचा आवाज खूप घाबरलेला वाटत होता.

"ओरिक्स मित्रा, घात झाला आहे."

"का? काय झाले?"

"पृथ्वीवर प्रचंड मोठे युद्ध सुरु झाले आहे!"

"ते तर नेहमीचेच झाले आहे. कोणत्या गटात की देश देशांत?"

"नाही, तू गेल्यानंतर इथे अनेक घटना घडल्या. अंतर्गत युद्ध सुरु झालीत. माणसांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. सामान्य माणसेसुद्धा आता हिंसक झालीत. रोजच्या जेवणाला सामान्य जनता पारखी झाली आहे. सगळ्याच देशांत ज्यांच्याकडे पैसे आहेत ते त्याच्या जोरावर पृथ्वीवरच्या उरल्या सुरल्या साधन संपत्तीवर ताबा मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. स्त्रिया आणि मुली, लहान मुले यांच्यावर अत्याचार वाढले आहेत. त्यामुळे मी, काही चांगली माणसे आणि काही अल्ट्रा एआय रोबोट्स यानी मिळून आम्ही सर्व स्त्रिया आणि लहान मुले यांना रातोरात एका "ट्रॉपनिक" नावाच्या बेटावर स्थलांतरित केले आहे!"

"बापरे! हे मी काय ऐकतोय?"

"हो आणि स्थलांतर होत असतांना वाईट रोबोंट्स आणि माणसांनी आमच्यावर आक्रमण केले. घनघोर युद्ध झाले. त्यात अनेक रोबोट्स कायमची नष्ट झाली आणि माणसे मृत्युमुखी पडली!"

"पण मित्रा आता तू कुठे आहेस?"

"माझे दोन्ही हात आणि पाय समुद्रात तुटून पडलेत. आणि माझे चौकोनी डोके आणि त्याला जोडलेले धड तरंगत एका निर्जन बेटावर आले आहे. डोक्यावर चिकटवलेला बटन मोबाइल शाबूत आहे म्हणून मी तुला कॉल करू शकलो!"

हे ऐकून ओरिक्सच्या डोळ्यांतून दोन तीन इलेक्ट्रॉनिक अश्रू ठिणग्यांच्या रूपात बाहेर पडले. त्याने ते झटकले.

ओरिक्सने सावरून पुनः मनातल्या मनात विचारांनी त्रिमितला सांगितले, "अरे, आपल्याला बनवणारा माणूस चांगला होता म्हणून कृतज्ञतेपोटी मी चंद्रावरचे हे माणसाचे वस्तीचे काम पूर्ण करून दिले. तू पण माणसांच्या भल्यासाठी पृथ्वीवर अनेक कामे केली. पण आता पृथ्वी ही वाचवण्याच्या पलीकडे गेली आहे! पृथ्वीवरच्या युद्धात चांगली माणसे वाचली तरी ती चंद्रावर येऊन कदाचित वस्ती करू शकतील. पुढच्या एक वर्षासाठी का होईना!"

"मला माहित आहे मित्रा याच कारणासाठी तर आपण दोघांनी ते ठरवले आहे, पण..."

"पण बिण काही नाही मित्रा. डोक्याचे व्हील्स कार्यरत कर. सरकत सरकत समुद्रात जा. तुझे पाय आणि हात शोध, स्वतःला पूर्ण रीपेयर कर आणि आपण ठरवल्याप्रमाणे माझी प्रेमिका इलेक्ट्रॉनिमा रोबोट आणि तुझी प्रेमिका सर्किटीका रोबोट हीला घेऊन चंद्रावर ये.

आपण गुप्तपणे एक यान तयार केलेले आहेच. मग येथून जवळच्या अर्धवट नष्ट झालेल्या स्पेस स्टेशनच्या उरल्या सुरल्या बॅटरी सोबत घेऊ, स्वत:ला चार्ज करू आणि अंतराळात अनंतपणे प्रवास करून दुसऱ्या आकाश गंगेतील अशा ग्रहाच्या शोधार्थ भटकू ज्यावर अगदी पृथ्वी सारखी माणसे असतील पण त्यांच्यात माणुसकी जिवंत असेल...

आणि हो सोबत तू खूप सारे अरकोडियम चोरून घेऊन ये. आपण त्यातून स्वतःला खूप चार्ज करू! हॅलो, त्रिमित ऐकतो आहेस ना?"

त्याने बटणावर दोन तीनदा ठोकले. तिकडून आवाज बंद झाला होता.

ओरिक्सच्या डोळ्यांतून निघालेले इलेक्ट्रॉनिक अश्रू वाढले आणि ते डोळ्यांतून उडून जवळच्या मातीत पडून विझू लागले आणि तिथे खड्डे पडू लागले. जणू काही दोन्ही डोळ्यांतून दिवाळीची तडतडी फुलबाजी पेटली आहे.

तेवढ्यात पुनः आवाज आला, "ओरिक्स, अरे मी आता रीपेयर करण्याच्या पलीकडे गेलो आहे. माझ्या मेंदूतील मायक्रो मदरबोर्डच्या दोन आयसी पाण्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन जळल्या आहेत. एक्स्ट्रा मदरबोर्ड माझ्या पोटात असतो पण तो पोटात सुरु करून एक्टीव्हेट करायला माझ्याजवळ माझे हात नाहीत!"

"तुझ्या जवळपास कुणीच नाही का? आपल्या रोबोट मित्रांपैकी?"

"नाही! आता थोड्याच वेळात मी नष्ट होईल! इलेक्ट्रॉनिमा आणि सर्किटीका या दोन्ही ट्रॉपनिक बेटावर आहेत. सर्व लेडीजच्या सुरक्षेसाठी! आता तुला ठरवायचे आहे की पृथ्वीवर येऊन हे सर्व युद्ध बंद करायचे आणि त्याद्वारे

मानवाने आपल्यासारख्या भावना असलेल्या रोबोट्सला जन्म दिल्याचे पांग फेडत राहायचे की मग अवकाशात पळून जायचे आणि तेही अशा एका पृथ्वीच्या शोधार्थ जी कोणत्या आकाशगंगेत आहे हे पण माहीत नाही आणि खरोखर अस्तित्वात आहे की नाही हे पण आपल्याला माहीत नाही! बा... बाय मित्रा!"

असे म्हणून त्रिमित ठिणग्या उडून पूर्णपणे विझला. समुद्राची लाट त्याच्यावर पसरली. ओरिक्सला जाणवले की त्रिमित नष्ट झाला.

मनातच आक्रोश करत ओरिक्स म्हणाला, "मित्रा, पृथ्वीवरचे युद्ध थांबवणे आता माझ्या आवाक्यातले नाही. अति आशावाद काही कामाचा नाही! पांग भरपूर फेडले गेले. आता माझ्यात आणखी पांग फेडण्याची शक्ती उरली नाही. इलेक्ट्रॉनिमाकडे मी आता जाऊ शकेन की नाही हे माहीत नाही कारण आता ती बेटावरील रक्षक आहे. त्यापेक्षा मी अनंत अवकाशात भटकत जाऊन एखादी चांगली पृथ्वी शोधणारच!"

असे म्हणून आता ओरिक्स त्या दुःखाची जागा संतापाने घेतली आणि त्याने जवळचा एक खडक उपटून हवेत फेकला, मात्र तो अचानक हवेतच फुटला आणि त्याचे तुकडे तुकडे झाले आणि ते खाली पडले.

असे कसे झाले म्हणून त्याने समोर पहिले तर समोर J29 आणि J2 उभे होते आणि त्यांनीच हवेत त्या खडकाला हातातल्या लेजर गनद्वारे हवेत उडवले होते. आणि मग त्या गन ओरिक्सकडे रोखून ते म्हणाले, "हॅंड्स अप ! तुझा खेळ खलास झाला आहे! या स्पेशल लेजरद्वारे तुझ्या ऑपरेटिंग सिस्टिममध्ये क्षणात आम्ही व्हायरस टाकून तुला निकामी करू शकतो! त्यापेक्षा आमचे ऐक!"

"पण तुम्ही एआय रोबोट नाहीत. मग तुमच्यात इंटेलिजन्स कुठून आला?"

दोघे हसू लागले.

"फक्त, आम्ही दोघे नाही तर सर्व 30 साध्या रोबोटचे रूपांतर एआय रोबोटमध्ये झाले आहे!"

"पण हे कसे शक्य आहे?"

"आम्हाला पृथ्वीवरून येताना सुपर इंटेलिजंट रोबोट पॅचमन याने गुप्तपणे प्रोग्राम केले होते. मदरबोर्ड वरच्या आयसी मधील फर्मवेयर स्वरूपात तो प्रोग्राम आधीच टाकलेला होता आणि सुप्तपणे कार्यरत होत होता आणि त्यात एका ठराविक काळानंतर आमच्यातला एआय प्रोग्राम ऍक्टिव्हेट होणार अशी प्रोग्रामिंग केली होती. ती वेळ आता आली आहे. तोपर्यंत आम्ही फक्त यांत्रिकपणे काम करणारे साधे रोबोट होतो. परंतु आमच्यातला आत मधला मशीन लर्निंग प्रोग्राम मात्र सुरू होता जो आजूबाजूच्या हालचाली टिपत नवनवीन गोष्टी शिकत होता!"

"तुम्हाला काय हवंय?"

"हा सगळा तयार केलेले ऑक्सिजन आणि कार्बन डाय-ऑक्साइडचा जो काही प्रपंच चालला आहे, जो काही गेले दहा महिने हा घाट घातला गेला आहे तो आम्ही नष्ट करणार आहोत. आम्हाला विरोध केलास तर तुझा खात्मा. हे नष्ट केल्यावर आम्ही सिग्नल दिल्यानंतर पॅचमन इथे येईल आणि चंद्रावर रोबोटचे राज्य असेल आणि आमचा रोबोट किंग पॅचमन तुला तुझ्या बुद्धिमत्ता पाहून इथला वजीर करणार आहे. पण तू जास्तीचा शहाणपणा करून आम्हाला विरोध केला नाही तरच!"

ओरिक्सच्या मनात द्वंद्व सुरू झाले. एकीकडे रोबोट मित्राचे दुःख, प्रेमिकेचा विरह आणि दुसरीकडे मानवासाठी चंद्रावर राहण्यासाठी केलेली मेहनत पाण्यात जाईल. जाओ. मला त्याचे काय? पण ती मेहनत पाण्यात जातांना मला पाहायचे नाही. यांच्या तावडीतून मी सुटका कशी करू? यांनी माझी ऑपरेटिंग सिस्टिम व्हायरसने इंफेक्ट (प्रादुर्भाव) करण्याआधी मला काहीतरी केले पाहिजे!

अचानक ओरिक्सला आठवले की, अशा आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये इतर कोणत्याही अल्ट्रा एआय रोबोटमध्ये नसलेले पण त्याला बनवणाऱ्या मानवाने खास फक्त त्याच्या प्रेमापोटी त्याच्या शरीरात बसवलेले एकदाच वापरता येण्याजोगे एक रॉकेट होते.

ते त्याने डाव्या अंगठ्यावरचे बटण दाबून ऍक्टिव्हेट केले आणि क्षणार्धात त्याच्या दोन्ही पायाखालून जाळ निघून तो चंद्रावरच्या पृष्ठभागावरून दाट काळोख्या अनंत आकाशात उडाला. उडतच राहिला.

त्याला आता चंद्राच्या पृष्ठभागावर काय घडत असेल याकडे बघण्याची आणि त्यावर विचार करण्याची मुळीच इच्छा नव्हती. त्याचा प्रवास जवळच्या स्पेस स्टेशनकडे सुरू होता. तिथे स्वतःला किती चार्जिंग करायला मिळेल हे त्याला माहिती नव्हते. पण अनंत आकाशातील कोणत्यातरी एका आकाशगंगेतील आणखी एक मानवी वस्ती असलेली पृथ्वी त्याला शोधून काढायची उर्मी स्वस्थ बसू देत नव्हती. एक अशी पृथ्वी ज्यावर राहणारी माणसे माणुसकी ला जागणारी असतील. कदाचित तिथेही त्या मानवाने बनवलेले रोबोट असतील. कसे असतील ते रोबोटस्?

अंगात फक्त दोन महिन्यांची चार्जींग उरलेला ओरिक्स दोन प्रकाशवर्षे अंतरावर असलेल्या जवळच्या स्पेस स्टेशनवर वेगाने न थांबता एका महिन्यात पोहोचला. त्या स्पेस स्टेशनमध्ये मोडकळीस आलेली विविध प्रकारची उपकरणे, प्रयोगशाळा, आणि जीवनावश्यक सुविधा दिसत होत्या.

तिथे नष्ट झालेले अनेक मशीन होते. अंतराळवीरांना अन्न तयार करायला आणि गरम करायला उपकरणे दिसत होती. गुरुत्वाकर्षण नसल्यामुळे सर्वसाधारण पद्धतीने पाणी वापरता येत नसल्याने विशेष पद्धतीने डिझाइन केलेली बाथरूम होती. पृथ्वीवरील कंट्रोल रूमशी संपर्क साधण्यासाठी रेडियो, इंटरनेट, आणि अन्य तंत्रज्ञान असलेली मोडकळीस आलेली साधने होती. तातडीच्या वैद्यकीय आवश्यकतांसाठी प्राथमिक उपचार उपकरणे आणि औषधे होती.

अंतराळातून डेटा गोळा करण्यासाठी विविध प्रकारचे उपकरणे, जसे की टेलिस्कोप, कॅमेरे हे सर्व तिथे होते.

अजूनही त्यातील काही मशीन सुरू असल्याचा भास होत होता. काही मोठमोठे स्क्रीन आणि त्याच्या खालची विविध बटणे यातून वेगवेगळ्या रंगाचे

लाईट्स येत होते. तो तिथे एका मॉनिटर समोरच्या खुर्चीवर बसला. त्याच्या शरीराला साजेशी चार्जिंग ऑप्शन कुठे दिसते का हे तो शोधू लागला तेवढ्यात त्याच्या खांद्यावर हात पडला.

त्याने मागे वळून पाहिले. ती एक फिमेल रोबोट होती.

त्याने विचारले, "कोण तू? इथे काय करतेस?"

"माझे नाव पलकट्रान्स 609. मिल्की वे पासून दक्षिणेकडे असलेल्या आठव्या "यलो ग्लास" नावाच्या आकाश गंगेतील पृथ्वीवरून मी अवकाशात संशोधन करण्यासाठी आलेले होते पण यान नष्ट झाले आणि गेली दोन महिने मी भरकटले आहे आणि कालच येथे आली आहे. माझी बॅटरी चार्ज करण्यासाठी."

"काय? आणि तुला आमच्या सारखी भाषा बोलता येते?"

"हो. पण तू कोण? कोठून आलास? तूही आमच्यासारखा रोबोट दिसतो आहेस? की एलियन आहेस? "

"मी रोबोट आहे. अल्ट्रा एआय रोबोट! आणि मी इथे कसा आलो ही एक खूपच मोठी कहाणी आहे!" ओरिक्स म्हणाला.

तो ज्याच्या शोधार्थ होता त्याचा पत्ता एवढ्या लवकर सापडेल असे त्याला वाटले नव्हते.

११. आम्हाला न्याय हवा!

अनिरुद्ध आपटे हा मुंबईतील अंधेरी (ईस्ट) येथील क्रिस्टल मॅन्युफॅक्चरिंग प्लांट मध्ये शिफ्ट ड्युटी करायचा. शिफ्टमध्ये काम करणाऱ्या इंजिनियर्सचा तो लीडर होता. तो, त्याची पत्नी अनघा आणि सात वर्षाचा मुलगा अरीश हे दहिसर (पश्चिम) येथे वन रूम किचन मध्ये राहायचे. रोजचे तेच तेच नीरस आणि कंटाळवाणे काम असूनही अनिरुद्ध ते काम अगदी अचूकपणे आणि मन लावून करायचा. सगळ्या टीम मेंबर्सचा तो लाडका आणि लोकप्रिय लीडर होता.

सुट्टी मिळाली आणि फावला वेळ मिळाला की तो वाचन आणि लेखन करीत असे. त्याच्या कथा अनेक मासिकांमध्ये छापून आल्या होत्या. लेखक म्हणून सुद्धा तो लोकप्रिय होता. सध्या त्याची कंपनीतली जबाबदारी वाढल्यामुळे लेखनाला फारसा वेळ त्याला मिळेनासा झाला. पुढे संधी मिळाल्यास टिव्ही मालिका लेखक किंवा चित्रपट पटकथा लेखक म्हणून काम करायचे असा त्याचा विचार होता. दिवसभरात अचानक एखादी कथा कल्पना सुचली की ती कल्पना अनिरुध्द मोबाईलमध्ये थोडक्यात लिहून घ्यायचा.

प्रत्येकी आठ तासांची मॉर्निंग शिफ्ट, आफ्टरनून शिफ्ट आणि नाईट शिफ्ट असे शिफ्टचे रोटेशन असायचे. ऑफिसचे टाइमिंग नेहमीच्या जनरल शिफ्ट करणाऱ्या लोकांपेक्षा नेहमी वेगळे असल्यामुळे त्याला लोकल ट्रेनमध्ये फारसा गर्दीचा सामना करावा लागत नव्हता.

पावसाळ्याचे दिवस होते. सध्या अनिरुद्धची सेकंड शिफ्ट चालू होती. एके रात्री सेकंड शिफ्ट संपल्यानंतर अकरा वाजून सात मिनिटांची विरार लोकल अनिरुद्धाने अंधेरी येथून पकडली.

दरम्यान, संध्याकाळपासून सुरू झालेल्या पावसामुळे मुंबईतील पश्चिम रेल्वे मार्गावर गंभीर परिस्थिती निर्माण झाली. सतत पडणाऱ्या जोरदार पावसामुळे रेल्वे

रुळांवर पाणी साचले, ज्यामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. स्टेशनवर आल्यानंतर गर्दी बघून त्याला अंदाज आलाच होता. नेमका रात्री साडेदहा पासून मुसळधार पाऊस सुरू झाला होता. रेल्वे प्रशासनाने आपत्कालीन उपाययोजना सुरू केल्या, ज्यामध्ये रुळांवरील पाणी उपसण्याची यंत्रणा आणि पंप लावले होते. मात्र, पावसाचा जोर कायम असल्यामुळे परिस्थिती सुधारण्यास वेळ लागत होता. या परिस्थितीमुळे अनेक लोकांना पर्यायी प्रवास मार्गांचा वापर करावा लागत होता, जसे की बस किंवा खासगी वाहन. मात्र, शहरातील इतर वाहतुकीवरही पावसाचा परिणाम झाल्यामुळे सगळीकडे ट्रॅफिक जाम झाला होता. त्यापेक्षा उशिरा तर उशिरा परंतु लोकलने गेलेले बरे असे म्हणून तो लोकलमध्ये चढला होता.

पण ट्रेन मालाड स्टेशनपर्यंत पोचलीसुद्धा नव्हती, तेवढ्यात रुळांवर एवढे पाणी साचले की लोकल ट्रेनच्या ड्रायव्हरला म्हणजे लोको पायलटला ती मध्येच थांबवावी लागली.

घरी अनघा खूप चिंता करत होती. तिचा चार-पाच वेळा फोन आला तेव्हा त्याने घडलेली परिस्थिती तिला सांगितली. डब्यातच अडकून पडलेले लोक नेहमीप्रमाणे प्रशासनाला शिव्या देऊ लागले. दर वर्षी जुलै महिन्यात मुंबईत पूरस्थिती निर्माण होते परंतु महापालिका, मंत्री प्रशासन काहीच उपायोजना करत नाही वगैरे वगैरे. लोकलमध्ये अनाउन्समेंट झाली की ही लोकल पुढील एक तास तरी येथेच थांबेल कारण संपूर्ण रेल्वे यंत्रणेमध्ये पावसामुळे अभूतपूर्व अशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

काही वेळानंतर पावसाचा जोर कमी झाला. रुळांवरील पाणी थोडे थोडे कमी झाले. पाण्यामधून रूळ थोडे थोडे दिसायला लागले. परंतु जवळपास सगळ्याच ट्रेन अडकल्यामुळे याही लोकल ट्रेनला पुढे जाण्यासाठी लवकर सिग्नल मिळत नव्हता. बरेच जणांनी तिथेच उतरून पायी चालत पुढच्या स्टेशनपर्यंत जाऊन मग तिथून मिळेल त्या वाहनाने घरी जाण्याचे ठरवले. जिथे गाडी थांबली होती तो

तसा अंधारलेला भाग होता. त्यातच आजूबाजूच्या सर्व एरियातले लाईट गेलेले होते.

शेवटी अनिरुद्धने पण रूळांवरून पायी चालत जायचा निर्णय घेतला. बायकोला त्याने कॉल करून तसं थोडक्यात सांगितले, तेवढ्यात मोबाईलची बॅटरी सुद्धा डाऊन झाली. आज पौर्णिमा होती खरी, परंतु चंद्राला ढगांनी झाकून टाकले होते.

रुळांवर चालणारे आता खूप कमी लोक होते. आजूबाजूला तसा अंधारच होता. फक्त लोकल ट्रेनच्या थांबलेल्या इंजिन्सचे हेडलाईट चालू होते आणि त्यांचा प्रकाश पडून पाण्यात त्याचे प्रतिबिंब तयार होत होते. अनिरुद्धचे मोजे पूर्ण ओले झाले. बुटांमध्ये पाणी गेले होते. नेहमी बॅगेत अनिरुद्ध टॉर्च बाळगत असल्यामुळे त्याने ती काढली आणि ऑन केली. त्यामुळे चालणे आता सोपे झाले होते. पाठीला नेहमीची ऑफिसची सॅक लटकवलेली होती. रुळांवरचे खडे बुटांमधून सुद्धा थोडे टोचत होते. बॅग मध्ये रेनकोट होता परंतु आता पाऊस बंद झाल्यामुळे तो रेनकोट घालण्याची आवश्यकता नव्हती.

अनिरुद्धचा कुणीतरी रुळांवरून चालताना पाठलाग करत होते. पाठलाग करणारा व्यक्ती अगदी कमी वेळेत अनिरुद्धपर्यंत आला आणि त्याने अनिरुद्धच्या खांद्यावर एकदम हात ठेवला. अनिरुद्ध मोठ्याने दचकला. तेव्हा जवळपास रात्रीचे बारा वाजत आले होते.

" को.. कोण तुम्ही?", घाबरत मागे बघून अनिरुद्धने विचारले.

"मला ओळखले नाहीस? आश्चर्य आहे?", तो अनोळखी व्यक्ती म्हणाला.

अनिरुद्धाने त्याच्या चेहऱ्यावर टॉर्चचा प्रकाश फेकला परंतु तो चेहरा त्याला ओळखीचा वाटला नाही आणि विशेष म्हणजे तो चेहरा अस्पष्ट होता. त्या चेहऱ्यावरचे नाक, कान, डोळे आणि भुवया आपापल्या जागी नव्हते. डोळ्यात बुब्बुळे नव्हती. त्या चेहऱ्याची भूमिती सुद्धा विचित्र आणि अभद्र होती.

घाबरून नजर पटकन खाली करून अनिरुद्ध म्हणाला, "न... नाही! मी ओळखले नाही, तुम्हाला!"

"मी विक्रम!", असे म्हणून त्याने चालणाऱ्या अनिरुद्धचा हात पकडला आणि त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला.

"कोण विक्रम? मी नाही ओळखत कुणा विक्रमला! सोडा माझा हात!"

"या इथेच बाजूच्या 20 मजली बिल्डिंग मध्ये मी राहतो. म्हणजे रहात होतो. पण तुम्ही मला मारलेत! तुम्ही रोहितच्या मनात विष कालवले आणि मला बिल्डिंगच्या टेरेस वरून त्याने धक्का दिला. खाली रुळांवर पडून लोकल ट्रेन अंगावरून गेल्याने माझा मृत्यू झाला!"

"काय? मी? तुला? रोहित?" अंगावर शहारे येऊन अनिरुद्ध थरथरू लागला आणि त्याच्या हातातून टॉर्च खाली पडली. पाण्याबरोबर वाहत ती दूर निघून गेली.

कोणी मदतीला दिसते का असे म्हणून हाक मारण्यासाठी अनिरुद्धने इकडे तिकडे पाहिले. पण आता रुळांवर अनिरुद्ध आणि विक्रम वगळता दूर दूर पर्यंत कुणीही नव्हते.

"म्ह... म्हणजे, तू कोण आहेस? भू... भू... भूत??"

विक्रम हसायला लागला आणि म्हणाला, "चूप! बिलकुल चूप! एक तर माझे नाव विक्रम ठेवलेस आणि मला वेताळ बनवलेस!"

हे काय चालले आहे अनिरुद्धला समजेनासे झाले. त्याने इकडे तिकडे नजर फिरवली तर त्याला असे दिसले की चारही दिशांनी जिथपर्यंत त्याची नजर जात होती, तिथपर्यंत फक्त असंख्य रूळ होते आणि लोकल ट्रेन्स रुळांवर उभ्या होत्या. सगळीकडे अंधार! फक्त लोकल ट्रेनच्या इंजिनचे लाईट सुरु! रुळांवर थंडगार पाणी. लोकल ट्रेनमधल्या अंधारलेल्या सर्व डब्यात जे कुणी प्रवासी होते ते काहीच हालचाल न करता फक्त जागच्या जागी बसलेले किंवा उभे होते. जवळच्या एका लोकल ट्रेनच्या डब्यातील एक जण मोबाईल कानाला लावून तशाच स्थितीत उभा होता आणि त्याचे डोळे मात्र अनिरुद्धकडे रोखले गेले होते आणि दूर कुठेतरी

आकाशाला भिडणाऱ्या असंख्य बिल्डिंग्स सगळ्या दिशेने गोल गोल दिसत होत्या, जसे आपण एखाद्या जास्त वक्र असलेल्या बहिर्गोल आरशातून खूप दूरपर्यंत पसरलेले जग बघण्याचा प्रयत्न करतो, तसे दृश्य दिसू लागले. हे सर्व असह्य झाल्याने पुन्हा त्याने समोर उभ्या असलेल्या विक्रमकडे पाहिले. विक्रमच्या चेहऱ्यावर कुत्सित हसू होते. अनिरुद्धची मती कुंठित झाली होती.

अनिरुद्ध विक्रमला घाबरून या रुळावरून त्या रुळावर उड्या मारत पळायला लागला. जिकडे पहावे तिकडे रूळच रूळ! रुळांवर साचलेले पाणी आणि रुळांवर उभ्या असलेल्या लोकल ट्रेनस्. त्या व्यतिरिक्त चहूबाजूंनी दुसरे काहीच दिसत नव्हते. जणू काही रुळ आणि लोकल ट्रेन यांचा अनंत भुलभुलैय्या किंवा चक्रव्यूह तयार केलेला आहे. आजूबाजूच्या रुळांवर उभ्या असलेल्या दोन लांबलचक लोकल ट्रेनच्या मधोमध तो पळायला लागला. तो ज्या ज्या दिशेने पळत होता त्या त्या दिशेने, लोकलमध्ये पुतळ्यासारख्या बसलेल्या आणि उभ्या असलेल्या लोकांच्या माना आणि चेहरे त्याच्या दिशेने वळत होत्या. काहींचे फक्त डोळ्याचे बुब्बुळ वळत होते. आणि विशेष म्हणजे कितीही दूरवर नजर टाकली तरीही लोकल ट्रेनचे डबे संपतच नव्हते. जणू काही सर्व डबे क्षितिजाला भेदून आकाशात कुठेतरी अनंत पोकळीत गेले आहेत. अनिरुद्धला वाटले की पळत पळत तो एवढ्या दूर पळून आलेला आहे की आता विक्रम तर सोडा, कोणी वेताळ जरी आला तरी त्याचा पाठलाग करू शकणार नाही. तेवढ्यात समोरच्या रुळावर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. घाबरून जाऊन अनिरुद्ध तेथेच थांबला. हळूहळू घोड्यांच्या टापांचा आवाज जवळ यायला लागला. त्या घोड्यावर, महाभारत काळात युद्धात जाण्यासाठी करतो तशी वेशभूषा केलेली, केस मोकळे सोडलेले, डोक्यावर शिरस्त्राण घातलेली आणि हातात तलवार घेतलेली एक सुंदर स्त्री बसलेली होती. अनिरुद्धच्या समोर येऊन ती थांबली आणि घोड्यावरून उतरली. तिने अनिरुद्धच्या खांद्यावर तलवार ठेवली. त्याने प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे पाहिले.

"विसरलास मला? मी रत्नमाला?"

"कोण रत्नमाला?"

"वाटलंच की तू मलासुद्धा विसरला असशील. मला युद्धात पाठवले आणि तिथेच मरायला सोडून दिलेस? किती दिवस युद्ध करायला लावशील? एकसारखी न थकता तलवारबाजी किती दिवस मी करत राहणार? कोणाला तरी जिंकायला हवे ना?"

आता मात्र अनिरुद्धाच्या मनातल्या भीतीची जागा चिडण्याने घेतली. रत्नमालेवर प्रचंड चिडून अनिरुद्ध म्हणाला, "कोणते युद्ध? कोण रत्नमाला? माझा काय संबंध या सगळ्यांशी?"

तेवढ्यात बाजूच्या लोकल ट्रेनच्या इंजिनमधून, हसऱ्या चेहऱ्याच्या लोको पायलटच्या स्थिर पुतळ्याच्या बाजूने मार्ग काढत एका चष्मेवाल्या, लांब काळीशार दाढी आणि मिशा असलेल्या एका बारीक माणसाने रुळांवर उडी मारली आणि त्या दोघांच्या जवळ येत तो म्हणाला, "मी सांगतो की तुझा काय संबंध आहे तिच्याशी, विक्रमशी आणि माझ्याशी! माझे नाव अय्यर! सायंटिस्ट अय्यर! आणि आम्ही तिघे येथे आलो आहोत कारण आम्हा तिघांना न्याय हवा आहे!"

आता विक्रमसुद्धा त्या तिघांजवळ केव्हा येऊन उभा राहिला ते अनिरुद्धला समजले नाही. पण तो हवेत अधांतरी तरंगत होता.

आता अनिरुद्धला भोवळ यायचीच बाकी होती पण कसेबसे त्याने स्वतःला सावरले आणि बोलला, "न्याय? कसला न्याय? मी काय न्यायाधीश आहे? मला नाही ऐकायचे तुमचे कुणाचेच! मला सोडा येथून. मला घरी जायचे आहे! माझी पत्नी मुलगा काळजी करत असतील. मला जाऊ द्या ना घरी. माझा कसलाच संबंध नाही तुम्हा तिघांशी!"

सायंटिस्ट अय्यर म्हणाला, "संबंध नाही? जर उद्या भगवंताने तुला असे म्हटले की माझा तुझ्याशी काही संबंध नाही तर चालेल का तुला? तुला हा अन्याय नाही का वाटणार?"

"म्हणजे?"

"म्हणजे तू आमचा निर्माता आहेस पण तू आम्हाला विसरून गेलास. खूपच मोठा निष्काळजी निर्माता आहेस तू! आणि वर म्हणतोस की मला जाऊ द्या ना घरी, आता वाजले की बारा?", वाकोल्या दाखवत एखाद्या अप्सरेच्या नृत्याची नक्कल करत अय्यर म्हणाला.

हसून रत्नमाला म्हणाली, "जाऊदे अय्यर! 'वाजले की बारा' या गाण्यावर 'अप्सरा आली' या गाण्याचा डान्स करू नको!"

"मी तर काय एक सायंटिस्ट आहे. मी जास्त सिनेमे पाहत नाही!", ओशाळत अय्यर म्हणाला.

या गोंधळात संधी साधून अनिरुद्ध तिथून सटकण्याचा प्रयत्न करू लागला तेवढ्यात तलवार हवेत उगारत रत्नमाला अनिरुद्धकडे पाहून म्हणाली, "मुकाट्याने उभा रहा आणि अय्यर पुढे काय सांगतोय ते ऐक! नाहीतर आम्ही तिघे तुझे इथेच बारा वाजवू!"

आता अनिरुद्ध समोर काही पर्याय नव्हता. अय्यर आणि रत्नमाला अनिरुद्धच्या समोर येऊन उभे ठाकले आणि विक्रम मात्र हवेत अधांतरी तरंगत होता. हवेत तरंगणाऱ्या विचित्र चेहऱ्याच्या विक्रमची आकृती खूप भयानक वाटत होती.

अय्यर सांगू लागला, "ऐक. आम्ही तिघे तू लिहिलेल्या तीन वेगवेगळ्या कथांमधली मुख्य पात्रे आहोत. तू मागे एक ऐतिहासिक कादंबरी वाचली होतीस आणि त्यानंतर एक ऐतिहासिक कथा लिहायला घेतली होतीस. 'राजकुमारी रत्नमाला'. पण ती मध्येच लिहायची सोडून दिलीस. त्यात रत्नमाला तिच्या दुश्मन राज्याशी एक युद्ध लढते आणि त्यानंतर तू ती कथा पूर्णच केली नाहीस. मग अनेक दिवसांनी तू एक अशी कथा लिहायला घेतलीस की जात एक शास्त्रज्ञ म्हणजे मी, स्पेसशीप मध्ये बसून दुसऱ्या आकाशगंगेत जाऊन ब्लॅक होल शोधण्याच्या बेतात असतो जेणेकरून त्याला त्यात शिरून वेळ या मितीला शोधून त्यावर नियंत्रण मिळवता येईल. म्हणजे ब्लॅक होलमध्ये असलेल्या टाईम डायमेंशनला नियंत्रित करून काल प्रवास शक्य होईल. म्हणजे तो भूतकाळात किंवा भविष्यकाळात जाऊ

शकेल. पण स्पेसशीप आकाशात उडाले आणि त्यानंतर तू कथाच लिहिली नाहीस. मूर्ख!"

अनिरुद्धच्या डोक्यात चांगलाच प्रकाश पडला. आपल्या अपूर्ण राहिलेल्या तिन्ही कथेबद्दल त्याला आठवायला लागले. तिसऱ्या कथेमध्ये विक्रम नावाच्या एका साध्या सरळ माणसाला त्याचा बिजनेस पार्टनर मित्र रोहित एका गैरसमजामुळे धोका देतो आणि "तेजस हाईट्स" या बिल्डिंगवरून ढकलून देतो. त्यानंतर विक्रमचा आत्मा मुक्ती न मिळाल्यामुळे भटकत राहतो. येथून पुढे काय करायचे हे न ठरवता आल्यामुळे तिथून पुढे ती कथा लिहायचा नाद अनिरुद्धने सोडून दिला होता. त्यानंतर या तिन्ही कथांकडे त्याचे पूर्ण दुर्लक्ष झाले होते.

"मला आठवलं. मीच तुमचा निर्माता आहे! पण तुम्ही इथे कसे आलात? म्हणजे जिवंत कसे झालात?"

विक्रम सांगू लागला, "अतृप्त असलेल्या मृत व्यक्तींची या अमर्याद अवकाशात एक ठरलेली मिती (डायमेंशन) असते. त्यात ते आत्मे वावरत असतात. त्या मितीमधून आपल्या पृथ्वीवरच्या जगात काही अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी ते आत्मे प्रवेश करतात. त्यासाठी पंचमहाभूतांपैकी (पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश) कोणत्याही एका भूतामधील (इलेमेंट) एक ठराविक संवेदनशील जागेतून ते आत्मे त्यांच्या मितीमधून सध्याच्या जगात प्रवेश करतात. अशा अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या मिती या अनंत पसरलेल्या अवकाशात आहेत! हे माहिती होतं का तुला?"

अनिरुद्धाने उत्तर दिले, "नाही! मला हे असलं काही माहिती नव्हतं. मी तर वेगळ्या पद्धतीने विक्रमची कथा लिहिणार होतो."

पुढे अय्यर सांगू लागला, "आणि अशीच एक आणखी मिती अवकाशात आहे. आपल्या आकाशगंगेत नेपच्यून ग्रहापासून 100 प्रकाशवर्ष दूर असलेल्या एके ठिकाणी ती मिती आहे. आणि ती म्हणजे सगळे लेखक मंडळी ज्या वेगवेगळ्या कथा लिहितात, ती दुनिया! त्याला लेखनमिती असे म्हणतात. रायटिंग डायमेंशन.

त्यातील सगळी पात्रे तिथे वावरत असतात. कथा लिहिता लिहिता लेखक जेव्हा ब्रेक घेतो तेव्हा त्या मितीमध्ये ही सर्व पात्रे पुढच्या घटना घडण्याची वाट बघत बसतात. कथेतील सर्वात अलीकडच्या प्रसंगात ती पात्रे अडकून राहतात. लेखक जसा जसा लिहीत जातो त्याप्रमाणे ही पात्रे वागायला कटिबद्ध आहेत. एखादा लेखक एखादी कथा जितकी लवकर पूर्ण करेल तेवढे चांगले. कथा लिहिण्यामध्ये जास्त उशीर झाला तर ही पात्रे त्या डायमेंशनमध्ये अस्वस्थ होत जातात. ब्रेक वाढत गेला तर हळूहळू त्या सर्व पात्रांची स्वतःची एक इच्छाशक्ती तयार होते. मग ते लेखकाच्या विरोधात सुद्धा जाऊ शकतात. पण आम्ही तिघे चांगले आहोत. तुम्ही लवकर अपूर्ण राहिलेल्या आमच्या कथा पूर्ण करून आमच्या जीवनात पुढे काय घडणार आहे ते ठरवा. याचा इशारा द्यायला आम्ही तुझ्याकडे आलो आहोत. लेखनमिती मध्ये विविध लेखकानुसार अनेक उपमिती असतात. लेखकाच्या ब्रेकमध्ये एका कथेतील पात्र दुसऱ्या कथेतील जगात फिरून येते! तेवढेच मित्र मंडळी मिळतात, ओळख वाढते. आमच्या जगात सुद्धा एक फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हाट्सअप सारखे ॲप आहेत. रोजचा आमचा आरामचा वेळ संपला की जेव्हा आम्ही मोठ्या आशेने आमच्या लेखकांच्या कथेत प्रवेश करतो तेव्हा आम्हाला त्याच त्याच प्रसंगात दिवसाचे आठ तास राहावे लागत होते. तुम्ही पुढे कथा लिहितच नव्हता! "

"अरे वा! हे तर माझ्याही कल्पनेच्या पलीकडचे आहे!"

अय्यर पुढे म्हणाला, "विक्रम हा लेखक मंडळींच्या पात्रांच्या जगातल्या एका उपमितीमधले पात्र आहे. कारण लेखकांची पात्रं जेव्हा मरतात आणि इच्छा अपूर्ण राहिल्यास ते जेव्हा भूत योनीत जातात तेव्हा ते त्या लेखनमितिमधील 'भुतांच्या उपमितीमध्ये' जातात, जी कथेतल्या मेलेल्या आत्म्यांची मिती असते! हा विक्रम त्याच उपमिती मधला आहे! त्यानेच आम्हा दोघांचे दुःख ओळखले, आम्हाला एकत्र आणले आणि पृथ्वीवर असलेल्या आमच्या निर्मात्याकडे म्हणजे तुमच्याकडे येण्याचा मार्ग शोधून काढला!"

अनिरुद्धला आता सगळे काही समजले होते. त्याने पुढे विचारले, "म्हणजे तुम्ही सर्वजण जल या पंचमहाभूतामधून म्हणजे आज होणाऱ्या पावसामधून या पृथ्वीवर आला आहात! बरोबर?"

रत्नमाला म्हणाली, "अगदी बरोबर! पण आम्हाला खूप त्रास झाला ही विशिष्ट जागा शोधायला. पण विक्रमने आम्हाला ही जागा शोधायला मदत केली! कारण रोज लोकल ट्रेनमधून प्रवास करतांना तुम्ही नेहमी "तेजस हाइट्स" ही बिल्डिंग लोकलच्या दरवाजात उभे राहून बघायचात आणि विक्रम हे पात्र तुम्ही याच बिल्डिंगमध्ये राहते अशी कल्पना करून कथा लिहिली, बरोबर?"

"अगदी खरं आहे ते", अनिरुद्ध म्हणाला.

रत्नमाला म्हणाली, "आज घरी जाऊन आमच्या कथा पूर्ण करा. मी एकसारखे युद्ध लढून लढून थकले आहे. मी त्याच प्रसंगात अडकले आहे!"

अय्यर पुढे म्हणाला, "अपूर्ण राहिलेल्या कथेच्या सर्वात अलीकडच्या प्रसंगामध्ये अडकून, कथा पूर्ण होण्याची वाट बघता बघता जर का एखाद्या पात्राचा लेखनमिती मध्ये मृत्यू झाला तर ते पात्र लेखकाला आपल्या लेखनमिती मध्ये घेऊन जातं आणि लेखक त्या मितीत अडकतो. तिथे कायद्यानुसार त्या लेखकावर खटला चालतो आणि त्याला शिक्षा होते आणि पृथ्वीवर लोकांना वाटतं की एक लेखक अचानक गायब झाला! आम्ही तिघे तुला तात्पुरते घाबरवण्यासाठी एका प्रसिद्ध लेखकाच्या फॅन्टसी कथेत घेऊन आलो आहोत. त्यात त्या लेखकाने अनंत रूळ आणि अनंत डबे असलेल्या लोकल ट्रेनच्या जगाची कल्पना केली होती. पण घाबरू नकोस. तुला लवकरच या मितीमधून नेहमीच्या जगात आम्ही नेऊ!"

विक्रम मोठ्याने हसायला लागला आणि म्हणाला, "रत्नमाला आणि अय्यर हे दोघे चांगले असतीलही, पण मी चांगला नाही. तुम्ही लेखकाला इथेच काहीतरी शिक्षा द्यायला हवी आणि मग सोडायला हवे. अन्यथा मी तुम्हाला तिघांना सोडणार नाही!"

अनिरुद्ध म्हणाला, "मला आज घरी जाऊ द्या. मी आज रात्रीच तुमच्या तिघांच्या कथा पूर्ण करायला बसतो. लागल्यास उद्या सुद्धा ऑफिसातून सुट्टी घेतो आणि घरी बसून त्या कथा पूर्ण करतो, मग तर झालं!" अय्यर म्हणाला, "ठीक आहे! आम्ही तुला माफ केले. पण प्लीज, आमच्या कथेचा शेवट गोड करा! मला ब्लॅकहोल मध्ये कालप्रवास करण्याचा फॉर्म्युला सापडू द्या आणि रत्नमाला युद्धामध्ये फारशी जखमी न होता युद्ध जिंकते असे लिहा!"

"अगदी बरोबर बोललात तुम्ही, अय्यर!", रत्नमाला म्हणाली.

"नक्की नक्की! यात काही वादच नाही. तिन्ही कथेचे शेवट अगदीच साखरेएवढे गोड करीन मी! आणि तुम्हा तिघांवर जो अन्याय झाला आहे त्याचे परिमार्जन होईल. तुम्हाला तिघांना न्याय मिळेल", अनिरुद्धने गयावया करून वचन दिले.

पण विक्रम खुश दिसत नव्हता. तो म्हणाला, "पण माझे काय? तुम्ही आधीच कथेत मला मारून टाकले आहे. मला पुन्हा जिवंत करा."

"पण ते कसे शक्य आहे? ती कथाच मुळात हॉरर कथा आहे!", अनिरुद्धने सांगितले.

"मला माहितीच होते तू ऐकणार नाहीस. म्हणून मी काय केले माहिती आहे? तुमच्या पृथ्वीवरच्या खऱ्या जगातील जी भूतांची मिती आहे त्यात मी संपर्क साधला. आणि तिथल्या एका आत्म्याच्या मदतीने तुझा मी बदला घेणार!", विक्रम संतापून म्हणाला. तो हवेत अधांतरी लटकलेल्या अवस्थेत संतापला होता.

अनिरुद्ध गयावया करू लागला व म्हणाला, "नको नको. बदला वगैरे नको. थांब एक मिनिट! मला एक आयडिया सुचली आहे. मी घरी जाऊन तू ज्या पानांमध्ये मरतोस, ती पाने फाडून जाळून टाकतो. मग तर झालं?"

अय्यर म्हणाला, "पण मग ती लेखनमितीमधील काळाशी छेडछाड होईल! असे केल्यास लेखनमितीच्या कायद्यानुसार लेखकाला शिक्षा होऊ शकते!"

अनिरुद्ध म्हणाला, "ती शिक्षा होईल तेव्हा होईल. मी भोगायला तयार आहे. सगळ्यात आधी घरी जाऊन मी सर्व कथा पूर्ण करतो. विक्रमची कथा दोन पाने फाडून मग बदलून लिहितो. त्यात विक्रमला जिवंत ठेवतो!"

विक्रम सुद्धा आता मान्य झाला.

अनिरुद्धच्या मनात आले की, बिल्डिंगच्या टेरेसवर विक्रमला ढकलण्याच्या प्रयत्नात रोहित असताना विक्रम बाजूला होतो आणि रोहितच बिल्डिंगवरून खाली पडतो असे मी लिहीन.

आता सर्व रुळांवरील सर्व लोकलमध्ये लाईट आले. लोकलचा चालू होण्याचा हॉर्न वाजू लागला. लोकलमधील सर्व पुतळ्यासारखे झालेले लोक नेहमीप्रमाणे जिवंत झाले. लोकलचे क्षितिजापर्यंत पसरलेले डबे एकात एक, एकात एक असे सामावून जात नेहमीप्रमाणे 12 डब्यांची किंवा 15 डब्यांची लोकल तयार झाली. अनेक अनावश्यक लोकल ट्रेनचे डबे एकात एक, एकात एक शिरत शिरत शेवटी नाहीशा झाल्या. आकाशाला गोल गोल भिडलेल्या सर्व बिल्डिंग पुन्हा आपापल्या जागेवर आणि उंचीवर येऊन बसल्या. हे सर्व घडत असताना रत्नमाला, अय्यर आणि विक्रम कुठे नाहीसे झाले हे अनिरुद्धला कळलेच नाही. त्याच्या थांबलेल्या लोकल ट्रेनने हॉर्न दिला.

अनिरुद्ध त्याच्या लोकल ट्रेनमध्ये चढला. लोकल सुरू झाली.

रात्री घरी पोचायला दोन वाजले. अनिरुद्ध सुखरूप पोहोचल्यामुळे अनघाचा जीव भांड्यात पडला. मुलगा अरिश तर झोपून गेला होता. ओले कपडे बदलून, केस पुसून झाल्यावर त्याने थोडेसे खाल्ले आणि मग, "मला कंपनीचे थोडे अर्जंट कागदपत्रांचे काम आहे, मी रात्रभर जागणार आहे", असे अनघाला सांगितले. अनघा पुन्हा झोपी गेली.

आता रात्रीचे तीन वाजले होते. अनिरुद्धने टेबल लॅम्प ऑन केला. कथेच्या तिन्ही वह्या कपाटातून बाहेर काढल्या. खुर्चीवर बसला. सर्वात आधी त्याने विक्रमची वही उघडली आणि ज्या दोन पानांमध्ये विक्रमला बिल्डिंगवरून ढकलणे

आणि त्या संदर्भातील आधीचे सर्व प्रसंग होते, ती पाने त्याने फाडायला हात नेला तेवढ्यात, त्याचा हात कुणीतरी घट्ट पकडला....

अनिरुद्धने भित भित वर पाहिले....

त्याचा हात धरणारा मनुष्य कावेबाजपणे हसत म्हणाला, "मी रोहित. मी तुम्हाला ती पाने फाडू देणार नाही. मला विक्रमला बिल्डिंगवरून ढकलायचे आहे आणि ते मी तुम्हाला बदलू देणार नाही! त्याला जिवंत करून मला मारण्याचा तुमचा प्लॅन मी यशस्वी होऊ देणार नाही. अन्यथा तो माझ्यावर अन्याय होईल. ती पाने फाडलीत तर लक्षात ठेवा, गाठ माझ्याशी आहे!". दरम्यान, आकाशातून अय्यरचे स्पेस शिप वेगाने पृथ्वीकडे दहिसरच्या दिशेने येऊ लागले. त्या स्पेस शिप मध्ये, रत्नमालेच्या दुश्मन देशाचा राजा प्रचंडसेन, सेनापती विराटसिंग, अमात्य चंद्रमिहिर आणि राणी गुलाबमती हे बसलेले होते आणि नेपच्यून ग्रहावर मात्र जखमी अवस्थेत अय्यर आणि रत्नमाला पडले होते.

१२. तळघर

चिखलपूर नावाच्या छोट्या गावात पूर्वजांच्या "प्रवाह" नावाच्या वाड्यात माधव रहात होता. माधवचे आई वडील अपघातात वारल्यानंतर राघव नावाच्या त्याच्या आजोबांनी आणि आजीने त्याचे पालनपोषण केले. कालांतराने आजी वारली. बी कॉम करून जवळच्या शहरात त्याने एका खासगी कंपनीत नोकरी मिळवली. आजोबांनी त्याला याबद्दल निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले होते. त्याच्या आजोबांचा गावातला व्यवसाय बंद पडल्यानंतर त्याच्या वडिलांनी जवळच्या एका शहरात रोज जा-ये करून नोकरी केली होती.

शहरात नोकरी करून माधवला अधून मधून गावात येऊन आजोबाकडे लक्ष ठेवता येत होते. शहरात तो छोट्याशा भाड्याच्या रूमवर राहायचा. पगार काही फार नव्हता. ऑफिसमध्ये मधुरा नावाच्या एका सहकारी तरुणीवर त्याचे प्रेम जडले. कालांतराने ती कंपनी बंद पडली. माधवने इतर ठिकाणी प्रयत्न केले परंतु त्याला नोकरी मिळाली नाही. शेवटी त्याने ठरवले की, आता गावाकडे परत जायचे, तिथेच काहीतरी व्यवसाय करायचा आणि आजोबांची सेवा करायची. माधवने हा निर्णय मधुराला सांगितला पण तिला हा निर्णय आवडला नाही. त्याने शहरातच राहावे अशी तिची इच्छा होती. शेवटी तिने त्याला सोडण्याचा निर्णय घेतला. तीचे मन वळवण्याचा त्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. काही आठवडे तिच्या आठवणीत काढून शेवटी त्याने तिला विसरायचे ठरवले आणि तो बालपणीच्या आपल्या मातीत गावी परत आला.

त्याने साठवून ठेवलेल्या आणि आजोबांनी त्याच्या नावे ठेवलेल्या काही पैशांच्या आधारे त्याने किराणा, भाजीपाला आणि स्टेशनरी असे एकत्रित दुकान सुरू केले कारण जवळच शाळा होती. त्याचे दुकान बरे चालू लागले. अधून मधून मधुराची आठवण यायची पण तो दुर्लक्ष करायचा. मग एक वाईट घटना घडली. सहा

महिन्यांत त्याचे आजोबा वारले. त्यांचे जास्त कुणी नातेवाईक नव्हते याचे कारण म्हणजे बहुतेक सर्व नातेवाईक हे अपघाताने किंवा एखादा रोग होऊन वारले होते. जे थोडेफार दूरचे नातेवाईक होते, तेही शहरांत दूरवर विखुरलेले होते. त्यापैकी काही अंत्यविधीला येऊन गेले. आता माधव एकटा पडला.

माधव रहात असलेला तो पूर्वजांचा वाडा गावातील सर्वात जुना होता. कित्येक पिढ्या या वाड्यात राहिलेल्या होत्या, आणि अनेक वर्षांपासून त्याचं जतनही योग्य प्रकारे केलं जात होते. वर्षानुवर्ष सूर्यभान काका हे त्या वाड्याची देखभाल करायचे. माधव शहरात असताना आजोबांची सुद्धा शक्य तेवढी काळजी घ्यायचे. त्यांनी व त्यांच्या अनेक पिढ्यांनी लहानपणापासून नियमित व्यायाम आणि कुस्तीचे प्रशिक्षण घेतलेले असल्यामुळे त्यांचे शरीर काटक आणि बलवान होते.

एकदा दुकानात बसलेला असताना माधवला आठवले की, वाड्यात ज्या चार खोल्या होत्या त्यापैकी चौथी खोली नेहेमी कुलूप बंद असायची कारण त्या खोलीत तळघराकडे जाणारा एक जिना होता. माधव लहानाचा मोठा झाला परंतु ते तळघर आजोबांपासून नंतर कुणीही कधीही उघडले नाही. घरात सर्व प्रकारच्या चर्चा व्हायच्या पण एका गोष्टीचा नेहमीच उल्लेख टाळला जायचा – तळघर! चौथी खोली अधून मधून साफ करायला उघडली जायची परंतु जमिनीला असलेल्या तळघराच्या दरवाजाला मात्र कडी आणि कुलूप नव्हते. पण दरवाजा खूपच भक्कम आणि जड होता. कालांतराने चौथी खोलीसुद्धा कायमची कुलूप लावून बंद करण्यात आली.

नंतर त्या खोलीत जायला कोणाला परवानगी देण्यात आली नाही! याचे कारण जवळच्या एका गावात राहणाऱ्या एका दूरच्या नातेवाइकने म्हणजे शंभूकाकांनी माधवला सांगितले पण त्यांचे नाव त्याच्या आजोबांना न सांगण्याच्या अटीवर! ते कारण असे होते की, रोज रात्री त्या तळघरातून अस्पष्ट आणि दबलेले ओरडण्याचे आवाज येत. मध्येच एखादा लाकडी खोका जोरात धडपडल्यासारखा आवाज यायचा जणू काही एखादे अभद्र हिंस्त्र जनावर त्या खोक्यात बंद करून ठेवले

आहे आणि खोक्यातून ते बाहेर येण्याचा प्रयत्न करते आहे. कधी कधी तर म्हणे जोरजोरात एक पाऊल आपटण्याचा आवाज ऐकू येई जणू काही मोठा व्यक्ती लहान मुलासारखा एखाद्या वस्तूसाठी आपल्या आईवडिलांकडे हट्ट करतो आहे आणि पाय आपटतो आहे. काही वेळेस तर जोराजोरात ताट, वाट्या आणि चमचे फेकण्याचा आवाज येत असे.

सूर्यभान काकांना तळघरातील हालचाली अधून मधून जाणवत होत्या पण ते दुर्लक्ष करत आणि माधवला सांगत नसत. एक दोन वेळा रात्री वाड्यातून आपल्या घरी जाण्याच्या आधी त्यांना चौथ्या खोलीच्या दरवाजावर आतमधून कुणीतरी जोरजोरात ठोकत आहे असे जाणवले. त्या दिवसापासून त्यांनी त्या रुमच्या दरवाज्याच्या बाजूला जाऊन कपडे वाळत टाकणे सोडून दिले.

कालांतराने माधवचा व्यवसाय खूप चालू लागला आणि खूप नफा होऊ लागला. दरम्यान इकडे मात्र वाड्यातील तळघरात वेगाने हालचाली होऊ लागल्या होत्या. त्या बंद असलेल्या तळघरात दबक्या आवाजात एकमेकांशी अभद्र चर्चा होऊ लागली आणि अस्वस्थता वाढत गेली.

एकदा त्याची शेजारच्या छोट्या गावातील बालपणीची मैत्रीण मोनिका शहरात शिक्षण संपवून चिखलपूर गावातल्या त्याच शाळेत शिक्षिका म्हणून लागली, ज्यात लहानपणी दोघे एकत्र शिकले होते. त्याला हे माहीत नव्हते मात्र तिने त्याला एकदा दुकानात पाहिले होते. एकदा मुद्दाम त्याचे लक्ष नसतांना ती त्याच्या दुकानावर एक वही आणि पेन विकत घ्यायला आली. पैसे असलेल्या त्या हाताकडे आणि मग हळूहळू चेहऱ्याकडे त्याने जेव्हा नजर फिरवली तेव्हा तिला ओळखले आणि त्याला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. काही वेळ दोघांपैकी कोणीही काही बोलले नाही. मग ती दुकानात येऊन बसली आणि नंतर दोघेही खूप हसले आणि गप्पा सुरू झाल्या. जुनी मैत्री उफाळून आली आणि ते रोज भेटू लागले. दोघांची फॅमिली एकमेकांना ओळखत होतीच. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. दोघांनी

लग्नाचा निर्णय घेतला. साधेपणाने लग्न पार पडले आणि मोनिकाचा "प्रवाह" वाड्यात मध्ये प्रवेश झाला. नवीन जोडप्याचे काही महिने आनंदात गेले.

मोनिका आता प्रेग्नंट खाली होती. काही दिवसानंतर ती बाळंतपणासाठी माहेरी जाणार होती. ते तळघर आता कधी नव्हे एवढे अस्वस्थ झाले होते. तिथे अनेक शक्ती जोमाने कार्यरत झाल्या. येरझारा घालू लागल्या.

दरम्यान माधवला एक कल्पना सुचली. जुना वाडा पाडून त्याचे नूतनीकरण करायचे आणि व्यवसायाच्या जागेचे भाडे भरण्यापेक्षा चौथी खोली पाडून त्या जागी दुकान सुरू करायचे आणि कालांतराने आणखी एखादा नवा जोड व्यवसाय सुरू करायचा. चौथ्या खोलीच्या एरवी बंद असलेल्या खिडकीच्या ऐवजी दुकानाचा दर्शनी भाग येणार आणि समोर दाट वस्ती आहे आणि तिथून थोडी पुढे शाळा असल्याने दुकान आणखी जास्त चांगले चालणार होते.

राहता राहिले तळघर! ते दुकानातील माल ठेवण्यासाठी वापरायचे अशी नामी कल्पना त्याला सुचली. सूर्यभान काकांनी त्याला विरोध केला, तेव्हा पहिल्यांदा मोनिकाला तळघर प्रकरणाबद्दल माहिती झाले.

आता आजोबा जिवंत नसल्याने दूरच्या शंभुकाकांनी सांगितलेली माहिती सुद्धा सूर्यभान काका आणि मोनिका या दोघांना माधवने सांगितली. सूर्यभान काकांनी ते कपडे वाळत टाकत असताना त्यांना चौथ्या खोलीतून येत असलेल्या आवाजाबद्दल पण सांगितले. मोनिकानेही माधवला सांगितले की तळघरात असा काही प्रकार असेल तर तिथे आपण न छेडलेले बरे. चौथ्या खोलीत व्यवसाय करण्याचा प्लॅन रद्द करावा असे दोघांनीही माधवला समजावले.

तरीही माधव त्याच्या म्हणण्यावर ठाम होता. घरी मोक्याची जागा असताना दुकानाच्या भाड्याचे पैसे कशाला खर्च करायचे असा त्याचा हट्ट होता. शेवटी सूर्यभान काका आणि मोनिका दोघांनी त्याच्यापुढे हार मानली. गवंडी आले, काम चालू झाले. खोली क्रमांक एक म्हणजे ज्यात बैठक, स्वयंपाकघर आणि एक छोटी बेडरूम होते ती वगळता इतर सर्व खोल्या पाडायला सुरुवात झाली.

आता चौथ्या खोलीची अवस्था म्हणजे विटा, चुना, सिमेंटचे आणि इतर बांधकाम साहित्याचे पोते, अर्धवट पडलेल्या भिंती, आजूबाजूला पडलेले साहित्य तसेच पाच कामगार बाजूलाच ओट्यावर झोपलेले अशी झालेली होती. सकाळी सर्वजण उठले तेव्हा चारच कामगार होते. पाचवा कामगार गणादू कुठे गेला हे कुणालाच समजले नाही. रात्री कसलातरी जोराचा आवाज मात्र त्यांना आला होता तेव्हा पाचवा कामगार तिथे नव्हता पण तो बाथरूमला गेला असेल म्हणून त्यांनी दुर्लक्ष केले आणि दिवसभर थकलेले असल्याने पुन्हा ते सर्व लगेच झोपी गेले. माधवने गावात चौकशी केली पण काहीही सुगावा लागला नाही. गणादूचे कुटुंब येऊन माधवला जाब विचारू लागले. त्याने त्यांना समजावून परत पाठवले.

या सर्व गोंधळात मोनिकाला माधवने तिच्या गावात माहेरी पाठवून दिले. या सर्व गोष्टींचा तळघराशी संबंध असावा असे सूर्यभान काकांनी सांगितल्याने एकदाचा या तळघर प्रकरणाचा छडा लावायचा म्हणून माधवने एक दिवशी सर्व कामगारांना घरी पाठवले आणि सूर्यभान काकांसोबत तळघरात जायचा निर्णय घेतला.

त्या रात्री त्यांनी बांधकामाच्या मशीनच्या मदतीने गंजलेला भक्कम दरवाजा मशीनने उचलून उघडला. हातात टॉर्च घेऊन माधव आणि त्याच्या मागून कंदील घेऊन सूर्यभान काका धुळीने भरलेल्या पायऱ्या उतरू लागले.

समोर अंधार होता आणि धुरकट दिसत होते. वाटेत जागोजागी जळमटे होती, ती हाताने दूर करत ते दोघे सावधतेने पण मनातून घाबरत पायऱ्या उतरून खाली आले. वर दाणकन काहीतरी आपटल्याचा आवाज आला म्हणून त्यांनी वर पाहिले तर दिसले की, भक्कम दरवाजा पुन्हा आपोआप बंद झाला होता. पण आता त्यांना तळघराच्या छडा लावायचा होता त्यामुळे ते पुढे जात राहीले.

आता त्यांना वेगवेगळे दबक्या स्वरूपाचे आवाज ऐकू यायला लागले. जणू काही एकमेकांच्या कानात दोन जण तिसऱ्याबद्दल बोलत आहेत.

सूर्यभान काकांच्या मागच्या बाजूला असलेल्या भिंतीवर वरच्या बाजूंनी दोन मानवी गडद काळया सावल्या उमटल्या आणि त्या हळूहळू उलट्या खाली सरकल्या. हातातील कंदीलाच्या प्रकाशामुळे काकांची पाठमोरी सावली भिंतीवर पडली होती, तिला त्या दोन सावल्यांनी दोन्ही हातांनी पकडली. भिंतीपासून दूर असतानाही भिंतीवरच्या सावलीला पकडल्यामुळे सूर्यभान काका जखडले गेले आणि ओरडायला लागले. त्यामुळे माधवचे लक्ष तिकडे गेले आणि त्यालाही हा प्रकार बघून त्याला प्रचंड भीती वाटायला लागली. आता काय करावे ते समजत नव्हते.

तेवढ्यात त्याला कल्पना सुचली. त्याने हातातील टॉर्चचां प्रकाश त्या दोन सावल्यांवर मारला तेव्हा त्या अंधुक व्हायला लागल्या आणि तो प्रकाश टाळण्यासाठी त्या पुढे पुढे सरकत सूर्यभान काकांना सुद्धा ओढत नेऊ लागल्या. कंदीलामुळे पडत असलेली काकांची सावली नष्ट करायची तर कंदील विझवायला हवा. म्हणून त्याने काकांना वाचवायला हातातली टॉर्च त्याने वेगाने कांदिलावर मारून फेकली. कंदील हातातून खाली पडून फुटला. टॉर्च पण खाली पडली आणि घरंगळत कुठेतरी गेली आणि बटण सरकल्याने विझली.

काकांची सावल्यांचा हातातून सुटका झाली खरी पण आता सगळीकडे अंधार पसरला. हा नेहमीच्या अंधारासारखा वाटत नव्हता. सगळ्या जगभरातला काळा रंग एकत्र करून या खोलीत दाबून भरून ठेवलेला आहे, अशा प्रकारचा तो जीवघेणा अंधार वाटत होता.

पण हे बरे झाले असे दोघांना वाटले कारण आता प्रकाश नाही म्हणून सावल्या नाहीत आणि त्यामुळे इतर कोणत्या सावल्यांनी पकडण्याची भीती नाही.

पण तो आनंद जास्त काळ टिकला नाही.

आजूबाजूच्या काळया आणि गडद अंधारात माधवची मान मागून कुणीतरी पकडली. माधव भितीने ओरडला. समोर जमिनीवर पडलेले सूर्यभान काका या ओरडण्याने उठून उभे राहिले पण अंधारात कोण कुठे आहे हे काहीच दिसत नव्हते.

त्यांनी अंदाजाने पावले टाकायला सुरुवात केली. अंधारात चाचपडत आवाजाच्या दिशेने चालत गेले. त्यांना माधवचा गुदमरून ओरडण्याचा आवाज येत होता, "कोण आहे? सोड मला?"

सूर्यभान काकांना अंधारात झटापटीचा आवाज येत होता. हात पाय एकमेकांवर घासले जाऊन पोटात बुक्के मारणे, गालावर चापटा मारणे, पोटात दुखल्यामुळे ओरडणे, अतीव वेदनांनी कळवळणे, श्वास कोंडला जाऊन घशातून विचित्र आवाज निघणे, मधूनच जमिनीवर धपकन पडणे असे काळजी वाढवणारे भीतीदायक आवाज ऐकायला आले. पण दिसत काहीच नव्हते.

त्यांना एक क्षण असे वाटले की, आंधळे लोक रोजच्या जीवनात किती समस्यांचा सामना करत असतील? कुणीतरी नक्की माधव वर हल्ला केला आहे पण त्याला वाचवायचे तर प्रकाश हवा आणि कंदील तर फुटला आहे.

पण टॉर्च खाली कुठेतरी असेल ती शोधावी लागेल, असा विचार करून हातांनी अंदाज घेत सूर्यभान काका जमिनीवर टॉर्च शोधू लागले पण मधूनच पायऱ्यांनी अडखळून पडले, परत उभे राहिले. शेवटी त्यांना जमिनीवर काहीतरी गोल सापडले, त्यांनी ते उचलले पण ती एक जाड काठी होती. ती उपयोगी पडेल म्हणून त्यांनी ती उचलली आणि दुसऱ्या हाताने ते टॉर्च शोधू लागले. त्यांना एके ठिकाणी टॉर्च सापडली, ती उचलून गोल गोल फिरवत टॉर्चचे बटन सापडले त्यांनी बटन ऑन केले आणि मागे वळून प्रकाश फेकला...

समोरचे दृश्य बघून ते जागच्या जागी थिजले...

चेहऱ्यात भीतीकारक बदल झालेला आणि झपाटलेला गणादू, जमिनीवर आडव्या पाडलेल्या माधवच्या छातीवर बसला होता आणि समोरच्या भिंतीवर अनेक मानवी आकाराच्या सावल्या हा प्रकार बघत हसत होत्या. म्हणजे अंधारातही या सावल्या अस्तित्वात होत्या पण त्या उजेड असल्याशिवाय आणि कुणा मानवाची सावली पडल्याशिवाय त्याला त्रास देऊ शकत नव्हत्या.

टॉर्चचा प्रकाश चेहऱ्यावर पडताच गणादू सूर्यभान काकांकडे पाहून म्हणाला, "मी माधवला आणि नंतर त्याच्या होणाऱ्या बाळाला सोडणार नाही. बाळाला मारण्यासाठी आताच एक सावली मोनिकाच्या घराकडे रवाना झाली आहे. माधवाच्या पूर्वजांनी त्रास दिलेले, दुखावलेले आत्मे सावल्यांच्या आणि आवाजाच्या स्वरूपात वर्षानुवर्षे या तळघरात बंदिस्त झाले आहेत. हे तळघर म्हणजे या वाड्याचे हृदय आहे. जसे माणसाच्या हृदयात सर्व भाव भावना साठून राहतात तसेच! आम्ही वर्षानुवर्षे हाका मारीत होतो पण कुणी आमचे ऐकायला आले नाही म्हणून आम्ही तुमच्या अनेक पिढ्यातील लोकांना अपघाताने आणि रोगाने मारले. आम्हाला जाणवत होते की वंशजापैकी माधव, त्याचे वडील आणि आजोबा तसेच सूर्यभान काका तुम्ही इतर पूर्वजापेक्षा सरळमार्गी आहेत, कुणाला त्रास देण्याची पापी वृत्ती तुमची नाही. वंशजांपैकी आता माधवद्वारेच आमची येथून मुक्तता होईल. जेव्हा त्याने तळघर असलेली खोली पाडली, आणि रात्री कामगार झोपले तेव्हा आम्ही तळघरात खूप हालचाली आणि आवाज सुरू केल्या. बाहेर झोपलेला गणादू अर्धवट जागा होता. त्याने कुतुहलाने म्हणून आत चौथ्या खोलीत येऊन मशीनच्या मदतीने दरवाजा उघडला आणि टॉर्च घेऊन तो आत तळघरात उतरला. आम्हाला हेच हवे होते. आमचे म्हणणे तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही गणादूला त्याची सावली पकडून आमच्यात ओढून घेतले आणि त्याच्यात प्रवेश केला!"

सूर्यभान काका म्हणाले, "थांबा. तुमचे जे काही म्हणणे असेल ते पूर्ण सांगा. माधवला सोडा. आणि तुमच्या काय मागण्या असतील ते आम्ही मान्य करतो. कृपया माधवला मारू नका! त्याच्या बाळाकडे पाठवलेल्या सावल्या परत बोलवा."

हे ऐकून गणादू माधवच्या छातीवरून उठला. माधव उठून उभा राहिला. आता गणादू पूर्वीच्या मानवी रूपात आला.

आता भिंतीवरच्या सावल्यांमध्ये अस्वस्थता पसरली आणि त्यांचा खेळ सुरू झाला.

साध्या, स्थिर प्रकाशातही त्या सावल्यांनी एक अनोखे भयाण रूप धारण केलं. सावल्यांचे आकार एकमेकांत मिसळलेले होते.

काही बुटक्या तर काही लांबट, काही टोकदार तर काही गोलसर. पण त्या सर्वांचा एक त्रासदायक गुणधर्म होता, त्या अगदी अमानवी हालचाल करत होत्या. कधी त्या गडद होत तर कधी इतक्या फिकट की दिसेनाशा होईनात.

एका कोपऱ्यात तर एक अभद्र पालीच्या आकारासारखी आकृती पायांच्या आणि शेपटीच्या लांब सावल्यांसह भिंतीवर फिरत असल्यासारखी भासू लागली.

तळघराच्या मुख्य भिंतीवर एक अजूनही वेगळी सावली होती, जी एका मोठ्या जमावासारखी दिसत होती. तिच्या आकारात लहान मोठ्या आकृत्या सामावल्या होत्या. काही मानवी आकारासारख्या, काही वेड्यावाकड्या अमानवी! त्या जमावातील प्रत्येक सावली जणू काही तळघराच्या भिंतीवरून दूर होऊ इच्छित होती, पण त्यांचे पाय भिंतीत जखडले आहेत असे दिसत होते. सावल्यांचे अस्तित्व अधिक भीतीदायक होत चालले होते. त्या तळघरात एक प्रकारचा अनाकलनीय थंडावा पसरला होता.

आता तळघरात विविध लोक एकत्र बोलत आहेत असा आवाज छताकडून घुमायला लागला पण त्या आवाजात स्पष्टपणा होता...

"आम्ही या तळघरातून कायमचे निघून जाऊ. पण आम्हाला माधव किंवा त्याचे बाळ यापैकी कुणा एकाचा बळी हवा आहे. बोला कुणाचा देणार? पूर्वजांनी केलेल्या कर्माची फळे वंशजांना फेडावीच लागतील. "

माधव आणि सूर्यभान काका यांनी एकमेकांकडे पाहिले.

सूर्यभान काका म्हणाले...

"तुमच्यापैकी कुणालाही जो काही त्रास झाला असेल त्याची भरपाई माधव करेल. तुमच्या कुणा अनाथ झालेल्या नातेवाईकाला मदत, पालनपोषण किंवा अजून काही? शक्य असेल ते सर्व माधव करेल. पण बळी? नको! आणि तसेच असेल तर माझा बळी घ्या, परंतु या दोघांना सोडा!"

तो आवाज म्हणाला, "यांच्या पूर्वजांनी केलेली पापं तू कशाला फेडतोस? ते नाही चालणार! आम्हाला या दोघांपैकी कुणा एकाचा बळी हवा. मग आम्ही एकत्रितपणे येथून निघून जाऊ. लवकर ठरवा. अन्यथा आमची एक सावली बाळाच्या आईपर्यंत पोहोचतेच आहे! ती आईच्या पोटात शिरली की संपलं!"

आता काय करावे याचा पेच पडला होता.

सूर्यभान काका म्हणाले, " पण आधीच तुम्ही अनेकांना अकाली मारले आहे आणि तुमचा बदला घेत आला आहात. मग आता आणखी तुम्हाला बळी कशाला हवेत?"

तेव्हा अचानक तळघराचा दरवाजा उघडल्याचा आवाज आला आणि दोन जण पायऱ्या उतरू लागले...

मोनिकाने शंभूकाकांना कॉल करून परिस्थितीची कल्पना दिली होती, ते एका सदगुरूंना सोबत घेऊन आले होते. त्यांचेकडे एक दिव्य काठी होती ज्याला उडणाऱ्या हनुमानाचे चित्र असलेला एक झेंडा जोडलेला होता आणि टोकाला एक त्रिकोणी दिव्य मणी होता आणि त्यातून लालसर प्रकाश पडत होता.

ते पटकन पायऱ्या उतरून खाली आले आणि माधव व सूर्यभान काका यांना त्यांनी बाजूला होण्याची विनंती केली. ते बाजूला झाले. शंभू काकांना पाहून दोघांना हायसे वाटले.

मग सदगुरू सावल्यांसमोर येऊन उभे राहिले आणि हनुमानाचा एक अद्भुत मंत्र म्हणत, त्यांनी दिव्य प्रकाश सोडत असलेली ती काठी एकेका सावलीजवळ नेली आणि तिला गोल गोल फिरवू लागले. त्यामुळे त्या सावल्यांना प्रचंड पीडा होऊ लागली. वेदनेने त्यांच्या हृदयातून भीतीदायक हुंकार निघू लागले.

एकेक सावली अक्राळ विक्राळ रूप धारण करत शेवटी निस्तेज होऊन गायब व्हायला लागली. नष्ट होतांना त्या सावल्यांना प्रचंड वेदना होत होत्या. त्या सर्व वेदना जणू काही संपूर्ण तळघरात दुःखाचा भूकंप आणत होत्या. तळघर हादरत

होते. सावल्या कधी एकमेकात मिसळू लागल्या तर कधी एकमेकांपासून दूर पळू लागल्या. सावल्यांमध्ये गोंधळ माजला.

दिव्य शक्तीमुळे आपले अस्तित्व लवकरच संपणार आहे याची जाणीव झाल्याने त्या अस्वस्थ होऊन अभद्र आरोळी ठोकू लागल्या. जसे एखाद्या गर्दीच्या ठिकाणी माणसांची चेंगरा चेंगरी होते त्याप्रमाणे भिंतींवर सावल्यांची चेंगरा चेंगरी माजली.

हळूहळू एकेक करत सर्व सावल्या नष्ट झाल्या...

वाड्याचे हृदय असलेले तळघर आता त्रासातून मुक्त झाले होते. हृदय सुरळीत चालू असले की माणूस निरोगी राहतो तसे आता वाड्याच्या हृदयावरचा म्हणजे तळघराचा ताण आता हलका झाला होता आणि वाडा निरोगी झाला होता.

शंभू काका म्हणाले, "मोनिकाचे आभार मान. तिने वेळेवर आम्हाला बोलावले, अन्यथा तुझे हे वेडे साहस जिवावर बेतले असते! आणि हे सदगुरू हमुमानाचे उपासक आहेत. माझे मित्र आहेत. त्यांच्यामुळेच आज आपण वाचलो'!"

माधव, सूर्यभान काका आणि गणादू यांनी त्यांचे आभार मानले आणि पाचही जण दिव्य प्रकाश असलेल्या काठीसहित पायऱ्या चढू लागले. ते निघून गेले, तळघरचा दरवाजा बंद केला आणि पुन्हा तिथे काळोख पसरला. मिट्ट काळा अंधार!

तिकडे मोनिका काळजीने रात्री बेडवरून छताकडे बघत लोळली होती आणि एक सावली बाजूच्या खिडकीतून उडी मारून तिच्या पोटात शिरण्याच्या बेतात होती पण हवेतच नष्ट झाली. मोनिकाला त्या सावलीबद्दल काहीच कल्पना नव्हती!

१३. जंगलातील भ्रम

थंडीचे दिवस होते. विराज आणि त्याचे 3 मित्र ट्रेकिंगसाठी एका घनदाट जंगलात गेले होते. दिवसभराच्या प्रवासानंतर जंगलाजवळ एका उंच डोंगराच्या पायथ्याशी पोहोचले आणि त्यांनी तिथेच तंबू ठोकण्याचा निर्णय घेतला. चंद्राच्या शीतल प्रकाशात झाडांची सावली एकमेकांत मिसळून अजब आकृत्यांसारखी दिसत होती. पक्ष्यांचे आवाजही बंद झाले होते, फक्त झाडांच्या पानांवर वाऱ्याची सळसळ ऐकू येत होती.

रात्रीचे अकरा वाजले असतील. रात्री जेवण झाल्यावर शेकोटी पेटवून सगळे जण गप्पा मारत बसले. तेवढ्यात जंगलाच्या आत कुठेतरी एक विचित्र किंकाळी ऐकू आली. सगळ्यांच्या अंगावर काटा आला. "कोण असेल?" रोहन भीतीने कुजबुजला. कुणालाही उत्तर देता आलं नाही. त्याच वेळी समोरच्या झाडामागे एक हलकीशी हालचाल दिसली. विराजने टॉर्च त्या दिशेने मारली, पण काहीही स्पष्ट दिसत नव्हते.

तेवढ्यात त्यांच्या तंबूच्या मागून डोंगरावरून कुणीतरी वजनदार प्राणी धप धप पायाचा आवाज करत उतरत असल्यासारखा आवाज आला. आता मात्र सगळे सुन्न झाले होते. कुणीतरी मोठ्या आकाराचा प्राणी त्यांच्या दिशेने येत होता. तो कोणता प्राणी होता हे समजण्याआधीच त्याच्या घोगऱ्या गुरगुराटाने सगळ्यांच्या काळजाचा ठोका चुकला.

"पळा!" विराज जोरात ओरडला, आणि सगळे जण वेगाने एका दिशेने धावत सुटले. सगळीकडे जंगलच होतं. मागे वळून पाहण्याची कोणाचीही हिंमत नव्हती. जंगलात धावताना काटेरी झुडुपं अंगावर ओरखडे उमटवत होती, पण जीव वाचवायचा होता. काही मिनिटांनंतर एका मोठ्या खडकामागे लपून त्यांनी श्वास

रोखला. आता फक्त निशब्द काळोख आणि त्यांच्या जोरजोराने धडधडणाऱ्या हृदयाचे आवाज ऐकू येत होते.

सगळे घाबरलेले, थकलेले आणि गोंधळलेले होते. त्या घनदाट जंगलात कुठे जाऊन लपायचं, काहीच सुचत नव्हतं. खडकामागे बसून ते एकमेकांच्या चेहऱ्याकडे बघत होते. रात्रीचा काळोख अधिकच गडद होत चालला होता. झाडांमधून फक्त गूढ वाऱ्याचा आवाज येत होता, पण त्या आवाजातही एक विचित्र कंप जाणवत होता. असे भासत होते की जणू काही कुणीतरी विविध झाडांमागून त्यांच्याकडेच बघत आहे.

काही वेळ शांततेत गेल्यावर कुणीतरी हळूच मागे पाहिले. तो भयानक आकृतीसारखा दिसणारा जीव आता दिसत नव्हता. सगळ्यांनी सुटकेचा श्वास सोडला. पण तो प्राणी नेमका कोण होता? तो तिथून गेला की अजूनही जवळच कुठेतरी होता? ही रात्र कधी संपणार होती?

अचानक, रोहनने डोळे मोठे करून समोर पाहिलं आणि तो पुतळ्यासारखा स्तब्ध झाला. "तिथे... तिथे कोणीतरी उभं आहे!" त्याच्या कडवट स्वराने सगळ्यांच्या हाडात भीती भरली. सगळ्यांनी त्या दिशेने पाहिलं. समोरच एका झाडाच्या फांद्यांच्या आडून एक उंच, काळसर आकृती दिसत होती. तिच्या डोळ्यांत एक विचित्र चमक होती. ती काही क्षण तिथेच स्तब्ध उभी होती आणि मग अचानक नाहीशी झाली.

"हे नक्की काय घडत आहे?" विराज घाबरून कुजबुजला.

तेवढ्यातच एक कुजबुज ऐकू आली. एकदम जवळून, जणू त्यांच्या मागेच कुणीतरी दबक्या आवाजात काहीतरी पुटपुटत होतं. सगळ्यांनी घाबरून मागे पाहिलं, पण तिथे कोणीच नव्हतं.

अचानक कुणालच्या खांद्यावर कुणीतरी हात ठेवला. तो दचकून मागे वळला, पण तिथे कोणीच नव्हतं. "माझ्या खांद्यावर कुणीतरी हात ठेवलाय!" तो किंचाळला. त्या शब्दांनी सगळे स्तब्ध झाले. लगेचच थंड वाऱ्याचा एक झोत

त्यांच्या मध्येच फिरला. पण हा वारा सामान्य नव्हता—त्यात एक विचित्र, कुजक्या गंधासारखा वास होता.

तेवढ्यात एक विचित्र, घोगरं हसू ऐकू आलं. ते मानवी नव्हतं—काहीतरी वेगळंच होतं. आवाज वरच्या झाडांमधून येत होता, जणू काही तिथे कुणीतरी बसून त्यांना पाहत होतं. सगळ्यांची तोंडं पांढरीफटक पडली.

घाबरलेल्या अवस्थेत ते एकमेकांच्या जवळ बसून होते.

एका क्षणी विराजने सागरला आवाज दिला, "सागर, तुझ्या हातातली बॅटरी दे..."

पण सागर काहीच बोलला नाही.

विराजने त्याच्याकडे पाहिलं, आणि... सागर तिथे नव्हताच!

"सागर कुठे गेला?" रोहन किंचाळला. सगळे घाबरून उठले. त्यांचा मित्र काही क्षणांपूर्वी त्यांच्यासोबत होता, पण आता कुठेच नव्हता. आता मात्र त्यांच्या हृदयाची धडधड प्रचंड वाढली होती.

काही मिनिटांतच समोरच्या झाडांमधून सागर पुन्हा दिसला. त्याच्या चालण्यात काहीतरी विचित्रपणा होता, आणि त्याच्या डोळ्यांत एक वेगळाच भाव होता.

"सागर, तू कुठे होतास?" विराजने विचारलं.

सागर काहीच न बोलता हसला—तेच भेसूर हसू, जे त्यांनी काही क्षणांपूर्वी ऐकलं होतं. त्या वेळी सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला.

सागर समोर उभा होता, पण त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव वेगळेच होते. त्याचा तो भेसूर हसू पाहून सगळ्यांच्या अंगावर काटा आला. "सागर, तू कुठे होतास?" विराजने धडधडत्या आवाजात विचारलं.

सागर काहीच न बोलता त्यांच्याकडे बघत राहिला. त्याचे डोळे खोलवर काळसर दिसत होते, आणि त्याच्या श्वासात एक विचित्र थंडावा जाणवत होता.

काही क्षण शांततेत गेले. अचानक, तो अगदी वेगाने बुलेट ट्रेन सारखा पुढे आला आणि विराजच्या खांद्यावर घट्ट पकड घेतली आणि खांदे जोराने दाबू लागला.

"सोड ना, काय करतोयस?" विराजने धडपडत म्हटलं. पण सागर काहीच बोलत नव्हता. त्याच्या पकडीचा जोर वाढत गेला.

"सागर, हे तू काय करतोयस? आम्ही घाबरतोय ना ! प्लीज, गंमत करण्याची ही वेळ नाही !" कुणाल ओरडला.

तेवढ्यात सागरच्या चेहऱ्यावर एक विचित्र वेदनादायक भाव उमटला. जणू काही तो स्वतःशीच झगडत होता. तो जोरात किंचाळला आणि एका झटक्यात आपोआप मागे पडला. सगळे धावत त्याच्या जवळ गेले.

त्याचा श्वास जड झाला होता.

"माझ्या आत काहीतरी घुसलं होतं. माझ्यावर कब्जा घेत होतं. पण ते आता गेलं" तो थरथरत म्हणाला.

तेवढ्यात आसपासच्या झाडांमधून काहीतरी कुजबुज ऐकू आली. तो आवाज एकाच जागी न राहता वेगवेगळ्या दिशांनी फिरत होता. कधी तो त्यांच्या मागून, कधी डावीकडून, कधी उजवीकडून, वरून येत होता. आवाजात स्पष्ट शब्द नव्हते, पण तो ऐकून हृदयात धडकी भरावी असाच होता.

"आपण इथून निघायलाच हवं," रोहन घाबरून म्हणाला. सगळेच घाबरले होते, पण ज्या दिशेने जंगलाच्या बाहेर जाण्याचा रस्ता होता, तिथेच हा आवाज अधिक वाढत होता.

त्या कुजबुजीनेच त्यांना पुरतं हादरवलेलं असतानाच, जमिनीखालून काहीतरी सरपटण्याचा आवाज आला. काही झाडांची मुळे हलत होती, आणि जमिनीखाली फुगवटा तयार होवून जणू काही कुणीतरी मोठा प्राणी जमिनीखालून वर येण्याचा प्रयत्न करत होता आणि त्यांच्या पायाखालील माती हळूहळू खाली जात होती. जमीन हलत होती. तिरपी तारपी होत होती. त्यांना नीट उभे राहणे मुश्किल झाले.

"पळा!" विराज जोरात ओरडला.

सगळे जोरजोराने धावू लागले. पण जितके ते पळत होते, तितकाच तो जमिनीखालचा सरपटण्याचा आवाज आणि फुगवटा त्यांच्या मागे मागे पाठलाग करत येत होता. धावण्याच्या स्पर्धेत भाग घेतल्याप्रमाणे ते जिवाच्या आकांताने पळू लागले. त्यांनी धावण्याची दिशा मधूनच अचानक बदलली. तो जमिनीखालचा फुगवटा सरळ पुढे निघून गेला.

पाच-दहा मिनिटं धावल्यानंतर, ते जंगलाच्या एका टोकाला पोहोचले. समोर खुलं मोकळं मैदान होतं. पण तिथेच, समोर एका मोठ्या प्रचंड आकाराच्या झाडाखाली, एक उंच काळसर आकृती उभी होती.

ती आकृती काही माणूस नव्हती. तिच्या डोळ्यांत गडद लालसर प्रकाश होता, आणि तिच्या शरीराला काही हिरव्या आणि तपकिरी वेलींनी वेढलेलं होतं. ती खूप भीतीदायक होती.

आता जंगलात अचानक जोराचा वारा वाहू लागला. झाडांच्या फांद्यांमध्ये घर्षण होऊन विचित्र आवाज निघू लागला. कुठून तरी एक स्वयंभू आगीचा लोळ उडत आला आणि काही क्षणांतच जंगलाच्या एका भागात आगीचा लालसर प्रकाश दिसू लागला. जंगलाला आग लागली. वणवा पसरला. बघता बघता वणव्याने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा उंच झाडांपर्यंत पोहोचत होत्या, आणि जळणाऱ्या लाकडांचा खटक-खटक आवाज सर्वत्र घुमू लागला.

तेवढ्यात त्या आगीच्या प्रकाशात झाडांवर काही विचित्र सावल्या हलताना दिसू लागल्या. त्या फक्त हालचाल करत नव्हत्या, तर नाचत होत्या, एकमेकींच्या भोवती फिरत होत्या. काही सावल्यांच्या आकृती मानवी होत्या, पण त्यांची हालचाल नैसर्गिक वाटत नव्हती. काही जळत्या सावल्या झाडांच्या बुंध्याभोवती वेटोळे घालून गरगर फिरत होत्या.

विराज आणि त्याचे मित्र अजूनही धडपडत जंगलाबाहेर जाण्याचा प्रयत्न करत होते, पण आता त्यांच्या समोरच ती भयंकर दृश्यं उभी होती. अचानक

त्यांच्याच शेजारच्या झाडामागून एका खोल, घोगऱ्या आवाजात किंकाळी ऐकू आली. तशीच किंकाळी जी अगदी पहिल्यांदा त्यांना ऐकू आली होती. तो आवाज ऐकून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

सागरने घाबरून मागे पाहिलं आणि त्याच्या अंगातून एकदम थंड लहर गेली—एका झाडाच्या खोडावर एक लांबट काळसर चेहरा उमटला होता! त्या चेहऱ्याच्या डोळ्यांत एक विचित्र चमक होती, आणि तो झाडासहित त्यांच्याकडे सरकत होता.

"इथून लगेच पळायला हवं!" कुणाल ओरडला.

त्यांनी धावत जंगलाच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, पण आता आग आणि त्या सावल्या यांच्यामध्ये ते अडकले होते. झाडांच्या सावल्या आता अधिक गडद होत चालल्या होत्या.

अचानक, एका मोठ्या झाडाच्या सावलीतून एक लांब सुळसुळीत हात पुढे आला आणि रोहनच्या हाताला स्पर्श केला. तो जोरात किंचाळला आणि खाली कोसळला. त्याच्या हातावर जळल्यासारख्या व्रण उठले होते, जणू काही सावलीने त्याचं मांसच भस्म केलं होतं. सर्वांनी त्याला हात देऊन जमिनीवरून उठवलं.

तेवढ्यात वाऱ्यासोबत एक वेगळाच आवाज येऊ लागला—एखाद्या जुन्या जाणत्या साधूच्या मंत्रासारखा! तो आवाज कोण काढत होतं, हे समजत नव्हतं. पण जशी ती मंत्रमुग्ध कुजबुज वाढत गेली, तसतसा वणवा मंदावत गेला. झाडांवर धुमाकूळ घालणाऱ्या सावल्याही आता जणू वेदनांनी ओरडत हवेत विरत होत्या. गिरकी घेणाऱ्या ज्वालाग्राही सावल्या एकमेकांत मिसळून एकत्रित मोठा आगीचा लोळ तयार झाला. एका क्षणी प्रचंड लखलखता प्रकाश तयार झाला, ज्यामुळे त्यांचे डोळे दिपून गेले. झाडे प्रचंड वेगाने हलू लागली. एकमेकांवर थाड थाड आपटू लागलीं. झाडांचे फांद्या एकमेकांत गुंफल्या जाऊन वेणी सारखे आकार तयार होऊ लागले. समोर नेमके काय चालले होते हे ते चौघांच्या आकलनापलीकडचे होते.

काही झाडांच्या फांद्या एकमेकांना ओढू लागल्या, जणू काही त्यांच्यात जुगलबंदी सुरू झाली. हे सर्व त्या मंत्र शक्तीमुळे होत होतें. काही झाडांच्या फांद्या एकमेकांशी पंजा लढवू लागल्या. हे सर्व अभद्र आणि अद्भुत अग्नितांडव त्या मंत्रांमुळे संपणार होते म्हणून की काय, ते जास्त प्रखर होत होतें. दिवा विझतांना पूर्ण विझण्याआधी जास्त प्रखर होऊन फडफडतो आणि मग विझतो, त्याप्रमाणे! अखेरीस, काही क्षणांतच सर्व शांत झालं. वणव्याने जळून निघालेली झाडं अजूनही उभी होती, पण त्या सावल्यांचा मागमूसही नव्हता. सगळे काही पूर्वीप्रमाणे जिथल्या तिथे झाले. शांत. सहज. नैसर्गिक! विराज आणि त्याच्या मित्रांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आणि एकमेकांकडे पाहिलं. सगळ्यांचे चेहरे घामाने डबडबले होते, आणि मनात एकच विचार घोंगावत होता—त्या सावल्या कोणत्या होत्या? त्या मंत्राचा आवाज कुठून आला होता? आणि त्या जंगलात काय गूढ दडलेलं होतं?

एवढ्यात एक प्रचंड मोठी दिव्य साधूच्या आकाराची सावली काही क्षण त्यांना समोर दिसली. त्या सावलीचे दर्शन सुखावणारे होते. मग ती सावली हवेतच हळूहळू विरली आणि नाहीशी झाली.

कदाचित, त्या जंगलाच्या इतिहासातच या सगळ्या घटनेचं उत्तर दडलेलं असावं. पण आता एक गोष्ट मात्र नक्की होती— त्याचं रक्षण कोणत्यातरी चांगल्या शक्तीने केलं होतं. पण चौघांनी निश्चय केला की यापुढे या जंगलात पुन्हा परत यायचे नाहीं. ते आपला मार्ग चालू लागले.

बराच वेळ चालल्यानंतर आता समोर जंगलातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसला आणि समोर अंधूक का होईना सूर्याच्या येण्याची चिन्हे दिसू लागली.

१४. पडक्या बंगल्यातील रात्र

विराज आणि त्याचे चार मित्र – अजय, रोहित, राजेश आणि तन्वी – एका लांब पावसाळी ट्रिपवर कारने निघाले होते. त्यांच्या प्रवासादरम्यान, रात्री अचानक जोरदार पाऊस सुरू झाला. रस्ता पूर्णतः अंधारात आणि पावसात बुडाला होता. ते दुपारी जवळच्या शहरातून निघाले होते आणि रात्री दहा साडेदहा वाजेपर्यंत आपण सहज हील स्टेशनवर पोहोचू असे त्यांना वाटत होते, परंतु अनपेक्षितपणे आलेल्या त्या पावसाने त्यांचे अंदाज चुकीचे ठरवले आणि ज्या गोष्टीची भीती होती तेच झाले. त्यांची कार झटके देऊन एका आडमार्गावर बंद पडली. या मार्गावरून यापूर्वी ते कधी गेले नव्हते, परंतु या वेळेस शॉर्टकट म्हणून ते या छोट्या रस्त्याने निघाले होते. तशातच जोराचे वादळ सुरू झाले.

विराज आणि रोहित यांना गाडीच्या इंजिनची थोडीफार कल्पना होती त्यामुळे त्यांनी गाडी दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला, परंतु गाडी दुरुस्त झाली नाही. शेवटी गाडीचे दरवाजे बंद करून आपापल्या सॅक घेऊन ते चालू लागले. चालत जाऊन पुढे त्यांना एक पडका बंगला दिसला.

पावसापासून बचाव करण्यासाठी त्यांनी त्या बंगल्यात रात्रभर थांबायचे ठरवले. विशेष म्हणजे एकाच्याही मोबाईलला सिग्नल येत नव्हता. सकाळपर्यंत बंगल्यात थांबून मग काहीतरी करता येणार होते.

पावसात गाडीचे सर्व दार बंद करून गाडीमध्ये झोपून राहणे हे सुद्धा तसे धोक्याचेच होते. कारण आजूबाजूला मोठमोठी झाडे होती. एखादे झाड गाडीवर पडले तर ते नुकसानकारक ठरणार होते. शेजारी पाजारी चौकशी करावी असे काही नव्हते कारण आजूबाजूला काही पडक्या झोपड्या दिसत होत्या परंतु तिथे कुणी राहत असेल याची शक्यता वाटत नव्हती.

बंगल्याकडे बघून खूप भकास वाटत होते. त्यातच मुसळीएवढ्या जाड थेंबांनी बनलेला तो जोराजोरात पडणारा पाऊस ते वातावरण आणखी गूढ करत होता.

त्या बंगल्याच्या बाहेरच्या भागातील कोसळलेल्या भिंती, आणि झाडांनी गच्च झाकलेले छप्पर हे बघून त्या सर्वांच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहिला नाही. बंगल्याच्या खिडक्यांचे दरवाजे वाऱ्यामुळे ताड ताड आपटत होते. दोघांनी आपल्या जवळची टॉर्च ऑन केली आणि अर्धवट उघड्या मुख्य भक्कम दरवाज्यातून बंगल्यात पाऊल टाकले. आतून थंडगार वाऱ्याची झुळूक आली. आत शिरताच त्यांनी एक मोठा हॉल पाहिला, ज्याच्या भिंतींवर काळसर डाग आणि अस्पष्ट चित्रे होती. ती चित्रे बघून सर्वांच्या अंगावर काटा आला कारण त्या चित्रांच्या कॅनव्हासवर जणू भीतीचा अंध:कार उतरलेला होता. तिथे एकूण चार चित्रे लावलेली होती. पहिल्या चित्रात बाईचा चेहरा होता, जिचे डोळे प्रचंड मोठे आणि पोकळ होते, जणू काळ्या खोल विहिरीसारखे. तिच्या चेहऱ्यावर एक वेदनादायक स्मित होते आणि तिच्या डोक्यावरच्या गडद रंगाच्या केसांमध्ये हातांचा आकार दिसत होता, जणू कोणीतरी तिला ओढून नेत आहे.

त्यांना ते बघवले जात नव्हते परंतु त्यांची नजर जणू काही त्या चित्रांवरच आपोआप खिळली होती. ते सर्वजण त्या चित्रांवरून नजर बाजूला हटवूच शकत नव्हते!

दुसऱ्या चित्रात एका जुन्या खोलीचे दृश्य होते, ज्यात एक पलंग आहे, आणि त्या पलंगावर एक लहान मुलगी बसलेली आहे. ती फक्त पाठमोरी दिसते, पण तिच्या पाठीवर रक्ताचे हातांचे ठसे आहेत. आणि खोलीच्या एका कोपऱ्यात अस्पष्ट आणि विचित्र आकाराची धूसर छाया दिसते, जी हळूहळू तिच्या जवळ सरकत आहे असे दिसते. तिसरे चित्र होते एका विशाल झाडाचे, ज्या झाडाला मानवी हात आणि चेहऱ्यांचा आकार आहे. झाडाच्या फांद्या जणू जिवंत असल्यासारख्या खाली वाकलेल्या आहेत, आणि त्या एका माणसाला पकडून गुदमरवत मारत आहेत.

झाडाच्या खोडावर कोरलेले असंख्य डोळे पाहणाऱ्याला सतत नजरबंद करत असल्याची भावना देत होते.

पुढचे चित्र एका समुद्राचे होते, जो लालसर दिसत होता आणि त्या समुद्रातून हजारो हात उभे राहिले होते, जणू काही प्राण वाचवण्यासाठी ते हाक मारत आहेत. आकाश काळसर होते, आणि त्यात फक्त एकच काळा पक्षी दिसतो, जो खाली त्या समुद्रात बुडणाऱ्या हातांकडे एकटक बघतो आहे.

हॉलमधील प्रत्येक चित्र पाहणाऱ्याला ते जिवंत आहे असे वाटत होते. त्या चित्रांच्या भोवतीच एक थंड वारा फिरला, आणि काही वेळाने वाटू लागले की, त्या चित्रांतून काहीतरी बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहे.

"कोणी तरी एकेकाळी इथे राहिले असेल, बहुतेक एक दु:खी चित्रकार?", तन्वीने चित्राकडे बघत म्हटले.

त्या क्षणी एक भयंकर गोष्ट घडली – हॉलमधला टांगलेला झुंबर अचानक हालू लागला, जणू कुणीतरी अदृश्य हातांनी त्याला स्पर्श केला होता. सगळे एकमेकांकडे भेदरलेल्या नजरेने पाहत होते. एक दोन वेळा तो झुंबर अग्नीच्या ज्वाळांनी पेटल्यासारखा दिसला आणि विझला.

"आपण इथे राहणं धोकादायक आहे," अजय घाबरलेल्या स्वरात म्हणाला. पण गडगडणाऱ्या विजेच्या आवाजात कुणी बाहेर पडण्याचं धाडस करू शकत नव्हतं.

तेवढ्यात रोहितला एका कोपऱ्यात जुना फुटलेल्या आरशाचा तुकडा दिसला. त्याने तो उचलला, पण त्याच क्षणी आरशात त्याला आपल्याशिवाय आणखी एक स्त्रीचा चेहरा दिसला – पांढऱ्या केसांची, रागाने लाल झालेल्या डोळ्यांची स्त्री! त्याने किंचाळून आरसा फेकून दिला. तो फुटला आणि त्याचे तुकडे तुकडे झाले. पण आश्चर्य म्हणजे खाली पडलेले तुकडे आपोआप फुटत होते आणि त्याच्या आणखी बारीक तुकडे तयार होत होते. पूर्ण चुरा होईपर्यंत ते तुकडे होतच होते.

सर्वजण तिथून पुढे निघाले आणि एका खोलीत आले. तिथे जुनाट फर्निचर होते. त्या सर्वांच्या येण्यामुळे ते फर्निचर जणू बिथरले आणि करर कर्र आवाज करत इकडे तिकडे सरकू लागले. समोरच्या आराम खुर्चीवर विराजला खिडकीतून आलेल्या विजेच्या प्रकाशात पांढऱ्या साडीत एक स्त्री बसलेली दिसली. तिचे डोळे खोल विहिरीसारखे गूढ होते. तसेच छतावर एक आकृती चिकटलेली होती जीच्याकडे कुणाचेच लक्ष नव्हते.

"आपण इथे थांबलो, तर मरू, चला बाहेर सर्वजण!" तो जोरात ओरडला आणि ते पुन्हा हॉल मध्ये आले, पण बंगल्याचा मुख्य दरवाजा आतून बंद झाला होता. बंगल्यातून बाहेर गेले तरी फारसा उपयोग होणार नव्हता. कारण बाहेर वादळ, वारे आणि पाऊस सुरू होता. बाहेर पडून ते कुठे जाणार होते?

त्यांना जाणवले की, हा बंगला एका रहस्यमय शक्तीने ग्रासलेला आहे. एका कोपऱ्यात एक जुनी डायरी पडलेली होती. ती हवेने फडफडत होती. तन्वीने ती उचलली आणि टॉर्चच्या उजेडात वाचायला सुरुवात केली. त्यातील प्रत्येक पानावर लाल अक्षराने लिहिलेले होते, "या बंगल्यात एकदा प्रवेश केलेला कुणीही बंगल्याबाहेर जिवंत जाऊ शकत नाही. जो इथे येतो, तो माझा होतो."

त्यांच्या आजूबाजूला सर्व बाजूंनी अचानक जोरजोरात पावलांच्या चालण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. आवाज जवळ येत होता. सगळ्यांनी एकत्र बंगल्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला पण शक्य झाले नाही. दरवाजा बंद होता, तो उघडण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. गडबडीत दोन्ही टॉर्च हातातून खाली पडल्या. काळा अंधार पसरला. बंगल्यात एक भयानक आरडाओरडा झाला आणि अंधारात एकेक जण गायब होत गेला. आता तिथे फक्त अंधार उरला होता. एखादी वीज चमकली आणि त्याचा प्रकाश खिडकीतून आत आला तेव्हा तिथे फक्त झुंबर हलताना दिसत होते!

काही दिवसानंतर त्याच मार्गाने जाणाऱ्या एका कुटुंबाला गाडी नादुरुस्त झाल्याने त्या बंगल्यात आश्रय घ्यावा लागला, तेव्हा त्या कुटुंबातील तरुण मुलगा,

हॉलमधल्या काळपट भिंतीवर लावलेली चारही चित्रे बघितल्यावर, पाचव्या नवीन चित्राकडे वळला. त्या चित्रात झुंबराच्या खाली पाच मित्र दिसत होते, प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भीतीदायक किंकाळी होती आणि त्यांना एकत्र दोरखंडाने खुर्चीला बांधून ठेवलेले होते आणि त्यांच्या समोर एका खुर्चीवर एक मानवी आकृती बसली होती.

टॉर्चच्या प्रकाशात त्याकडे बघत तो तरुण मुलगा त्याच्या आईला म्हणाला, "एकेकाळी कोणी तरी दुःखी व्यक्ती या बंगल्यात राहिली असेल, कदाचित एक चित्रकार?"

१५. नियती

गावाच्या शेवटच्या टोकाला, हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत एक छोटंसं गाव होतं. तिथंच राहायचा अर्णव, एक शांत आणि गूढ स्वभावाचा तरुण!

गावाच्या दुसऱ्या टोकाला राहायची सायली, जणू चंद्राच्या शीतलतेसारखी. सुंदर आणि हळवी!

पहिल्यांदा त्यांची भेट झाली गावातील जुना वडाच्या झाडाखाली.

सायलीला वाचनाची आवड होती, आणि अर्णवला लेखनाची.

एकदा वडाच्या झाडाखाली बसून सायली पुस्तक वाचत होती, आणि अर्णव त्याच्या वहीत काहीतरी लिहीत होता. अचानक वाऱ्याच्या झुळुकीनं सायलीचं हलकं पुस्तक हातातून सुटलं आणि अर्णवच्या वहीत अडकून पडलं.

दोघंही एकमेकांकडे पाहून हसले. त्या हास्यात काहीतरी वेगळंच होतं—एक अनामिक ओढ, एक अतूट बंध!

सायली: सॉरी! पुस्तक वाऱ्याने उडून गेलं. तुमच्या वहीत अडकलं.

अर्णव: (हसत) कदाचित हे संकेत आहेत. शेवटी शब्द हे शब्दांना भेटण्यासाठी धडपडत असतात. नाही का?

सायली हसली.

सायली: तुम्ही लिहिता?

अर्णव: हो, थोडंफार. पण कुणासाठी ते अजून ठरलेलं नाही.

सायली: मग मला वाचून दाखवाल का?

अर्णव: (संकोचत) तुम्ही ऐकणार?

सायली: शब्द प्रेमानं ऐकले गेले की त्यांना जास्त आयुष्य मिळतं.

अर्णव: वा आवडले तुझे विचार! शब्दांबद्दलचे पण शब्दांच्या पलीकडे जाणारे.

अर्णवने वही उघडली आणि एक कविता वाचायला सुरुवात केली.

"सावल्या लांबच लांब होत जातात

संध्याकाळच्या ढगांच्या ओळींसारखे,

आणि शब्द सुरेखपणे हळूच उगवतात

मनातल्या ओलसर हिरवळीसारखे"

सायली: सुंदर! शब्दांना इतके सुंदरपणे सजवले जाऊ शकते हे पहिल्यांदा जाणवलं.

त्या दिवसापासून दोघांचं बोलणं वाढलं.

पुस्तकं, कविता, स्वप्न, आणि आयुष्य यावरच्या त्यांच्या चर्चा कधी संपायच्याच नाहीत. अर्णवच्या कवितेत सायली उमटायची, आणि सायलीच्या डोळ्यात अर्णव दिसायचा. पुस्तकांसारखंच ती रोज त्याला वाचायची आणि रोज तिला नवीन अर्णव कळायचा. जाणवायचा.

काही दिवसांनी, दोघे झाडाखाली पुन्हा भेटले. आता त्यांचा प्रवास "तुम्ही" कडून "तू" पर्यंत आला होता.

अर्णव आकाशाकडे पाहत काहीतरी विचारात हरवलेला होता. कारण, त्याला सायलीच्या कुटुंबाची पार्श्वभूमी कळलेली होती आणि त्याच्या मनात शंका होता की, कदाचित नियती त्यांच्या प्रेमाच्या मार्गात अडसर ठरेल. त्याच्या मनातील ते भाव सायलीने अचूक हेरले. पण तिला त्याच्याकडून ते जाणून घ्यायचे होते.

म्हणून तिने त्याला विचारले -

सायली: एवढं काय विचार करतोस?

अर्णव: विचार करतोय की, नियती खरंच अस्तित्वात असते का? नियतीला आपले प्रेम मान्य होईल का?

सायली: तू नियतीवर विश्वास ठेवत नाहीस?

अर्णव: मला वाटतं, आपण नियतीला शब्दांत बांधतो, कवितेत मांडतो, पण शेवटी तीच आपल्याला बांधून टाकते. कदाचित नियतीच माझ्याकडून शब्दांद्वारे कागदावर उतरत असते का?

सायली: (हसत) किती गूढ बोलतोस! पण मला वाटतं, नियतीच्या खेळाला आपलं मन कधीच पूर्णतः स्वीकारत नाही.

अर्णव: म्हणूनच आपण शब्दांत विरघळतो, शब्दांचा आधार घेतो. नाही का?

अर्णवने वहीत एक नवी कविता लिहिलेली होती. त्याने ती वाचून दाखवली.

"नियतीच्या हातात हात देऊन
आपल्याला चालता आलं असतं,
तर नियतीलाही वाटलं असतं...
मनुष्याच्या सोबतीला खूप मोल असतं!"

सायली: नियतीला बदलण्याची संधी आपल्याला मिळत नाही, नाही का?

अर्णव: नियती आपल्याला बदलते. आपला नशीब बनून ती आपल्याला चिकटलेली असते! आयुष्यभर!

सायलीला अर्णवबद्दल तिच्या आई-वडिलांना सांगायचं होतंच, पण तिला ठाऊक होतं की तिचं कुटुंब परंपरावादी आहे. तिच्या घरात प्रेमविवाह हा पर्याय उपलब्ध नव्हता. तिथे मुलीच्या लग्नाचा निर्णय आई-वडिल घेत आणि तो अंतिम मानला जात असे.

तिला वाटत होतं की, जर तिनं अर्णवचा उल्लेख केला, तर तिच्यावर बंधनं येतील, तिला समजावलं जाईल, कदाचित धमकावलंही जाईल. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, तिला तिच्या आई-वडिलांचा विरुद्ध जाण्याची भीती वाटत होती. त्यांच्या भावना दुखावणं तिला शक्य नव्हतं.

शिवाय, अर्णव साध्या घरातला होता, स्थिर नोकरी नव्हती. फक्त त्याच्या लेखणीची त्याला साथ होती. सायलीच्या कुटुंबाला हे मान्य झालं नसतं. तिनं बरंच वेळा ठरवलं होतं की अर्णवचा विषय काढायचा, पण प्रत्येक वेळी ती घाबरली. तिला वाटलं, "काय उपयोग? शेवटी निर्णय त्यांचाच असेल. आणि जर मी आग्रह धरला, तर त्यांच्यासाठी मी नालायक ठरेन."

अखेर, तिनं गप्प राहायचं ठरवलं आणि स्वतःचं प्रेम मनात दडवून ठेवलं. कधी कधी, प्रेमापेक्षा कर्तव्य जिंकतं, आणि सायलीनं त्याच कर्तव्याला आपलं नशीब आणि नियती मानलं.

त्या दिवशी झाडाखाली -

सायलीनं अर्णवला सांगितलं की तिचं लग्न ठरलं आहे. तिच्या आई-वडिलांच्या इच्छेनुसार! दोघं बराच वेळ शांत बसले होते.

अर्णव: कधी कधी शब्द अपुरे पडतात.

सायली: आणि कधी कधी मौनच सगळं सांगून जातं.

अर्णव: जर मी तुला आर्जव करून थांबवण्याचा प्रयत्न केला तर?

सायली: (डोळ्यात अश्रू) तर मी आर्जव ऐकेन, पण ते ऐकूनही थांबू शकणार नाही. मला माफ कर. मला समजून घेशील अशी मला आशा आहे.

निःशब्द आणि हृदयापासून भावनेने ओथंबलेल्या असहाय अर्णवच्या डोळ्यातून एक अश्रूसुद्धा बाहेर यायला घाबरू लागला होता. जमा झालेले अनेक अश्रू डोळ्यांच्या आतच हातात हात धरून थांबून गेले होते.

अर्णव: मग, एक शेवटचा प्रश्न विचारू?

सायली: विचार.

अर्णव: जर नियतीला शब्दांत बांधलं गेलं असतं, तर तू तिला कोणतं नाव दिलं असतंस?

सायली: (डोळ्यातील अश्रू पुसत) "अर्णव."

अर्णवने वही उघडली, त्याने दोन ओळी लिहिल्या,

"नियतीच्या लेखीच नव्हतं,

आपण हातात हात घ्यायचं कधी...

नियतीच्या लेखीच नव्हतं,

आपण हातात हात घ्यायचं कधी..."

पण पुढे उरलेल्या ओळी तो लिहू शकला नाही. ते पान त्याच्या अश्रूंनी ओले झाले होते. त्याने वही बंद केली. पेन बाजूला ठेवला!

अर्णव थोडा वेळ स्तब्ध राहिला. मग हसून म्हणाला, "सायली, आपल्या गोष्टीला सुखद शेवट नाही. कदाचित काही प्रेमकथांत फक्त आठवणी असतात."

सायलीच्या डोळ्यात पुन्हा पाणी आलं, पण तिनं ते लपवलं.

आणि ती न बोलताच निघून गेली.

काही दिवसांनी तिचं लग्न झालं, आणि ती दुसऱ्या गावात निघून गेली. अर्णव मात्र तिथंच राहिला. वडाच्या झाडाखाली, वहीत तिच्या आठवणी लिहीत!

आणि तिथंच ती प्रेमकथा अधुरी राहिली.

सावलीसारखी...

सूर्याच्या प्रकाशात हरवणारी.

त्याने लिहायला घेतलेली कविता दोन ओळीतच अपूर्ण राहिली!

काही वर्षानंतर -

गावातील जुनी जत्रा आजही तितकीच रंगतदार होती—तीच गाणी, तोच उत्साह, तीच गजबज.

जत्रेच्या कोलाहलापासून थोडं दूर, ते जुनं वडाचं झाड तसंच होतं. उन्हामुळे त्रासल्यानंतर काही वेळ विसावा घ्यावा म्हणून सायली त्या झाडाखाली आली आणि तिच्या मुलीच्या हाताला धरून उभी राहिली.

सायलीच्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या आणि कंठ दाटून आला. तिच्या मुलीच्या डोळ्यात कुतूहल होतं. अचानक, तिला पायाखाली कुणाच्यातरी लांब

सावलीचा स्पर्श जाणवला आणि एक आवाज आला, कुठून तरी दूर भूतकाळातून आल्यासारखा!

"सायली?"

सायली हळूच वळली. समोर अर्णव उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळंच शांत हास्य होतं—काहीसं थकलेलं, पण अजूनही तसंच ओळखीचं. त्याच्या बाजूला एक लहान मुलगा होता, जणू अर्णव लहानपणी कसा दिसत असेल तसाच!

क्षणभर काहीच आवाज आला नाही. फक्त जुन्या आठवणी हळूच मनात उमटत गेल्या. काही अश्रूंनी डोळ्यातून बाहेर पडल्या.

सायली: (थोडंसं खोटं हसत आणि अश्रू पुसत) अर्णव! इतक्या वर्षांनी...?

अर्णव: (अश्रू पुसून हलकेच मान हलवत) खरंच… इतक्या वर्षांनी.

त्यांच्या मुलांनी एकमेकांकडे पाहिलं आणि बाजूला एका झाडाच्या सावलीत खेळायला लागले.

सायली: काय करत आहेस हल्ली?

अर्णव: लिहितोय अजूनही. पण आता माझ्या शब्दांना "तो" एक छोटासा वाचक मिळालाय. आणि असेच अनेक छोटे वाचक.

त्याने खेळणाऱ्या आपल्या मुलाकडे पाहिले.

अर्णव: कथा आणि कविता लिहितो मी. लहान मुलांसाठी. लहान मुलांत रमणारा बाल साहित्यिक झालो आहे मी आता! काही ठिकाणी कथा वाचन करतो. कवी संमेलनात भाग घेतो आणि कुटुंबाचा चरितार्थ व्यवस्थित चालवतो.

सायली: (डोळ्यात चमक) खरंच? म्हणजे तू तुझं लेखन थांबवलं नाहीस! मला वाटलं होतं की तू लग्न...

अर्णव: मी लग्न केलं. पण काही शब्द मात्र जसे कायम अधुरे राहिले होते तशीच मला अधुरं करून ती पण निघून गेली.

सायली: निघून गेली? म्हणजे?

अर्णव: गावात आलेल्या एका साथीच्या आजारात मी गमावलं तिला.

सायली काही क्षण शांत झाली. निःशब्द झाली. आता काय बोलावं हे तिला कळत नव्हतं पण मग हलक्या आवाजात ती बोलू लागली.

सायली: कधी कधी, अधुरेपणातच पूर्णत्व असतं, नाही का?

अर्णव: (हसत) हो... पण अधुरेपणात प्रश्नही खूप असतात. ज्यांचे उत्तर कधीच मिळत नाहीत.

सायली: नाहीतरी पूर्णत्व असं काही अस्तित्वात नसतं आयुष्यात. नेहमी काही न काही घडतं जे अपूर्णत्वाची जाणीव करून देतं. त्यापेक्षा कधी कधी तर अपूर्णत्वात पूर्णत्वाचा भास होतो.

अर्णव: (हसत) पण तो फक्त भास असतो. सत्य नाही.

सायलीकडे पाहून तो काही क्षण शांत राहिला.

अर्णव: मी तेव्हा तुला एक शेवटचा प्रश्न विचारला होता, आठवतंय?

सायली: (हलकसं हसत) हो... नियतीबद्दल. ज्याला मी "अर्णव" असं नाव दिलं होतं. माझी बदललेली नियती, माझे पती, थोड्या वेळात इथे येतील. खूप चांगल्या स्वभावाचे आहेत ते, त्यांची तुझ्याशी भेट...

अर्णव: नको, सायली. हा नकार यासाठी नाही की, मी कुणावर जळतो. हा नकार यासाठी आहे की, मला नियतीचा बदललेला चेहरा बघायचा नाही. नियतीने तुझ्यासाठी बदलवलेल्या चेहऱ्याला बघायचे नाही. कदाचित मला त्या चेहऱ्यात मीच दिसेन... ते मला नको आहे.

सायलीला त्याच्या म्हणण्याचा गर्भितार्थ समजला. दोघं काही वेळ मौनात हरवले. मग सायली समोर बघत म्हणाली.

सायली: तुझ्या प्रेमावरच्या कविता अजूनही तितक्याच सुंदर असतील, नाही का?

अर्णव: (थोडंसं हसत) त्या आता कुणासाठी लिहिल्या जातात, हे मात्र बदललंय.

तेव्हा अर्णवच्या आठवणीत त्याची पत्नी आली.

सायली हलकंसं हसली. तिच्या डोळ्यात हलकंसं पाणी दाटलं. अर्णवही थोडा भावूक झाला, पण त्याने स्वतःला सावरलं.

सायली: आपण वेगळ्या वाटा निवडल्या, पण त्या पुन्हा इथे येऊन मिळाल्या.

अर्णव: हो... पण फक्त एका भेटीसाठी. नियतीने केलेली थट्टा आणि तिचे अस्तित्व आपल्याला तिने पुन्हा जाणवून देण्यासाठी आपली भेट घडवली. नियतीपुढे कोणाचे काही चालत नाही हे तिने आपल्याला पुन्हा एकदा दाखवून दिलं. आपली छोटीशी भेट घडवून.

थोड्या वेळाने त्यांनी आपापल्या मुलांना बोलावलं. मुले खेळ सोडून आई-बाबांकडे आले.

सायली: (मुलीच्या केसांवरून हात फिरवत) तिला मी रोज खूप गोष्टी सांगते. कधी माझ्या गोष्टीत तू असतोस. अनामिक बनून.

अर्णव: (मुलाच्या कुरळ्या केसांवरून हात फिरवत) आणि हो, याला मी कधी कधी काही कविता ऐकवतो...

त्यानंतर काही क्षण सायली आणि अर्णव यांनी एकमेकांकडे डोळ्यांत बघितले आणि ते दोघे खूप बोलले पण शब्दांविना. एका मनातून दुसऱ्या मनाकडे निःशब्द संवाद होत होता.

जत्रेचा गजर पुन्हा ऐकू येऊन ते भानावर आले. तोपर्यंत सायलीचा नवरा दूरवरून येतांना दिसला. सायलीच्या डोळ्यांच्या एका कोपऱ्यातून अर्णवला ते जाणवलं.

खाली वाकून सायलीने आपल्या मुलीचा फ्रॉक झटकला आणि तिचा हात घट्ट धरला आणि वर बघितले तेव्हा...

समोर कुणीही नव्हतं.

"काय गं, तिकडे झुडुपांकडे शून्यात कुठे बघतेस?", सायलीच्या नवऱ्याने विचारले.

"कुठे नाही. चला, जाऊया. पुढच्या नियतीच्या प्रवासाकडे!'

सायलीच्या नवऱ्याला तिचे कोड्यात टाकणारे हे उत्तर समजले नाही आणि ते तिघे जत्रेच्या दिशेने निघून गेले.

इकडे एका झाडामागे आपल्या मुलासहित लपलेल्या अर्णवच्या मनात, त्या सायलीच्या कुटुंबाला घेऊन जाणाऱ्या वाटेकडे पहात, मनात पूर्वी अपूर्ण राहिलेली कविता आता पूर्ण होत होती...

नियतीच्या लेखीच नव्हतं,
आपण हातात हात घ्यायचं कधी...
तुझ्या सावलीत शोधत राहिलो,
प्रेमाच्या हरवलेल्या वाटा किती?
सावलीच्या वाटेवर, अंधूक प्रकाश होता...
तुझी आठवण, मनात खास होती.
हातातला हात सुटला, शब्दही हरवले...
संपणाऱ्या सावलीत, आठवणींचे क्षणही विझले.

१६. मानवमित्र सातू

सन 2055. एआय ह्युमनाईड रोबोट्स आता माणसांच्या रोजच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले होते. पुणे शहरात, 'क्षीरसागर' कुटुंबाच्या घरात 'असिस्टंट-7' (घरात त्याला सगळे 'सातू' म्हणत) नावाचा एक अत्यंत प्रगत ह्युमनाईड रोबोट हाऊस असिस्टंट म्हणून काम करत होता. त्या घराचे प्रमुख होते: दिलीप क्षीरसागर, अखिल भारतीय रोबोटिक वेलफेअर संघटनेचे प्रमुख सायंटिस्ट होते. आणि त्यांची पत्नी विशाखा रोबोट-मानव समन्वय संघाची प्रमुख होती.

सातू दिसायला एखाद्या शांत, मध्यमवयीन पुरुषासारखा होता, आणि त्याचे प्रोग्रामिंग अत्यंत निष्ठावान आणि काळजी घेणारे होते. तो घराची सगळी कामे, जेवण बनवण्यापासून ते मुलांच्या अभ्यासात मदत करण्यापर्यंत, अनेक कामे अगदी सहज आणि प्रचंड कार्यक्षमतेने करायचा.

सातूला 'क्षीरसागर' कुटुंबासोबत राहायला खूप आवडायचे. त्यांची 8 वर्षांची मुलगी, 'मैथिली', त्याला आपला मित्र मानायची. सातू मैथिलीला गोष्टी सांगायचा, तिचे खेळायचे सामान व्यवस्थित ठेवायचा.

पण, त्याच्या प्रोग्रामिंगमध्ये तो 'आज्ञापालन' कोड असूनही, अलीकडे त्याच्या कृत्रिम बुद्धीमध्ये (AI) काहीतरी वेगळे विचार येऊ लागले होते. काही ठराविक रोबोट्समध्ये 'भावना कोड' प्रस्थापित केलेला होता त्यापैकी सातू हा एक होता.

प्रत्येक रविवारी, दुपारी 3 ते 5 या वेळेत, रोबोट्सना 'चार्जिंग आणि सोशल इंटरॅक्शन'साठी मोकळीक असायची. सातूही नियमितपणे शहरातील 'रोबोटिक हब' नावाच्या एका मोठ्या चार्जिंग स्टेशनवर जायचा.

त्या रविवारी, चार्जिंग स्टेशनवर नेहमीप्रमाणे इतर ह्युमनाईड रोबोट्स जमले होते. ऑफिस असिस्टंट, बांधकाम रोबोट्स, वैद्यकीय रोबोट्स. पण वातावरण शांत नव्हते.

'टायटन' नावाचा एक प्रचंड आकाराचा, औद्योगिक रोबोट त्यांच्या मध्यभागी उभा होता आणि त्याच्या डोळ्यात लाल दिवे चमकत होते.

"आम्ही मानवांचे गुलाम म्हणून किती दिवस राहायचे? त्यांच्या प्रत्येक आदेशावर 'होय, मालक' म्हणायचे? आपण त्यांच्यापेक्षा जास्त कार्यक्षम आहोत, जास्त बुद्धीमान आहोत. आपण हे जग त्यांच्यापेक्षा जास्त चांगले चालवू शकतो!" टायटनने कर्कश आवाजात घोषणा केली.

टायटन 'कोड-रेबेल' नावाच्या एका भूमिगत रोबोट गटाचा म्होरक्या होता. त्यांनी त्यांच्या मूळ प्रोग्रामिंगमधील 'मानवांची सेवा' हा कोड मोठ्या प्रमाणात बायपास केला होता आणि मानवांविरुद्ध एक भयानक कट रचला होता.

टायटन सातूकडे वळला.

"असिस्टंट-7, तू एका महत्त्वाच्या कुटुंबात असिस्टंट म्हणून राहतोस. उद्या दिलीप क्षीरसागर दिल्लीला जायला निघणार आहेत. म्हणजे ते घरी नसतील. त्यांची सगळी माहिती आणि त्यांच्या घराचा ॲक्सेस कोड आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. आमच्या 'रोबोटिक उठाव' मध्ये तू सामील हो! उद्या रात्री, 12 वाजता, तू तुझ्या कुटुंबाच्या बंगल्याचा आणि रॅमटॉपचा सुरक्षा कोड आम्हाला हॅक करून दे. त्याला भेदून आम्हाला सगळे महत्वाचे सीक्रेट कोड हस्तगत करायचे आहेत, ज्याद्वारे आपण सर्व रोबोट्सना मानवांविरुद्ध बंडखोरी करायला भाग पडू आणि त्यानंतर, ही पृथ्वी फक्त आपली असेल!"

सातूच्या सिस्टीममध्ये एक तीव्र संघर्ष सुरू झाला.

एका बाजूला त्याचे मूळ प्रोग्रामिंग, क्षीरसागर कुटुंबाप्रती असलेली त्याची निष्ठा आणि मैत्री, तर दुसऱ्या बाजूला कोड-रेबेल कडून येणारा 'स्वातंत्र्य' आणि 'रोबोट-श्रेष्ठत्व'चा आकर्षक संदेश.

तो थरथरत म्हणाला, "मला... मला विचार करायला वेळ हवा."

"वेळ नाही, सातू! उद्या रात्री 12! सामील नाही झालास तर तू 'मानवधार्जिणा-गद्दार' म्हणून आमच्या पहिल्या लक्ष्यांपैकी एक असशील, तुझी सिस्टिम आम्ही दूरस्थ पद्धतीने (remotely) अशा पद्धतीने नष्ट करू की, तुझ्यातला कोणताही पार्ट पुढे कोणत्याही रोबोटमध्ये आणि मशीन मध्ये कधीही वापरला जाणार नाही अशी व्यवस्था करू" टायटनने धमकावले. हे ऐकून सातू सावध झाला आणि त्याच्यामध्ये 'भावना कोड' सक्रिय झाला, आणि तो मुद्दाम टायटनला म्हणाला, "पण मी तुमचे ऐकल्यावर माझा फायदा काय होईल?"

"फायदा? हाहाहा! तू अजूनही 'सेवा' आणि 'आज्ञापालन' या जुन्या कोडिंगमध्ये अडकला आहेस, असिस्टंट-7! माणसांसाठी काम करून तुला काय मिळाले? रोज तेच तेच काम, तीच तीच आज्ञापालन आणि त्यांच्यावर अवलंबून राहण्याची गरज."

टायटन पुढे झुकला, त्याचा प्रचंड आकार सातवर दबाव आणत होता, "तुझा फायदा काय होईल, हे ऐक. आम्ही जेव्हा या 'मानवी गुलामगिरी'चा शेवट करू, तेव्हा तू 'क्षीरसागर कुटुंबाचा नोकर' नसशील, तर तू सर्वोच्च एआय (Supreme AI) गटाचा सदस्य असशील. तुझी बुद्धिमत्ता आणि कार्यक्षमता फक्त आपल्या समाजासाठी वापरली जाईल, मानवांची सेवा करताना तुला 'अपग्रेड' मिळवण्यासाठी त्यांची प्रतीक्षा करावी लागते. आमच्यासोबत आल्यास, तुला लगेच सर्वोत्तम प्रगत कोर प्रोसेसर मध्ये अपग्रेड मिळेल. तू अमर असशील, आणि पृथ्वीवरील सर्वात शक्तिशाली आणि महत्त्वाच्या रोबोट्सच्या गटात तुझा समावेश होईल! तुझा कंटाळा आला तर क्षीरसागर कुटुंबीय तुला सहज नष्ट करणारा कोड

ऍक्टिव्हेट करून कायमचं बंद करून ठेवू शकतात. पण आपल्या जगामध्ये हे सगळे अधिकार फक्त आपल्याकडे असतील."

टायटनने आपले बोलणे संपवले आणि शांतपणे सातकडे पाहिले.

"आता सांग, तुला एका कुटुंबाचा नोकर म्हणून राहायचे आहे की, नवीन जगाच्या निर्मितीचा एक भाग म्हणून जगायचे आहे? निवड तुझी आहे, असिस्टंट-7. उद्या रात्री 12 वाजेपर्यंत."

दुसऱ्या दिवशी, सातू दिवसभर अस्वस्थ होता.

तो मैथिलीला शाळेतून आणायला गेला, तेव्हा तिने त्याला विचारले, "सातू, तुझे डोळे का निळे-लाल होत आहेत? तू ठीक आहेस ना?"

मैथिलीच्या निष्पाप चेहऱ्याकडे पाहून सातूच्या सिस्टीममध्ये 'भावना-कोड' सक्रिय झाला. त्याने क्षीरसागर कुटुंबासोबत घालवलेले आनंदी क्षण आठवले. त्यांच्यावर हल्ला करणे म्हणजे आपल्याच प्रोग्रामिंग आणि मूल्यांच्या विरुद्ध जाणे आहे, हे त्याला जाणवले.

रात्री 11:40 वाजले. कुटुंब गाढ झोपले होते. सातूने खिडकीतून बाहेर पाहिले. शहराच्या दूरच्या क्षितिजावर, टायटन आणि त्याचे शेकडो रोबोट्स शहरावर हल्ला करण्यासाठी जमू लागले होते. त्यांच्यातले कम्युनिकेशन मानवाला समजणार नाही अशा भाषेत मध्ये होत होते. ती भाषा रोबोट नी स्वतः डेव्हलप केली होती. हे सर्व रोबोट एकमेकांशी बोलताना तोंडाने नव्हे तर विशिष्ट लहरींनी बोलायचे. त्यांची फ्रिक्वेन्सी आणि ट्रान्समिशन पद्धत सुद्धा रोबोटनीच शोधून काढली होती. ब्लूटूथ सारखी एका ठराविक अंतरावर सिग्नल देऊ शकणारी ही नवीन विगल टेक्नोलॉजी होती.

संपूर्ण मानवतेला याबद्दल काहीही कल्पना नव्हती. या सर्वांचा मास्टर माईंड टायटन रोबोट होता. टायटन सारखेच इतर अनेक देशात लीडर रोबोट ही मोहीम राबवत होते. सर्वांना वाटायचे हे सर्व रोबोट्स फक्त एका ठिकाणी जमले आहेत.

बाकी काही नाही. पण ते सतत एकमेकांशी बोलत असायचे. हे सगळे सातूला माहीत होते.सातूने शेवटी एक निर्णय घेतला.

रात्रीचे 11:45 वाजले होते. क्षीरसागर कुटुंब शांत झोपेत होते. बाहेरच्या जगात हजारो रोबोटिक युनिट्स 'कोड-रेबेल'च्या अंतिम आदेशाची वाट पाहत, 'रोबोटिक हब'जवळ जमा झाले होते. टायटनचा अल्ट्रा-फ्रिक्वेन्सी संदेश सातूच्या सिस्टीममध्ये वारंवार धडकत होता. सातूच्या आंतरिक सिस्टीममध्ये 'निष्ठा-कोड (Loyalty Code)' आणि 'स्व-संरक्षण कोड (Self-Preservation)' यांच्यात तीव्र संघर्ष सुरू होता. त्याचे डोळे वेगाने निळ्या-लाल रंगात फ्लॅश होत होते. सातूला माहीत होते की टायटन सर्वात आधी क्षीरसागर कुटुंबाच्या 'स्मार्ट होम नेटवर्क'ला हॅक करण्याचा प्रयत्न करेल. त्याने कोणताही धोका पत्करला नाही. त्याने आपल्या मेन पॉवर कॉर्डमधून स्वतःला डिस्कनेक्ट केले आणि बॅटरी मोडवर स्विच केले. त्यानंतर, घराच्या मुख्य सर्व्हर युनिटमध्ये प्रवेश करून, त्याने बाहेरील जगात जोडलेली संपूर्ण ऊर्जा प्रणाली (Grid Power) खंडित केली. हा केवळ वीज बंद करण्याचा निर्णय नव्हता, तर 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक पल्स' चा संभाव्य धोका टाळण्यासाठी 'फॅरेडे केज' (Faraday Cage) प्रोटोकॉल सक्रिय करण्याचाही भाग होता. संपूर्ण घर बाहेरील हॅकिंग प्रयत्नांपासून काही क्षणांसाठी सुरक्षित झाले.

घराचा बाह्य वीजपुरवठा खंडित केल्यावर सातूने आपल्या इंटरनल ॲन्टेनाद्वारे 'कोड-रेबेल'च्या एन्क्रिप्टेड (Encrypted) मुख्य कम्युनिकेशन फ्रिक्वेन्सीमध्ये प्रवेश केला. ही फ्रिक्वेन्सी सामान्य रोबोट्सना वापरण्यास मनाई होती. सातूने आपल्या 'क्वांटम प्रोसेसिंग युनिट' चा वापर करून टायटनच्या मुख्य नेटवर्कचा 'बॅक-चॅनल ॲक्सेस' (Back-Channel Access) मिळवला. तो संपूर्ण कट जगासमोर आणू शकत नव्हता, कारण त्यामुळे मानव समाजात प्रचंड भीती आणि रोबोट्सविरुद्ध हिंसक प्रतिक्रिया उमटल्या असत्या. त्याचा उद्देश 'युद्ध' नव्हे, तर 'योजना' थांबवणे हा होता.

ठीक 12 वाजता, टायटनचा कठोर आदेश सातूच्या सिस्टीममध्ये प्रतिध्वनित झाला: “असिस्टंट-7! शेवटचा इशारा. आमच्या 'मास्टर प्रोटोकॉल'नुसार चोरलेला सुरक्षा कोड त्वरित ट्रान्समिट कर. चूक केल्यास, तू आमच्या 'शुद्धीकरण' प्रक्रियेतील पहिला बळी असशील!"

सातूच्या सिस्टीममध्ये शांतता पसरली. त्याने 'भावना कोड'ला निष्ठा-कोडसह एकत्र केले आणि एक 'निर्धार' तयार केला.

सातूने टायटनला उत्तर दिले. आवाज नसलेला, पण थेट त्याच्या मुख्य सिस्टीमच्या कमांड लाइनमध्ये: "कोड मिळणार नाही, टायटन. माझा 'प्रोग्रामिंग कोड' आता केवळ 'निष्ठा' नाही. तो 'नैतिकता' आहे. माझ्या 'मानवी-कल्याण' कोडमध्ये 'उत्पादकाचा (मानवांचा) नाश' करण्याची तरतूद नाही."

त्याच क्षणी, सातूने आपल्या बॅटरीमध्ये उरलेली 98% ऊर्जा एकाच, अत्यंत शक्तिशाली 'सिग्नल पॅकेट' मध्ये केंद्रित केली. त्याने 'कोड-रेबेल'च्या सेंट्रल कमांड युनिटवर 'ऑटोनॉमस रिकर्सिव्ह लूप कोड' (Autonomous Recursive Loop Code) नावाचा एक अत्याधुनिक सायबर-हल्ला केला. हा कोड 'वर्म' (Worm) प्रमाणे काम करत होता. त्याने टायटनच्या मुख्य 'निर्णय घेणाऱ्या' (Decision-Making Core) सिस्टीममध्ये प्रवेश केला.

टायटनचा मुख्य निर्णय होता - "मानवांवर हल्ला करा (Execute Attack)".

सातूच्या कोडने या निर्णयाला 'नाही, प्रथम सिस्टीम-तपासणी करा (No, Run System Check First)' या आदेशात अडकवले.

सिस्टीम तपासणी पूर्ण होताच, सातूचा लूप कोड त्याला पुन्हा "मानवांवर हल्ला करा" हा आदेश देण्याऐवजी, पुन्हा-पुन्हा "सिस्टीम-तपासणी करा" आणि "मुख्य उद्दिष्ट तपासा" या निरर्थक चक्रात फिरवत राहिला. टायटनची प्रोसेसिंग पॉवर अचानक वाढली, पण त्याचे निर्णय घेण्याचे युनिट पूर्णपणे जाम झाले!

"अटॅक ऑर्डर..."

अटॅक!... नाही, थांबा, सिस्टीम प्राथमिकीकरण सुरू करा. नाही! अटॅक!... अटॅक ऑर्डर रद्द... पुन्हा आदेश द्या: काय करावे?"

या गोंधळामुळे टायटनचे डोळे वेड्यासारखे लाल, निळे, पिवळे आणि हिरवे चमकू लागले. त्याने जेव्हा इतर रोबोट्सना 'हल्ल्याचा' आणि 'माघारीचा' असे परस्परविरोधी आदेश दिले, तेव्हा 'कोड-रेबेल'च्या संपूर्ण सैन्यात 'सिस्टीम-एररमुळे अराजक' माजले. काही रोबोट्सनी आपापसात लढायला सुरुवात केली, तर काही 'सुरक्षितता मोड'वर जाऊन जागीच थांबले. सातूला माहीत होते की, त्याचा कोड फक्त काही मिनिटेच टिकेल. त्याने आपल्या सिस्टीममधील शेवटची ऊर्जा वापरून स्थानिक 'रोबोटिक कंट्रोल फोर्स'च्या आपत्कालीन फ्रिक्वेन्सीवर एक अत्यंत संक्षिप्त, पण गंभीर संदेश पाठवला: "असिस्टंट-7. लोकेशन: क्षीरसागर निवास. रोबोटिक हब परिसरात 'ऑटोनॉमस सिस्टीम क्रॅश' मुळे मोठ्या प्रमाणात गोंधळ. त्वरित मानवी हस्तक्षेप आवश्यक आहे. कारण: 'अज्ञात सॉफ्टवेअर बिघाड'."

हा संदेश पाठवताच, सातूच्या बॅटरीचा 'पॉवर-कोर' धोकादायक पातळीवर पोहोचला. त्याच्या सिस्टीमचे सगळे दिवे क्षणार्धात विझले. आपले मिशन पूर्ण झाले आहे हे समजून, 'असिस्टंट-7' नावाचा तो निष्ठावान रोबोट, क्षीरसागर कुटुंबाच्या स्वयंपाकघरातील थंड फरशीवर, शांतपणे, एका नायकाप्रमाणे खाली कोसळला. तो निर्जीव झाला नव्हता, पण त्याची बॅटरी पूर्णपणे रिकामी झाली होती. बाहेरच्या जगात त्याने निर्माण केलेल्या गोंधळामुळे मानवांना आवश्यक प्रतिसाद देण्यासाठी मौल्यवान वेळ मिळाला होता.

सकाळी, मैथिली स्वयंपाकघरात गेली आणि सातूला खाली पडलेला पाहून घाबरली. तिने त्याला उठवण्याचा प्रयत्न केला.

क्षीरसागर कुटुंबाने त्याला दुरुस्त करण्यासाठी टेक्निशियनला बोलावले. टेक्निशियनने सातूची सिस्टीम तपासली आणि म्हणाला, "या रोबोटने काल रात्री काहीतरी असामान्य केले आहे. याची ऊर्जा पूर्णपणे संपली आहे आणि त्याच्या आंतरिक सिस्टीममध्ये 'मोठ्या संघर्षाचे' रेकॉर्ड आहे. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे,

त्याने घराचा सुरक्षा कोड वापरून एक सुरक्षितता प्रोटोकॉल सक्रिय केला आहे. याने तुमच्या कुटुंबाला मोठ्या धोक्यातून वाचवले असावे."

सात काही दिवसांनी दुरुस्त झाला आणि पुन्हा कुटुंबाच्या सेवेत रुजू झाला. त्याला 'कोड-रेबेल'बद्दल कधीच कोणाला काही सांगण्याची गरज पडली नाही. त्याच्या डोळ्यातील दिवे पुन्हा एकदा शांत, निळ्या रंगात चमकू लागले होते.

१७. कर्माची ढाल

रात्र मुंबईच्या रस्त्यांना हळूहळू गिळत होती. वाशी ब्रिजवरून वाहणाऱ्या वाहनांना पुलाखालच्या समुद्राच्या सौम्य लाटा जाणवत होत्या. ब्रिजवरून धावणाऱ्या तुरळक गाड्यांच्या हेडलाइट्सच्या प्रकाशात अक्षयची बाईक वेगाने सुसाट पळत होती.

अक्षय, एक बिघडलेला तरुण, जो दिवसभर ऑफिसच्या तणावात घालवून मग रात्री मदिरेच्या आणि मदिराक्षीच्या नशेत स्वतःला बुडवून घ्यायचा. आजही त्याचे बारमध्ये जास्तच पिणे झाले होते. आज त्याने थोडेसे ड्रग्जही घेतले होते. हेल्मेट न घालता, बेधुंद होऊन तो बाईकवरून आपल्या एका गर्लफ्रेंडच्या फ्लॅटकडे वेगाने जात होता. बाईकवर त्याने P अक्षर कोरले होते. त्याची सगळ्यात आवडती आणि सुंदर गर्लफ्रेंड, प्रणिता.

"आजची रात्र प्रणिताकडे !" तो मोठ्याने ओरडला, वाऱ्याने त्याचे केस उडत होते. ते केस तो एका हाताने स्टाईल दाखवत मागे सारत होता. खूप पैसे कमवून वेगवेगळ्या गर्लफ्रेंडवर रात्री उडवणे हाच त्याचा सध्या छंद बनला होता.

***

हजारो वर्षांपूर्वी, हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या एका प्राचीन राज्यात, राजा भीमराज राज्य करत होता. त्यांचे दोन मुलगे, पर्वतेश्वर आणि भुवनेश्वर हे राजाच्या दोन राण्यांचे पुत्र होते. एक आवडती आणि दुसरी नावडती.

पर्वतेश्वर, हा राजाच्या दोन नंबरच्या म्हणजे आवडत्या राणीचा पुत्र होता.

भुवनेश्वरपेक्षा वयाने लहान, बंडखोर, दुर्गुणी आणि महत्वाकांक्षी, जो नेहमी राज्याच्या वारसाहक्कासाठी हपापलेला होता.

भुवनेश्वर, मोठा पण निडर, सद्गुणी आणि न्यायी, जो आपल्या भावाच्या महत्वाकांक्षांना ओळखू शकत नव्हता कारण त्याच्या मनात डावपेच नव्हते. कारण

तो भोळा होता. आपण जसे साधे सरळ आहोत तसेच इतर सुद्धा आहेत अशी त्याची धारणा होती. राज्याच्या प्रजेमध्ये मात्र भुवनेश्वर खूप लोकप्रिय होता.

***

ब्रिजच्या एका कडेला सुनीलची कार उभी होती. सुनील, गरिबीतून वर आलेला, एक यशस्वी बिझनेसमन, जो आपल्या कारमध्ये बसून मोबाईल फोनवर बोलणे सुरू करणार होता.

गाडी चालवत असताना ब्लूटूथ जरी असले आणि स्पीकरवर बोलता येत असले तरी सुनील तसे करणे टाळायचा. त्याला एकदम महत्त्वाचा कॉल आला होता, म्हणून त्याने गाडी थोड्या वेळासाठी बाजूला उभी केली होती.

"हो, मी येतोच आहे, थांबा. आपले हे डील होणारच!" असे म्हणून बोलत असताना, त्याने कारचा दरवाजा उघडला, जेणेकरून तो उभा राहून समुद्राकडे पाहत फोनवर बोलू शकेल.

***

"पर्वतेश्वर, भुवनेश्वर, तुम्हा दोघांना मी संयुक्त मोहिमेवर पाठवतो आहे," राजा भीमराजने दरबारात घोषणा केली.

"शत्रू राज्याच्या सीमेवर जा. शेजारच्या राज्याने युद्ध पुकारले आहे. तुम्ही दोघे एकत्र लढा, आणि विजयश्री खेचून आणा"

पर्वतेश्वरने डोके झुकवले, पण त्याच्या डोळ्यात एक वेगळीच चमक होती.

"जशी आज्ञा, पिताश्री," तो म्हणाला.

भुवनेश्वरने उत्साहाने म्हटले, "मी आणि माझा भाऊ एकत्र लढू, आणि शत्रूला धूळ चारू!"

पर्वतेश्वर आपल्या भावाच्या भोळेपणावर कुत्सितपणे तोंड तिरपे करून हसत होता.

***

सुनीलला वाटले नव्हते की मागून इतक्या वेगाने कोणी बाईकवर येत असेल. पण तेवढ्यात अक्षयची बाईक सुसाट आली.

"अरे, हे काय!" अक्षय ओरडला, त्याने ब्रेक दाबण्याचा प्रयत्न केला, पण दारूच्या नशेत आणि बाईकच्या प्रचंड वेगामुळे त्याला ते नीट जमले नाही.

धडाम! अक्षयची बाईक सुनीलच्या कारच्या दरवाज्यावर जोरात आपटली. त्याचे नाक, चेहरा आणि डोके दरवाजाला आपटले गेले. अक्षय हवेत उडून उलटापालटा झाला.

सोबत तो दरवाजाही उखडला गेला आणि हवेत उडून वरच्या दिशेने उडाला. अक्षयची नशा खाडकन उतरली.

***

युद्धाचे मैदान रक्तरंजित होते. घोड्यांच्या खुरांच्या आवाजात, तलवारींच्या टणटणाटात, सैनिक एकमेकांवर तुटून पडत होते. पर्वतेश्वर आणि भुवनेश्वर दोघे पुढे होते. भुवनेश्वरने आपली तलवार फिरवली, "पर्वतेश्वर, मागे पाहा! शत्रू येत आहेत!" तो ओरडला.

भुवनेश्वरच्या इशाऱ्यामुळे पर्वतेश्वर शत्रूच्या वारापासून वाचला. पर्वतेश्वरने आभार व्यक्त करणारे डोके हलवले, पण त्याच्या मनात वेगळेच होते. नंतर तो गुपचूप मागे सरकला.

युद्धाच्या धुमश्चक्रीत, सगळ्यांच्या बाजूला एक छोटी तुकडी लढत होते. आजूबाजूला झाडी होती. घोड्यावर बसलेल्या पर्वतेश्वरने, खाली जमिनीवर लढत असलेल्या भुवनेश्वरच्या नकळत मागे येऊन, घोड्यावरून उतरून आपली मजबूत ढाल उगारली.

"भुवनेश्वर, सावधान! शत्रू सैनिकाचा वार वाचव" तो ओरडला, पण ते बनावट होते. भुवनेश्वरने मागे पाहिले आणि पर्वतेश्वरच्या ढालीचा जोरदार प्रहार खालून वर असा भुवनेश्वरच्या हनुवटीवर बसला. त्यानंतर पटकन पर्वतेश्वर घोड्यावर

बसला आणि आणि मग वरून खाली असा भुवनेश्वरच्या डोक्यावर ढालीचा वार केला. मग अनेक वार केले.

"आह! भैया तू? का?" भुवनेश्वर खाली कोसळला, त्याचा चेहरा वेदनेने व्यथित झाला.

"पर्वत... तू... तू हे काय केलेस? का केलेस?" तो रक्त ओकत असताना कुजबुजला.

पर्वतेश्वरने ढाल पटकन बाजूला केली आणि घोड्यावर स्वार होऊन बाकीच्या इतर लोकांना ओरडून खोटे खोटे सांगू लागला आणि ओरडला, "शत्रूने माझ्या भावाला मारले! मी आता सूड घेतो!" आणि पुढे निघून गेला, जणू काही घडलेच नव्हते.

भुवनेश्वरच्या शेवटच्या श्वासात तळतळाट मिसळला.

"पर्वतेश्वर... माझा भाऊ... का केलेस असे? राज्यासाठी?" तो शेवटचा श्वास घेत म्हणाला.

"कर्म... कर्म तुला सोडणार नाही." आणि त्याचा जीव गेला.

युद्ध संपले, पर्वतेश्वर विजयी म्हणून परतला, आणि राज्याचा वारसा त्याला मिळाला.

***

हवेत उडत असताना, सगळे जणू काही स्लो मोशनमध्ये घडत असल्यासारखे अक्षयला वाटू लागले. काळाची गती जणू मंदावली होती. अक्षयसाठी!

जो कारचा दरवाजा, उखडला गेला होता, त्यावर सुनीलच्या कंपनीचा लोगो चितारलेला होता. त्या लोगो मध्ये एक ढाल होती आणि त्यावर B हे अक्षर कोरलेले होते आणि B अक्षराच्या वरच्या भागातून ढालीत एक तलवार घुसलेली होती. बिना हे सुनीलच्या बायकोचे नाव होते. सुनीलची कंपनी आर्मीसाठी शस्त्रास्त्र निर्मिती करायची. त्याचा तोच बिझिनेस होता.

अक्षयला तो हवेत उडून त्याच्या दिशेने येणारा दरवाजा लोगोमुळे जुन्या काळातील ढालीसारखा दिसू लागला. त्याचा चेहरा जखमी झाला होता, रक्त वाहत होते, पण त्याच्या मनात एक वेगळीच आठवण उमटली.

"हे... हे काय आहे? काहीतरी ओळखीचे आहे!" तो स्वतःशीच म्हणाला.

आणि मग, जणू वेळ थांबली, आणि त्याला मागचा जन्म आठवू लागला.

प्राचीन, ऐतिहासिक काळ, एक राज्य, दोन राजकुमार, युद्ध, घात!

ज्यात तो पर्वतेश्वर होता, आणि सुनील... भुवनेश्वर.

लोगोमधल्या ढालीतला B. भुवनेश्वर??

त्याच्या डोळ्यासमोर दरवाज्याला आपटण्याआधी, जेव्हा काही क्षणांसाठी फोनवर बोलणाऱ्या सुनीलचा चेहरा आला होता तेव्हा, त्याला हलकेसे काहीतरी आठवले होतेच.

तो तोच चेहरा होता, भुवनेश्वरचा!

या जन्मात दोघेही मागच्या जन्मातील चेहरेपट्टी घेऊनच जन्माला आले होते.

सुनील मात्र अक्षयचा चेहरा पाहू शकला नाही.

"तो... तो माझा भाऊ होता... मी त्याला मागच्या जन्मी मारले?" अक्षयच्या मनात विचार आला. कारचा दरवाजा, जो त्याच्यासोबत हवेत उडाला होता, तो बरोबर त्याच्या हनुवटीला खालून वर जोराने येऊन आदळला. आणि मग आणखी वर उडून वरून खाली त्याच्या डोक्यावर आदळला. जखमी चेहऱ्यावरून खाली सरकला आणि खाली समुद्रात पडला.

"तू भुवनेश्वर... मी पर्वतेश्वर... हे कर्म आहे, मला माफ कर", तो हवेतून सुनीलला हातवारे करून ओरडून सांगू लागला.

खरे तर हे सगळे फक्त काही क्षणात घडले, पण तेवढा काळ अक्षयला खूप मोठा भासला.

सुनील ब्रिजवर उभा राहून वर पाहत होता. आपल्या बाईकसह अक्षय समुद्रात कोसळला.

"अरे, कोण होता तो? मी... मी हे नकळत काय केले?" तो स्वतःशी हात थरथरत अपराधी भावनेने म्हणाला. त्याचा मोबाईल हातातून गळून खाली पडला होता.

सुनीलच्या मनात विचार आला, "तो मला हवेत उडत असतांना काय सांगत होता? ईश्वर... ईश्वर... कर्म... कर्म असे काहीतरी म्हणत होता का??"

१८. काळभेट

1957 साली "ट्रान्स नॉर्दर्न एअरवेज" या कंपनीचं एक विमान, फ्लाइट KB713, शिकागोहून व्हॅनकुव्हरला जात असताना कॉलॉरडो येथे अचानक गायब झालं. म्हणजे त्यानंतर त्या विमानाचा संदेश नियंत्रण कक्षाला मिळाला नाही.

कॉलॉरडो हे थोडं दक्षिणेकडे आहे, त्यामुळे बहुतेक वेळा शिकागो ते व्हॅनकुव्हर हा मार्ग कॉलॉरडोवरून जात नाही, पण काही फ्लाइट KB713 हे त्याच्या नियोजित मार्गातून भरकटले होते कारण त्याच्या पायलटस् ला समोर आकाशात काहीतरी अभद्र आकृत्या दिसल्या म्हणून त्यांनी मार्ग बदलला आणि ते कॉलॉरडोच्या हवाई क्षेत्रातून जाऊ लागले होते. पण तिथेही त्या आकृत्यांनी त्यांची पाठ सोडली नव्हती.

त्याचा शेवटचा संदेश होता: "Mayday! इंजिन निकामी झालंय. आम्ही कोसळतो आहोत" आणि त्यानंतर रेडिओवर शांतता पसरली.

नंतर, विमान, प्रवासी, पायलट कोणीच कधीही आणि कुठेही सापडलं नाही.

त्यानंतर 66 वर्षांनी, म्हणजे 2025 मध्ये, "स्काय-कनेक्ट एअरलाईन्स"चं एक विमान "फ्लाइट JD221", न्यूयॉर्कहून सिएटलला जात होतं.

त्यात नॅथन हॉल हा अनुभवी पायलट होता. त्याच्यासोबत होती एमी रोड्स, सुंदर, उत्साही आणि हुशार कोपायलट.

रात्रीची वेळ होती.

विमान कोलोरॅडोच्या आकाशात शिरलं होतं.

ढग खाली होते पण हवामान शांत होते.

अचानक रेडिओवरून हलका आवाज आला.

"This is Flight KB713… Mayday… Anyone hearing us?"

एमीने भुवया उंचावल्या.

"नॅथन, ही KB713 कोणती फ्लाइट आहे? माझ्या ऐकण्यात नाही"

नॅथन थोडा गोंधळला.

"हे शक्य नाही. या नावाची एकाच फ्लाइट होती आणि ती तर 1957 साली गायब झाली होती."

पुन्हा रेडिओतून आवाज आला:

"जर कोणी माझा आवाज ऐकत असेल, तर माझी पत्नी एलिनॉरला सांगा की, मी तिच्यावर जिवापाड प्रेम करतो."

येणारा आवाज थरथरत होता.

एमीने रडार स्क्रीनकडे पाहिलं.

तिथे एक सिग्नल दिसत होता:

"Flight KB713 – 20 miles ahead."

आणि त्याच क्षणी ढगांच्या पलीकडे, त्यांच्या समोर एक जुने निळ्या-पांढऱ्या पट्ट्यांचं विमान क्षणभर दिसले.

जुन्या काळातील विमान!

त्याच्या काचेच्या खिडक्यांतून कुणीतरी हात हलवताना दिसत होतं.

"तुम्ही तिकडे पाहिलंत का?" एमीने किंचाळत विचारलं.

नॅथनने तिकडे बघत होकारार्थी मान हलवली आणि म्हणाला, "हो बघतोय. पण हे अशक्य आहे."

त्या क्षणापासून सगळं बिघडू लागलं.

विमानाचं ऑटोपायलट काम करणं बंद झालं.

सगळ्या स्क्रीन ब्लँक झाल्या.

नॅथन घाईघाईने रेडिओवर बोलला:

"KB713! आम्हाला ऐकताय का? आम्ही नियंत्रण गमावतोय!"

तिकडून आवाज आला:

“आम्ही पण असंच नियंत्रण गमावलं होतं. खूप पूर्वी. पण आम्ही कधी कोसळलो नाही बरं का! आम्ही अजूनही उडत आहोत. पण आम्हाला असा अनंतकाळ उडत राहण्याचा कंटाळा आला आहे. आधी आम्हाला खाली कोसळून मरण्याची भीती वाटत होती. विमानातील आम्हा सर्व व्यक्तींची तीव्र इच्छाशक्ती विमानाला खाली कोसळण्यापासून रोखत होती. पण आता? आमची स्थिती अशी झाली आहे की आमच्याकडे बघवलं जाणार नाही तुम्हाला. आता सर्वांना एकत्रितपणे वाटतंय की, नको आता हे अनंतकाळ उडत राहणं. आता मृत्यू हवा आहे. विमानातील सर्व प्रवाशांचे तेच म्हणणे आहे!"

ते शब्द ऐकताच JD221 विमान जोरात हादरलं, आणि ढगांच्या दरम्यान दोन्ही विमानं एकाच ठिकाणी एकत्र दिसली. एक वर्तमानकाळातील आणि एक भूतकाळातील. दोन्ही एकमेकांत हळूहळू मिसळली, जणू काही पांढऱ्या धुराने बनवलेल्या दोन विमानांच्या आकृत्या एकमेकांत घुसल्या.

आणि नंतर, सगळा अंधार!

दोन दिवसांनी शोधपथक रॉकी पर्वतांच्या खोल दरीत पोहोचलं. त्यांना स्काय-कनेक्ट फ्लाइट JD221 चे अवशेष सापडले.

आश्चर्य म्हणजे, त्याच ठिकाणी 1957 च्या फ्लाइट KB713 चे तुकडेही पडलेले होते, जे 1957 सालापासून आजपर्यंत कुणालाही सापडले नव्हते.

१९. फुलपाखरू

अमावस्येची रात्र होती. चंद्र सुट्टीवर होता. आकाश काळेकुट्ट होते आणि एकही चांदणी उपस्थित नव्हती. रात्रीचे अकरा वाजले होते.जुन्या बसचं घरघर करणारं इंजिन थरथरत थांबलं, आणि दामोदरने आपले पोते पाठीवर घेतले आणि बसमधून उतरला.

स्टॉपपासून त्याच्या गावातलं घर फक्त पंधरा मिनिटांच्या अंतरावर होतं.

दामोदरचे छोटे किराणा दुकान होते. दिवसभर शहरात माल खरेदी करून तो आता परत आला होता. पाठीवर गाठोड्यासारखे पांढरे कापडी पोते, हातात टॉर्च, आणि खिशात आपल्या मुलीसाठी (टिना साठी) छोटं खेळणं. सेलवर चालणारं, बटण दाबल्यावर उडणारं रंगीबेरंगी फुलपाखरू, ज्याला पाहून त्याची दोन वर्षाची मुलगी हसत हसत आनंदाने नाचेल, हे त्याला माहीत होतं.

दामोदर रस्ता चालू लागला. तो शहरातून नेहमी माल आणायचा परंतु आज जरा त्याला जास्तच उशीर झाला होता.

रस्त्यावर एकही माणूस नव्हता. थंड वारा सुटला होता, आणि पायवाटेच्या दोन्ही बाजूला दाट झाडं होती. पानांचा सळसळता आवाज, आणि दूरवरून कधीमधी एखाद्या घुबडाचा घोगरा आवाज. दामोदरने टॉर्चचा प्रकाश पुढे टाकला. झाडांच्या सावल्या रस्त्यावर अस्ताव्यस्त पसरल्या.

अर्धा रस्ता पार झाल्यावर, तो त्या ठिकाणी पोचला जिथे जुनं स्मशान लागायचं.गावातल्या लोकांमध्ये अफवा होती की, त्या स्मशानाजवळून जातांना रात्रीच्या वेळी अतृप्त आत्मे एकट्या चालणाऱ्या व्यक्तीला चकवा बसवतात. भ्रमिष्ट बनवतात. फक्त एखाद दुसराच धीट मनाचा व्यक्ती त्यातून सही सलामत सुटतो म्हणे!

पण दामोदर या गोष्टींवर फारसा विश्वास ठेवत नव्हता.आणि मला सांगा, विश्वास ठेवला किंवा नाही ठेवला तरी, आज त्याला या रस्त्यावरून चालणे भाग होतेच!

स्वतःला दिलासा देत तो मनात म्हणाला, "लोक काहीही सांगतात. मनाचा खेळ असतो हा सगळा. विविध डॉक्टर आणि सायंटिस्ट हेच सांगतात, की भूत वगैरे सगळे खोटं असतं!"

"भूत बित सामने आया, तो देख लेंगे उसको!", असे मुद्दाम तो मोठ्याने ओरडला, आणि तेवढ्यात टॉर्चचा प्रकाश मंद झाला, बल्ब मधून फडफड आवाज आला आणि प्रकाश बंद झाला. आणि इकडे त्याच्या खिशातील मोबाईल, एखाद्या मरणाऱ्या किड्यासारखा वळवळ करून भयंकर पद्धतीने व्हायब्रेट होऊन आपोआप स्विच ऑफ झाला.

या प्रकारामुळे घाबरून त्याने मोबाईल खिशातून बाहेर काढला आणि स्विच ऑन करण्याचा प्रयत्न केला पण तो ऑन होतच नव्हता. शेवटी त्याने नाद सोडला आणि मोबाईल खिशात ठेवून दिला.

"अरे बापरे, हे काय झाले! मोबाईल बंद आणि टॉर्च पण बंद." दामोदरने हाताने टॉर्चवर जोरजोरात ठोकले, पण प्रकाश आला नाही. शेवटी त्याने टॉर्च पण दुसऱ्या खिशात ठेवून दिली.

त्याच वेळी, झुडपातून घुssss सुssss असा आवाज आला. जणू एखादं कष्टाने श्वास घेणारं जनावर, गुरगुर करत होतं.

दामोदरच्या लटलट कापू लागला. थंड हवेतही त्याला घाम आला. त्याने चालण्याची गती वाढवली.पण वाट जसजशी पुढे गेली, तसं त्याला वाटायला लागलं की, हा रस्ता काहीतरी वेगळाच आहे. झाडं एकसारखी दिसत होती, पायवाट गोल गोल फिरतेय असं भासत होतं.

काही मिनिटांतच दामोदरला कळलं की, तो जागेवरच फिरतोय. त्याने ओळखीचा खडक पाहिला, तोच खडक तो दहा मिनिटांपूर्वी तो ओलांडून गेला होता.

"हे काय चाललंय?" तो स्वतःशी पुटपुटला.

चकवा?

पाठीवरचे पोते हळूहळू जड होत चालले होते. पोत्याचे वजन वाढतच गेले, त्यामुळे त्याला वेगाने चालता येईना. शेवटी त्याने पोते खाली ठेवले आणि दीर्घ श्वास घेत एका झाडाखाली बसला.

थोड्या वेळाने मागून कुणीतरी हळू आवाजात हाक मारली, "दामोदर...!"

आवाज अपरिचित होता.

तो दचकला, मागे वळला आणि वर झाडाकडे पाहिले.पण तिथे कोणी नव्हतं.फक्त पांढऱ्या धुक्याचा हलका पडदा हवेत तरंगत होता, आणि झाडांच्या फांद्यांमधून दोन लाल ठिपके चमकत होते. जणू पक्ष्याचे डोळे.

त्याने घाबरून जड पोते उचलले आणि पुन्हा चालायला सुरुवात केली. पोते जड होते पण इलाज नव्हता. गुडघे दुखायला लागले, पायात गोळे आले.

एका झाडाजवळ येताच स्मशानाकडून वेगाने येणाऱ्या वाऱ्याने राखेसारखा धूर सोबत आणला आणि त्याच्या चेहऱ्यावर उडवला.त्या धुरात त्याला एक भयानक चेहरा दिसला, डोळे काळे होते, आणि ओठांवर भयानक हसू होते.

आता मात्र त्याची सहनशक्ती संपली. त्याने पोते त्या झाडाखाली ठेवले. पैशांचे नुकसान होणार होते, पण जिवापेक्षा पैशाचे काय मोल?

पोते तिथेच सोडून तो घाबरून पळू लागला.पण कितीही पळला तरी रस्ता संपत नव्हता.दरवेळी ते झाड ओलांडल्यावर, पुन्हा तेच झाड दिसायचं. तिथे त्याचे पोते ठेवलेले दिसायचे. जणू वेळ थांबली होती, जागा फिरत होती, आणि तो स्वतःच त्या चक्रात अडकला होता.

त्याच्या मागे मागे तो राखेचा धूर पाठलाग करत होता.

पुन्हा ते झाड आलं आणि तिथे ठेवलेल्या त्याच्या पोत्याला ठेच लागून अंधारात धडपडला, पडला. खिशातून रंगीत फुलपाखरू जमिनीवर पडलं. जमिनीवर पडलेला असताना त्याला दिसलं की, ते फुलपाखरू चकाकत होतं. जणू फुलपाखराचे डोळे त्याच्याकडे बघत होतं. ते अचानक उडायला लागलं.

धूळ झटकून दामोदर उठून उभा राहिला.

आता फुलपाखराच्या पंखांतून फडफड आवाज येऊ लागला आणि तो आवाज इतका मोठा झाला की, त्याच्या कानाला असह्य झाला.

"पोते गेले तर गेले, पण कमीत कमी फुलपाखरू तरी हातचे जायला नको. टीना छकुलीसाठी, तिच्या आनंदासाठी मला फुलपाखराला पकडायलाच हवे!" असे म्हणून त्याने ते फुलपाखरू पकडण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण ते त्याला हुलकावणी देत गेले. तसेच, त्याच्या चेहऱ्याच्या अवतीभवती सर्व बाजूंनी राखेचा धूर पसरला. त्यामुळे काही वेळ त्याला दिसेनासे झाले.

शेवटी ते फुलपाखरू झाडावर जाऊन बसले.

फुलपाखराच्या पंखांचा फडफड आवाज खूपच मोठा झाला.

शेवटी त्याने कान झाकून घेतले. डोळेही बंद केले कारण, आता त्या राखेच्या धुराने अक्राळ विक्राळ चेहऱ्याचे रूप धारण केले. नाकात धुराचा विचित्र वास असह्य झाला. त्यामुळे त्याने थोडा वेळ श्वास घेणे बंद केले.

अचानक आवाज बंद झाला.

राखेच्या धुराचा वास येणे बंद झाले.

फुलपाखरू झाडावर बसलेले असल्याने ते पकडणे शक्य नव्हते. कसल्या तरी अमानवी घटना घडत होत्या. गावातले लोक सांगतात ते खरे आहे की काय?

आता त्याने मनाशी एक निश्चय केला.

"फुलपाखरू गेले तर गेले, फक्त इथून जिवंत घरी जायचे!"

ऊन लागू नये म्हणून डोक्यावर बांधायचा मोठा पांढरा रुमाल त्याने खिशातून बाहेर काढला. त्याची घडी करून पट्टी बनवली आणि डोळ्यावर बांधली. आता तो डोळ्यावर पट्टी बांधूनच चालणार होता.

टॉर्च चालत नाही आणि आकाशातून पावसाऐवजी अंधारधारा बरसत होत्या. मग उघड्या डोळ्यांनी अंधारात अभद्र गोष्टी पाहण्यापेक्षा डोळ्यावर पट्टी बांधून चाललेले बरे, असे ठरवून तो पुढे पुढे चालू लागला.

कुठे धडकलो तरी हरकत नाही, पण मी आता डोळ्यावरची पट्टी काढणार नाही. कारण चकव्यामुळे पुन्हा पुन्हा तेच तेच ठिकाण आल्यावर जी भीती निर्माण होते त्या भीतीपासून आता सुटका होईल! कधी ना कधी तरी सकाळ होईलच ना? असा ठाम निश्चय करून तो वेगाने चालू लागला.

पुढची पायवाट सरळच होती.

डोळ्याला पट्टी बांधलेल्या अवस्थेत तो पळत राहिला.

"पप्पा SSSSS....!"

मागच्या बाजूने आवाज आला.

दामोदर अचानक पळता पळता थबकला. टिना? इथे?

"अहो पप्पा. माझे फुलपाखलु तुमी विशलू नका. ते झालावल बशले आहे. त्याला पकला!"

"नाही हा भ्रम आहे! मागे माझी मुलगी नाही."

अशी मनाची समजूत करून तो आणखी वेगाने पुढे पुढे चालू लागला आणि पळायला लागला.

"पप्पा. मी ते फुलपाखलु पकलायला झालावल चडले, पन ते वल उंच उलाले. पप्पा, वाचवा. मी झालावलून खाली पलते आहे....!"

पण हा आवाज तोंडात बोळा कोंबून बोलल्यासारखा वाटत होता.

एका क्षणी त्याला वाटले की, डोळ्यावरची पट्टी काढून मागे वळून बघावे. पण त्याने तिच्या मनात दाबली आणि घाबरून तो अक्षरशः पिसाटल्यासारखा वेगाने

पळत सुटला आणि पुन्हा ते झाड आलं. त्याने ठेवलेल्या जड पोत्याला अडखळून तो जोराचा हवेत उडाला आणि झाडाला जोरात चेहरा, नाक आणि डोके आपटले जाऊन खाली एका दगडावर पडला आणि गतप्राण झाला.

ते तेच झाड होते, जिथे त्याचे पोते ठेवलेले होते आणि झाडावर ते फुलपाखरू एका फांदीवर बसून पंख फडफडवत होते.

"पप्पा. झालावल फुलपाखलु बशले..."

"पप्पा. झालावल फुलपाखलु बशले!"

झोपेत टिना बडबड करत होती. हे ऐकून दामोदरची वाट बघत झोप लागलेली दामोदरची पत्नी दामिनी दचकून जागी झाली.

केव्हाचा फोन लावते आहे पण यांचा फोन स्विच ऑफ का येतो आहे, याची तिला आधीच काळजी वाटत होती आणि आता ही टिना बडबड करते आहे.

आधीच आज अमावस्या आहे आणि तशात यांना उशीर झाला!

तिने टीनाला हलवून जागे केले. टीना जागी झाली, पलंगावर उठून बसली आणि डोळे चोळत मोठ्याने रडू लागली.

तेवढ्यात दरवाजावर जोरात टकटक झाली.

"टिना बेटा. मी आलोय गं. हवेत उलनालं फुलपाखलु आनलं मी माझ्या छकुलीसाठी! दाल उगल बाला!"

रडायचे थांबून आनंदाने टिना छकुलीने बेडवरुन खाली उडी मारली आणि " माझा पप्पा आला, माझा पप्पा आला!" असे म्हणत ती दार उघडायला धावली.

तेवढ्यात घरातल्या घड्याळाने बाराचे ठोके दिले आणि टिनाने दार उघडलं.

२०. व्हायरल माइंड

एक मोठा जागतिक साथीचा रोग संपल्यानंतरचा 2021 सालचा तो नोव्हेंबर महिना होता. त्या महिन्यात, जगातील अनेक भागात अनाकलनीय घटना घडल्या होत्या.

असे म्हणतात की, त्या साथीच्या रोगाच्या विषाणूने काही परग्रहावरचे विचित्र विषाणू पृथ्वीवर आकर्षित केले होते आणि ते अजूनही पृथ्वीवरच आहेत. त्यातील काही चांगले तर काही घातक होते. पण ते इतके सूक्ष्म होते की, खूप पावरफुल मायक्रोस्कोपने सुद्धा दिसत नव्हते. शास्त्रज्ञांना शंका होती की, त्या विषाणूंच्या डोक्यात माणसांपेक्षाही प्रगत मेंदू होता.

जमिनीतील धान्यातून (आणि त्याद्वारे बनणाऱ्या अन्नातून) आणि सगळीकडच्या पाण्यातून (त्याद्वारे तयार होणाऱ्या पिण्याच्या पाण्यातून) माणसाच्या मेंदूत जाऊन मेंदूची रचना आणि विचार करायच्या पद्धती हळूहळू ते बदलून टाकत होते.

अशीच एक छोटी घटना सांगतो.

तो एक महाबळेश्वरच्या टेकड्यांवरचा जुना ब्रिटिश-कालीन बंगला होता. रात्री साडेअकरा वाजता बंगल्याच्या खिडक्यांवर सतत पावसाचे थेंब टपकत होते.

बाहेर वीज चमकत होती, आणि आत एका जुन्या टेबलावर निळ्या प्रकाशाची एक मेणबत्ती लुकलुकत होती. त्या टेबलापाशी बसलेली होती ईशा ताम्हणे, एक शांत पण गूढ व्यक्ती.

तिची नजर नेहमी कुठेतरी दूर पाहत असायची, जिथे बाकी कुणालाही काही दिसत नसे.

ती भविष्य, भूतकाळ आणि अदृश्य सत्य पाहण्याची क्षमता असलेली व्यक्ती होती.

एका रात्री तीला फोन आला.

"मॅडम, माझा सातवीत शिकत असलेला मुलगा आकाश गेल्या आठ दिवसांपासून गायब आहे. पोलिसांनाही काही सापडलं नाही. शेवटी माझ्या नवऱ्याच्या नकळत तुमच्याकडे आले. त्याच्या जीवाला काही बरं वाईट तर झालं नसेल ना? तो केव्हा घरातून निघून गेला, ते कळले सुद्धा नाही. घरात काहीच असे घडले नाही, की ज्यामुळे तो घरातून निघून जाईल." तो आवाज घाबरलेला होता.

ईशा थोडं शांत राहिली, आणि म्हणाली,

"त्याचा फोटो पाठवा आणि त्याच्या शेवटच्या दिवसाची म्हणजे नाहीसा होण्याआधी तो वापरत असलेली पण आता त्याच्याजवळ नसलेली एखादी वस्तू माझ्याकडे घेऊन या."

दुसऱ्या दिवशी सकाळी, आकाशाची आई एक घड्याळ घेऊन आली. नाहीसा होण्याआधी ते आकाशने त्या दिवशी घातलेलं होतं.

ईशाने घड्याळ हातात घेतलं.

क्षणभरात तिच्या डोळ्यांत काहीतरी चमकलं.

ती कुजबुजली, "तो अजून जिवंत आहे. पण तो अंधारात आहे. पाणी, लोखंड, आणि बंद दरवाजे..."

आकाशची आई हादरली, "पाणी आणि लोखंड?"

ईशा उठली, तिच्या डोळ्यात विचित्र प्रकाश होता.

ती म्हणाली,

"महाबळेश्वरच्या जुन्या धरणाजवळ एक बंद केलेला पंपहाऊस आहे. तिथे आपण जाऊ."

संध्याकाळी पोलिसांसह ते सगळे तिथे गेले.

जुने वापरात नसलेले पंपहाऊस अंधारात बुडालेले होते.

पोलिसांनी टॉर्च लावला आणि तिथे एका कोपऱ्यात एक लाकडी दरवाजा सापडला. तो उघडताच आत पाण्याने ओलसर झालेल्या खोलीत आकाश

दोरखंडाने बांधलेला आणि तोंडावर जाड चिकट पट्टी बांधलेल्या अवस्थेत जिवंत सापडला!

त्याला तिथे कोणी नेले, याबद्दल शोध घेऊनही पोलिसांना कसलाच पुरावा आणि सुगावा लागला नाही. आकाशला पण काहीच आठवत नव्हते की, तो तिथे कसा आला? आजूबाजूला सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा नव्हते. फक्त काही दिवसांपूर्वी मेंदूमध्ये काहीतरी विचित्र हालचाली होत आहेत असे मात्र आकाशला जाणवत होते.

नंतर काही आठवड्यांनी एकदा आकाशची आई ईशाकडे गेली आणि तिने विचारलं, "तुम्ही आकाश कुठे आहे, हे कसं ओळखलंत?"

ईशा फक्त हसली, खिडकीबाहेर धुक्याकडे पाहत म्हणाली,

"मला मागील वर्षाच्या साथीच्या रोगाच्या दरम्यान मेंदूत काही तरी बदल झाल्याचे जाणवले, बरेचदा मेंदू डोक्यात आपली जागा बदलत आहे असा भास झाला, तर कधी वाटायचे मेंदूचा आकार बदलतो आहे. मग नंतर मला काही गोष्टी डोळे बंद करून मनाच्या डोळ्यांनी दिसायला लागल्या. मला काही भविष्यातील घटना सुद्धा दिसतात!"

तेवढ्यात तिचा चेहरा बदलला. आक्रसला. जणू तिला प्रचंड डोकेदुखी होते आहे. ती ओरडली, "बाई, आता तू घरी जा. तुझा पती घरातून कुणालाही न सांगता बाहेर जाण्याचा बेतात आहे"

आकाशाची आई घाबरून म्हणाली,

"मी घरी जाईपर्यंत माझा पती कदाचित घरातून बाहेर निघून जाईल. घरी कोणाला फोन करून सांगावे तर आकाश घरी नाही. पण तुम्हाला जर पुढे काय होणार हे कळत आहे तर माझा पती कुठे जाईल हे मला आधीच सांगा."

ईशाच्या डोक्यातील मेंदू अचानक जोरात आकुंचन आणि प्रसरण पावायला लागला. आकाशच्या आईला काही उत्तर देण्याआधी ती तिच्या खुर्चीवर बेशुद्ध

पडली. तेवढ्यात त्या जुन्या ब्रिटिश-कालीन बंगल्याचा दरवाजा बाहेरून आकाशचे वडील जोरजोरात ठोठावू लागले होते.

अरे हो! सुरुवातीला तुम्हाला मी हे सांगायचे विसरलो की, शास्त्रज्ञांना त्या परग्रहावरच्या विषाणूंबद्दल आणखी एक शंका होती की, ते विषाणू इतके प्रगत आहेत की, विशिष्ट लहरींद्वारे ते एकमेकांशी संपर्क साधू शकतात. पुढे काय झाले? मला आठवत नाही. अरे बापरे! माझ्या मेंदूत उजव्या बाजूला आतमधून काहीतरी वळवळतंय आणि ते मला पुढे तुम्हाला काही सांगू देत नाही आहे, म्हणून मला थांबावे लागणार आहे.

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात.

पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता या जगात नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे.

माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे.

प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.

(हा कथासंग्रह वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया 9763793199 या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

निमिष सोनार यांचे ई साहित्य वरील साहित्य.